# राष्ट्रीय सभा.

## तिची उत्पत्ति व वाढ.

लेखक

गणेश रघुनाथ अभ्यंकर, बी. ए. एल्. एल्. बी.

पुणें येथें

आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन

यांनी छापून प्रसिद्ध केलें.

१९१५

किंमत आठ आणे.

---○◆○---

राष्ट्रीय सभा अस्तित्वांत येऊन तीस वर्षे झालीं. या सभेची हकीकत दर-साल इंग्रजींत प्रसिद्ध होणाऱ्या रिपोर्टांत नमूद केलेली असते. १९१२ सालच्या सभेचा रिपोर्ट मात्र अद्याप प्रसिद्ध झालेला नाहीं. इतर सर्व सालचे रिपोर्ट प्रसिद्ध झाले आहेत. राष्ट्रीय सभेनें वेळोवेळीं Congress Green books म्हणून पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. बाबू गंगाप्रसादवर्मा यानीं १८८९ सालीं India in England या नांवाचीं २ पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत व त्यांत राष्ट्रीय सभेच्या वतीनें विलायतेंत चालविलेल्या चळवळीची माहिती दिली आहे. मद्रासचे मुद्रक व प्रकाशक जी. नटे-सन यांनीं हिंदी राजकारण Indian politics या नांवाचा एक ग्रंथ सन १८९८ सालीं प्रसिद्ध केला आहे. त्यांत बाबू उमेशचंद्र बानर्जी व बॅरिस्टर नार्टन यांनीं राष्ट्रीय सभेच्या उत्पत्तीसंबंधीं थोडी माहिती दिली आहे. पुण्याचे रा. लक्ष्मणराव गोखले वकील यानींही The first twenty years of the Indian National Congress या नांवाचें पुस्तक १९०६ सालीं प्रसिद्ध केलें होतें त्यांत पहिल्या वीस वर्षांतील मंजूर झालेले ठराव व कांहीं मनोरंजक आंकडे व माहिती दिली आहे. मेसर्स नटेसन यानीं १९०९ सालीं Indian Congress या नां-वाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे व १८८५ ते१९०८ पर्यंतच्या अध्यक्षांचीं भाषणें, स्वागत कमिटीच्या चेअरमनचीं भाषणें, सभेंत मंजूर झालेले ठराव, कांहीं थोर लोकांचे राष्ट्रीयसभेबद्दल अभिप्राय दिले आहेत. सर वुइल्यम वेडरबर्न यानीं ह्यूमसाहेबांच्या लिहिलेल्या चरित्रांत राष्ट्रीय सभेची हकीगत दिली आहे. राष्ट्रीय सभेच्या इंग्लं-डांतील 'इंडिया' पत्राच्या फाइलींतून राष्ट्रीयसभेबद्दल वेळोवेळीं पुष्कळ उपयुक्त माहितीचा संग्रह झाला आहे. राष्ट्रीय सभेचे निस्सीम भक्त बाबू

अंबिकाचरण मुजुमदार यानीं The Indian Evolution या नांवाचें नुकतेंच एक पुस्तक इग्रजींत प्रसिद्ध केलें आहे. संकलित रीतीनें राष्ट्रीय सभेच्या उत्पत्तीबद्दल, वाढीबद्दल व तिच्या हल्लींच्या स्वरूपाबद्दल माहिती देणारें पुस्तक मराठींत अद्याप प्रसिद्ध झालें नव्हतें. याच दृष्टीनें राष्ट्रीय सभेच्या तीस वर्षांच्या कामाचा संक्षिप्त इतिहास देण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रीय सभेच्या उत्पत्तीची मीमांसा, तिचा प्रारंभ, तिजबद्दल काढलेले आक्षेप, त्यांचें निरसन, राष्ट्रीय सभेची घटना, ध्येय, स्वराज्याच्या कल्पनेचा विकास, सुराज्याबद्दल चालविलेले प्रयत्न, यशःप्राप्ति, राष्ट्रीय सभेपासून झालेले फायदे, कामाची दिशा, विलायतेंतील खटपट व तेथील कामाचें स्वरूप या सर्व विषयांचा ऊहापोह या पुस्तकांत केला आहे. राष्ट्रीय सभेच्या सर्व अध्यक्षांचे व जनरल सेक्रेटरींचे फोटो देऊन पुस्तक मनोरंजक करण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटीं राष्ट्रीय सभेची घटना, प्रांतिक कांग्रेस कमिटीचे नियम, सरकार व राष्ट्रीय सभा यांचे दरम्यान झालेला पत्रव्यवहार व इतर उपयुक्त माहिती ५ परिशिष्टांत दिली आहे. देशोन्नतीबद्दल आस्था बाळगणाऱ्या सर्व गृहस्थांच्या आदरास हें पुस्तक पात्र होईल अशी उमेद आहे.

सांगली. ता. १८।१२।१५ ग. र. अभ्यंकर

# तिसाव्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष.

मुंबई १९१५.



सर सत्यप्रसन्न सिंह, बार-ॲट-लॉ.

# राष्ट्रीय सभा.

## तिची उत्पत्ति व वाढ.

For freedom's battle once begun
Though baffled oft is ever won.

राष्ट्रीय सभा अस्तित्वांत येऊन आज तीस वर्षें झालीं. सामान्यपणें तीस वर्षांचा काल म्हणजे एक पिढीचा काल समजतात. ज्या कर्तृत्ववान् पुरुषांनीं राष्ट्रीय सभा अस्तित्वांत आणिली व तिला जोमाचें स्वरूप दिलें त्यांतील फारच थोडे आजमितीस हयात आहेत. १८८५ सालीं मुंबई शहरांतच राष्ट्रीय सभा स्थापन झाली, व फिरून तीस वर्षांनीं तिचें चौथ्यांदां मुंबई शहरीं आगमन होत आहे. अशा मंगल प्रसंगीं या संस्थेची उत्पत्ति व वाढ कशी कशी होत गेली याचा इतिहास सर्व राष्ट्रभक्तांस मनोरंजक होईल असें जाणून तो देण्याचा प्रयत्न करीत आहें.

हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें ईस्ट इंडिया कंपनीच्या हातीं असतांना येथील लोकांच्या उन्नतीबद्दल ब्रिटिश मुत्सद्द्यांचें व राजकारणी पुरुषांचें धोरण फार उदारपणाचें होतें. याचें मुख्य कारण ईस्ट इंडिया कंपनीच्या उत्कर्षा-बद्दल त्यांची असहिष्णुता हेंच होय. ईस्ट इंडिया कंपनीचे येथील नोकर अपरिमित संपत्ति मिळवून स्वदेशीं जात व तेथें नबाबाप्रमाणें ऐषआरा-मांत राहात असत व यामुळें पुष्कळांना हेवा उत्पन्न होत असे. तसेंच कंपनीचे अनेक भागीदार व डायरेक्टर्स धनाढ्य होऊन प्रबल झाले होते. पैशाच्या जोरावर पार्लमेंटांतही त्यांचें वजन वाढत होतें व कंपनीस अनेक सवलती ते पार्लमेंटाकडून मिळवून देत असत. या सर्व कारणांमळें बऱ्याच इं-ग्रजी मुत्सद्द्यांना कंपनीच्या वर्चस्वाबद्दल असूया वाटत होती. दर तीस वर्षां-नीं कंपनीला हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविणेबद्दल नवी सनद मिळवावी लागे व ती देतांना हिंदुस्थानांतील लोकांच्या उन्नतीबद्दल कंपनीनें केलेल्या

कामगिरीची पार्लमेंटची कमिटी नेमून कसून चवकशी होत असे, अनेक दृष्टींनीं हिंदुस्थानच्या उन्नतीच्या प्रश्नाबद्दल ऊहापोह होत असे व या चवकशीच्यामुळेंच हिंदुस्थानांतील कंपनीच्या राज्यकारभारावर पार्लमेंटचा मोठा वचक होता. कंपनीचें राज्यकारभाराचें धोरण वेळोवेळीं जें उदारपणाचें होत गेलें याचें सर्व श्रेय पार्लमेंटच्या चवकशीकडे आहे. सामान्यपणें खालीं लिहिलेले सहा सिद्धांत त्या वेळीं ग्राह्य मानिले होते.

१ हिंदुस्थानांतील लोकांचें कल्याण व सौख्य शक्य त्या योगानें वाढविणें हें इंग्लंडचें आद्य कर्तव्य आहे.

२ इंग्लंडची हिंदुस्थानावरील सत्ता कायम ठेवण्यास हिंदुस्थानांतील लोकांस अज्ञानदशेंत ठेवण्याचें मुळींच कारण नाहीं.

३ हिंदुस्थानांतील लोकांस शिक्षण देण्यांत यावें, तें इंग्रजी भाषेच्या द्वारें देण्यांत यावें व इंग्रजी कल्पनांचा सर्वत्र फैलाव करण्यांत यावा.

४ राज्यकारभारामध्यें एतद्देशीय लोकांचा समावेश करावा व प्रामाणिकपणानें व स्वाभिमानानें त्यांना उदरनिर्वाहाचे मार्ग दाखवून द्यावे.

५ सरकारी नोकरींत शिरण्यासंबंधीं एतद्देशीय लोकांच्या मार्गांतील सर्व अडचणी दूर कराव्यात.

६ ब्रिटिश राज्याचें हिंदुस्थानासंबंधीं धोरण सर्वस्वीं न्यायाचें, प्रामाणिकपणाचें व येथील लोकांच्या उन्नतीस सहाय्य करणारें असेंच असावें.

वरील उदात्त तत्त्वांचा अनुवाद सर जॉन शोअर, सर चार्लस ग्रँट, लॉर्ड मोईरा, लॉर्ड हेस्टिंग्स्, माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन, सर जॉन माल-कम, लॉर्ड मेकॉले यांच्या वेळोवेळीं झालेल्या भाषणांतून, कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स् यांच्या खलित्यांतून व सन १८१३ व १८३३ या वर्षीं पास झालेल्या कायद्यांवरून स्पष्टपणें दिसून येत आहे.

या धोरणाप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकांच्या उन्नतीकरितां अमलांत आलेली पहिली सुधारणा म्हणजे येथील लोकांस इंग्रजी भाषेच्या द्वारें विद्यादान देणें, ही होय. इंग्रजी विद्येला कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं

'वाघिणीचें दूध' अशी अन्वर्थक उपमा दिली आहे. या दुग्धामृताचें प्राशन केल्यानंतर येथील लोकांत नवा उत्साह, नवीन तेज, नवीन स्फूर्ति उत्पन्न झाल्यास त्यांत मुळींच आश्चर्य नाहीं.

इंग्रजी विद्येच्या अध्ययनानें व पाश्चिमात्य देशांच्या व तेथील संस्थांच्या इतिहासाच्या परिशीलनानें हिंदुस्थानांतील तरुणांस राजा व प्रजा यांचे हक्क समजूं लागले, अनियंत्रित राजसत्तेचे तोटे त्यांचे नजरेस आले, स्वतंत्रतेच्या कल्पना स्पष्टपणें कळूं लागल्या. स्वातंत्र्याकरितां ब्रिटिश जनतेनें केलेला व चालविलेला झगडा त्यांच्या निदर्शनास आला. व्यक्तिस्वातंत्र्याचें हृद्गत उमजूं लागलें. राजकीय उन्नतीची परमावधि त्यांना दिसूं लागली. सापेक्षत्वानें व तुलनेनें येथील स्थितीचें त्यांस आकलन करतां येऊं लागलें. देशाच्या अधोगतीचें चित्र हृत्पटलावर प्रतिबिंबित झालें. कर्तव्याची अंतःस्फूर्ति उत्पन्न झाली. उन्नतीची महत्त्वाकांक्षा उद्भवूं लागली. स्वाभिमानाचें नवीन वारें त्यांच्यामध्यें संचार करूं लागलें. सारांश, राष्ट्रोन्नतीच्या कल्पना मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभ्या राहूं लागल्या. इंग्रजी शिक्षणाचा हा परिणाम देशांतील तरुणांवर होईल, हें भाकीत त्यावेळच्या चाणाक्ष इंग्रजी मुत्सद्द्यांनीं केलेंच होतें. साठ वर्षांपूर्वी इंग्रजी शिक्षणास सुरुवात करतांना किती उदार बुद्धीनें या प्रश्नाकडे इंग्रज लोक पहात असत हें मनन करण्यासारखें आहे. ना. गोखले यांस मि. हागसन प्रचाट यांनीं लिहिलेल्या एका पत्रांत खालीं लिहिलेले उद्गार काढले आहेः—

Indian youths would be brought up to admire our doctrines of political liberty, popular rights and national independence. Nor could it ever have been supposed that these lessons would fall upon deaf ears and cold hearts. On the contrary the inevitable result of such teaching was clearly perceived by the Government of those days and was regarded in a generous spirit. In support of this assertion I may mention that at the time of the inauguration of these measures I accompanied the

then Lieut.-Governor of Bengal Sir Frederic Haliday on one of his winter tours through the province. Naturally he called the attention of those, who attended the public meetings held by him, to the new education policy and he always took occasion to declare that the schools would promote one of the leading purposes of the British rule which was to **prepare the people for self-Government**. It certainly was not supposed that at any subsequent time a policy would be adopted which would disappoint the legitimate hopes thus created.

इंग्रजी शिक्षणानें येथील लोकांस स्वराज्यास लायक करावयाचें आहे हा त्या वेळचा हेतु व या हेतूविरुद्ध कोणतेंही कृत्य पुढें केलें जाणार नाहीं ही त्या वेळची भावना साठ वर्षांनंतरही अँग्लो-इंडियन मुत्सद्द्यांकडून कितपत यथार्थपणें पाळली जात आहे याचा अधिकारी वर्ग व प्रजाजन यांपैकीं प्रत्येकानें आपल्या मनाशीं विचार करावा. इ. सन १८५८ सालीं सर्वत्र शांतता स्थापित झाल्यानंतर कंपनीचा राज्यकारभार राणीसरकारानीं आपल्या ताब्यांत घेतला. आपल्या जाहिरनाम्यानें पूर्वीं दिलेलीं सर्व आभिवचनें त्यानीं कायम ठेऊन हिंदुस्थानच्या लोकांना समतेनें वागविण्याचें नवें आश्वासन दिलें. विश्वविद्यालयांची स्थापना झाली. उच्च शिक्षणाचा फैलाव झाला. वरिष्ठ प्रतीच्या नोकऱ्यांवर सुशिक्षित लोकांची नेमणूक होऊं लागली. संख्येच्या मानानें अल्प असल्यामुळें सुशिक्षित लोकांचें त्या वेळीं कौतुक व गौरव होऊं लागलें, व पाश्चात्य संस्कृतीचा लखलखाट पाहून सुशिक्षित वर्गाच्या पहिल्या पिढीचे डोळे दिपून गेले. याप्रमाणें १८७५ चे सुमारास स्थिति होती.

## पूर्व तयारी.

या संधीस लॉर्ड लिटन यांची कारकीर्द सुरू झाली. लिटनसाहेबांचें धोरण हिंदुस्थानांतील लोकांच्या उन्नतीच्या विरुद्ध होतें. जात्या कान्सरव्हेटिव असून ब्रिटिश राजसत्ता केवळ इंग्लंडांतील लोकांच्या उन्नतीसाठींच अस्तित्वांत आली आहे असें प्रतिपादणाऱ्या स्वार्थपरायण इंग्रजी मुत्सद्द्यांच्या ( Imperialists ) सहवासांतच ते वाढले होते. हिंदुस्थानां-

तील लोकांस उदार मनानें वागवून, सहानुभूतीनें त्यांची उन्नति करावी ही कल्पना लिटनसाहेबांच्या कधीं स्वप्नींही आली नाहीं. त्यांच्या अमदानींत व्हर्न्याक्युलर प्रेस ॲक्टाच्यायोगानें एतद्देशीय वर्तमानपत्रांचीं तोंडें बंद करण्यांत आलीं. हत्याराच्या कायद्यानें गरीब प्रजेस निःशस्त्र करण्यांत आलें; हिंस्र श्वापदांपासून सुद्धां आपले प्राण किंवा आपली मालमत्ता-यांचें संरक्षण त्यांस करतां येईनासें झालें. १८३३ किंवा १८७० या सालीं पास झालेल्या कायद्यांस बाजूला ठेवून इंग्लडांतील सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेस एतद्देशीय लोकांना बसूं देऊं नये अशी लिटनसाहेबांनीं शिफारस केली. पार्लमेंटनें ती मंजूर केली नाहीं; परंतु त्याचा परिणाम सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेचें वय एकोणीसांवर येऊन बसलें व त्यामुळें एतद्देशीय लोकांस त्या परीक्षेस जाणें अशक्य झालें. Statutory service या नांवाचा सिव्हिल सर्व्हिसपेक्षां कमी दर्जाचा 'नोकरांचा वर्ग' तयार करण्यांत आला. वरिष्ठ शिक्षणाबद्दल लिटनसाहेबांनीं आपलें धोरण उघडपणें विरोधाचें स्वीकारलें. दिल्ली कॉलेज व बनारस इंग्लिश कॉलेज हीं बंद करण्यांत आलीं. सरहद्दीवर अफगाणिस्थानशीं निष्कारण लढाई सुरू केली. लक्षावधि रुपये या कामीं खर्च केले. मिठावरील कर वाढविला. १८७७ त सर्व देशभर भयंकर दुष्काळ पडला. हजारों लोक मृत्युमुखीं पडले. दुष्काळनिवारणाची व्यवस्था अत्यंत निर्घृणतत्त्वानुसारी करण्यांत आली; सारांश, सर्व लोक गांजून गेले. १८८० सालीं लिटनसाहेब स्वदेशीं परत गेल्यानंतर इंग्लंडांत निवडणुकीची धामधूम चालू झाली. लॉर्ड बीकन्सफील्ड यांची कारकीर्द संपून लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला व ग्लॅडस्टन साहेबांचें मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलें. या वेळीं पार्लमेंटापुढें आपलीं सर्व गाऱ्हाणीं मांडण्याकरितां पुणें येथील नागरिकांनीं सार्वजनिक सभेच्या विद्यमानें पार्लमेंटास एक अर्ज सादर केला. त्या अर्जांत हिंदुस्थानांतील तत्कालीन स्थितीचें अत्यंत मुद्देसूद वर्णन केलें आहे व त्यावरूनच १८८० सालच्या देशांतील स्थितीचें बरोबर आकलन करतां येतें. त्या अर्जाचा सारांश पुढें दिल्याप्रमाणें आहे. " १८३५ सालीं दिलेला मुद्रणस्वातंत्र्याचा

हक्क लिटनशाहींत एका दिवसांत नाहकपणें काढून घेण्यांत आला आहे. हत्यारांच्या कायद्यामुळें लोकांस निःशस्त्र केलें आहे. सिव्हिल सर्व्हिसची वयोमर्यादा कमी करून हिंदुस्थानांतील लोकांना या परीक्षेस बसणें अशक्य केलें आहे, व एतद्देशीय लोकांकरितां कमी दर्जाचा नोकरीचा वर्ग काढला आहे. हिंदुस्थानच्या उत्पन्नाचा गैरशिस्त कारणांकडे उपयोग करून देशांतील कर्जाचें ओझें सुमारें तीन कोटींनीं वाढविलें आहे. पार्लमेंटच्या आश्वासनांस बाजूस ठेवून कराचा बोजा वाढविण्यांत आला आहे. दुष्काळानें लोकांची उपासमार होत असतांना मिठावरील कर शेंकडा ४० टक्क्यांनीं वाढविला आहे. बंगालखेरीज इतर प्रांतांतून कायम धाऱ्याची पद्धत अमलांत आणण्याचीं आश्वासनें दिलीं असून त्याबद्दल यत्किंचित्‌ही तजवीज झालेली दिसत नाहीं. देशांत भयंकर दुष्काळ पडला असून साऱ्याची तहकुबी किंवा माफी मुळींच देण्यांत आलेली नाहीं, व साऱ्याची बाकी सक्तीनें वसूल करण्यांत आलेली आहे. दुष्काळ-निवारणाकरितां म्हणून नित्राण झालेल्या लोकांवर नवीन करांचें ओझें लादण्यांत आलेलें आहे. अशा रीतीनें उभारलेल्या फंडाचा विनियोग दुष्काळ निवारण्याकडे न करतां अफगाणिस्थानच्या लढाईमुळें तिजोरीस आलेली तूट भरून काढण्यांत केला आहे. भ्रामक आंकडे देऊन जमाखर्चाची स्थिति समाधानकारक आहे असें दाखविण्याचा खोडसाळ प्रयत्न केला आहे. हिंदुस्थानच्या हिताशीं यत्किंचित्‌ही संबंध नसलेल्या सरहद्दीवरील लढाया व आगगाड्या यांजवर गरीब रयतेचे पैसे कर वाढवूनही खर्च करण्यांत आले आहेत व उपयुक्त सुधारणा या सबबीवर मागें टाकण्यांत आलेल्या आहेत. साम्राज्याच्या हिताकरितां केलेल्या लढायांचा खर्च एकट्या हिंदुस्थानवर लादला आहे. लोकांचे पुढारी दाद मागण्याकरितां गेले असतां व्हाइसरॉयांनीं त्यांस उद्दामपणानें वागवून त्यांची गांठही घेतलेली नाहीं व असें करून प्रजेस दाद मागण्याचा राजमान्य मार्गही Right of petition नाहींसा केला आहे. एतद्देशीय संस्थानांवर करांचें ओझें लादण्यांत आलें आहे व त्यांचें सैन्य साम्राज्यास अपायकारक आहे या

सबबीवर कमी करण्यांत आलें आहे. हिंदुस्थानांतील राज्यकारभाराचें धोरण दिवसेंदिवस बेपर्वाईचें व स्वैरवृत्तीचें होत चाललें आहे. कायदे-कौन्सिलांतून सभासदांच्या जागा नालायख लोकांस देऊन कौन्सिलाचें स्वातंत्र्य कमी करण्याचा प्रयत्न होत आहे, व महत्वाचे प्रश्न लोकांना विचार करण्यास यत्किंचितही अवसर न देतां घाईनें निकाल करण्यांत येत आहेत. न्यायाच्या कोर्टांचें स्वातंत्र्य कमी होत असून अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचें स्तोम वाढत आहे. वरिष्ठ शिक्षणास यत्किंचितही उत्तेजन मिळत नसून खुद्द व्हाइसरॉय साहेबांनीं वरिष्ठ शिक्षणाचे विरुद्ध आपण आहों असें जाहीर केलें आहे. जमिनीवरील सारा रिव्हिजन सर्वमध्यें गैरशिस्त रीतीनें वाढविण्यांत आला आहे. दुष्काळाच्या वेळीं सारा सक्तीनें वसूल करण्यांत आला व स्थानिक अधिकाऱ्यांनीं पसंत केलें असूनही साऱ्याच्या सुटीचें मागणें वरिष्ठ सरकारनें नामंजूर केलें आहे. जंगलखात्याच्या वाढीमुळें हजारों गुरांचीं गायरानें नाहींशीं होऊन शेतकऱ्यांना फार अडचणी सोसाव्या लागत आहेत. तीन वर्षांच्या दुष्काळामुळें देशाची स्थिति फार नित्राण झाली आहे. सरकारी किंवा बिनसरकारी लोकांनीं दिलेला प्रजेच्या हिताबद्दलचा सल्ला वरिष्ठ सरकारकडून सर्वस्वीं फेंटाळण्यांत येत आहे.”

सदरच्या अर्जांतील वरील हकीकतीवरून देशांत लिटनसाहेबांच्या कारकीर्दीमुळें किती अस्वस्थता उत्पन्न झाली होती याची स्पष्ट कल्पना वाचकांस येईल. त्या वेळीं पार्लमेंटांत प्रो. फॉसेट हे ‘हिंदुस्थानचे वाली’ ह्मणून नामांकित होते व त्यांच्याशिवाय मि. ल्यँग, सर जॉर्ज बालफर, जेम्स स्टेन्सफील्ड, ओडोनेल, बॅक्स्टर रीड इत्यादि हिंदुस्थानचे हितचिंतक पार्लमेंटांत असल्यामुळें त्यांनाही या अर्जाबद्दल दाद मागण्यासाठीं विनंति करण्यांत आलेली होती. या अर्जावरून हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोकमत कसें होतें हें दिसून येईल. वरिष्ठ सरकारच्या उपरिनिर्दिष्ट धोरणामुळें हिंदुस्थानांतील जनतेमध्यें असंतोष उत्पन्न झाला होता.

## थोडेंसें मागें.

१८६४ च्या सुमारास अमेरिकेंतील लढाईमुळें शेंकडों व्यापाऱ्यांचीं दिवाळीं निघालीं होतीं. कापसाच्या सट्ट्यांनीं हजारों लोक निर्धन झाले होते व व्यापारास जबरदस्त धक्का बसला होता. १८७९ च्या सुमारास स्कॉटलंडांतील सिटी ऑफ् ग्लॉसगो या नामांकित पेढीनें दिवाळें काढलें व त्याचा परिणाम सर्वत्र होऊन शेंकडों ठेवीवाल्यांचें नुकसान झालें. १९१४ सालच्या ब्यांकांच्या दिवाळखोरपणासारखाच प्रकार ७९ सालीं मुंबईंत दिसून आला. नरशी केशवजी सारख्या पुष्कळ प्रसिद्ध पेढ्या मुंबईंत बंद झाल्या व त्याचा परिणाम देशांतील व्यापारधंद्यावर स्पष्टपणें दिसून आला. पतीवरील देवघेव मर्यादित झाली. पैशाची टंचाई सर्वत्र भासूं लागली. शेतकीशिवाय लोकांस तरणोपाय उरला नाहीं. रोखीनें सरकारी सारा देणेची पद्धत अगदीं नवीन असून ती शेतकऱ्यांच्या अंगवळणीं पडलेली नव्हती. व्यापारमंदीमुळें नियमितपणें सरकारी सारा भागविणें अगदीं दुरापास्त होई. जमीनमहसुलाच्या कायद्यामुळें नियमित वेळीं सारा देणें शेतकरी वर्गास फार जाचूं लागलें. सावकारांच्या दारांत गेल्याशिवाय त्यास गत्यंतर उरलें नाहीं, व सावकार मागेल तें व्याज देणें त्यास भाग पडे. सरकारी कोर्टें व अंमलबजावणीचे कायदेही त्या वेळीं फार कडक होते. शेतकऱ्यांस ऋणमुक्त करण्याबद्दल ज्या अनेक सवलती हल्लींच्या कायद्यांतून दिसून येतात त्या त्या वेळीं अस्तित्वांत नव्हत्या व त्यामुळें शेतकऱ्यांची फार हलाखी होती. आगगाड्या वगैरे प्रवासाच्या साधनांमुळें दाणागोट्याचा संचय नाहींसा होऊं लागला व विशेषेंकरून १८७८ च्या सुमारास जो भयंकर दुष्काळ सर्वत्र पसरला त्यायोगानें शेतकरीवर्ग अगदींच थकून गेला. दंगेधोपे करण्यापर्यंत त्याची मजल येऊन ठेपली. महाराष्ट्रांत तर कांहीं ठिकाणीं स्वस्थतेचाही भंग झाला. दुष्काळनिवारणार्थ उपाय व ऋणविमोचनाची योजना अमलांत आणण्याची आवश्यकता भासूं लागली. याप्रमाणें देशांतील आधारस्तंभ असलेला शेतकरीवर्ग व

# राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष.



उमेशचंद्र बॅनर्जी

मुंबई १८८५. अलाहाबाद १८९२.



दादाभाई नौरोजी

कलकत्ता १८८६. लाहोर १८९३.

कलकत्ता १९०६.



बद्रुद्दीन तय्यबजी—मद्रास १८८७



जार्ज यूल—अलाहाबाद १८८८.

सामान्य जनता यांच्यामध्यें तीव्र असमाधान उत्पन्न झालें होतें. १८८० सालीं हिंदुस्थानांतील सांपत्तिक स्थिति कशी होती याचें त्या वेळीं एका मार्मिक लेखकानें केलेलें वर्णन विचार करण्यासारखें आहे. "गेल्या दहा वर्षांत ५० लक्ष लोक दुष्काळ व उपासमार यांमुळें मृत्यु पावले. परकीय व्यापारामुळें उद्योगधंदे बंद होऊन परकीय देशांस कच्चा माल पुरविण्याचें काम आपल्याकडे राहिलें आहे. जमिनीची किंमत कमी होत असून तिचें उत्पन्नही खालावत आहे. जीवनार्थ कलह फार तीव्र भासत असून लक्षावधि लोकांस मोठ्या कष्टानें चरितार्थ चालवितां येतो. देशांत साक्षरतेचें प्रमाण अगदींच कमी आहे. ललितकला, वाङ्मय यांची वाढ मुळींच होत नाहीं. देशांतील लोकांना मुलांसारखे समजून त्यांचा कोणत्याही बाबतींत सल्ला घेतला जात नाहीं. सत्ताधारी लोक प्रजेपासून शक्य तितके फटकून वागतात. वर्तमानपत्रें बंद केलीं आहेत. लोकांस निःशस्त्र केलें आहे व स्थानिक आरोग्याच्या बाबतींतसुद्धां त्यांना कोणत्याही प्रकारचें स्वातंत्र्य नाहीं. आयात व निर्गत व्यापार, दलालीचा धंदा, ब्यांका हे सर्व परकीयांच्या हातीं असून सरकारास उपयोगी पडणारा सर्व माल परदेशांतून येतो. देशांतील लोक नित्राण झाले आहेत व पदोपदीं तेजोभंग होत असल्यामुळें त्यांच्यांत कोणतीच महत्वाकांक्षा उरली नाहीं व देशाच्या उन्नतीचा प्रश्न फार भेसूर दिसत आहे."

## साम्य.

व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या आयुष्यक्रमांत फरक पडण्यास कांहीं अननुभूत प्रसंग यावे लागतात. अशाच प्रकारचा अनुभव १८७५ पासून १८७९ पर्यंत लॉर्ड लिटनसाहेबांच्या अनुदार व बेपर्वाई वर्तनामुळें येथील लोकांस प्राप्त झाला. सर्व राष्ट्राचा संतोष संपादन करण्याचें पुण्य ज्याप्रमाणें लॉर्ड रिपन, लॉर्ड मोर्ले, लॉर्ड मिंटो किंवा लॉर्ड हार्डिंज यांसारख्या असामान्य व लोकोत्तर महाभागांस संपादन करतां येतें, त्याप्रमाणेंच सर्व राष्ट्राचा क्षोभ उत्पन्न करण्याचें अपेशही मनुष्यकोटींतील लॉर्ड कर्झन किंवा लॉर्ड लिटन यांसारख्या अद्वितीय व्यक्तींनाच मिळवितां

येतें. लॉर्ड कर्झनसाहेबांच्या कारकीर्दीनें जो असंतोष उत्पन्न केला व ज्याचीं कटुफळें आपण अद्यापि अनुभवीत आहों अशाच प्रकारचा असंतोष सर्व देशभर लॉर्ड लिटनसाहेबांच्या कारकीर्दीमुळें तेव्हां पसरून गेला. दोघांच्याही कारकीर्दींत अविश्वासाचें एकच प्रतिगामी धोरण होतें. लिटनसाहेबांनीं उच्च शिक्षणाची हेटाळणी केली व विश्वविद्यालयास नांवें ठेविलीं, व सर्व विद्यासंस्था Educational hotbeds and forcing houses आहेत असे कुत्सितपणाचे आरोप केले. कर्झनसाहेबांनीं विश्वविद्यालयांचे हक्क मर्यादित करून त्यांस सरकारच्या ताटाखालील मांजरें करण्याचा प्रयत्न केला. लिटनसाहेबांनीं मुद्रणस्वातंत्र्यावर गदा घालून एतद्देशीय वर्तमानपत्रांची मुस्कुटदाबी केली. लॉर्ड कर्झनसाहेबांनीं राजद्रोहाच्या नांवाखालीं अनेक वर्तमानपत्रकारांस अडचणींत आणलें. लिटनसाहेबांनीं राणीच्या जाहिरनाम्यास बाजूस ठेवून व १८३३ च्या कायद्यास झुगारून देऊन एतद्देशीय लोकांकरितां कमी दर्जाची व कमी योग्यतेची Statutory Service उत्पन्न केली. कर्झनसाहेबांनीं राणीचा जाहिरनामा म्हणजे एक अशक्य सनद आहे असें तिरस्कारबुद्धीनें जाहीर केलें. लिटनसाहेबांनीं अफगाणिस्थानसारख्या देशांतील हिंदुस्थानाशीं संबंध नसलेल्या राजकारणांत पडून हिंदुस्थानचा पैसा व सैन्य निष्कारण खर्चीं घातलें. कर्झनसाहेबांनींही तिबेटच्या मोहिमेंत हिंदुस्थानच्या पैशाचा चुरा केला व हिंदुस्थानांतील सैन्य या 'शांततेच्या' मोहिमेंत व्यर्थ शिणविलें. सर्वत्र दुष्काळ पडला असतां व अन्नान्न करून लोक मरत असतांना लिटनसाहेबांनीं दिल्लीस, केवळ आपली बडेजाव करण्याकरितां दरबार भरविला व रयतेचे पैसे नाहक खर्च केले. कर्झनसाहेबांनींही दुष्काळामुळें सर्वत्र विपन्नावस्था दिसत असूनही हिंदुस्थानांतील गरीब रयतेच्या पैशानें दिल्लीस दरबार भरवून आपली हत्तीवरून मिरवणूक काढली. लिटनसाहेबांनीं हिंदुस्थानांतील प्रजेस निःशस्त्र करण्याचा कायदा करून येथील लोकांबद्दल संपूर्ण अविश्वास व्यक्त केला. कर्झनसाहेबांनींही असल्याच अविश्वासाच्या धोरणामुळें लोकांच्या हक्कास

आळा घातला. लिटनसाहेबांनीं सुशिक्षित लोकांचा अपमान करून त्यांची भेट घेण्याची किंवा त्यांच्या द्वारें लोकांचीं दुःखें समजावून घेण्याची पर्वा केली नाहीं. तसेंच व तितक्याच अरेरावीपणानें कर्झनसाहेबांनींही राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांची मुलाखत घेतली नाहीं. प्रजेस नाउमेद करण्याचा, लोकांचे हक्क मर्यादित करण्याचा, अविश्वासामुळें जनतेशीं बेपर्वाईनें वागण्याचा व हिंदुस्थानांतील लोकांचा तेजोभंग करण्याचा लिटनसाहेबांचा कित्ता कर्झनसाहेबांनीं पुरा गिरविला. लिटनसाहेबांच्या कारकीर्दीपासून जो राष्ट्रक्षोभ उत्पन्न झाला, तोच क्षोभ राष्ट्रीय सभेचें बीजारोपण करण्यास प्रधान कारण होय. या क्षोभामुळें राष्ट्रीय चैतन्य प्रज्वलित झालें व राष्ट्रीय सभेच्या द्वारें तें दृश्यमान झालें. लॉर्ड कर्झनसाहेबांच्या धोरणाचा परिणाम तशाच प्रकारचा किंबहुना जास्त घोरतर स्वरूपाचा झाला हें सर्वांस माहीतच आहे.

लॉर्ड लिटनसाहेबांस, कदाचित् या घोर निद्रेंत पडलेल्या देशास प्रबुद्ध करण्याकरितांच, ईश्वरी संकेतानें येथें पाठविण्यांत आलें असेल. पुष्कळ वेळां महान् संकटांतून किंवा अनर्थांपासून अमोप कल्याण घडून येतें तसाच कांहीं प्रकार या प्रसंगींही घडून आला आहे. समान दुःखामुळें, किंवा समान जाचामुळें सचेतन समाजांत जीवाची एकरूपता होते; विद्युत्संदेशाप्रमाणें सर्वत्र एकतानता दृष्टीस पडते. लिटनसाहेबांच्या सर्वव्यापी दडपशाहीच्या धोरणामुळें सर्वत्र उद्वेग, संताप व अस्वस्थपणा उत्पन्न झाला व यापासूनच एकराष्ट्रीयत्वाची कल्पना मूर्तपणें प्रादुर्भूत झाली. उत्क्रांतीच्या दृष्टीनें कोणताही परिणाम घडून येण्यास कारणांचा समुच्चय असावा लागतो. राष्ट्रीय सभेसारखी संस्था एखाद्या व्यक्तीच्या कल्पनातरंगापासून उद्भवली नाहीं किंवा यदृच्छेनें ती निर्माण झाली नाहीं. अशा तऱ्हेची अत्यंत महत्त्वाची संस्था जिला "राष्ट्रजननी" असें अन्वर्थ नामाभिधान दिलें आहे, ती अस्तित्वांत येण्यास कोणती कारणपरंपरा देशांत प्रचलित होती याचा येथपर्यंत विचार केला आहे.

## नवीन मनु.

लिटनसाहेब गेल्यानंतर लॉर्ड रिपन हिंदुस्थानचे व्हाइसरॉय झाले व नवीन मनूस प्रारंभ झाला. रिपनसाहेबांनीं अफगाणिस्थानची लढाई संपवून टाकिली व यासंबंधीं हिंदुस्थानास योग्य मदत साम्राज्यसरकाराकडून देवविण्याचा प्रयत्न केला. वर्तमानपत्रांचा कायदा रद्द केला. मिठावरील कर कमी केला. वरिष्ठ शिक्षणाला उत्तेजन दिलें. एज्युकेशन कमिशन नेमून प्राथमिक व उच्च प्रकारचें शिक्षण वाढविण्याची खटपट केली. खासगी शिक्षणसंस्थांना उत्तेजन देण्याचा क्रम सुरू झाला. स्थानिक स्वराज्यसंस्था आस्तित्वांत आणून म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें स्थापन केलीं. निर्भीड व स्वतंत्र विचारांच्या लोकांच्या पुढाऱ्यांस कायदे कौन्सिलांत नेमण्याचा परिपाठ घातला. वरिष्ठ प्रतीच्या जागांवर एतद्देशीय लोकांस नेमण्यास सुरुवात झाली. बंगालच्या चीफ जास्टिसच्या जागीं प्रथमतः तात्पुरती कां होईना हिंदी गृहस्थाची नेमणूक करण्यांत आली. देशांत तयार होणारा माल सरकारी खात्यांना जो लागत असेल तो अवश्य विकत घेण्यांत यावा असा ठराव करण्यांत आला. व्हिक्टोरिया स्कॉलरशिप्सच्या रूपानें शिष्यवृत्ति देऊन हिंदी लोकांस वाकबगार करण्याचे प्रयत्न सुरू झाले. प्रांतिक करारास व्यवस्थित स्वरूप देऊन जमाबंदीची योग्य शिस्त लाविली. शेतकीच्या खात्याचें पुनरुज्जीवन केलें. शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनाकरितां कायदा करण्यांत आला. दुष्काळाचे वेळीं साऱ्याच्या तहकुबीचे व माफीचे नियम करून सदर बाबतींत पुष्कळ सवलती देण्यांत आल्या. ज्यूरीच्या पद्धतीचा फैलाव केला. दुष्काळनिवारणार्थ उभारलेल्या फंडाची व्यवस्था केली. याप्रमाणें लोकहिताच्या अनेक प्रश्नांत लक्ष्य घालून उदारबुद्धीनें व सहानुभूतीनें लोकांचें व्हाइसरॉयनीं सांत्वन केलें. राणीसरकारच्या जाहिरनाम्यावरील लोकांचा विश्वास दृढतर केला. दीर्घकाल अवर्षणानंतर मेघवृष्टि झाली असतां ज्याप्रमाणें सर्वत्र प्रसन्नता उत्पन्न होते, त्याचप्रमाणें लिटन-

शाहीच्या संतापामुळें त्रस्त झालेले लोक रिपनसाहेबांच्या उदार व प्रेमळ कारकीर्दीनें संतुष्ट झाले व सर्वत्र शांतता व समाधान दिसूं लागलें.

## इलबर्ट बिल.

लॉर्ड रिपनसाहेबांच्या कारकीर्दींत ज्या एका कायद्याच्या बिलानें सर्व अँग्लो-इंडियन समाज चवताळून गेला तें फौजदारी काम चालविण्याच्या कायद्याच्या दुरुस्तीचें बिल ( Criminal Procedure Amendment Bill) होय. या कायद्यचा पूर्व इतिहास लक्षांत ठेवण्यासारखा आहे. हिंदुस्थानांत ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता सुरू झाल्यापासून युरोपियन लोक नोकरीच्या नात्यानें, व्यापाराच्यासंबंधानें व वसाहतीच्या उद्देशानें येथें येऊन राहूं लागले. त्यांचा व्यवहारांत एतद्देशीय लोकांशीं वरचेवर संबंध येऊं लागला. दिवाणी व फौजदारी दोन्ही प्रकारचे लढे उत्पन्न होऊं लागले व त्यांचें नियमन करणें त्या त्या वेळच्या सत्ताधारीवर्गास भाग पडलें. १७८७ सालीं कोणत्याही युरोपियन प्रजाजनास येथें स्थाईक रहावयाचें झाल्यास कंपनीनें स्थापन केलेल्या दिवाणी कायद्यानें आपण बांधले आहों असा लेख त्यास लिहून द्यावा लागे. त्याशिवाय त्यास येथें राहून व्यापार करण्याची परवानगी दिली जात नसे. दिवाणी कोर्टांचे येथील अधिकारी आरंभीं युरोपियनच होते. परंतु शिक्षणाचा प्रसार जसजसा या देशांत वाढूं लागला तसतसा एतद्देशीय लोकांचा समावेश दिवाणी खात्यांत हुद्यांच्या जागीं होऊं लागला. १८३६ सालीं दिवाणी काम करण्याचा कायदा अस्तित्वांत आला व या कायद्याच्या योगानें हिंदुस्थानांतील सर्व लोकांवर-मग ते कोणत्याही जातीचे असोत-दिवाणी कोर्टांची हुकमत प्रस्थापित झाली. युरोपियन ब्रिटिश प्रजाजनसुद्धां या कायद्याच्या मर्यादेंत आले; त्या वेळीं सुद्धां या कायद्याबद्दल युरोपियन प्रजेनें अतिशय गिल्ला केला, जोराची चळवळ चालविली, वर्तमानपत्रांतून घाणेरडे लेख प्रसिद्ध केले

व एका अविचारी वक्त्यानें तर हा कायदा सुचविणारे हिंदुस्थान सरकारचे मंत्री लॉर्ड मेकाले यांचे अंगाची चामडी लोळवावी असें उघडपणें बोलून दाखविलें. या कायद्यास **काळा कायदा** ( Black Act ) असें निंदाव्यंजक नांव युरोपियन प्रजाजनांनीं दिलें होतें. या वेळीं युरोपियन लोकमताची स्थिति कशी होती याचें वर्णन मि. वुइलियम टेलर यानीं खालीं लिहिल्याप्रमाणें केलें आहे:—

The Black Act was the cause of an agitation which may fairly be said to have convulsed Indian Society for a time. Several barristers took the lead. Public meetings were called; scurrilous articles filled the columns of the daily journals. One impassioned orator hinted that Mr. Macaulay the legal member of Council ought to be lynched at very least.

अशा स्थितींतही हिंदुस्थानसंबंधीं पार्लमेंटच्या उदार धोरणास अनुसरून हा कायदा पास झाला व तोच आज मित्तीस देशांत चालू आहे. याप्रमाणें दिवाणी कायद्याच्या बाबतींत तरी हिंदी व युरोपियन प्रजाजन यांचेमधील विषमता नाहींशी झाली.

फौजदारी कायद्यासंबंधानें असे निर्बंध होते कीं, युरोपियन प्रजाजनानें कोणताही गुन्हा कोठेंही केला तरी त्याची चवकशी सरकारच्या वरिष्ठ कोर्टांनींच करावी. सरकारचीं वरिष्ठ फौजदारी कोर्टें इलाख्याच्या राजधानींतच होतीं. यामुळें युरोपियन प्रजाजनानें, राजधानीबाहेर देशांत कोठेंही गुन्हा केला तरी त्याची चवकशी फौजदारी वरिष्ठ कोर्टांत म्हणजे अदालतींत व्हावी लागे. अर्थात् ही चवकशी फार दिरंगाईची, खर्चाची व त्रासाची असून पुष्कळ वेळां युरोपियन अपराधी असला म्हणजे प्रजेस न्याय मिळणें जवळ जवळ अशक्य होई. कोर्टांच्या या मर्यादित स्थलसीमेमुळें युरोपियन गुन्हेगारांस बहुतेक गुन्ह्यांची माफी असल्याप्रमाणेंच स्थिति झाली होती. १८४९ सालीं लॉर्ड डलहौसी यानीं या कायद्यांत दुरुस्ती करण्याचा एक मसुदा तयार केला होता. या कायद्यानें कलकत्ता, मद्रास व मंबई या शहरांबाहेर राहणाऱ्या सर्व गुन्हेगार

युरोपियन प्रजाजनांवर कंपनीनें स्थापन केलेल्या सर्व फौजदारी कोर्टें व मॅजिस्ट्रेट-यांचा अंमल चालावा असें सुचविण्यांत आलें होतें. मॅजिस्ट्रेट किंवा सेशनजज्ज युरोपियन प्रजाजन असला पाहिजे असा निर्बंध या मसुद्यांत घातला नव्हता. परंतु फौजदारी कायदा ( Penal Code ) मंजूर होईपर्यंत हा मसुदा तहकूब ठेवावा असें तेव्हां ठरलें. लॉर्ड क्यानिंग हे व्हॉइसरॉय असतांना १८५७ सालीं हाच प्रश्न पुन्हां कायदे कौंसिलपुढें आला होता व त्याचें स्वरूपही डलहौसी यांच्या मसुद्याप्रमाणेंच होतें; परंतु त्या वेळीं तो मंजूर झाला नाहीं. १८५८ सालीं कंपनीचा राज्यकारभार राणी-सरकारकडे गेला व या काळापासून १८७२ पर्यंत आस्तित्वांत असलेल्या कायद्यानें गुन्हेगार युरोपियन प्रजाजनांची चवकशी कलकत्ता, मद्रास, मुंबई येथील हायकोर्टांस व अलाहाबाद व लाहोर येथील वरिष्ठ कोर्टांसच करितां येत असे, या कोर्टांचा न्यायाधीश कोणत्याही जातीचा असला तरी त्यास गुन्हेगार युरोपियन प्रजाजनांची चवकशी करण्याचा अधिकार होता. तसेंच राजधानींच्या गांवांतून असलेल्या प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटांस मग ते कोणत्याही जातीचे असोत, युरोपियन गुन्हेगारांची चवकशी करण्याचा अधिकार असे. १८७२ सालीं मंजूर झालेल्या कायद्यानें इलाख्याच्या इतर भागांत म्हणजे जिल्ह्यांतून गुन्हेगार युरोपियन प्रजाजनाची चवकशी करण्याचा अधिकार युरोपियन सेशनजज्जास, तीन वर्षांच्या अनुभवाच्या व सरकारनें या बाबतींत विशेष अधिकार दिलेल्या युरोपियन असिस्टंट सेशन जज्जास किंवा कोणत्याही पहिल्या वर्गाच्या युरोपियन मॅजिस्ट्रेटास देण्यांत आला. या कायद्यानें सिव्हिल सर्व्हिसमधील एतद्देशीय असिस्टंट जज्ज, सेशन जज्ज, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांस हा अधिकार मुळींच देण्यांत आला नाहीं. एतद्देशीय सिव्हिल सर्व्हिसमधील लोकांस हा हक्क देण्यांत यावा अशी एक सूचना कौन्सिलपुढें होती, परंतु ती मंजूर झाली नाहीं. सिव्हिल सर्व्हिसच्या बाहेरील एतद्देशीय मॅजिस्ट्रेटास हे अधिकार देण्याची त्या वेळीं कल्पनाही नव्हती.

१८५३ पासून हिंदी लोकांचा प्रवेश सिव्हिल सर्व्हिसमध्यें होऊं लागला व या वेळेपासून १८८२ पर्यंत दोन हिंदी सिव्हिल सर्व्हंटस् डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व सेशन जज्ज (मि. दत्त व मि. टागोर) या हुद्यांवर होते. परंतु प्रचलित कायद्यामुळें त्यास युरोपियन गुन्हेगारांची चवकशी करण्याचा अधिकार दिलेला नव्हता. युरोपियन वस्ती असलेल्या कोणत्याही जिल्ह्यांत अशा एतद्देशीय सिव्हिल सर्व्हंटास डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट किंवा सेशनजज्ज नेमणें अडचणीचें भासूं लागलें. तशीच ही स्थिति उदारमनस्क पुष्कळ इंग्रजी मुत्सद्यांस फार असमाधानकारक वाटली. विद्वत्तेनें, हुषारीनें, योग्यतेनें सिव्हिल सर्व्हिसमधील इतर अधिकाऱ्यांच्या सर्वस्वी बरोबरीचे असून व सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा पास होऊनही हे अधिकार एतद्देशीयांस न देणें हें अन्यायाचें व जुलमाचें आहे असा पुष्कळ सरकारी अधिकाऱ्यांचा अभिप्राय पडला. पार्लमेंटांत १८३३, १८३७, या सालीं मंजूर केलेल्या कायद्यांस व १८५८ साळच्या राणीसरकारच्या जाहिरनाम्यास हे निर्बंध सर्वस्वी कमीपणा आणूं लागले. या सर्व स्थितीचें मनन करून या बाबतींत सुधारणा करण्याची इच्छा लॉर्ड रिपन साहेबांस झाली. राज्यकारभाराचें त्यांचें धोरण प्रगमनशील होतें. त्या वेळचे बंगालचे ले० गव्हर्नर सर ॲशले एडन यांनीं फौजदारी कायद्यांत दुरुस्ती करून सर्व एतद्देशीय सनदी नोकरांस (Covenented Civil Servants) युरोपियन सनदी नोकरांप्रमाणें गुन्हेगार युरोपियन प्रजाजनांची चवकशी करण्याचा अधिकार देण्यांत यावा अशी सूचना केली. सदरहु सूचना लॉर्ड रिपन यांनीं सर्व प्रांतिक सरकारांकडे अभिप्रायाकरितां पाठविली होती. कूर्ग खेरीजकरून सर्व प्रांतिक सरकारांनीं या सूचनेस आपला अनुकूल अभिप्राय दिला. हिंदुस्थान सरकारनें या अभिप्रायानुरूप कायद्याचा मसुदा कौन्सिलपुढें आणण्यासाठीं सेक्रेटरी ऑफ स्टेट यांची मंजुरी मागितली. लॉर्ड हार्टिंगटन हे त्यावेळीं सेक्रेटरी ऑफ स्टेट होते. त्यानीं व त्यांच्या कौन्सिलरांनीं वरील सूचनेस संमति दिली. इतकी पूर्व तयारी झाल्यानंतर इल्बर्ट साहेबांनीं हें बिल १८८३ सालीं

कौन्सिलपुढें मांडिलें. या बिलाचा हेतु नामदार इल्बर्ट यांनीं थोडक्यांत असा सांगितला कीं, ब्रिटिश सेशन जज्ज व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांचे-प्रमाणें एतद्देशीय सेशन जज्ज व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांस गुन्हेगार युरोपियन प्रजाजनांची चवकशी करण्याचा अधिकार असावा. ही दुरुस्ती सर ॲशले एडन यांच्या सूचनेप्रमाणेंच होती. दुसरी एक दुरुस्ती अशी सुचविण्यांत आली होती कीं, कांहीं थोड्या अनुभवशीर एतद्देशीय मॅजिस्ट्रेटांना युरोपियन मॅजिस्ट्रेटाप्रमाणें हा अधिकार देण्यांत यावा.

We propose to say that a very small number of specially selected Native Magistrates may exercise that limited and qualified jurisdiction which can at present be exercised only by persons who fall within the extremely arbitrary and technical definition of European British subjects.

लॉर्ड रिपनसाहेबांनीं हिंदू लोकांची योग्यता लक्षांत आणून त्यांच्या महत्वाकांक्षेस प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न स्थानिक स्वराज्याच्या बाबतींत जसा केला होता तेंच मुत्सद्देगिरीचें धोरण ह्याही बाबेतींत स्वीकारण्याची त्यांची इच्छा होती; परंतु या बिलाविरुद्ध हिंदुस्थानांतील सर्व युरोपियन लोकांनीं प्रचंड चळवळ चालू केली. ब्रिटिश राज्य उलथून पडणार असें ते बहकूं लागले. ब्रिटिश प्रजाजनांवर–पुरुषांवर व स्त्रियांवर–मोठे अनर्थ ओढवणार असा त्यांनीं आक्रोश सुरू केला. वर्तमानपत्रांतून, सभांतून, अर्जांनीं, तारांनीं येथील सरकारास त्यांनीं भंडावून सोडलें. रिपनसाहेबांस लाखोली वाहण्यास सुरुवात झाली. हें बिल हाणून पाडण्याकरितां ॲंग्लो-इंडियन समाजानें भगीरथ प्रयत्न केले. इंग्लंडमध्येंही त्यांनीं लोकमत प्रक्षुब्ध केलें. कांहीं माथेफिरू ॲंग्लो-इंडियन लोकांनीं सरकारच्या राजवाड्या ( Government house ) वरील शिपायांस बाजूस सारून लॉर्ड रिपनसाहेबांस अचानक उचलून चंद्पाल घाटावर जहाजांत ठेवावें व केप ऑफ गुडहोपच्या मार्गानें त्यांस विलायतेस पाठवावें असा कट केला होता असें मि. बकलंड यांनीं आपल्या Bengal under the Lieutenant

Governors या पुस्तकांत नमूद केलें आहे. ही कल्पना किती आततार्ई-पणाची आहे हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

या बिलाविरुद्ध सर्व आक्षेप स्वार्थमूलक होते. पहिला आक्षेप असा होता कीं, आपल्याच जातीच्या न्यायाधीशांनीं आपली चवकशी करावी असा युरोपियन प्रजेचा नैसर्गिक हक्क आहे. फौजदारी कायद्या-संबंधीं हें विधान सर्वस्वीं निराधार होतें. सिलोनच्या उदाहरणावरून हें विधान वस्तुस्थितीस सोडून आहे असें दिसण्यासारखें होतें. सिलोनांतील युरोपियन वसाहतवाल्यांस अशा तऱ्हेचे मुळींच हक्क नाहींत. दिवाणी बाबतींत जर युरोपियन वादी किंवा प्रतिवादींची चवकशी एतद्देशीय न्यायाधीशांस करितां येते तर ती फौजदारी बाबतींत कां करितां येऊं नये याचेंही कोणतेंच कारण दाखविण्यांत आलें नाहीं. आपल्या जातीच्या ज्यूरीकडून चवकशी होण्याचें जें तत्त्व इंग्लंडांत लागू आहे त्यांत सुद्धां न्यायाधीशाच्या जातीचा प्रश्न केव्हांच उद्भवलेला नाहीं. दुसरी अशी एक सबब पुढें आणण्यांत आली होती कीं, या बिलाच्या-यागानें युरोपियन लोकांस येथें वसाहत करण्यास उत्तेजन येणार नाहीं व त्यामुळें इंग्रजी भांडवलाचा उपयोग येथील देशाची उन्नति करण्यास मिळणार नाहीं.हा आक्षेपही सर्वस्वीं भ्रामक होता.युरोपियन भांडवलवाल्यांचें हितानाहित समजणाऱ्या युरोपियन चेंबर ऑफ कॉमर्सनें या बिलाबद्दल नापसंती दर्शविली नव्हती. तिसरा एक हास्यास्पद अपवाद असा होता कीं, कोणत्याही साहेबांच्या मेमसाहेबांवर तिचे नोकर म्हणजे दाई, बटलर, घोडेवाला किंवा हुजरे खोट्या फिर्यादी करतील व त्यामुळें त्यांची इज्जत जाऊन त्यांस येथील राहणें अत्यंत अपमानास्पद वाटेल व युरोपियन कौटुंबिक स्वास्थ्यास जबरदस्त धक्का बसेल. हा अपवाद अगदीं बाष्कळपणाचा होता. फौजदारी कायद्याची बाब सोडिली तरी आजपर्यंत नोकर लोकांनीं मेमसाहेबांस दिवाणी कोर्टांत आणल्याचीं उ-दाहरण क्वचित्च आढळून आलीं आहेत. फौजदारी बाबतींत मात्र या लोकां-च्या मनोवृत्तींत फरक होईल असें मानण्यास कोणतेंही कारण नाहीं. शिवाय

जी न्यायबुद्धि, चवकसपणा, निस्पृहपणा, तारतम्य व सन्माननीयांबद्दल आदर, एतद्देशीय न्यायाधीशाकडून दिवाणी कोर्टांत दाखविला जातो तोच फौजदारी कोर्टांत दाखविला जाणार नाहीं हें म्हणणें मनुष्यस्वभावास व व्यवहारास सर्वांशीं सुटून होतें. या आक्षेपांपैकीं कोणत्याही आक्षेपांत यत्किंचित्ही समंजसपणा नव्हता. या बिलाबद्दल खरा आक्षेप युरोपियन वसाहतवाल्यांकडून घेण्यांत आला होता. एतद्देशीय लोकांस निर्जीव कस्पटाप्रमाणें वागविण्यास सोकावलेल्या युरोपियन वसाहतवाल्यांसच या कायद्यापासून भय वाटत होतें. एतद्देशीय मॅजिस्ट्रेटाच्या कोर्टांत आपल्या चेष्टा चालणार नाहींत अशी त्यांची खात्री होती. मि. वुइलफ्रिड ब्लंट यांनीं एका आसामांतील युरोपियन मळेवाल्यानें या बिलासंबंधीं व्यक्त केलेला अभिप्राय नमूद केला आहे व त्यावरून युरोपियन लोकांचा या बिलाविरुद्ध कां आक्षेप होता हें थोडक्यांत समजणार आहे.

It is all nonsense to suppose, you can get on without an occasional upset with the niggers, and our English Magistrates understand this. But if we have Native Magistrates we should be constantly getting run in for assault.

याचा अर्थ इतकाच कीं, "या काळ्या भिकारड्या लोकांशीं कमजास्ती प्रकार नेहमीं होतोच. आमच्या जातीच्या युरोपियन मॅजिस्ट्रेटास तो समजतो, व तो तिकडे दुर्लक्ष करितो. नेटिव्ह मॅजिस्ट्रेटास आमच्या चवकशीचा अधिकार दिल्यास रोज खटले होऊन रोज मारामारीबद्दल आम्हांस शिक्षा होईल."

इलबर्ट बिलाविरुद्ध चाललेल्या मोहीमेचें सार वरील विचारांत संपूर्णपणें प्रतिबिंबित झालें आहे.

बिलाविरुद्ध युरोपियन समाजानें माजविलेला कोल्हाळ अतिशय वाढला. त्याचा परिणाम इंग्लंडांतील मंत्रिमंडळावर झाला. कौन्सिलांतील फक्त दोन सभासदांनीं म्हणजे बिल आणणारे ना. इलबर्ट व फडणवीस मेजर बेरींग

(लॉर्ड क्रोमर) या दोनच युरोपियन सभासदांनीं लॉर्ड रिपनसाहेबांस मदत केली. बिल मंजूर होण्याचा संभव मुळींच दिसेना. शेवटीं तडजोड होऊन ब्रिटिश प्रजाजनांची चवकशी करण्याचा अधिकार फक्त हिंदी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व सेशन जज्ज यांनाच देण्यांत आला व इतरांना तो हक्क देण्यांत आला नाहीं. कायद्यांतील यासंबंधाची उद्वेगजनक विषमता क्रिमिनल प्रोसीजर कोडचीं ४४३ ते ४६३ कलमें वाचलीं असतां कोणा-सही दिसून येणार आहे. पार्लमेंटाचे कायदे व राणीसरकारचा जाहिर-नामा यांच्या स्पष्ट शब्दांचा निषेध करून, जातिविशिष्ट असमता, अँग्लो-इंडियन सत्ताधारी वर्गानें आपल्या हिताकरितां कशी घडवून आणिली हें मनन करण्यासारखें आहे. वस्तुतः या बिलामध्यें राणीसाहेबां-च्या जाहिरनाम्यास धरूनच हिंदी व युरोपियन मॅजिस्ट्रेटास समसमान हक्क दिले होते; परंतु गुन्हेगार युरोपियन असला तरी त्याची कायद्याप्रमाणें चवकशी करण्याचा अधिकार शासित वर्गांपैकीं कितीही इभ्रतीचा मॅजि-स्ट्रेट असला तरी त्यास असूं नये असा अँग्लो-इंडियन लोकांचा हट्ट होता व या हट्टाच्या बुडाशीं जित व जेते यांचेमधील उच्चनीच संबंधाची भाव-नाच अत्यंत प्रबल होती. आपण राज्यकर्त्यांच्या जातीचे आहोंत व आपला दर्जा अत्यंत श्रेष्ठ आहे ही अहंकारवृत्ति अँग्लो-इंडियन समा-जानें अत्यंत उद्दामपणानें या प्रसंगीं प्रगट केली. त्या वेळच्या प्रधान-मंडळाच्या कमकुवतीमुळें न्यायाची व सत्याची बाजू लंगडी पडली. एतद्देशीय लोकांना रिपनसाहेबांच्या स्तुत्य हेतूबद्दल यत्किंचित्ही किंतु वाटला नाहीं. परंतु ब्रिटिश साम्राज्यांत नुसत्या न्यायाच्या जोरा-वरच यशःप्राप्ति होत नसून चळवळीचें प्रचंड सहाय्यही हक्काच्या माग-णीस असावें लागतें, हाच बोध एतद्देशीय लोकांनीं या चळवळीपासन घेतला. याबद्दल ब्लंटसाहेबानीं फार मार्मिक उद्गार काढले आहेत.

"I consider the attitude of native opinion on this occasion vastly creditable to the political good sense of India though it would be highly dangerous to trust to it on another time. The evil done will certainly reappear and be repaid upon Lord

Ripon's successor. Down to the last year, the natives of India completely as they have lost faith in the official system, in the honest purpose of their covenanted rulers, still look to the Home Government as an ultimate court of appeal able to defend them if not always willing. The weakness however of the Cabinet on this occasion to resist a wholly unjust and an unscrupulous attack upon them was now apparent, and I doubt extremely whether they will ever again have confidence in ministerial professions. The Government was entirely committed to the passing of the Bill, yet it gave way before the clamour of an insignificant section of the public, abetted by the sworn enemies of all reform in India, the Anglo Indian Bureucracy. The spectacle was not an edfying one, and I know that the natives appreciated it entirely on its merits and I am much mistaken if they did not also come to the conclusion that *the justice of a course was insufficient for its triumph* in politics that the *only path of victory henceforth lay through agitation.*"

या चळवळीमुळें एतद्देशीय लोकांच्या राष्ट्रोन्नतीच्या कार्यास एक महत्वाचा लाभ झाला. हिंदुस्थानांतील सर्व राजसत्ता अँग्लो–इंडियन लोकांच्या हातीं आहे, हिंदुस्थानांतील लोकांना कोणताही फायद्याचा किंवा मानाचा राज्यकारभारांतील वांटा देणें म्हणजे अँग्लो–इंडियन लोकांचें तितक्या अंशानें नुकसान करणेंच होय, हिंदुस्थानांतील लोकांचा स्वातंत्र्याचा खरा झगडा अँग्लो–इंडियन सत्ताधारी वर्गाबरोबरच ( Bureaucracy ) आहे व हा सत्ताधारी वर्ग पदोपदीं निकराचा विरोध केल्याशिवाय आपल्या हातांतील सत्ता सोडण्यास कधींही तयार होणार नाहीं, ही जाणीव इलबर्ट बिलाचे चळवळीमुळेंच हिंदुस्थानांतील लोकांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली. आपल्या उन्नतीच्या मार्गांतील ही बलवत्तर अडचण त्यांचे नजरेस आली. आपल्या हक्कांच्या रक्षणासाठीं अँग्लो–इंडियन समाजानें, वर्तमानपत्रांतून, जाहीरसभांतून, राजकीय संस्थांमार्फत, अर्ज, डेप्युटेशनें व हस्तपत्रकें यांच्या विद्यमानें, जो कल्होळ उत्पन्न केला, जी विलक्षण चळवळ सुरू केली, तोच एक मार्ग दाद लावण्यास समर्थ आहे हें चळवळीचें रहस्य

हिंदी समाजास स्पष्टपणें प्रथमतः समजलें. **सनदशीर चळवळीचें बाळ-कडूं** हिंदी लोकांस या अँग्लो-इंडियनांच्या चळवळीनेंच मिळालें.

लिटनशाहीमुळें देशांत **राष्ट्रीय चैतन्य** उत्पन्न झालें; **एक-राष्ट्रीयत्वाची** भावना जागृत झाली. इलबर्ट बिलाच्यायोगानें **आत्मप्रत्ययाची जोड राष्ट्रीय चैतन्यास मिळाली**; बाह्य उपाधींची शक्ति व व्यापकपणा यांचें यथार्थ आकलन त्यांस त्यानें करतां आलें; आत्मोन्नतीच्या कामांत योग्य दिशेनें, हिंमतीनें व आत्मविश्वासानें कर्तव्य करण्याची बुद्धि निर्माण झाली. अशा रीतीनें प्रज्वलित झालेलें राष्ट्रीय तेज ' सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपाद् ' अशा व्यापक स्वरूपानें राष्ट्रीय सभेच्या द्वारें मूर्तिमंतपणें उदयास आलें. राष्ट्रीय सभेच्या **उत्पत्तीची** वरीलप्रमाणें **मीमांसा** आहे.

इलबर्ट बिलामुळें लॉर्ड रिपनसाहेबांबद्दल जितकी अप्रीति युरोपियन लोकांनीं दाखविली त्यापेक्षां कित्येक पटीनें निःसीम कृतज्ञता हिंदी लोकांनीं त्यांच्यासंबंधानें प्रदर्शित केली. हिंदुस्थानचा खरा वाली व हितकर्ता हा थोर पुरुष आहे असे उद्गार सर्व आबालवृद्धांच्या तोंडून निघाले. आपली कारकीर्द संपवून लॉर्ड रिपन जेव्हां स्वदेशीं परत जावयास निघाले तेव्हां सर्व हिंदी प्रजेस फार हळहळ वाटली. आपल्या जिव्हाळ्याचा पुरस्कर्ता आपल्यास सोडून दूर जात आहे या विचारानें त्यांचें मन उद्विग्न झालें. ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांनीं मुंबईस येऊन रिपन साहेबांचा निरोप घेतला. हजारों मानपत्रें सादर केलीं. नुसत्या महाराष्ट्रांतून दीडलक्ष लोकांनीं सह्या केलेलीं मानपत्रांचीं नऊ मोठीं पुस्तकें सार्वजनिक सभेच्या मार्फत रिपनसाहेबांस अर्पण करण्यांत आलीं. ता. १७ डिसेंबर १८८४ रोजीं रिपनसाहेब मुंबईहून विलायतेस रवाना झाले.

या प्रसंगानिमित्त देशांतील ठिकठिकाणचे पुढारी मानपत्रें अर्पण करण्याकरितां एकत्र झाले होते. त्या सर्वांच्या भेटी झाल्या व सर्वांचें हृद्गत एकच असल्यामुळें अशा तऱ्हेचे भेटीचे प्रसंग वरचेवर यावे याबद्दल त्यांच्यामध्यें वाटाघाट झाली. हिंदुस्थानांतील सुशिक्षित पुढारी निरनिराळ्या

कृपया पुस्तकें ...

ठिकाणांहून राजकीय बाबतींसंबंधीं यापूर्वी कधींही एकत्र जमले नव्हते. या अपूर्व प्रसंगामुळें व त्यापासून उत्पन्न झालेल्या स्फूर्तीमुळें राष्ट्रांतील पुढाऱ्यांस एकत्र जमून विचारांची अदलाबदल करण्याची अवश्यकता स्पष्टपणें कळून आली. राष्ट्रीय सभेच्या **प्रथम अधिवेशनाचें हेंच पुण्याहवाचन होय.**

## राजकीय चळवळीचा प्रारंभ.

बंगाल्यांत प्रथमतः राजा राममोहन राय यानीं राजकीय चळवळीस प्रारंभ केला. १८३२ सालीं राममोहन राय विलायतेस गेले होते व त्यानीं हॉऊस ऑफ कॉमन्सच्या कमिटीपुढें हिंदुस्थानच्या स्थितीबद्दल साक्ष दिली होती. राजकीय चळवळ करण्याकरितां १८५१ सालीं बंगाल्यांत 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन' नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली. मुंबई इलाख्यांत (Bombay Association) 'बॉंबे असोसिएशन' अस्तित्वांत आली. बंगालच्या संस्थेचे प्रसन्नकुमार टागोर, डॉ. राजेंद्रलाल मित्र व ख्रिस्तोदास पॉल हेच पुढारी होते. मुंबईच्या संस्थेचे दादाभाई नवरोजी, सर मंगळदास नथुभाई, जगन्नाथ शंकरशेट व नवरोजी फरदुनजी हे चालक होते. याशिवाय देशामध्यें राजकीय चळवळ वर्तमानपत्रांच्याद्वारें सुरू होती. १८७५ चे सुमारास सुमारें ४७८ वर्तमानपत्रें अस्तित्त्वांत होतीं व देशांतील सर्व भाषांतून तीं निघत होतीं. १८७६ चे सुमारास बंगाल्यांत (Indian Association) 'इंडियन असोसिएशन' नांवाची संस्था स्थापण्यांत आली. ब्रिटिश इंडियन असोसिएशन ही संस्था जमीनदार व श्रीमान् गृहस्थांनीं चालविली होती; परंतु ही नवीन संस्था सुशिक्षित व उत्साही तरुणांनीं पुढाकार घेऊन अस्तित्वांत आणिली. सुरेंद्रनाथ बानर्जी व आनंद मोहन बोस हेच तिचे आधारस्तंभ होते.

१८७२ चे सुमारास मुंबई इलाख्यांत पुणें येथें 'सार्वजनिकसभेची' संस्थापना होऊन तिच्या द्वारें देशांतील सर्व राजकीय प्रश्नांचा

खल फार व्यापकपणानें होऊं लागला. रावबहादूर रानडे, सितारामपंत चिपळूणकर, रावबहादूर नूलकर हे या संस्थेचे प्रमुख चालक होते. सार्वजनिक सभा आपल्या अलौकिक तेजानें फारच थोड्या काळांत सरकारच्या आदरास पात्र झाली. खऱ्या राजकीय शिक्षणाचा शास्त्रोक्त रीतीनें प्रसार या सभेनें केला. मद्रासेस १८७८ सालीं आनंदाचार्लू, वीर राघवाचार्य, जी. सुब्रह्मण्य अय्यर व रंगय्या नायडू यांनीं सुप्रसिद्ध 'हिंदु' पत्र सुरू केलें. १८८४ चे सुमारास 'मद्रास महाजन सभा' स्थापन केली. बंगाल, मुंबई व मद्रास या ठिकाणीं याप्रमाणें राजकीय उन्नतीच्या प्रश्नांची चर्चा होण्यास प्रारंभ झाला. हे सर्व प्रयत्न वैयक्तिक असून निरनिराळे प्रांतांत निरनिराळे होते. सर्व प्रांतांस लागू पडणाऱ्या सामान्य प्रश्नांच्या चर्चेस प्राधान्य नव्हतें. लोकमत जागृत करण्याचा क्रम प्रथमतः बंगाल्यांत सुरू झाला. १८७७ सालीं लिटनशाहींत सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेचें वय कमी झालें. वयोमर्यादेची वाढ व समकालीन परीक्षेची अवश्यकता देशांतील लोकांस भासवावी या दृष्टीनें सर्व देशभर व्याख्यानांची मोहीम सुरू करण्याचें कलकत्त्यास ठरलें. कलकत्त्याच्या टाऊन हॉलमध्यें एक जंगी जाहीर सभा भरली होती. त्या सभेनें बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांस या प्रश्नांबद्दल लोकमत सुशिक्षित करण्याकरितां पाठवून दिलें. सुरेंद्रबाबूनीं उत्तर हिंदुस्थानांत बनारसपासून रावळपिंडीपर्यंत व्याख्यानें दिलीं. आपल्या अलौकिक वक्तृत्वानें या सुधारणांबद्दल लोकांमध्यें कळकळ उत्पन्न केली. तसेंच सन १८७८ सालीं पश्चिम व दक्षिण हिंदुस्थानांत सुरेंद्रबाबूनीं प्रवास केला. मुंबई, सुरत, अहमदाबाद, पुणें व मद्रास या ठिकाणीं जाहीर व्याख्यानें दिलीं. राजकीय प्रश्नांबद्दल लोकमत जागृत करण्याचा व त्यांत ऐक्यभाव उत्पन्न करण्याचा हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत हा पहिलाच प्रयत्न म्हणण्यास हरकत नाहीं. एकराष्ट्रीयत्वाची भावना अद्यापि देशांत उत्पन्न झाली नव्हती; परंतु ती उत्पन्न करण्याचा प्रयत्न मात्र या वेळीं सुरू झाला. लिटनशाहीमध्यें दिल्लीस दरबार भरला होता. देशांतील निरनिराळ्या प्रांतांतून पुष्कळ पुढारी तेथें एकत्र

# राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष.



सर डब्ल्यू वेडर्बर्न
मुंबई १८८९. अलाहाबाद १९१०.



सर फेरोजशहा मेथा—कलकत्ता १८९०.



रांय ब. पी. आनंदाचार्लू—नागपूर १८९१.
जा. जनरल सेक्रेटरी (माजी)



आलफ्रेड वेब—मद्रास १८९४.

ग 2/e25

जमले होते. हाही एकत्र जमण्याचा प्रसंग अगदीं अपूर्व होता. या वेळीं जरी सरकारच्या कृपाछत्रांतीलच पुष्कळ थोर लोक दिल्लीस एकवटले होते, तथापि स्थानमहात्म्यानें, पूर्ववैभवाच्या संस्मरणानें, इतिहासाच्या आठवणीनें, लिटनसाहेबांच्या अप्रयोजकपणामुळें व रयतेच्या पैशाच्या होत असलेल्या अपव्ययामुळें जमलेल्या लोकांपैकीं रावसाहेब मंडलीक, नवरोजी फरदुनजी, सर मंगळदास नथुभाई अशा बाणेदार पुरुषांस उद्वेग वाटला. लिटनसाहेबांसारख्या अनुदार व्हाइसरॉयसाहेबांस लब्धप्रतिष्ठेकरितां, हिंदुस्थानांतील संपन्न लोकांस जर एकत्र गोळा करितां येतें तर हिंदुस्थानांतील प्रजेसही आपल्या सुखदुःखांचा विचार करण्याकरितां एकत्र जमतां कां येऊं नये या कल्पनेचा अंकुर येथें उत्पन्न झाला. ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांचे विचारास या दृष्टीनें चालन मिळालें. समवायानें व एकत्र जमण्यानें पुष्कळ वेळां विचारांची अदलाबदल करण्यास मदत होते. १८८४ सालीं कलकत्त्यास 'ग्रेट इंटर नॅशनल एक्झिबिशन' या नांवाचें एक प्रदर्शन भरलें होतें. हें प्रदर्शन पहाण्याकरितां देशाच्या . र्व भागांतून पुष्कळ लोक जमले होते. या वेळींच राष्ट्रीय सभेची कल्पना अस्तित्वांत आली असें मि. मरडॉक यानीं विधान केलें आहे. चैनीनें जिवाची करमणूक करण्याकरितां गोळा झालेल्या लोकांत उत्सवाच्या व सुखोपभोगाच्या प्रसंगीं राष्ट्रीयसभेसारख्या गंभीर प्रश्नाची कल्पना उत्पन्न झाली असेल हें संभवत नाहीं. १८८३ सालीं (Indi an association) इंडियन असोसिएशनच्या मार्फत 'नॅशनल कॉन्फरन्स' म्हणून एक सभा कलकत्त्यास भरली होती. या सभेस बंगाल्यांतील पुष्कळ सुशिक्षित लोक आले होते. सभेच्या सुरुवातीस दिल्ली येथील समारंभास उद्देशून देशांतील तरुण व उत्साही लोकांस एकत्र जमवून आपल्या हितानहिताच्या प्रश्नांबद्दल विचार करण्याची सुरेंद्रबाबूनीं विनंति केली. होतकरू तरुण लोकांत फार उत्साह उत्पन्न झाला. देशाच्या परिस्थितीचें ते मनन करूं लागले. एकत्र जमून देशोन्नतीच्या कार्यास प्रारंभ करावा असें त्यांस वाटूं लागलें. १८८४ सालीं 'नॅशनल लीग' या नांवाची संस्था

अस्तित्वांत आली. सर जितेंद्रमोहन टागोर हे तिचे उत्पादक होते. १८८४ च्या सुमारास बंगाल्यांत राजकीय सुधारणेबद्दल विचार करणाऱ्या ब्रिटिश इंडियन असोशिएशन, इंडियन असोशिएशन व नॅशनल लीग या तीन संस्था होत्या. १८८३ प्रमाणेंच १८८५ सालीं नॅशनल कॉन्फरन्सची दुसरी बैठक बोलावण्याचें या तिन्ही संस्थांच्या पुढाऱ्यांनीं ठरविलें होतें. परंतु ही परिषद् सर्व राष्ट्राची नसून एका प्रांताची होती.

लिटनसाहेबांच्या कारकीर्दींत सर्वत्र उत्पन्न झालेल्या उद्विग्नतेमुळें एकराष्ट्रीयत्वाचा उदय कसा झाला होता हें वर निर्दिष्ट केलेंच आहे; राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेची जरूरी अंधुकपणें लिटनशाहींत कांहीं थोड्या लोकांस कशी भासूं लागली हेंही वर नमूद केलें आहे. रिपनसाहेबांस निरोप देतांना या कल्पनेस कसें निश्चित स्वरूप प्राप्त झालें याचेंही वर्णन पूर्वीं केलेंच आहे. परंतु वर्तमानपत्रांतून, सभांतून किंवा ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांच्या विचारांतून ही जी ऐक्याची भावना दिसत होती तिचा अजमाव घेऊन, तिला मूर्त स्वरूप देण्याचें मुख्य श्रेय मि. ह्यूम यांचेकडेच आहे. मि. ह्यूम हे सरकारी नोकरींत असतांना त्यांची न्यायप्रियता, उदारबुद्धि, प्रजावात्सल्य, हिंदी लोकांबद्दल निस्सीम प्रेम हीं सर्वविश्रुत होतीं. ह्यूमसाहेब हिंदुस्थान सरकारचे अंतर्गतराज्यव्यवस्था खात्याचे सेक्रेटरी Home Secretary होते. येथील लोकांबद्दलच्या सहानुभूतीमुळेंच त्यांना याहून बढतीची जागा मिळाली नाहीं. १८८२ सालीं त्यांनीं आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. त्यांनीं सिमल्यासच कायम राहून आपलें आयुष्य हिंदुस्थानच्या उन्नतीकरितां खर्च करण्याचें ठरविलें. या उद्देशानेंच त्यांनीं १८८३ च्या मार्चच्या १ ल्या तारखेस कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या ग्रॅज्युएटांस एक अनावृत पत्र लिहिलें आहे व त्यांत देशांतील सर्व तरुणांस फार कळकळीची विनंति केली आहे. 'परकीय लोकांना या देशाबद्दल कितीही प्रेम वाटलें, त्यांनीं कितीही पैसे खर्च केले, कितीही श्रम केले, कितीही झीज सोसली, तरी परकीपणामुळें देशोन्नतीच्या कार्यास यावें तसें यश येणार नाहीं. या

कामीं देशांतील तरुणांनींच पुढाकार घेतला पाहिजे,' असे त्यांनीं स्पष्ट उद्गार काढले आहेत.

"Invain may aliens like myself love India and her children as well as the most loving of these. Invain may they for her and their good give time and trouble, money and thought. Invain may they struggle and sacrifice. They may assist with advice and suggestions. They may place their experience abilties and knowledge at the disposal of the workers. But they lack the essential of nationality and the real work must ever be done by the people of the country themselves."

यासाठीं देशांतील सुशिक्षितांनींच देशोन्नतीचें कार्य आपल्या शिरावर घेतलें पाहिजे. हें काम एका दोघां व्यक्तींचें किंवा निरनिराळ्या व्यक्तींनीं आपापल्या कलाप्रमाणें व सोईप्रमाणें करण्याचें नसून, समवायानें, एकोप्यानें, शिस्तीनें व ठराविक मार्गानेंच केलें पाहिजे. या कामीं स्वार्थत्यागाची जरूर आहे. एकाच उदात्त भावनेनें जरी ५० लोक या कार्यास वाहून घेतील, तरी या कार्याची मजल पुष्कळ पुढें जाईल. अशा कामीं पुढाकार घेणारे लोकांचे अंगीं शुद्ध चारित्र्य, देशोन्नतीबद्दल निस्सीम तळमळ, प्रगल्भबुद्धि, उदार शिक्षण, योग्य संस्कार, स्वार्थत्यागाची तत्परता, शील, धैर्य व विचार यांची समता-हे गुण असले पाहिजेत. अशा तऱ्हेचे सुशिक्षित लोक या कामीं पुढें यावेत अशी त्यानीं आग्रहाची विनंति केली. ठिकठिकाणच्या लोकांस ह्यूमसोहबानीं पत्रें लिहिलीं होतीं. राष्ट्रजागृतीच्या कामास कांहीं तरी वळण लागावें या हेतूनें पुढाऱ्यांनीं एकत्र जमण्याची अवश्यकता त्यांनीं जोरानें प्रतिपादन केली. कराची, अहमदाबाद, सुरत, मुंबई, पुणें, मद्रास, कलकत्ता, बनारस, अलाहाबाद, लखनौ आणि लाहोर या ठिकाणीं राजकीय प्रश्नांचा विचार करणाऱ्या संस्था होत्या. त्या सर्वांबरोबर त्यानीं पत्रव्यवहार केला होता व एखादी सर्व राष्ट्रांतील पुढाऱ्यांची परिषद् बोलाविल्यास आपण प्रतिनिधी पाठवूं असें त्या संस्थांनीं कबूल केलें होतें. लॉर्ड रिपनसाहेबांस मानपत्र अर्पण करण्याकरितां मुंबईस ठिकठिकाणचे पुढारी जमल्या

ळीं या कल्पनेस मूर्तस्वरूप आलें. १८८४ च्या अखेरीस Indian National Union इंडियन नॅशनल यूनियन या नांवाची संस्था ह्यूमसाहेबांच्या चालकत्वाखालीं निर्माण झाली व १८८५ च्या मार्चमध्यें देशांतील सर्व प्रतिनिधींची सभा डिसेंबरमध्यें पुण्यास भरविण्याचें मुक्रर ठरलें. याच वर्षाच्या प्रारंभीं ह्यूमसाहेबानीं सिमल्यास त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड डफरीन यांची मुलाखत घेतली. राष्ट्रीय सभा प्रथमतः भरविण्यांत ह्यूमसाहेबांचा विचार मुख्यत्वेंकरून निरनिराळया ठिकाणच्या पुढाऱ्यांस एकत्र करून सामाजिक विषयांची चर्चा करावी व परस्परांत स्नेहभाव वृद्धिंगत करावा हा होता. लॉर्ड डफरीन यांच्या मुलाखतींत त्यानीं यासंबंधीं आपली नापसंती व्यक्त केली. निरनिराळे धर्म, निरनिराळ्या जाती, निरनिराळ्या रूढी व निरनिराळे रिवाज यांकडे लक्ष दिलें असतां येथील पुढाऱ्यांत सामाजिक बाबतींत एकवाक्यता होणें डफरीनसाहेबांस अशक्य वाटलें, व त्यांनीं राजकीय प्रश्नांची चर्चा करण्यांबद्दल ह्यूमसाहेबांस सुचविलें. 'इंग्लंडांतील राजकारणांत पक्षभेद असतात व अधिकारारूढ पक्षाला देशांतील लोकमत विरुद्ध बाजूकडून (opposition उघडपणें समजत असतें. हिंदुस्थानांत अशा तऱ्हेची संस्था नाहीं व राज्यकर्त्यांना येथील लोकांचें मत समजण्यास कोणतेंही साधन नाहीं. वर्तमानपत्रांवरून लोकमत निदर्शनास येतें; परंतु इंग्रजी भाषेंत चालू असलेल्या व राज्यकर्त्यांना समजणाऱ्या वर्तमानपत्रांची संख्या फार मर्यादित आहे, व त्यांपैकीं फारच थोडीं जबाबदारीनें चालविलेलीं असतात. यासाठीं देशांतील विद्वान् लोकांनीं एकत्र जमून राजकीय गोष्टींचा खल केला, समवायानें निरनिराळ्या राजकीय प्रश्नांबद्दल लोकमत सरकारच्या नजरेस आणिलें, राज्यव्यवस्थेंतील उणीवा व राज्यकारभारासंबंधीं सुधारणा सरकारपुढें ठेविल्या तर सरकारास फार मदत होईल,' असें डफरीनसाहेबानीं सुचविलें. तसेंच अशा सभेचें अध्यक्षस्थान गव्हर्नरासारख्या इलाख्याच्या अधिपतीस देऊं नये असेंही डफरीनसाहेबांचें मत होतें. १८८५ च्या डिसेंबरांतील सभेचें अध्यक्ष-

स्थान मुंबई इलाख्याचे लोकप्रिय गव्हर्नर लॉर्ड रे यांस देण्याबद्दल कित्येकांचा सल्ला होता. गव्हर्नरसारखा मोठा अधिकारी अध्यक्ष असतांना लोकांस आपले विचार मोकळ्या मनानें बोलून दाखवितां येणार नाहींत असेंही लॉर्ड डफरीन यानीं सांगितलें. डफरीनसाहेबांचा भारदस्त उपदेश सर्वांस पसंत पडला व डिसेंबरांत भरणाऱ्या सभेंत राजकीय विषयांची वाटाघाट करण्याचें ठरलें. इतकी तयारी झाल्यानंतर ह्यूमसाहेब इंग्लंडास गेले. त्यांनीं तेथील हिंदुस्थानच्या हितचिंतकांचा सल्ला घेतला. सर जेम्स केअर्ड, जॉन ब्राईट, लॉर्ड रिपन, मि. बॅक्सटर, आर. टी. रीड ( लॉर्ड लोरबर्न ) हे हिंदुस्थानचे त्या वेळीं पार्लमेंटांतील पुरस्कर्ते होते; त्यांनींही प्रोत्साहन दिल्यानंतर ह्यूमसाहेब हिंदुस्थानांत परत आले.

## पहिली बैठक.

'इंडियन नॅशनल यूनियन' या नांवाऐवजीं 'इंडियन नॅशनल कॉंग्रेस' हें नांव सभेस देणेचें ठरलें. डिसेंबर महिना जवळ आला. पुणें येथील सार्वजनिक सभेनें पुढाकार घेऊन सभेची बैठक भरविण्याचें पत्करिलें होतें. वर्तमानपत्रांच्या द्वारें व खासगी पत्रांनीं ठिकठिकाणच्या लोकांस आमंत्रण केले. सभेनें सर्व तयारी केली. पर्वतीजवळील सुप्रसिद्ध पेशव्यांच्या हिराबागेंतील दिवाणखान्याची जागा सभेकरितां मुक्रर करण्यांत आली. प्रतिनिधींच्या स्वागताची सर्व व्यवस्था झाली. इतक्यांत पुण्यास कॉलरा सुरू झाला; व बाहेर गांवांहून येणाऱ्या पाहुण्यांस कदाचित् या सांथीमुळें अपाय होईल असें समजून पुण्यांतील बैठकीचा बेत रहित झाला. यासंबंधीं 'चित्रमय जगतां'तील एका लेखकानें पुण्याहून राष्ट्रीय सभेचें अधिवेशन अधिकाऱ्यांच्या वक्र दृष्टीमुळें मुंबईस गेलें, असें ध्वनित केलें आहे. परंतु ही व्यंजना अगदीं खोडसाळपणाची आहे. पुण्यास अधिकाऱ्यांची वक्रदृष्टि झाली तर ती मुंबईस होणार नव्हती अशी थोडीच कोणीं हमी दिली होती? खुद्द व्हाइसरॉयानीं राष्ट्रीय सभेची कल्पना सुचविली होती. या पहिल्या सभेचं अध्यक्षस्थान मुंबईचे त्या वेळचे गव्हनर लॉर्ड रे यांना

देण्याबद्दल वाटाघाट चालू होती व ना. वेडरबर्न, जार्डीन सारखे अधिकारी राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींस भेटण्यास आले होते. यावरून वरील तर्क किती निराधार आहे हें दिसून येईल.

अगदीं थोडा अवकाश असतांही मुंबईच्या प्रेसिडेन्सी ॲसोसिएशननें पुढाकार घेऊन सभेची बैठक मुंबईस भरविण्याचें ठरविलें, व सर्व तजवीज करण्याची जोखीम अंगावर घेतली. २८ डिसेंबर १८८५ रोजीं राष्ट्रीय-सभेच्या बैठकीस मुंबईस गवाळीतळ्यावर गोकुळदास तेजपाळ यांच्या संस्कृत कॉलेजाच्या पवित्र जागेंत प्रारंभ झाला. प्रथमतः या सभेमध्यें पुष्कळ सरकारी अधिकाऱ्यांनीं हजर राहून व वादविवादांत प्रत्यक्ष भाग घेऊन आपली सहानुभूति प्रदर्शित केली होती. ना. सर वुइल्यम वेडर्न-बर्न, न्या. जार्डीन, कर्नल फेल्पस, प्रो. वर्ड्सवर्थ, यांसारखे सरकारी बडे अधिकारी सभेस येऊन प्रतिनिधींशीं वाटाघाट करीत होते व त्यांचें अभिनंदन करीत होते. त्याचप्रमाणें डी. एस व्हाईट, मद्रासचे कलेक्टर, दि. ब. रघुनाथराव, रा. ब. महादेव गोविंद रानडे, आग्र्याचे प्रो. लाला बैजनाथ, अहमदाबादचे प्रो. काथवटे, अर्काटचे प्रो. कादंबी सुरस रामन् तिरु, वेलूरचे नरसिंह अयर व पुण्याचे डॉ. भांडारकर हे सरकारी अधिकारीही सभेकरितां मुद्दाम बाहेरगांवांहून आले होते. बारा वाजतां सभेच्या कामास सुरुवात झाली. सभेचे अध्यक्ष उमेशचंद्र बानर्जी हे अध्यक्षस्थानीं विराजमान होतांच टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत मोठ्या उत्साहानें त्यांचें स्वागत करण्यांत आलें. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतून भिन्न भिन्न जातींचे, चित्रविचित्र पेहेरावांचे, निरनिराळ्या ठेवणीचे, उत्साह-पूर्ण, राष्ट्रीय प्रेमानें प्रफुल्लित झालेले, हिंदमातेचे अनेक पुत्र पाहून परकीय लोकांनासुद्धां फार कौतुक व आनंद वाटला. हिंदुस्थानच्या खऱ्या हित-चिंतकांना तर हा दिवस सोन्याचा भासला. राष्ट्रीय चैतन्याची ही मूर्तिमंत प्रतिमा पाहून कोणत्याही सहृदय मनुष्यास आल्हाद वाटणें अगदीं साहजिक होतें. कराची, विरमगांव, सुरत, पुणें, कलकत्ता, आग्रा, बनारस, सिमला, अ-लाहाबाद, लाहोर, अंबाला, अहमदाबाद, मुंबई, मद्रास, बेहरामपूर, मच्छ-

लीपट्टण, चिंगलपेठ, तंजावर, कुंभकोणम्, मदुरा, तिनवेल्ली, कोइमतूर, सालेम, कडपा, अनंतपूर व बल्लारी या सर्व ठिकाणांहून सुमारें ७२ प्रतिनिधी या सभेस आले होते. पुण्याहून रा. ब. नूलकर, गंगाराम भाऊ म्हसके, ज्ञानप्रकाशाचे संपादक रामभाऊ साने, सार्वजनिक सभेच्या मासिकाचे संपादक सितारामपंत चिपळूणकर व सेक्रेटरी शिवरामपंत साठे, डॉ. पांडुरंग गोपाळ, प्रा.वामनराव आपटे, रामभाऊ लिमये, केसरी व मराठ्याचे संपादक प्रो. आगरकर असे प्रतिनिधि होते. यांपैकीं पुण्याकडील आजमित्तीस रामभाऊ साने हे एकटेच हयात आहेत. मुंबईच्या १८प्रतिनिधींपैकीं दादाभाई नौरोजी, दिनशा वाच्छा व सर नारायणराव चंदावरकर एवढेच आजमित्तीस काळाच्या तडाक्यांतून सार्वजनिक आयुष्यक्रमांत खटपट करीत आहेत. या सभेचें काम तीन दिवस मोठ्या उत्साहानें चाललें. प्रत्येक प्रश्नावर वादविवाद होऊन सभेचें मत निश्चित झालें व कलकत्यास पुढील सभा भरण्याचें ठरवून सभेचें अधिवेशन पार पडलें. सभेच्या कामांत अध्यक्ष, मद्रासचे ना. सुब्रह्मण्य अय्यर, मुंबईचे फेरोजशहा मेथा, नरेंद्रनाथ सेन, दयाराम जेठमल, जव्हेरीलाल याज्ञिक, ना. तेलंग, रा. ब. नूलकर, मि. वाच्छा, मि. मुदलियार, मि. घोसाळ, मि. ह्यूम, मि. पिले, ना. दादाभाई नवरोजी, रा. सितारामपंत चिपळूणकर, मि. आनंदाचार्लू, मि. सयानी, मि. सुब्रायडू, लाला मुरलीधर, राव ब. रानडे, दिवाण रघुनाथराव, मि. सुंदरराव, मि. चंदावरकर, मि. वीरराघवाचार्य, मि. व्हाइट, मि. मुकरजी, मि. मोदी, मि. स्वामिनाथ आयर, मि. पंतलु, प्रो. रामन्, मि. ध्रुव, मि. अग्निहोत्री या लोकांनीं वादविवादामध्यें व भाषणामध्यें प्रमुखत्वानें भाग घेतला होता. ( १ ) हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेबद्दल रायल कमिशन नेमून चवकशी व्हावी, ( २ ) सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचें कौंसिल बंद करण्यांत यावें, ( ३ ) वरिष्ठ व प्रांतिक कौंसिलांचे हक्क वाढविण्यांत यावे व त्यांत लोकनियुक्त सभासदांचें प्रमाण बरेंच असावें, सर्व बजेटें या कौंसिलांनीं मंजूर करावीं, राज्यव्यवस्थेबद्दल सरकारास प्रश्न विचारण्याचा सभासदांना अधिकार असावा, पंजाब व वायव्य प्रांतांत कौंसिलें स्थापन

व्हावीं व हाऊस ऑफ कॉमन्सची एक कायमची कमिटी नेमून कौन्सिलांतून बहुमतानें एखादी तक्रार सरकारविरुद्ध करण्यांत आल्यास तिचा तिनें विचार करावा, ( ४ ) वरिष्ठप्रतीच्या नोकरीकरितां इंग्लंडांत व येथें समकालान परीक्षा घेण्यांत याव्या. सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेचें वय तेवीस वर्षांचें असावें व सिव्हिल सर्व्हिसकरितां राखून ठेवलेल्या जागांखेरीज इतर जागा हिंदुस्थानांतच परीक्षा घेऊन भरण्यांत याव्या, ( ५ ) लष्करी खर्च कमी करण्यांत यावा, ( ६ ) आयात मालावर जकात बसवून व मोठ्या पगाराच्या सरकारी नोकरांवर प्राप्तीचा कर बसवून लष्करी खर्चाची तोंडमिळवणी करण्यांत यावी, ( ७ ) उत्तर ब्रह्मदेश खालसा करूं नये व केलाच तर त्याची स्वतंत्र कॉलनी करावी व तो हिंदुस्थानास जोडूं नये. याप्रमाणें सात महत्वाच्या विषयांचा खल पहिल्या राष्ट्रीय सभेच्या बैठकींत पुष्कळ होऊन सभेचें मत निश्चित झालें व ही बैठक सर्व तऱ्हेनें यशस्वी झाली असें त्या वेळच्या प्रसिद्ध झालेल्या वर्तमानपत्रांतील अभिप्रायांवरून स्पष्टपणें दिसून येत आहे.

१८८५ च्या राष्ट्रीय सभेच्या बैठकीच्या वेळींच बंगाल्यांतील नॅशनल कॉन्फरन्सची National Conference ची दुसरी बठक भरविण्यांत आली होती. या बैठकीस बंगाल्यांतील सर्व प्रमुख लोक आले होते. सुमारें २०० प्रतिनिधी जमले होते. मि. कॉटन व मि. अमीरअल्ली हेही या बैठकीस हजर होते. रावसाहेब मंडलीक, दरभंग्याचे महाराज, ज. गुरुदास बानर्जी, प्यारी मोहन मुकरजी, कालीचंद्र बानर्जी, त्रैलोक्यनाथ मित्र, जयकृष्ण मुकरजी इत्यादि प्रसिद्ध गृहस्थ या समारंभास आले होते. या परिषदेंत सहा ठराव मंजूर झाले.

१ कायदे कौन्सिलांची सुधारणा.

२ हत्याराच्या कायद्याची दुरुस्ती.

३ खर्चाच्या बाबतींत काटकसर.

४ समकालीन परीक्षा.

५ न्याय व अंमलबजावणी खात्यांची फारकत.

६ पोलीसची सुधारणा.

यात्रमाणें राष्ट्रीय सभा व प्रांतिक सभा या राष्ट्रीय चळवळीच्या दोन अंगांची उत्पत्ति समकालीन झालेली आहे. वरील हकीगतीवरून कांहीं अंशानें प्रांतिक सभेचें अधिवेशन थोडें पूर्वीचेंच आहे. तथापि बंगाल्यांतील लोकांनीं स्थानिक अभिमान बाजूस ठेवून, राष्ट्रीय सभेसच अग्रस्थान देऊन तिच्या उत्कर्षास मनोभावानें मदत केली. एकराष्ट्रीयत्वाची ही भावना बंगाल्यांत प्रथम सुरू झाली हें उत्क्रांतीच्या नियमास अनुसरून होतें. कारण ईस्ट इंडिया कंपनीचा अम्मल बंगाल्यांतच प्रथम जोरानें सुरू झाला. इंग्रजी शिक्षणाचा व संस्कारांचा फायदा बंगाली लोकांसच प्रथम मिळाला व राजकीय चळवळीचा प्रारंभ त्यांनींच केला. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून आजपर्यंत प्रत्येक बैठकीस हजर राहून आपल्या अलौकिक वक्तृत्वानें, विद्वत्तेनें व इंग्रजी भाषेच्या नैपुण्यानें राष्ट्रीयसभेस त्यांनींच उज्वल स्वरूप दिलें आहे. स्वावलंबनाच्या तत्त्वाचा उदय बंगाल्यांतच झाला. देशांतील तेजस्वीपणाचें पुष्कळ श्रेय बंगाल्यांतील राजकीय चळवळीसच आहे.

या दृष्टीनें विचार करतां पहिल्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानाचा मान बंगाली गृहस्थास मिळाला हें सर्वतोपरी अनुरूपच झालें असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

## आक्षेप व त्यांचें निरसन.

राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्यानंतर हिंदुस्थानच्या हितशत्रूंकडून तिच्याबद्दल पुष्कळ आक्षेप घेण्यांत आले. युरोपियन वर्तमानपत्रें व युरोपियन सत्ताधारी वर्ग यांचा कटाक्ष या संस्थेवर फार जोराचा होता. त्यांनीं नानाप्रकारचे आरोप करून ही संस्था निर्मूल करण्याचे प्रयत्न केले. सर ऑकलंड कॉलव्हिन यानीं वर्तमानपत्रांत लेख लिहून राष्ट्रीय सभेबद्दल आपला विरोध व्यक्त केला. या सर्व आक्षेपकांचें मुख्य म्हणणें असें होतें कीं, ( १ ) राष्ट्रीय सभा हें नांवच भ्रामक आहे.

हिंदुस्थानास एक राष्ट्र असें म्हणतां येणार नाहीं. ( २ ) या सभेंतील प्रतिनिधींस राष्ट्राचे प्रतिनिधी असें नांव धारण करण्याचा अधिकार नाहीं. ( ३ ) ही सभा मूठभर सुशिक्षितांची आहे व ते राष्ट्राचे खरे पुढारी किंवा हिताचिंतक नव्हत. ( ४ ) हिंदुस्थानांतील असंख्य प्रजेस राष्ट्रीय सभेच्या मागण्यांची अवश्यकता वाटत नाहीं. ( ५ ) या सभेचें मागणें अशक्य कोटींतील आहे. त्याबद्दलची पात्रता येथील लोकांत मुळींच आलेली नाहीं. ( ६ ) या सभेस हिंदुस्थानांतील प्रमुख जातींनीं संमति दिली नाहीं व त्यांनीं या सभेंत पुढाकार घेतलेला नाहीं. ( ७ ) ही सभा असंतुष्ट अशा हिंदी सुशिक्षितांची असून ती राजद्रोही आहे. या आक्षेपांचें निरसन राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांनीं व तिच्यामधील वक्त्यांनीं अनेक वेळां केलें आहे. या आक्षेपांत आतां कोणताच अर्थ उरलेला नाहीं. तथापि ऐतिहासिक दृष्ट्या विचार करितांना त्याचा उल्लेख करणें अप्रासंगिक होणार नाहीं. हिंदुस्थानांत अनेक जाति, अनेक धर्म, अनेक भाषा, अनेक पंथ व अनेक समाज आहेत. या सर्वांस एक राष्ट्र म्हणतां येणार नाहीं, असा एक कोटिक्रम आहे. राष्ट्रांतील घटकावयवांना नियमन करणारी शक्ति म्हणजे सरकारच होय. एकाच सरकाराच्या राज्यछत्राखालीं असणारे सर्व नागरिक, एकाच कायद्यानें बांधले गेलेले सर्व प्रजाजन, एकाच शासनपद्धतींखालीं सुखदुःख अनुभवणारा जन-समूह, समान हक्क, समान जबाबदारी असलेले सर्व लोक, या सर्वांस एका राष्ट्राचे घटकावयव म्हणतां येईल. त्याचें एक राष्ट्र मानतां येईल. अशा तऱ्हेनें एका राजछत्राखालीं असलेल्या लोकांत साभाजिक दृष्टीनें कितीही भेद असले तरी राजकीय दृष्ट्या ते एकाच राज्याचे घटक आहेत, असेंच मानावें लागेल. हीच व्याख्या 'नॅशनल रिव्ह्यू'मधील एका विद्वान् लेखकानें केली आहे. ( Citizens of one Country, subordinate to one power, subject to one supreme Legislature, taxed by one authority, influenced for weal or woe by one system of administration, urged by like impulses to secure like rights and to be relieved of like burdens. ). हिंदुस्थानास ही

व्याख्या लाविली असतां, येथील सर्व लोक, मग ते कोणत्याही धर्मांचे, कोणत्याही जातीचे, कोणत्याही भाषेचे, कोणत्याही वर्णाचे, कोणत्याही समाजाचे असोत–एकाच राजाची प्रजा आहेत; एकाच अमलाखालीं ते रहात आहेत; एकाच कायद्यानें बांधले गेले आहेत; एकाच सत्तेस त्यांजवर करें बसवितां येतो; त्यांचीं सुखदुःखें एकाच प्रकारचीं आहेत; त्यांचे हक्क व जबाबदाऱ्या एकाच स्वरूपाच्या आहेत व उन्नतीबद्दलच्या त्यांच्या मनोवृत्ति एकाच भावनेच्या आहेत. अशा स्थितींत ‘एक राष्ट्र’ ही संज्ञा हिंदुस्थानास लावण्यास कोणतीही हरकत नाहीं, असें दिसून येईल. दुसरा एक कोटिक्रम असा आहे कीं, सुशिक्षित लोक हे हिंदुस्थानांतील जनतेचे प्रतिनिधी नाहींत. प्रतिनिधि या शब्दानें म्युनिसिपालिटींतील विशिष्ट वर्णनाच्या मतदारानें निवडून दिलेला किंवा विशिष्ट हक्काच्या मनुष्यानें पार्लमेंटांत निवडून दिलेला प्रतिनिधि, असा संकुचित अर्थ करावयाचा असल्यास कायद्याच्या ( Technical ) संज्ञेप्रमाणें सुशिक्षित लोकांस हिंदुस्थानांतील प्रजेचे प्रतिनिधी ( representative ) असें कदाचित् म्हणतां येणार नाहीं. परंतु प्रतिनिधि म्हणजे पुढारी असा अर्थ केल्यास सुशिक्षित लोक हे हिंदुस्थानांतील लोकांचे खरे पुढारी आहेत, याबद्दल यत्किंचित्‌ही शंका बाळगण्याचें कारण नाहीं. हीच कल्पना कोणत्याही सुधारलेल्या देशांत सर्वसंमत झालेली दिसते. सुधारणेचा इतिहास पाहिला असतां, जरी त्या लोकांच्या हिताकरितां असतात तरी त्यांना आपलें हित त्या सुधारणांत आहे असें प्रथम समजत नाहीं; सुशिक्षित लोकांनीं चळवळ करून लोकमत जागृत केलें म्हणजे त्या सुधारणा आपल्या हिताच्या आहेत, असें लोकांस वाटूं लागतें व त्यांना त्यांची अवश्यकता भासूं लागते. सुशिक्षित लोक हे शिक्षणानें व संस्कारानें अधिकारसंपन्न असल्यामुळें बऱ्यावाईटाचें ज्ञान त्यांस तत्काळ होतें; अज्ञ समाजाला आपलें हितानहित कळण्यास पुष्कळ काळ लागतो व यासाठींच सुशिक्षित समाज हा देशांतील जनतेचा नैसर्गिक पुढारी आहे. अंधळ्या मनुष्यास किंवा मुक्या मनुष्यास ज्याप्रमाणें

डोळस किंवा वाचासंपन्न माणसाचें साहाय्य लागतें, त्याचप्रमाणें अज्ञानांधकारांत असणाऱ्या लोकांची स्थिति आहे. हिंदुस्थानांत साक्षरतेचें प्रमाण जगांतील कोणत्याही सुशिक्षित देशापेक्षां अत्यंत कमी प्रकारचें आहे. ज्या देशांत दर दहा मुलांपैकीं नऊ मुलें अज्ञानांधकारांत चाचपडत आहेत व दर पांच गांवांपैकीं चार गांवांत शिक्षणाची मुळींच सोय नाहीं, अशा देशांतील लोकांत आत्मस्थितीबद्दल निबिड अज्ञान असल्यास आश्चर्य कोणतें ? व याचसाठीं सुशिक्षित लोकांनीं आपल्या अज्ञ देशबांधवांकरितां पुढाकार घेणें अत्यंत अवश्य आहे.

नामदार गोखले यानीं सुशिक्षित लोक जनतेचे नैसर्गिक पुढारी आहेत असें म्हटलें आहे. वर्तमानपत्रांच्या द्वारें त्यांस आपले विचार आपल्या देशबांधवांस कळवितां येतात. व्यवहारांत शेंकडों प्रकारांनीं त्यांस समाजशिक्षणाचें काम करितां येतें, व याचसाठीं ब्यूरॉक्रसीनें काढलेला हा अपवाद निरर्थक आहे. या अपवादाचा अर्थ जोंपर्यंत लोक अज्ञानदशेंत आहेत, जोंपर्यंत त्यांच्या बुद्धीस संस्कार झालेला नाहीं तोंपर्यंत त्यांस हल्लींच्या स्थितीबद्दल वैषम्य वाटत नाहीं; शिक्षणाचा प्रसार झाला, बुद्धि प्रगल्भ झाली, आत्मज्ञान प्राप्त झालें म्हणजे हल्लींच्या स्थितीबद्दल असंतोष उत्पन्न होतो—येवढाच होय. हा अपवाद किती फोल आहे हें त्यांतील गर्भित अर्थावरूनच सिद्ध होत आहे.

"However it may suit the interests of the officials to deny the fact, the educated classes are in the present circumstances of India *the natural leaders of the people*. Theirs is the vernacular press the contents of which do not fail to reach the masses; in a hundred ways they have access to the minds of the latter. And what the educated Indians think to-day the rest of India thinks to-morrow. Moreover do the officials realise how their contention condemns their rule, out of their own mouth ? For it means that only so long as the people of India are kept in ignorance and their faculties are forced to lie dormant that they do not raise any objection to the present system of administration. The mo-

-ment education quickens those faculties and clears their vision; they range themselves against a continuance of the system".

तिसरा आक्षेप ही सभा मूठभर सुशिक्षितांची असून ते देशाचे खरे पुढारी नव्हेत असा आहे. इंग्रजी इतिहासाचें अध्ययन करणारास हा आक्षेप नित्य परिचयांतील आहे. इंग्लडांतील कोणत्याही सुधारणेचा इतिहास पाहिला असतां सुधारणा घडवून आणणारे लोकांस अशींच नांवें ठेवण्यांत आलीं होतीं परंतु दूरदर्शी पुढाऱ्यांनीं अशा आक्षेपांकडे यत्किंचित्‌ही लक्ष न देतां आपले प्रयत्न अव्याहतपणें चालू ठेविले व दीर्घपरिश्रमानें त्यास यशःप्राप्ति झाली. पार्लमेंटच्या निवडणुकीच्या हक्काची सुधारणा, ( Reform Bill ) कॅथॉलिक लोकांची राजकीय हक्कप्राप्ति, ( Catholic Emancipation Bill) गुलामांची मुक्तता, ( Anti-slavery agitation ) कॉर्न लॉ लीग, वगैरे इंग्लंडांतील नामांकित चळवळींपासून हाच बोध घेण्यासारखा आहे. या सर्व सुशिक्षित पुढाऱ्यांनींच आपल्या अज्ञ देशबांधवांकरितां सुरू केल्या होत्या.

## रिफार्म बिल.

१८३१ पर्यंत हाऊस ऑफ कामन्सच्या निवडणुकीची पद्धत अगदीं असमाधानकारक होती, कॉमन्स सभेंतील पुष्कळ सभासद इंग्लंडचे राजे व लॉर्डस्‌ यांचे हस्तक होते; त्या योगानें कॉमन्स सभेंतील मताधिक्य पैशाच्या लांचलुचपतीनें व इतर अत्यंत निंद्य मार्गांनीं घडवून आणतां येत असे. कित्येक गांवांतून दहा पांच लोकांसच प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क असे. खुद्द राजघराण्यास कित्येक प्रतिनिधि पाठवितां येत असत. इंग्लंडांतील लीडस्‌, बर्मिंगहॅम, मॅन्चेस्टर अशा महत्वाच्या शहरांस प्रतिनिधि पाठविण्याचा मुळींच हक्क नव्हता. सुमारें ३५ गांवांस मतदारांची संख्या मुळींच नसतांना ७० प्रतिनिधि पार्लमेंटास पाठविण्याचा हक्क होता, व हे ७० प्रतिनिधि या गांवच्या जमीनदारांच्या हातांतील बाहुलींच होतीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. एडिंबरो, ग्लासगो अशा प्रसिद्ध शहरांतून सुद्धां २५।३० लोकांपेक्षां जास्त

लोकांस मत देण्याचा अधिकार नव्हता; व सर्व स्कॉटलंड देशांत चार हजारांपेक्षां जास्ती मतदारांची संख्या नव्हती. आयर्लंडमध्यें याहूनही वाईट स्थिति होती. कोणत्याही प्रकारची स्थावर मिळकत नसतांना मत देण्याचा अधिकार कित्येक लोकांस दिला होता व असे लोक ज्या ठिकाणीं रहात त्यांनीं त्या गांवच्या जमीनदारास मतें दिलीं पाहिजेत अशी वहिवाट होती. यायोगानें थोड्याशा श्रीमान् जमीनदार लॉर्डांना आयर्लंडच्या वतीनें असलेल्या प्रतिनिधींपैकीं दोनतृतीयांश प्रतिनिधी निवडण्याचा हक्क मिळालेला होता. सामान्यपणें धनिक, संपन्न व जमीनदार अशा थोड्या सरदार लोकांच्या हातांत पार्लमेंटचे प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क असे व त्यायोगानें त्यांचें वजनही राज्यकारभारांत फार होतें. पार्लमेंटांत पाठविलेल्या एका अर्जांत असें नमूद केलें होतें कीं, अवघ्या ८४ लोकांना १५७ प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार होता, व ७० वजनदार लोकांना १५० प्रतिनिधींना आपल्या हुकमतींत ठेवितां येत असे. याप्रमाणें पार्लमेंटचे निम्याहून अधिक सभासद पार्लमेंटांत पाठविण्याची शक्ति अवघ्या दीडशें लोकांच्या हातीं होती. ही स्थिति सुधारण्याकरितां Society of the friends of the people या नांवाची एक संस्था १७९० चे सुमारास स्थापन करण्यांत आली व तिच्या मार्फत निवडणुकीच्या हक्काच्या अनिष्ट स्थितीबद्दल पार्लमेंटास अर्ज करण्यास सुरुवात झाली. सनदशीर चळवळीस याप्रमाणें प्रारंभ झाला. **लॉर्ड चॅथॅम** यानीं निवडणुकीच्या या नादान पद्धतीची ( rotten part of the constitution ) दुरुस्ती करण्याबद्दल पार्लमेंटास सुचविलें होतें. इ. १७७६ सालीं **विलकीस** यानीं अशीच सूचना आणिली. १७८० सालीं **ड्यूक ऑफ रिचमंड** यांनींही प्रयत्न केला. १७९० सालींही **मि. फ्लड** यानीं सुधारणेची योजना पार्लमेंटपुढें मांडली होती. परंतु पार्लमेंटांत कोणाचीच डाळ शिजली नाहीं. Friends of the People सोसायटीचे **ग्रे** (Lord Grey) **व अर्स्किन** हे पुढारी होते. ग्रेसाहेबानीं पार्लमेंटांत १७९२ व १७९७ सालीं निवडणुकीच्या सुधारणेबद्दल ठराव आणिले;

परंतु पार्लमेंटांतील बहुमत यांच्या अगदीं विरुद्ध होतें, व त्यांचे ठराव नामंजूर झाले. १८१८ सालीं **बरडेट**साहेबानीं फिरून त्याच सूचना पार्लमेंटपुढें मांडिल्या; परंतु सहाशें प्रतिनिधींपैकीं अवघ्या एकानें त्यांच्या म्हणण्यास पुष्टि दिली. १८२२ व २३ सालीं **लॉर्ड जॉन रसेल** यांनीं हाच प्रश्न हातीं घेतला व १७ हजार सह्यांचा एक अर्ज पार्लमेंटास सादर केला. परंतु तोही फेटाळण्यांत आला. १८२६ व १८३० या सालीं पार्लमेंटांत फिरून चळवळ करण्यांत आली व त्या वेळचे मुख्य प्रधान **सर रॉबर्ट पील** व **ड्यूक ऑफ वेलिंग्टन** यांनीं प्रचलित असलेली पद्धति समाधानकारक आहे व त्यांत सुधारणा करण्याचें कांहीं कारण नाहीं, असें जाहिर केलें. याप्रमाणें पार्लमेंटांत एकसारखा अपजय येत असतांही सोसायटीच्या चालकांनीं धीर सोडला नाहीं. पराजयानें पुनः पुनः प्रतिहत होऊनही, नव्या दमानें, नव्या उत्साहानें, सोसायटीनें चळवळ करण्याचें काम चालू ठेविलें. वर्तमानपत्रांतून व जाहीर सभांतून लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न सुरू होता. सोसायटीच्या अनेक शाखा पुष्कळ ठिकाणीं स्थापन करण्यांत आल्या होत्या. खुद्द इंग्लंडचे राजे, हाऊस ऑफ लार्ड्स व कॉमन्स सभेंतील बहुतेक सभासद हे सुधारणेच्या योजनेच्या विरुद्ध असल्यामुळें यशःप्राप्तीचा संभव फारच कमी होता. परंतु पार्लमेंटाबाहेर Friends of the People या सोसायटीच्या चळवळीमुळें सुमारें ४० वर्षांच्या कालांत लोकमत जागृत झालें. १८३१ सालीं लॉर्ड जॉन रसेल यानीं पार्लमेंटच्या निवडणुकीची सुधारणा करण्याचें एक बिल कॉमन्स सभेंत आणलें व तें एकमताधिक्यानें मंजूर झालें. मंत्रिमंडळाचा पाडाव झाला. देशांत चळवळ उडून गेली. फिरून निवडणूक झाली, फिरून कॉमन्स सभेंत बिल मंजूर झालें. परंतु लॉर्डांच्या सभेनें तें नामंजूर केलें. पुन्हां ते बिल १८३२ च्या मार्चांत कॉमन्स सभेनें मंजूर केलें व लॉर्डांकडे पाठविलें. फिरून त लॉर्डांच्या सभेनें नामंजूर केलें. मंत्रिमंडळानें लॉर्डांची संख्या वाढवून बिल मंजूर करण्याचा राजेसाहेबांस सल्ला दिला तो परंतु त्यांनीं ऐकला नाहीं. सबब **लॉर्ड ग्रे** यांनीं प्रधानाच्या

जागेचा राजीनामा दिला. देशांतील चळवळ अगदीं विकोपास गेली. लोकमत प्रक्षुब्ध झालें व शांततेचा भंग होईल असें दिसूं लागलें. देशावर अनर्थ ओढवणार असें वाटून राजेसाहेबांनीं ग्रे साहेबांस फिरून प्रधान होण्याबद्दल आग्रह केला. लॉर्डांचा विरोध नाहींसा झाला व १८३२ सालीं रिफॉर्म बिल मंजूर झालें. या बिलाच्यायोगानें सुमारें ७५ लक्ष लोकांस पार्लमेंटास प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क विलायतेंतील लोकांस मिळाला. सनदशीर रीतीनें चालविलेल्या खटपटीस ४० वर्षांनीं ही यशःप्राप्ति झाली. या चळवळीपासून अनेक बोध घेण्यासारखे आहेत. सत्ताधारी लोकांस आपली सत्ता यत्किंचित्‌ही कमी झाली असतां अत्यंत दुःसह होतें, व आपल्या हातून शक्य तीं विघ्नें प्रतिपक्षाच्या मार्गांत आणण्यास ते कधींही कमी करीत नाहींत; तसेंच ज्या लोकांच्या कल्याणासाठीं सुधारणेचे प्रयत्न चाललेले होते, ते प्रथमतः त्यांना प्रतिकूल होते व पुढें उदासीन होते. त्यांच्यांत आपल्या हक्कांची जाणीव उत्पन्न होण्यास सुमारें अर्धा शतकपर्यंत इंग्लंडसारख्या लहान देशांतसुद्धां पुढाऱ्यांस अहर्निश खटपट करावी लागली. तिसरी गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, न्यायाची कोणतीही चळवळ चालू केल्यास प्रामाणिकपणानें, निरपेक्षपणानें व सात्विक बुद्धीनें प्रयत्न केले असतां कितीही अडचणी आल्या, कितीही संकटें सोसावीं लागलीं, कितीही अपमान झाला, कितीही नाउमेद झाली, तरी यशःप्राप्ति ही शेवटीं होतच असते. चवथी गोष्ट गोष्ट मनन करण्यासारखी आहे ती ही कीं, अज्ञानांत असलेला लोकसमाज एकदां जागृत झाला, आपल्या हक्कांची जाणीव त्याचे ठिकाणीं उत्पन्न झाली, त्याजवर होत असलेल्या अन्यायाबद्दल त्याच्यांत तळमळ वाटूं लागली म्हणजे संघशक्तीच्यायोगानें प्रक्षुब्ध जनतेचा जोर राजसत्तेवर आपोआपच होतो, व राजनीतीला योग्य वळण लागतें. सत्ताधारी वर्ग समंजस असला म्हणजे लोकमताच्या ओघाचा बरोबर अजमाव करून प्रजेस संतुष्ट करण्याचा प्रयत्न त्याचेकडून केला जातो. लोकमत तयार करण्याचा हा मार्ग धिम्मेपणाचा व काला-

# राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष.



सुरेंद्रनाथ बानर्जी
पुणें—१८९५. अहमदाबाद—१९०४.



रहिमतुल्ला म. सयानी
कलकत्ता—१८९६.

AN 1444



सर शंकर नायर—उमरावती १८९७.



ए. एम्. बोस—मद्रास १८९८.

वधीचा आहे व तो सुशिक्षितांनींच स्वीकारला पाहिजे. हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीच्या दृष्टीनें विचार केला असतां येथील राजपद्धति सुधारणेचें काम फारच दुष्कर आहे. रिफार्म बिलाचे वेळीं खटपट करणाऱ्या लोकांस स्वकीय सत्ताधारी लोकांचेंच मन वळवावयाचें होतें; तशी परिस्थिति येथें नाहीं. इंग्लंडांत चळवळ करणारे सुशिक्षित लोक व सत्ताधारी वर्ग यांचे हितसंबंध खरोखर पाहतां विरोधाचे नव्हते. स्वार्थपरायणतेनें, अज्ञानानें, जुन्या परंपरेच्या अभिमानानें, सत्ताधारी लोकांकडून विरोध केला जात असे. या बाबतींतही हिंदुस्थानांतील व इंग्लंडांतील परिस्थितींत फारच तफावत आहे. सत्ताधारी वर्ग व सनदशीर चळवळ करणारे लोक यांचे हितसंबंध येथें परस्परविरुद्ध आहेत. इंग्लंडांतील जनता व हिंदुस्थानांतील अफाट समाज यांमध्यें शिक्षणाच्या, संस्काराच्या व संख्येच्या बाबतींत महदंतर आहे. अर्थात् अशा स्थितींत सनदशीर चळवळीस यशःप्राप्ति होण्यास पुष्कळ कालातिपात लागेल. तथापि रिफॉर्म बिलाच्या चळवळीपासून येथील पुढाऱ्यांनीं जो घेण्यासारखा बोध आहे तो हा कीं, दोघांचे हेतु उदात्त व सात्विक मनोवृत्तीचे होते व आहेत, दोघांचेही प्रयत्न न्याय व समतेबद्दलच चालले होते व आहेत व याच कारणामुळें जरी थोडासा अधिक काळ येथील लोकांच्या इच्छा सफल होण्यास लागला, तथापि यशःप्राप्ति होईल ही आशा या उदाहरणावरून मात्र बलवत्तर होत आहे.

रिफार्म बिलाच्या चळवळीच्या वेळीं लोकपक्षाला सोसावा लागलेला त्रास व आपत्ति व चळवळीची गति कुंठित करण्याकरितां सत्ताधारी वर्गानें भाषण, लेखन व संमेलन यांजवर घातलेले निर्बंध या सर्वांचा इतिहास फार बोधप्रद आहे. इतिहासाची पुनरावृत्ति वेळो वेळीं कशी होत असते याचेंही उदाहरण पाहण्यासारखें आहे. रिफार्म बिलासंबंधीं चळवळ चालू झाली त्या वेळीं तिच्या पुरस्कर्त्यांस सत्ताधारी वर्गानें अडचणींत आणण्याचा प्रयत्न केला. **थॉमस मूर**सारख्या कित्येक पुढारी लोकांस राजद्रोहाच्या आरोपावर शिक्षा करण्यांत आल्या. जस्टिस ऑफ धी

पोलिसला चळवळ करणाऱ्या मनुष्यांकडून जामीन घेण्याचा अधिकार देण्यांत आला. सेक्रेटरी ऑफ स्टेट यांस संशयावरून एखाद्या व्यक्तीस तुरुंगांत ठेवण्याचा अधिकार मिळाला. १८१९ सालीं कोणत्याही राजकीय चळवळीबद्दल सभा भरविणें राजद्रोहाचें समजून बंद करण्यांत आलें होतें. मँचेस्टरमध्यें सुमारें ४० हजार लोकांची एक सभा भरली होती. परंतु पोलिसांनीं ती सभा हांकून लाविली. या दंग्यांत पुष्कळांना दुखापती झाल्या, सुमारें ४०० लोक जखमी झाले व कांहीं थोडे मरण पावले. यासंबंधीं उघड चवकशी करण्यांत यावी व गुन्हेगार पोलिसांना शासन व्हावें म्हणून पुष्कळ आक्रोश पार्लमेंटांत करण्यांत आला, परंतु तो निष्फळ झाला. उलट पार्लमेंटनें सक्तीचे कायदे केले. या कायद्यांना सहा कायदे ( six acts ) असें नांव आहे. एकानें स्वस्थतेसंबंधीं झालेल्या गुन्ह्यांत आरोपीचा पुरावा देण्याचा हक्क मर्यादित केला. दुसऱ्याच्यायोगानें राजद्रोहासंबंधीं शिक्षा झाली असतां आरोपीनें प्रसिद्ध केलेलीं व आक्षेपार्ह ठरलेलीं सर्व पुस्तकें जप्त करण्याचा अधिकार कोर्टास देण्यांत आला; व राजद्रोहाबद्दल दोन वेळ खटला होऊन गुन्हा शाबीत झाल्यास कैद, हद्दपारी किंवा जन्मठेपेची शिक्षा लागू केली. तिसऱ्या कायद्यानें राजकीय प्रश्नांसंबंधीं प्रसिद्ध झालेल्या सर्व पुस्तकांवर व हस्तपत्रकांवर कर बसविण्यांत आला. चवथ्या कायद्यानें कोणत्याही गांवांत सहा दिवसांची लेखी नोटीस सात घरवाल्यांनीं स्थानिक मॅजिस्ट्रेटांस सभेबद्दल दिल्याखेरीज सभा भरवितां येणार नाहीं असें ठरविण्यांत आलें व या सभांस पन्नासांहून अधिक लोकांनीं जाऊं नये असेंही फरमाविण्यांत आलें व अधिक लोक गेल्यास त्यांना दंड व शिक्षा होईल असेंही जाहीर करण्यांत आलें. कोणतेंही व्याख्यान किंवा वादविवाद होण्याच्या जागेस परवाना घेतला पाहिजे व अशा जागेची वाटेल तेव्हां तपासणी केली जाईल असेंही ठरलें. पांचव्या कायद्यानें हत्यारांच्या शिक्षणाची मनाई केली व सहाव्या कायद्यानें अस्वस्थतेच्या भागांत स्थानिक मॅजिस्ट्रेटास कोणत्याही घराची झडती घेण्याचा अधिकार

देण्यांत आला. वरील प्रकारच्या सर्व कायद्यांच्या कैचींतून व अधिकारी वर्गाच्या जुलमांतून निभावून, अनेक आपत्ति सोसून, रिफार्म बिलाची चळवळ यशस्वी झाली. कर्झनसाहेबांच्या बंगालच्या फाळणीनंतर जी अस्वस्थता येथें उत्पन्न झाली व सरकारनें जें उग्र स्वरूप धारण केलें तो सर्व प्रकार रिफार्म बिलाच्या काळांतील सत्ताधारी वर्गाच्या जुलमी कृत्याचें अनुकरणच होय. बारिसाल येथील उधळून दिलेली प्रांतिक सभा, गुरखे लोकांचें व लष्करी शिपायांचें मैमनसिंग, डाक्का येथील ठाणें व त्यांचें उद्दाम वर्तन, ऑफिशियल सीक्रेटस् बिल, विद्यार्थ्यांच्यासंबंधीं सक्तीचे नियम, राष्ट्रीय गीत म्हटल्यावरून त्यांची हकालपट्टी व त्यांजवरील फुल्लरशाहींतील खटले, सभाबंदीचा कायदा, मुद्रणसंस्थांच्या व वर्तमानपत्रांच्या जामिनकीचा कायदा, समिती व संस्था बंद करण्याचा कायदा, झटपट चौकशीबद्दल स्पेशल ट्रायब्यूनलची स्थापना वगैरे सर्व कायदे हें सत्ताधारी वर्गाच्या सर्वत्र आढळणाऱ्या औद्धत्त्याचें प्रदर्शन होय; परंतु अशा भयानक स्वरूपानें, सात्विक बुद्धीनें चालविलेली चळवळ यत्किंचित्‌ही कमी न होतां जोरानें फोंफावत जाते, असेंच रिफार्म बिलाच्या चळवळीवरून दिसून येणार आहे.

## कॅथॉलिक इमॅन्सीपेशन बिल.

रिफार्म बिलाप्रमाणेंच कॅथॉलिक इमॅन्सीपेशन बिलाचा इतिहासही बोधप्रद आहे. १७७९ सालीं **ओकोनेल** यानीं प्रथमतः कॅथॉलिक लोकांच्या राजकीय अडचणी दूर करण्याबद्दल एक संस्था स्थापन केली व या संस्थेमार्फत सभा भरविणें, अर्ज पाठविणें, लोकमत जागृत करणें हे प्रयत्न सुरू झाले. पुष्कळ दिवसपर्यंत या संस्थेकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. १८२३ मध्यें या संस्थेमध्यें पुष्कळ सभासदांची भरती करण्यांत आली व डब्लीनमध्यें राष्ट्रीय सभेसारखी एक प्रचंड सभा भरविण्यांत आली. **ओकोनेल व शील** यांसारख्या प्रसिद्ध वक्त्यांनीं भाषणें केलीं. वर्तमानपत्रांतून व हस्तपत्रकांतून सभेच्या हकीकतीचा प्रसार करण्यांत आला. ही संस्था जास्त जोराची व जास्त वजनदार होत आहे, हें पाहून अशा संस्था बंद करण्याचा व त्यांना द्रव्यद्वारां सहाय कर-

ण्याची मनाई करण्याचा कायदा सरकारनें केला. दडपशाईच्या सरकारी धोरणामुळें जरी उघड रीतीनें अशा संस्था बंद करण्यांत आल्या, तथापि, कॅथॉलिक लोकांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याबद्दल प्रयत्न सुरूच होते. इंग्लंडमध्येंही याबद्दल लोकमत जागृत करण्यांत आलें; वर्तमानपत्रांतील लेखांनीं, जाहिर व्याख्यानांनीं व हस्तपत्रकांनीं सर्व देश दुमदुमून गेला व शेवटीं कॅथॉलिक लोकांच्या दुःखांचो दाद लागून त्यांच्या अडचणी नाहींशा करण्यांत आल्या. कॅथॉलिक इमॅन्सीपेशन बिल मंजूर झालें.

## इतर चळवळी.

गुलामांची मुक्तता, ॲन्टी कार्न लॉ लीग वगैरे चळवळींचा इतिहासही इतकाच मननीय आहे, परंतु विस्तारभयास्तव त्यांचें विस्तृत विवरण करतां येत नाहीं. रिफार्म बिल व कॅथॉलिक लोकांची राजकीय हक्कप्राप्ति, यांच्या वर दिलेल्या हकीकतीवरून असें दिसून येईल कीं, या सुधारणा ज्या लोकांचे कल्याणाकरितां अवश्य आहेत म्हणून चळवळ चालू होती, त्या लोकांना त्याबद्दल प्रारंभीं मुळींच ज्ञान नव्हतें. समाजांतील सुशिक्षित लोकांनींच पुढाकार घेऊन लोकांत हक्कांची जागृति उत्पन्न केली. या हक्कांचें रहस्य कळल्याबरोबर समाजांत चैतन्य उत्पन्न जाहलें; हक्कांबद्दल जोराची मागणी सुरू जाहली व सुशिक्षित पुढाऱ्यांस शक्य तितक्या उत्साहानें लोकांनीं पाठिंबा दिला. समाजोन्नतीचें काम फलद्रूप जाहालें. हें कार्य स्वस्थतेचा भंग न करतां, अत्याचार न करतां, सनदशीर चळवळीच्या मार्गानें घडवून आणतां आलें. हिंदुस्थानांतही हीच स्थिति आहे. ज्या राजकीय सुधारणांबद्दल राष्ट्रीय सभा सालदरसाल मागणें करीत आहे त्या लोकांचे उन्नतीकरितांच आहेत. लोकांना त्यांच्याबद्दल मात्र अज्ञानदशेमुळें असावी तितकी आस्था अद्याप वाटत नाहीं. तथापि राष्ट्रीयसभेनें चालविलेल्या ज्ञानसत्रामुळें लोकांत जागृति होऊन आपल्या हक्कांबद्दल निःसीम तळमळ वाटूं लागेल व सुशिक्षित पुढाऱ्यांच्या चळवळीची अवश्यकता व यथार्थता इतर देशांप्रमाणें येथेंही सर्वांचे प्रत्ययास येईल. हा फक्त कालाचा प्रश्न आहे. सनदशीर चळवळ कशी यशस्वी होते याचें एका इंग्रजी इतिहासकारानें फार

मार्मिकपणानें वर्णन केलें आहे. Political agitation to be successful must be based on a real grievance, adequately represented in parliament and in the press, and supported by the rational approval of enlightened men. राष्ट्रीयसभेनें दाखविलेल्या अडचणी व दुःखें अगदीं खरीं आहेत, त्यांबद्दल सरकारचें लक्ष शक्य त्या मार्गानें वेधलें जात आहे. वर्तमानपत्रांत त्याबद्दल खल होत आहे व देशांतील सर्व समंजस लोकांनीं आपली संमति राष्ट्रीय सभेच्या या चळवळीस दिली आहे. अर्थात् ही यशस्वी होईल याबद्दल कोणतीही शंका नाहीं.

## आणखी कोटिक्रम.

चौथा एक कोटिक्रम असा आहे कीं, राष्ट्रीय सभेच्या मागण्या हिंदुस्थानांतील असंख्य प्रजेस जरूर वाटत नाहींत. याचा अर्थ हिंदुस्थानांतील प्रजेनें, आपलें गाऱ्हाणें राष्ट्रीय सभेच्या शब्दांत केलें नाहीं, एवढाच असेल तर, या अपवादाबद्दल कांहींच म्हणावयाचें नाहीं. परंतु राष्ट्रीय सभा ज्या गैरसोईबद्दल तक्रार करीत आहे त्या गैरसोई लोकांस भासत नाहींत असें या आक्षेपकांचें म्हणणें असल्यास तें सर्वथैव निराधार आहे. या बाबतींत फरक असल्यास भाषेच्या प्रकारांत आहे. सुशिक्षितांच्या मागणीची भाषा व अशिक्षितांची भाषा यांमध्यें संस्कारभेदाप्रमाणें तफावत आहे. परंतु वस्तुतः ती मागणी एकच आहे. शेतकरी लोकांस विचारलें असतां, ते आपल्या गरजा अशा सांगतात "जमिनीवरील सारा वाढवूं नये, मीठभाकर सुखानें खातां यावी, कर्जवाम सोईनें मिळावें, अब्रूनें तें फेडतां यावें, दुष्काळांत सरकारानीं साऱ्याची सूट द्यावी, कांहीं प्रसंगीं तहकुबी द्यावी, आपल्यास वागवून घ्यावें, आपल्या धान्यांस योग्य किंमत यावी, आपल्या पोराबाळांस उदरनिर्वाहाचीं साधनें असावींत व वाढत्या प्रपंचाचा भार सर्वस्वी शेतकीवर पडूं नये". हेंच मागणें राष्ट्रीयसभा आपल्या पारिभाषिक शब्दांनीं खालीलप्रमाणें निवेदन करिते. "कायम धाऱ्याची पद्धति सर्व देशांत चालू करून शेतकीस उत्तेजन द्यावें; मिठावरील कर कमी करून गरीब रयतेवरील ओझें कमी करावें; व जीविताला अवश्य लागणाऱ्या या साधनाचा त्यांस ज्यास्त उपयोग करितां येईल अशी तरतूद करावी; शेतकऱ्यांच्या बँका व पतपेढ्या काढून शेतकऱ्यांस सोईनें कर्ज मिळ-

णेचीं साधनें उत्पन्न करावीं; शेतकऱ्यांच्या स्थितीकडे लक्ष देऊन सवलतीनें पैसे फेडण्याची मुभा ठेवावी; फॅमिन कोड करून साऱ्याचे तहकुबीचे, सुटीचे व मदतीचे नियम उदार व सढळ प्रमाणांवर करणेंत यावेत; रुपायाचा भाव कृत्रिमपणानें वाढवून शेतकरी वर्गाचा तोटा करूं नये व चलनपद्धतीच्या योगानें त्यांचा माल विकतांना नुकसान होऊं नये; शेतकीचें शिक्षण वाढवून एका धंदाच्या ठिकाणीं दोन धंदे उत्पन्न होतील, असें ज्ञान शेतकरीवर्गास देऊन त्याची स्थिति सुधारण्यांत यावी; प्राथमिक शिक्षणाचा सर्वत्र फैलाव करून शेतकरी वर्गाची मानसिक व आध्यात्मिक उन्नति करावी; उद्योगधंद्यांची वाढ करून व उदरनिर्वाहाचीं साधनें वाढवून शेतकीवर पडणारा बोजा अंशतः कमी करावा." राष्ट्रीय सभेच्या वर नमूद केलेल्या मागण्या व शेतकरी वर्गाचे कळवळ्याचे बोल यांत काय अंतर आहे हें प्रत्येक विचारी मनुष्यानें ताडून पहावें म्हणजे या कोटिक्रमांतील फोलपणा स्पष्ट दिसून येईल. अशिक्षित शेतकरी वर्गाप्रमाणेंच इतर वर्गाचीं दुःखेंही राष्ट्रीय सभा आपल्या भाषेनें सरकारपुढें मांडीत आहे. फरक असल्यास शब्दांचा आहे; वस्तुस्थितीचा किंवा अर्थाचा मुळींच नाहीं; हा आक्षेप मुख्यत्वेंकरून युरोपियन सत्ताधारी वर्गाकडून काढला जातो. प्रजेचें खरें हृद्गत यांस मुळींच कळत नाहीं. ते लोकांत मुळींच मिसळत नाहींत. लोकांच्या भाषेचें ज्ञान त्यांस थोडेंही असत नाहीं. अधिकाराच्या व सत्तेच्या दर्पामुळें आपलें मनोगत त्यांस सांगण्यास कोणी धजत नाहीं व यामुळेंच लोकांस काय पाहिजे आहे याबद्दलच्या त्यांच्या कल्पना अगदीं भ्रामकपणाच्या आहेत. "But leave the service, become a nobody, mix freely with the people, hear what they have to say when not afraid to speak their minds, study the reverse of the shield and knowing you as I do I know well that you would wholly change your views. The only way of learning the truth is to mix freely with the people—the people of all classes from the highest to the lowest, prove to them that you are trustworthy and they will trust you and tell you all the truth. This is not only the best way

but the *only way.* " संयुक्त प्रांताचे लेफ्टनंट गव्हर्नर सर ऑकलंड कॉलव्हीन यांस पाठविलेल्या उत्तरांत ह्यूमसाहेबानीं काढलेले वरील उद्गार युरोपियन सत्ताधारी वर्गापैकीं प्रत्येकानें विचार करण्यासारखे आहेत.

पांचवा आक्षेप असा आहे कीं, राष्ट्रीय सभा जे हक्क मागत आहे त्यांस येथील लोक लायख जाहले नाहींत. हा आक्षेप ब्युरॉक्रसीनें ( युरोपियन सत्ताधारी वर्गानेंच ) काढला आहे. राष्ट्रीय सभेनें चालविलेलें हें हक्काचें भांडण मुख्यतः याच वर्गाविरुद्ध आहे. वादामध्यें एका पक्षानें दुसऱ्याविरुद्ध केलेले आरोप जितके स्वार्थमूलक व निराधार असतात, तितकाच हा आक्षेप निरर्थक आहे. कोणतेही हक्क देतांना ते न देण्याची सबब नालायखीच्या कारणावरच प्रथम पुढें आणण्यांत येते. याबद्दल ग्लॅडस्टनसाहेबांनीं काढलेले उद्गार नेहमीं लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.

"It is liberty alone which fits men for liberty. This proposition like every other in politics has its bounds; but it is far safer than the counter doctrine, wait till they are fit."

स्वतंत्रतेचा उपभोग घेण्यास लोकांस पात्र करण्याचा खरा मार्ग म्हणजे स्वातंत्र्य देणें हाच होय. पिंजऱ्यांत कोंडून ठेवलेला राघू उंच भराऱ्या मारीत नाहीं, म्हणून आक्रोश करणें जितकें हास्यास्पद आहे तितकाच वरील कोटिक्रम निरर्गल आहे. पिंजऱ्यांतील राघूच्या जातीचे स्वतंत्र राघू जर स्वेच्छेनें वाटेल तितका उत्तुंग विहार करूं शकतात तर बंदिवासांत असलेला राघू स्वतंत्र झाल्यावर पाहिजे तिकडे उड्डाण करणार नाहीं काय? हिंदुस्थानांतील अनुभवही हेंच तत्त्व जोरानें प्रतिपादित आहे. वरिष्ठ प्रतीच्या जबाबदारीच्या जागांस येथील लोक लायख नाहींत असा ब्युरॉक्रसीचा पुष्कळ वर्षांचा आरोप होता. सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्या कौन्सिलांत, वरिष्ठ व प्रांतिक सरकारच्या कार्यकारी कौन्सिलांत, एतद्देशीय लोकांस जागा देण्याबरोबर तेही जबाबदारीचीं कामें करण्यास सर्वतोपरी लायख आहेत असाच अनुभव आलेला आहे. सर कृष्ण गुप्त

व सर एस्. पी. **सिंह** यांजबद्दल सेक्रेटरी ऑफ स्टेट व व्हाइसरॉय यांनीं काढलेले उद्गार व लॉर्ड हार्डिंज यानीं सर **अल्ली इमाम** यांचेबद्दल केलेली अत्यंत थोर प्रशंसा-यावरून हेंच सत्य स्थापित होत आहे. सबब राष्ट्रीय सभा मागत असलेले हक्क येथील लोकांस देण्यास येथील लोक पात्र नाहींत ही सबब अगदीं पोरकटपणाची आहे.

सहावा आक्षेप असा आहे कीं, निरनिराळ्या जातींची सहानुभूति व सहकारिता राष्ट्रीय सभेस नाहीं. हिंदुस्थानांतील प्रमुख जातींपैकीं पार्शी लोकांबद्दल विचार केला असतां या जातींतील अत्यंत सन्माननीय पुढारी म्हणजे **दादाभाई नवरोजी**, परलोकवासी **सर फेरोजशहा मेथा**, **ना. मि. वाच्छा** या लोकांनीं राष्ट्रीय सभेस सर्वस्वी वाहून घेतलें आहे. यांच्यापेक्षां अधिक लोकोत्तर पुढारी सर्व पारशी जातींत आहेत, असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. पारशी जातींतील उदार महात्मे **मरहूम टाटा** यांचीही राष्ट्रीय सभेस पूर्ण सहानभूति होती. ज्याअर्थीं राष्ट्रीय सभा ही देशांतील पुढाऱ्यांचीच आहे व जोंपर्यंत पारशी जातींतील सर्वमान्य पुढारी राष्ट्रीय सभेकरितां तन मन धन खर्च करीत आहेत, तोंपर्यंत या जातीबद्दल तरी वरील आक्षेप लागू पडत नाहीं. हिंदुस्थानांतील दुसरी प्रमुख जात म्हणजे मुसलमानांची होय. **बद्रुद्दीन तय्यबजी**, **रहिमतउल्ला सयानी**, **नवाब सय्यद महमद**, **नामदार मझरुल हक्क**, **नामदार जिना**-यांसारख्या वजनदार व थोर पुढाऱ्यांनीं राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान व राष्ट्रीय सभेचें अधिवेशन अलंकृत केलें आहे. परंतु मुसलमान लोकांतील बरेच पुढारी राष्ट्रीय सभेपासून आजपर्यंत अलग होते हेंही खरें आहे. मुसलमान लोकांच्या आक्षेपांचें निरसन **नामदार सयानी** यानीं राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष या नात्यानें सन १८९६ सालीं फार विस्तारानें व मार्मिकपणानें केलें आहे. त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. मुसलमान लोकांचा विरोध मुख्यत्वेंकरून सर सय्यद अहमद व त्यांचे अनुयायी यांचा होता. या विरोधास ब्युरॉक्रसीनें उत्तेजन दिलें होतें. सरकारच्या भयामुळें, सरकारी अधि-

काऱ्यांची मर्जी संपादन करण्याच्या बुद्धीनें, पोकळ पदव्या व राजदरबारची प्रतिष्ठा यांच्या हांवेमुळें, धर्मवेडाच्या खुळामुळें, पूर्वसंस्कारांच्या भ्रामक अभिमानामुळें व शिक्षणाच्या अभावामुळें, मुसलमानांतील कित्येक लोक राष्ट्रीय सभेस प्रतिकूल होते. परंतु उच्च शिक्षणाचा ज्या मानानें या समाजांत फैलाव होऊं लागला, अलिगड व तेथील उदात्त संस्कार यांची जसजशी व्याप्ति वाढूं लागली, तुर्कस्थानच्या उत्साहजनक इतिहासाचा जसजसा प्रकाश त्यांच्या अंतःकरणांत पडूं लागला, सापेक्षत्वानें आत्मप्रत्ययाची वाढ जसजशी होत गेली व हिंदुस्थानांतील एकराष्ट्रीयत्वाची भावना जसजशी विकास पावूं लागली, त्या मानानें मुसलमानांतील राष्ट्रीय सभेबद्दलचा विरोध कमी होत गेला; तिजबद्दलची त्यांची सहानुभूति वृद्धिंगत होत गेली. मुसलमानांतील सुशिक्षित पुढाऱ्यांनीं आपल्या समाजाच्या उन्नतीकरितां स्थापन केलेल्या मॉस्लेम लीगनेंही राष्ट्रीय सभेप्रमाणें आपलें अंतिम ध्येय 'स्वराज्य' हेंच आहे असें जाहीर केलें आहे व आजमित्तीस तरी हिंदु व मुसलमान यांतील सुशिक्षित पुढाऱ्यांच्या उन्नतीच्या कल्पना, महत्वाकांक्षा व भविष्यकाळाची भावना एकच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ब्युरॉक्रसीनेंही भेदवृत्तीच्या राजनीतिचें अवलंबन करून हिंदु लोकांचा पाडाव करण्याकरितां मुसलमानांस जवळ करण्याचा जो डाव चालविला होता, त्यांतही कानपूरच्या मशिदीच्या प्रकरणामुळें त्यांस सर्वस्वी अपयश आलें आहे. मुसलमान समाजांतील जागृत झालेल्या तेजाची साक्ष त्यांस पटली आहे. आवडत्या व नावडत्या बायकोचें खूळ, यापुढें तरी ब्युरॉक्रसीमध्यें माजेल असें दिसत नाहीं. यंदांच्या वर्षी मुसलमानांतील सुशिक्षित पुढाऱ्यांची व राष्ट्रीय सभेच्या चालकांची मॉस्लेम लीग व राष्ट्रीय सभा यांच्या अधिवेशनांनीं मुंबईंतच एक समयावच्छेदेंकरून गांठ पडण्याचा सुयोग आला आहे. हल्लींच्या अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं हें संमेलन राष्ट्राची प्रगति होण्यास पुष्कळ अंशीं कारणीभूत होईल अशी आमची आशा आहे. नामदार आगाखान यानीं मास्लेम

लीगच्या अधिवेशनास संमति दिल्याचें नुकतेंच जाहीर झालें आहे, ही बातमी अत्यंत समाधानकारक आहे. वरील विवेचनावरून मुसलमानांच्याबद्दलही घेण्यांत आलेला आक्षेप सयुक्तिक नाहीं, असें दिसून येईल. बाकीच्या इतर जाती संख्येच्या मानानें अगदींच अल्प आहेत व त्यांचेकडून आजपर्यंत कोणतेही आक्षेप घेण्यांत आलेले नाहींत.

सातवा आक्षेप असा आहे कीं, राष्ट्रीयसभा ही असंतुष्ट सुशिक्षितांची असून ती राजनिष्ठ नाहीं. हाही आक्षेप ब्युरॉक्रसीचाच आहे. राष्ट्रीय सभा उत्पन्न झाल्यापासून तिची भिस्त ब्रिटिश राज्यसत्तेच्या उदार नीतीवरच सर्वस्वी अवलंबून आहे. ब्रिटिश राज्यसत्तेनें उदात्त बुद्धीनें दिलेल्या शिक्षणाचें राष्ट्रीयसभा हें फळ आहे. पाश्चिमात्य शिक्षण व संस्कृति यांबद्दल सुशिक्षितांस आदर वाटत आहे. या शिक्षणाचा व संस्कारांचा लाभ राज्यकर्त्यांनीं आपल्यास दिल्याबद्दल सुशिक्षित लोकांत कृतज्ञताबुद्धि वसत आहे. अशा स्थितींत राष्ट्रीय सभेस अराजनिष्ठ म्हणणें खोडसाळपणाचें आहे. या बाबतींत सर वुइल्यम हंटर यानीं काढलेले उद्गार फार महत्वाचे आहेत.

They are the men who form the natural interpreters of our Rule to the masses of the people. To speak of such men when their activity takes a political direction as disaffected would be equally unjust and untrue. For they are the men who of all our Indian fellow subjects realise most clearly that their interests present and future are identified with the permanence of British rule.

वस्तुतः पाहिलें असतां, सुशिक्षित लोकांनीं देशोन्नतीच्या कामीं महत्वाची कामगिरी केली आहे. सुशिक्षित पुढाऱ्यांनीं पुढाकार घेतला नसता तर परिस्थितीमुळें उत्पन्न जाहलेल्या व होत असलेल्या असंतोषास भलतेंच स्वरूप प्राप्त जाहलें असतें व त्यास आळा घालणेंही फार दुष्कर जाहलें असतें. अज्ञान लोक असंतुष्ट व किंकर्तव्यतामूढ जाहले म्हणजे कोणच्या थरास जातील याचा नेम नाहीं असें इतिहास सांगतो.

सुशिक्षित लोकांनीं या ऐतिहासिक सिद्धांतांचा विचार करून लोकांतील चळवळीस योग्य वळण लावलें आहे. राज्यकर्त्यांचा हेतु प्रजाजनांस समजावून सांगणेचा प्रयत्न चालू ठेवला आहे व ब्रिटिश राज्यसत्तेमध्यें स्वातंत्र्य, समता व न्यायबुद्धि यांजबद्दल जी उच्च मनोवृत्ति पदोपदीं आढळून येते- तिच्यावर विश्वास ठेवून सात्विक बुद्धीनें व प्रामाणिक हेतूंनीं सनदशीर चळवळ करण्याचें वळण राष्ट्रोन्नतीस दिलें आहे. यायोगानें जित व जेते यांमधील संबंध प्रेमाचे व सलोख्याचे होण्याची संभवनीयता या देशांत प्राप्त जाहली आहे. अशा स्थितींत या चळवळीस राजद्रोही म्हणणें कृतघ्नपणाचें होईल. पंडित बिशन नारायण धार यानीं आपल्या एका विद्वत्ताप्रचुर लेखांत नमूद केलेले विचार संस्मरणीय आहेत.

It is a matter not of reproach nor of lamentation but of congratulation and even jubilation that the happy thought of subduing and organising forces which were beginning to run into dangerous courses first occured to some of our most enlightened countrymen; and that when the foundation of the great movement was thus laid upon knowledge, culture and patriotism it was very easy to enlarge the circle of its adherents and sympathisers by popularising its teachings among the masses and by persuading them to see that a great cause espoused and advocated by the cultivated intelligence of their country, wished for their support and encouragement. Whatever taunts the unfairness of political rancour may hurl at them, the founders of the Congress have yet the satisfaction of thinking–which is indeed their chief reward–that at a time when the ruled and the rulers are divided by the impassable gulf of civilisation, of manners, of religion and of nationality, when millions of Indians cannot appreciate the usefulness of those great boons which entitle the British rule to our highest esteem and regard, when the memory of the past rule is still cherished by the people, when for obvious reasons the Government and the subject races

are apt to misconstrue each other's motives and actions they had organised an institution which acts as an interpreter of the peoples' wants to the Government and of the just but so often misjudged actions of the Government to the people and which under the present circumstances possesses the chief condition of a safe and reliable guide to both.

## सरकारचें धोरण.

खुद्द सरकारचें राष्ट्रीय सभेबद्दलचें धोरण पाहिलें असतां, हा अपवाद निरर्थक आहे असें दिसून येईल. **लॉर्ड डफरीन** यानीं राष्ट्रीय सभा अस्तित्वांत आणण्यांत कोणती खटपट केली हें पूर्वीं नमूद केलें आहे. लॉर्ड डफरीन यानीं सन १८८६ सालीं कलकत्ता येथें राष्ट्रीय सभेंतील नामांकित पुढाऱ्यांस सन्माननीय पाहुणे म्हणून गार्डनपार्टीस बोलाविलें होतें. सन १८८७ सालीं **लॉर्ड कोनेमेरा** यांनीं मद्रासेस याचप्रमाणें राष्ट्रीय सभेंतील कांहीं सभासदांचा सन्मान केला. **लॉर्ड रॅन्डॉल्फ चर्चिल** यानीं राष्ट्रीय सभेचा विजय झाल्यास आपल्यास अत्यंत आनंद होईल, असे उद्गार काढले. इंग्लंडांतील प्रसिद्ध मुत्सद्दी **ग्लॅडस्टन** यानीं राष्ट्रीय सभेस **थोर जनसमूह** ( This great people ) असें नांव देऊन त्यांच्या मागण्यांचा अनादर करणें गैरशिस्त आहे, असा इशारा दिला. सर **चार्लस इलियट** यानीं सन १८९० सालीं कलकत्त्यास लेफ्टेनन्ट गव्हर्नर असतांना राष्ट्रीय सभेस विरोध करण्याचा प्रयत्न केला होता. प्रेक्षक या नात्यानें पुष्कळ सरकारी अधिकाऱ्यांकडे पाठविलेलीं तिकिटें परत करण्यांत आलीं. सर चार्लस इलियट यानीं असेंही प्रसिद्ध केलें कीं, हिंदुस्थानसरकारच्या हुकुमामुळें कोणत्याही सरकारी अंमलदारास 'प्रेक्षक' या नात्यानें सुद्धां राष्ट्रीय सभेच्या बैठकीस हजर राहणें अयोग्य आहे. इलियटसाहेबांच्या या हुकुमानें त्या वेळीं बरीच चळवळ जाहली. हिंदुस्थान सरकारचे या बाबतींतील काय हुकूम आहेत, यांचा एकवार खुलासा करावा अशी विनंति राष्ट्रीय सभेनें केली. वरिष्ठ सरकाराशीं पत्रव्यवहार करणेंत आला व **लॉर्ड लॅन्सडौन** साहेबांनीं केलेला खुलासा फार महत्वाचा आहे. या खुलाशांत असें

म्हटलें आहे कीं, 'राष्ट्रीय सभेची चळवळ सर्वस्वी कायदेशीर आहे. खाजगी लोकांनीं तिच्याशीं संबंध ठेवण्यास कोणचीही हरकत नाहीं. परंतु सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यांत प्रत्यक्षपणें कोणताही भाग घेणें बरें नव्हे. राष्ट्रीय सभा ही युरोपांतील प्रगमनशील लिबरल पक्षाप्रमाणें आहे, परंतु त्याबरोबरच देशांत एक कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षही आहे. या दोन्ही पक्षांशीं तटस्थ राहणें सरकारास इष्ट वाटत आहे व याचसाठीं सरकारी अधिकाऱ्यांनीं राष्ट्रीय सभेच्या कामांत प्रत्यक्ष संबंध (Active participation) ठेवूं नये असें सरकारचें मत आहे.' परंतु हा नियम प्रत्यक्ष सरकारचे नोकरींत असलेल्या लोकांसच लागू आहे. पेन्शन घेतलेल्या किंवा सरकारी नोकरींतून बाहेर पडलेल्या लोकांस हा नियम लागू नाहीं. या ठरावाच्यायोगानें प्रेक्षक या नात्यानें सरकारी नोकरांना हजर रहाण्यास सरकारची मनाई आहे असें आढळून आलेलें नाहीं. सन१८९१सालीं **लॉर्ड मॅकडोनल्ड** हे नागपुरास चीफ कमिशनर असतांना त्यानीं असें जाहीर केलें कीं, कोणीही मनुष्य राष्ट्रीय सभेस गेला किंवा न गेला तर सरकार त्याबद्दल चौकशी करणार नाहीं; सन १८९३ च्या लाहोरच्या बैठकीच्या वेळींही पंजाबचे लेफ्टेनंट गव्हर्नर **सर डेनिस फिटज् पॅट्रिक** यानीं असेंच धोरण स्वीकारलें होतें व **लॉर्ड मॅकडोनल्ड** हे संयुक्त प्रांतांत ले.गव्हर्नर असतांना सन१८९४ सालीं राष्ट्रीय सभेबद्दल त्यांनीं सहानुभूति प्रगट केली. सन १९०८ सालीं **सर ऑर्थर लॉले** यांनीं राष्ट्रीय सभेच्या पुष्कळ सभासदांस आमंत्रण करून त्यांचें स्वागत केलें होतें.

हल्लींचे उदार व थोर व्हाइसरॉय **लॉर्ड हार्डिंज** व सेक्रेटरी ऑफ स्टेट **लॉर्ड क्र्यू** यांनीं राष्ट्रीय सभेच्या वतीनें डेप्युटेशनांची आदरानें मुलाखत घेतली. **सर जेम्स मेस्टन**, **सर चार्लस बेले** यांनीं प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें दिलेलीं मानपत्रें स्वीकारलीं आहेत. गेल्या वर्षीं मद्रासेस **लॉर्ड पेंटलंड** यानीं व पुढें पुणें येथें१५वे प्रांतिक परिषदेच्या वेळीं मुंबई इलाख्याचे गव्ह-

र्नर **लॉर्ड विलिंग्डन** यांनीं राष्ट्रीय व प्रांतिक सभांत स्वतः हजर राहून आपल्या कृतीनें व भाषणानें राष्ट्रीय सभेच्या हेतूबद्दल उघडपणें सहानुभूति प्रगट केली आहे. **लॉर्ड विलिंग्डन** व **पेंटलंड** यांनीं घालून दिलेल्या महनीय उदाहरणांवरून अँग्लो इंडियन लोकांचीं तोंडें सर्वस्वीं बंद जाहालीं. राष्ट्रीय सभा किंवा तिच्या संस्था यांचेवर केलेल्या अराजानिष्ठेच्या आक्षेपाबद्दल कोणतेंही भय बाळगण्याचें कारण आतां उरलें नाहीं. याप्रमाणें राष्ट्रीय-सभेबद्दल काढलेल्या आक्षेपांचें व कुतर्कांचें निरसन या तीस वर्षांचे कालांत सर्वांशीं झालें आहे.

## राष्ट्रीय सभेची घटना.

कोणतीही संस्था चिरंतन होण्याला व ती पद्धतशीर चालण्याला कायद्याची किंवा घटनेची अवश्यकता आहे. आतां हे कायदे कित्येक प्रसंगीं संस्थेच्या जन्माबरोबरच अस्तित्वांत येतात; कित्येक प्रसंगीं मागील उदाहरणांवरून पुढील वहिवाट (broadening from precedent to precedent) वहिवाटीवरून रूढि-या परंपरेनें पुष्कळ संस्थांचें नियमन होतें. रूढि जसजशी जुनी होत जाईल तसतसें तिला गंभीर स्वरूप प्राप्त होतें व ती कायद्याच्या योग्यतेस येऊन बसते. राष्ट्रीय सभेच्या उत्क्रांतीमध्येंही हाच अनुभव दिसून आला आहे. राष्ट्रीय सभा उत्पन्न झाली त्या वेळीं कोणतीही नियमावलि किंवा घटना अस्तित्वांत नव्हती. १८८५ सालीं सेक्रेटरीची सुद्धां निवडणूक रीतसर झाली नाहीं. ह्यूमसाहेब तें काम करीत होते व १८८८ सालीं राष्ट्रीय सभेच्या ठरावानें या नेमणुकीवर मोर्तब झाला. १८८५ सालीं पहिल्या बैठकीचे वेळीं सभेच्या कामाची परंपरा चालू ठेवण्यासाठीं येवढें सुचविण्यांत आलें होतें कीं, देशांत असलेल्या राजकीय संस्थांकडे सभेंत पास झालेले ठराव पाठविण्यांत यावेत व त्यांनीं आपापल्या प्रांतांत असतील त्या संस्थांची मदत घेऊन राष्ट्रीय सभेंत खल झालेल्या प्रश्नांचा लोकांत प्रसार

करावा व त्यांबद्दल लोकमत जागृत करावें. १८८६ सालीं निरनिराळ्या प्रांतांतून स्टँडिंग काँग्रेस कमिट्या स्थापन कराव्या असें ठरविण्यांत आलें, १८८७ सालीं राष्ट्रीय सभेच्या घटनेबद्दल कमिटी नेमण्यांत आली-या कमिटींत नामजोशी, चंदावरकर, हुमायून बहादूर, अबदूल बाद. शहा साहेब, हार्जी महमद, सुब्रह्मण्य अय्यर, गॉटझ, रंगय्या नायडू, सुरेंद्रनाथ बानर्जी, त्रैलोक्यनाथ मित्र, कालीचरण बॉनर्जी, गुरुप्रसादसेन, शालिग्रामसिंग, रामकाली चौधरी, हाफीज रहीम, रामपालसिंग, पंडित मदन मोहन, बाबू गंगाप्रसाद, बिशन नारायण धार, हमीद अल्ली, लाला मुरलीधर, अग्निहोत्री, ध्रुव, उमेशचंद्र बानर्जी, नरेंद्रनाथ सेन, नॉर्टन, जयगोविंद, ईश्वरी सरकार, एस्. सुब्रह्मण्य अय्यर, दाजीसाहेब खरे, एस्. अय्यर, सभापति मुदलीयार, ह्यूम, विजयराघवाचार्य, गोविंद-बक्ष आणि करंदीकर असे गृहस्थ होते. या कमिटीनें कांहीं नियम केले. त्याचा विचार पुढील वर्षापर्यंत तहकूब ठेवण्यांत आला. १८८८ सालीं घटनेचा विचार झालाच नाहीं; त्या सालीं विषय-निर्णयाबद्दल एक नियम करण्यांत आला व तो फार महत्त्वाचा होता. राष्ट्रीय सभेपुढें विचाराकरितां येणाऱ्या कोणत्याही प्रश्नाबद्दल हिंदु किंवा मुसलमान प्रतिनिधींची एकविचारानें, सर्वांशीं किंवा बऱ्याच अंशीं, हरकत असेल तर विषयनिर्णायक कमिटीनें (Subjects Committee) तो विषय सुचवूं नये, किंवा अध्यक्षानीं सभेपुढें तो येऊं देऊं नये; एखादा प्रश्न विचाराकरितां आलाच व वादविवादाअंतीं हिंदु किंवा मुसलमान प्रतिनिधींचा बहुमतानें तीव्र मतभेद दिसून आल्यास तोही वगळण्यांत यावा, व हा नियम पुढील बैठकींस लागू करण्यांत यावा असें ठरलें. १८८९ सालीं राष्ट्रीय सभेस १८८९ प्रतिनिधी हजर होते. हा योगायोग अगदीं अपूर्व होता; प्रतिनिधींची एवढी संख्या राष्ट्रीय सभेस कधींही नव्हती. या संख्येमुळेंच प्रतिनिधींच्या भरतीस कांहींतरी मर्यादा घालावी या हेतूनें राष्ट्रीय सभेनें एक ठराव मंजूर केला. त्याचा आशय असा होता कीं, दर १० लक्ष लोकांस पांच प्रतिनिधी या मानानें

प्रत्येक स्टँडिंग काँग्रेस कमिटीनें प्रतिनिधींची संख्या ठरवून आपापल्या भागांत त्यांची वांटणी करावी.

याच वर्षी पंडित अयोध्यानाथ यांस जॉईंट जनरल सेक्रेटरी नेमण्यांत आलें, व सेक्रेटरींच्या ऑफिसच्या खर्चाकरितां म्हणून पांच हजार रुपये मंजूर करण्यांत आले; तसेंच १८८७ सालीं घटनेबद्दल नेमलेल्या कमिटीनें केलेल्या नियमांचा विचार स्टँडिंग काँग्रेस कमिट्यांनीं करावा व पुढील वर्षी तो राष्ट्रीय सभेपुढें मांडण्यांत यावा असें ठरलें. मि. बानर्जी, मि. मेथा व मि. आनंदा चार्लू यांस अनुक्रमें बंगाल, मुंबई व मद्रास येथें राष्ट्रीय सभेच्या सेक्रेटरींचे कायदेशीर सल्लागार नेमण्यांत आलें. इंग्लंडांत स्थापन झालेल्या 'नॅशनल काँग्रेस एजन्सी' या संस्थेचें नियमन करण्याकरितां कमिटी नेमण्यांत आली. राष्ट्रीय सभेचा हेतु इंग्लंडांतील लोकांस समजून देण्याकरितां एक डेप्युटेशन पाठवून देण्याचें ठरलें, व राष्ट्रीय सभेच्या येथील व इंग्लंडांतील कामासाठीं ४५ हजार रुपये मंजूर करण्यांत आले. राष्ट्रीय सभेसाठीं कायमचा फंड उभारण्यांत यावा असें ठरविण्यांत आलें व पूर्वीच्या वर्षाप्रमाणेंच खर्चाकरितां ४० हजार रुपये मंजूर करण्यांत आले. १८९१ सालीं राष्ट्रीय सभेची बैठक सालदरसाल भरविण्यांत यावी किंवा नाहीं व प्रतिनिधींची संख्या व सभेची जागा वगैरे प्रश्नांबद्दल सूचना करण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली. या कमिटीनें असें ठरविलें कीं, राष्ट्रीय सभा दरसाल भरविण्यांत यावी; त्यांत खंड पडूं देऊं नये व पूर्वीच्या नियमाप्रमाणेंच ती भरविण्यांत यावी. राष्ट्रीय सभेनें बहुमतानें हाच ठराव मंजूर केला, व खर्चाबद्दलची दरसालप्रमाणें मंजुरी देण्यांत आली. खर्चासंबंधीं राष्ट्रीय सभेंतील ठराव पाहून कोणासही हंसूं आल्यावांचून राहणार नाहीं. पार्लमेंट ज्याप्रमाणें दरसाल राज्यकारभाराचा खर्च मंजूर करतें त्याप्रमाणें राष्ट्रीय सभेनें दरसाल ४० हजार रुपये मंजूर करण्याचा प्रघात पडलेला दिसतो. पार्लमेंटची मंजुरी मिळतांच प्रधानमंडळास इंग्लंडच्या तिजोरींतून पैसे मिळण्यास कधींच

# राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष.



रमेशचंद्र दत्त, लखनौ—१८९९.



सर नारायण चंदावरकर. लाहोर—१९००.



डि. ई. वाच्छा,
कलकत्ता १९०१. जा. जनरल सेक्रेटरी (माजी)



लाल मोहन घोस, मद्रास—१९०३.

अडचण पडत नाहीं. परंतु काँग्रेसच्या सेक्रेटरीस मंजुरीप्रमाणें कोठल्याही तिजोरींतून रक्कम यावयाची नसल्यामुळें भिक्षांदेहीनेंच ती वसूल करावी लागते. राष्ट्रीय सभेचें येथील कायमचें ऑफिस किंवा कायमचा नोकरवर्ग—आजपर्यंत अस्तित्वांत आलेला नाहीं याचें मुख्य कारण हेंच आहे. इंग्लंडांतील ब्रिटिश काँग्रेस कमिटीचें काम चालविण्यासाठीं जी विवंचना जनरल सेक्रेटरीस दरसाल पडत आहे तिची हकीकत अत्यंत उद्वेगजनक आहे. सनदशीर चळवळीची पात्रता किंवा कळकळ आपल्या लोकांत कितपत आहे याची साक्ष राष्ट्रीय सभेंत दरसाल मंजूर होणाऱ्या व दरसाल प्रत्यक्ष वसूल होणाऱ्या रकमेवरूनच कोणासही पटणार आहे. १८९२ सालीं राष्ट्रीय सभेकरितां जो कायम निधि स्थापन केला होता, तो पांच हजार रुपयांचा होता; व 'न्यू ओरिएंटल बँक कॉर्पोरेशन'मध्यें ठेवलेला होता व त्या बँकेचें दिवाळें निघाल्यामुळें तो बहुतेक नाहींसा झाला. पंडित अयोध्यानाथ यांच्या मृत्यूमुळें रिकाम्या झालेल्या जॉइंट सेक्रेटरीच्या जागीं रायबहादुर आनंदाचार्लू यांची नेमणूक करण्यांत आली. १८९३ सालचे अखेरीस मि. ह्यूम यांसच जनरल सेक्रेटरी नेमण्यांत आलें. १८९४ च्या बैठकींत घटनेचा प्रश्न फिरून विचाराकरितां आला व १८९५ सालीं पुण्यांत राष्ट्रीय सभा भरावयाची असल्यामुळें पुण्याच्या स्टँडिंग काँग्रेस कमिटीनें या बाबतींत नियम करून ते पुढील बैठकीचे वेळीं सभेपुढें मांडण्यांत यावेत असें ठरलें. १८९५ सालीं हे नियम पुण्याच्या कमिटीनें राष्ट्रीय सभेपुढें मांडले व राष्ट्रीय सभेनें ते नियम सर्व स्टँडिंग काँग्रेस कमिट्यांकडे पाठवावे व त्यानीं आपले अभिप्राय जनरल सेक्रेटरी यांस १८९६ च्या सभेच्या पूर्वी निदान तीन महिने कळवावे असें मुक्रर करण्यांत आलें. या सालीं मि. वाच्छा यांस जॉइंट सेक्रेटरी नेमण्यांत आलें. १८९६ व ९७ सालीं घटनेचा प्रश्न तसाच पडून राहिला. १८९८ सालीं खालील ठराव मंजूर करण्यांत आला. "सर्व ठिकाणच्या स्टँडिंग काँग्रेस कमिट्यांनीं ठिकठिकाणीं मध्यवर्ती संस्था स्थापून राष्ट्रीय सभेच्या उद्दे-

शांचा प्रसार करावा व आपल्या कामाचा रिपोर्ट दरसाल राष्ट्रीय सभेकडे पाठवावा. अध्यक्ष व माजी सर्व अध्यक्ष व यंदांचे वर्षी नेमलेले नऊ गृहस्थ यांनीं कॉंग्रेसची घटना तयार करावी व तिचा विचार पुढील राष्ट्रीय सभेंत प्रामुख्यानें करावा" १८९९ सालीं राष्ट्रीय सभेनें घटनेबद्दल पुढील १० नियम मंजूर केले:—

१ राष्ट्रीय सभेचा हेतु हिंदुस्थानांतील लोकांची उन्नति सनदशीर मार्गांनीं करावी असा आहे.

२ आदल्या वर्षींच्या सभेंत ठरलेल्या ठिकाणीं व वेळीं राष्ट्रीय सभा भरविण्यांत यावी.

३ 'इंडियन कॉंग्रेस कमिटी'स राष्ट्रीय सभेच्या बैठकीची वेळ व ठिकाण जरूर त्या प्रसंगीं बदलतां येईल. सभेच्या बैठकी एकाहूनही अधिक बोलाविण्याचा अधिकार 'इंडियन कॉंग्रेस कमिटी'स आहे.

४ राजकीय संस्थांनीं किंवा सार्वजनिक सभांनीं निवडलेल्या प्रतिनिधींचा या सभेंत समावेश होईल. राष्ट्रीय सभेच्या कामाची व्यवस्था 'इंडियन कॉंग्रेस कमिटी' या संस्थेकडून होईल. तिच्यामध्यें ४५ सभासद असावेत व ते राष्ट्रीय सभेनें दरसाल निवडावे. त्यांपैकीं निदान ४० निरनिराळ्या कॉंग्रेस कमिट्यांनीं किंवा राष्ट्रीय सभेस हजर असलेल्या निरनिराळ्या प्रांतांतील प्रतिनिधींनीं निवडलेले असावेत.

५ 'इंडियन कॉंग्रेस कमिटी'च्या बैठकी सर सालांतून निदान तीन व्हाव्यात. राष्ट्रीय सभेच्या सेक्रेटरींनेंच या कमिटीच्या सेक्रेटरीचें काम करावें. शिवाय एक पगारी असिस्टंट सेक्रेटरी व कारकून वगैरे नेमण्यांत यावेत.

६ प्रत्येक प्रांतांत 'प्रांतिक कॉंग्रेस कमिटी' स्थापन करण्यांत यावी व त्यांनीं देशांत राजकीय ज्ञानाचा फैलाव करावा, प्रांतिक परिषदा भरवाव्या व आपल्या कामाचा रिपोर्ट दरसाल 'इंडियन कॉंग्रेस कमिटी' कडे पाठवावा.

७ अध्यक्ष नेमणें, ठरावांचा मसुदा करणें, प्रतिनिधींच्या निवडणुकी-

बद्दल नियम करणें, वक्त्यांची निवड करणें व सभेचा कार्यक्रम ठरविणें, हीं सर्व कामें 'इंडियन कॉंग्रेस कमिटी'नें करावींत.

८ प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांनींही असेच नियम करून ते 'इंडियन कॉंग्रेस कमिटी'कडून मंजूर करून घ्यावेत.

९ इंग्लंडमध्यें राष्ट्रीय सभेचा हेतु सिद्धीस नेण्याकरितां 'ब्रिटिश कॉंग्रेस कमिटी' या नांवाची संस्था स्थापन करण्यांत यावी व तिला लागणारी पैशाची मदत प्रांतिक कमिट्यांकडून मिळवून द्यावी.

१० 'इंडियन कॉंग्रेस कमिटी'नें कायमचा 'कॉंग्रेस फंड' उभारण्याची खटपट करावी.

१९०० सालीं इंडियन कॉंग्रेस कमिटींत एक्स-ऑफिशिओ म्हणून राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष, माजी सर्व अध्यक्ष, सभेचे सेक्रेटरी व आसिस्टंट सेक्रेटरी, स्वागत कमिटीचे चेअरमन व सेक्रेटरी यांचाही समावेश करण्यांत यावा.

१९०१ सालीं 'इंडिया' पत्रही राष्ट्रीय सभेच्या विद्यमानेंच चालविण्यांत येऊन त्याच्या प्रती निरनिराळ्या प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांनीं खपविण्याची तजवीज करावी असें ठरलें. या व्यवस्थेचाही उपयोग कांहीं न होतां 'इंडिया' पत्रास वर्गणीदार मिळण्याची मुष्कील पडून तें बंद पडण्याची वेळ आली व शेवटीं नामदार गोखले यांस हें काम अंगावर घेऊन 'इंडिया' पत्र जिवंत ठेवण्याची तजवीज करावी लागली. १९०२।०३ सालीं इंडिया पत्र खपविण्याकरितां निरनिराळ्या ठिकाणीं राष्ट्रीय सभेच्या वतीनें सेक्रेटरी नेमण्यांत आले व त्याच सालीं नामदार गोखले यांस ना. वाच्छा यांचेबरोबर जॉइंट सेक्रेटरी नेमण्यांत आलें.

१९०४ सालीं घटनेचा प्रश्न पुन्हां राष्ट्रीय सभेपुढें आला व ६ प्रांतांतील २० लोकांची कमिटी नेमून तिजकडे तो सोंपविण्यांत आला.

१९०५ सालीं राष्ट्रीय सभेची एक स्टँडिंग कमिटी नेमण्यांत आली. तींत १५ सभासद असून २ जॉइंट सेक्रेटरीही त्यांतच होते, व त्यांनीं

राष्ट्रीय सभेच्या ठरावांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करावा असें ठरविण्यांत आलें. १९०६ सालीं पूर्वीच्या वर्षी नेमलेल्या स्टँडिंग काँग्रेस कमिटीनें केलेल्या सूचना अमलांत आणाव्यात असा ठराव मंजूर करण्यांत आला. या नियमाप्रमाणें ( १ ) प्रत्येक प्रांतांत एक प्रांतिक काँग्रेस कमिटी असावी. ( २ ) प्रत्येक प्रांतिक कमिटीनें जिल्हा-सभा स्थापन कराव्यात. ( ३ ) राष्ट्रीय सभेची व्यवस्था करण्याकरितां एक सेंट्रल स्टँडिंग कमिटी निवडण्यांत यावी. हिच्यामध्यें ५० सभासद असून शिवाय अध्यक्ष व जनरल सेक्रेटरी हे एक्स-ऑफिशिओ सभासद असावेत. ( ४ ) अध्यक्षाच्या निवडणुकीबद्दल असें ठरविण्यांत आलें कीं, ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरावयाची असेल तिनें एक स्वागत मंडळी स्थापन करावी व इतर प्रांतांतील प्रांतिक कमिट्यांचें मत घेऊन स्वागत कमिटीच्या $\frac{2}{3}$ सभासदांनीं अध्यक्षाची निवडणूक करावी. स्वागत कमिटींत जर $\frac{2}{3}$ मतें अध्यक्षाच्या निवडणुकीस मिळणार नाहींत तर अध्यक्षाच्या निवडणुकीचा प्रश्न सेंट्रल स्टँडिंग काँग्रेस कमिटीकडे सोंपवावा व तिचा निर्णय अखेरचा मानण्यांत यावा. विषयनिर्णायक कमिटींतील संख्या प्रांतवारीनें करून ती ८५ ठरविण्यांत आली व ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरेल त्या प्रांतानें १० सभासद नेमावेत; शिवाय अध्यक्ष, स्वागत कमिटीचे चेअरमन, माजी सर्व अध्यक्ष, माजी सर्व चेअरमेन, जनरल सेक्रेटरीज् व स्थानिक सेक्रेटरीज यांचाही सबजेक्ट कमिटींत समावेश करण्यांत आला. १९०६ च्या घटनेनें पूर्वीच्या घटनेपेक्षां अध्यक्ष निवडण्याचा हक्क व सबजेक्ट कमिटीचे मेंबर निवडण्याचा हक्क नियमित करण्यांत आला. १९०४ सालापासून राष्ट्रीय सभेंत एक नवीन पक्ष उत्पन्न झाला होता. या पक्षाचीं मतें राष्ट्रीय सभेच्या पूर्वपरंपरेस सुटून होतीं. आपल्या मताचाच अध्यक्ष राष्ट्रीय सभेस असावा अशी या पक्षास अवश्यकता वाटूं लागली. सभेपुढें येणारे विषय आपल्या मताचे व आपल्या पक्षाचे असावेत, असा त्याचा प्रयत्न होता. सबजेक्ट कमिटींत आपल्या सहानुभूतीचे लोक असल्यानें आपल्या पक्षास

यश येईल, अशी याची भावना होती व याच कारणामुळें अध्यक्षाची निवडणूक व सबजेक्ट कमिटीची संख्या निश्चित करण्याचा प्रसंग आला. १९०६ सालीं कलकत्ता येथील सबजेक्ट कमिटींतील पुष्कळ लोकमान्य पुढाऱ्यांनीं आपल्या सौजन्याचें केलेलें प्रदर्शन, बिपिनचंद्रपाल व आश्विनीकुमार दत्त यांनीं दादाभाईसारख्या परमपूज्य व्यक्तीवर केलेले आरोप या सर्वांचा विचार करितां वरील नियमांची किती अवश्यकता होती हें सहज दिसून येईल. सुरत येथें १९०७ सालीं बखेडा होऊन राष्ट्रीय सभा तूर्तातूर्त नाहींशी झाली. परंतु बाबू सुरेंद्रनाथ यानीं म्हटल्याप्रमाणें "The Congress is dead. Long live the Congress" सुरतेच्या प्रसंगानंतर ही राष्ट्रीय सभा अस्तित्वांत आहे हेंच तिच्या चिरंतनपणाचें खरें दर्शक आहे..

## नवीन तरतूद.

सुरतेच्या तंट्यामुळें दोन गोष्टींची तरतूद करणें भाग पडलें. १९०५ सालापासून निर्भेळ स्वराज्यवाल्यांचा एक पक्ष अस्तित्वांत आला होता व तो दिवसेंदिवस बळावत होता. बहिष्कार हेंच या पक्षाचें मुख्य शरसंधान होतें. अर्ज, विनंत्या, मुलाखती वगैरे रूढ मार्गांची हेटाळणी करणें हें या पक्षाचें ब्रीद होतें, व प्रतिनिधींच्या संख्येवर आपल्या पक्षाची सरशी करण्याचा यांचा मानस होता. प्रतिनिधींच्या संख्येस आळा घालण्याची अवश्यकता जरी १८८९ पासून भासत होती, तरी सुरतेच्या प्रकरणामुळेंच या अडचणीचा निकाल करणें भाग आलें. ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरते तेथें सोईमुळें व सांनिध्यामुळें स्थानिक प्रतिनिधींची संख्या फार असते, असा नेहमींचा अनुभव आहे. यामुळेंच नुसत्या प्रतिनिधींच्या संख्येवरून राष्ट्रीय सभेचें मत निश्चित करावयाचें असेल तर ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरते तेथील प्रतिनिधींसच सर्व राष्ट्राचें मत नियमन करण्याची सत्ता प्राप्त होईल. ही स्थिति समाधानकारक आहे असें कोणीही म्हणणार नाहीं व याच कारणाकरितां सभेंतील मत निश्चित करण्याचे नियम करणें अपरिहार्य झालें. तसेंच राष्ट्रीय सभेंत जे प्रतिनिधी येतात, त्यांच्या लायखीबद्दल व जबाबदारीबद्दल

कांहीं निर्बंध घालून देणेंही अवश्य वाटूं लागलें. निर्भेळ स्वराज्य व बहिष्कार, त्यांपासून उत्पन्न होणारे अनर्थ, आजपर्यंतचें राष्ट्रीय सभेचें धोरण, लोकमताची राजकीय हक्कांची पात्रता, स्वार्थत्यागाची तत्परता इत्यादि बिकट प्रश्नांचा विचार करून राष्ट्रीय सभेचें सुकाणूं हाकतां येईल किंवा तिच्या कसलेल्या नावाड्यांस आपल्या समंजस विचारांनीं प्रोत्साहन देतां येईल अशाच प्रतिनिधींचा समावेश या सभेंत होईल अशी परिस्थिति प्राप्त झाली. यापूर्वीं आलेल्या अडचणी व सुरतेच्या कलहानें उत्पन्न झालेल्या नवीन अडचणी या सर्वांचा विचार करूनच राष्ट्रीय सभेस कायमची घटना करण्याचें काम अवश्य येऊन ठेपलें. राष्ट्रीय सभा उत्पन्न झाल्यापासून भिजत पडलेल्या या प्रश्नाचा या प्रसंगानें एकदांचा निकाल लागला.

सुरतेस राष्ट्रीय सभा मोडल्यानंतर सुमारें ८०० प्रतिनिधींनीं इतिहासांतील दाखल्यास अनुसरून राष्ट्रीय सभेची परंपरा कायम ठेवण्यासाठीं कन्व्हेन्शनची परिषद् २८ डिसेंबर १९०७ रोजीं राष्ट्रीय सभेच्या सभामंडपांतच भरविली. आदले दिवशींच्या अनिष्ट प्रकाराची पुनरावृत्ति पुढें होऊं नये म्हणून, राष्ट्रीय सभेचें कामकाज चालविण्यासाठीं नियम करण्याकरितां शंभर लोकांची एक कमिटी या कन्व्हेन्शनच्या बैठकींत नेमण्यांत आली. या कमिटीनें ता. १८ व १९ एप्रिल १९०८ रोजीं अलाहाबाद येथें राष्ट्रीय सभेची घटना निश्चित केली व तिला मूर्त स्वरूप दिलें. या घटनेस अनुसरून राष्ट्रीय सभेच्या आजपर्यंतच्या सात बैठकी भरविण्यांत आल्या आहेत. या घटनेंत कांहीं दुरुस्ती करण्याकरितां १९१० सालीं बंगालच्या प्रांतिक कमिटीनें सूचना केल्या होत्या व त्यांचा विचार करण्यासाठीं अलाहाबाद येथें १९१० सालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेनें एक कमिटी नेमिली. तिनें १९११ सालीं या बाबतींत आपला अभिप्राय कळवावा असें ठरलें. १९११ सालीं कलकत्त्यास पुन्हां तोच प्रश्न ऑल इंडिया काँग्रेस कमिटीकडे सोंपविण्यांत आला. १९१२ च्या राष्ट्रीय सभेनें याचा निकाल करावा असें ठरलें. १९१२ सालीं बांकीपूर येथें वाटाघाट

होऊन १९०८ सालीं मंजूर झालेल्या घटनेंत प्रतिनिधी निवडण्याच्या बाबतींत थोडा फरक करण्यांत आला. या दुरस्तीनें कॉंग्रेस कमिट्या किंवा कॉंग्रेसशीं संलग्न असलेल्या इतर संस्थांना जाहिर सभा भरवून प्रतिनिधी निवडण्याचा हक्क देण्यांत आला व पूर्वीप्रमाणेंच जाहीर सभांतूनही प्रतिनिधि निवडण्याची मुभा या सवलतीनें ठेवण्यांत आली. फक्त या सभा बोलावण्याची परवानगी मात्र जबाबदार संस्थांकडे सोंपविण्यांत आली आहे. यांत अपवाद घेण्यासारखें कांहींच उरलें नाहीं. आपल्यावरील जबाबदारी सभोंवतालची स्थिति ओळखून अशा संस्थांस चांगल्या प्रकारें पार पाडतां येईल व त्यायोगानें राष्ट्रीय सभेचा भारदस्तपणाही आपोआपच वाढेल हें निर्विवाद आहे. या दुरुस्तीच्यायोगानें घटनेबद्दल कांहीं विशिष्ट लोकांखेरीज इतरांचें समाधान झालें आहे. तसेंच या वर्षी राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींची फी विसांची दहा रुपये करण्यांत आली. याप्रमाणें घटनेची हल्लींची स्थिति आहे. गेल्या वर्षी मद्रासेस या घटनेंत कांहीं दुरुस्ती सुचविण्यांत आली होती. त्याबद्दल राष्ट्रीय सभेनें अद्याप निश्चित मत दिलेलें नाहीं. आजच्या स्थितींत तरी १९१२ सालीं झालेल्या दुरुस्तीसह १९०८ सालीं मंजूर झालेली घटना कायम आहे. येथपर्यंत घटनेचा जो २५ वर्षांचा इतिहास आहे तो दिला आहे. त्यावरून या प्रश्नाचें महत्व किती आहे हें आढळून येईल. दर दोन तीन वर्षांनीं कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपानें राष्ट्रीय सभेपुढें हा प्रश्न येत होता व त्याची वाटाघाट झालेली आहे. पुष्कळ कमिट्या नेमिल्या आहेत. जरूर त्या प्रसंगीं नियमही केले आहेत. परंतु बऱ्याच वेळां कायमचा निकाल लावण्याचें काम करणें कोणत्या तरी सबबीवर मागें टाकिलें आहे. मद्रास व पंजाब येथील प्रतिनिधींमध्यें घटनेबद्दल अत्यंत आतुरता नेहमीं दिसून आलेली आहे. प्रथम हा प्रश्न १८८७ सालीं मद्रास येथें काढण्यांत आला. १९०३ सालीं मद्रासेस सबजेक्टस् कमिटीमध्यें याबद्दल मोठा कडाक्याचा वाद झाला. घटना अस्तित्वांत आलीच पाहिजे, असा

मद्रासच्या प्रतिनिधींचा आग्रह होता. प० सर फेरोजहा मेथा हे त्या वेळीं मद्रासेस आले होते. त्यानीं आपल्या अलौकिक वक्तृत्वानें व भारदस्त कोटिक्रमानें घटनेबद्दल उतावीळपणा करूं नये, असा उपदेश केला व तो सर्वांस पसंत पडला. राष्ट्रीय सभा ही वाढती संस्था आहे व तिला नियमांनीं जखडून टाकूं नये असें त्यांचें म्हणणें होतें. अनुभवाप्रमाणें, गरजांप्रमाणें, उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीप्रमाणें तात्पुरते नियम करावेत, मागील वहिवाटीस मान द्यावा व आपलें काम चालवावें. पुष्कळ प्रजासत्ताक राज्यांतील घटना सुद्धां एकदम आस्तित्वांत आलेल्या नाहींत. हा कालाचा प्रश्न आहे. आपले उद्देश, आपली महत्वाकांक्षा, ज्याप्रमाणें वयपरत्वें वाढत जातात त्याप्रमाणें आपलें नियमनही स्थित्यनुसार असलें पाहिजे असें सर फेरोजशहा यांचें म्हणणें होतें. यामुळेंच १९०७ पर्यंत हा प्रश्न लांबणीवर पडला होता. सुरतेच्या बिनतोड प्रसंगामुळें घटना अस्तित्वांत आली. अवश्यकता ( Necessity ) पुष्कळ वेळेस सत्कार्य घडवून आणिते व अडचणींतून मार्ग दाखविते. तोच प्रकार सुरतेच्या बखेड्यामुळें अनुभवास आला. घटना निर्माण झाली. या वेळीं तयार केलेल्या घटनेचें स्वरूप वेळोवेळीं मंजूर झालेल्या राष्ट्रीय सभेच्या ठरावांत दृग्गोचर होत आहे. संकलित रीतीनें तें अलाहाबादेस मांडण्यांत आलें. बाबू अंबिकाचरण मुजुमदार यानीं यासंबंधानें केलेलें विधान अगदीं यथार्थ आहे.

"The constitution of 1908 was not aninnovation but only a repetition and amplification of the original constitution with which it was started in 1885."

## नाखुषी.

सुरतेस राष्ट्रीय सभेंतून बाहेर पडलेले कांहीं लोक घटनेच्या सबबी वर राष्ट्रीय सभेंत सामील होण्यास कबूल नाहींत. वस्तुतः राष्ट्रीय सभेच्या खऱ्या अभिमान्यांनीं असलेली घटना मान्य करून आंत येऊन शक्य ती सुधारणा करून घेतली पाहिजे. तसें करण्यास प्रत्येकास मुभा आहे. १९१२ सालच्या दुरुस्तीवरून हाच योग्य मार्ग आहे हें कोणासही दिसून येईल. कोणत्याही संस्थेची वाढ करावयाची असल्यास

रुसून बाहेर राहून ती होत नाहीं. दुसरी गोष्ट १९०७ पर्यंत राष्ट्रीय सभेच्या कामांत पुढाकार घेणाऱ्या बहुतेक लोकांस ती पसंत आहे, व ती त्यांनीं अंगिकारली आहे. तिसरी गोष्ट १९०७ पूर्वीच्या राष्ट्रीय सभेंतील प्रमुख पुढाऱ्यांपैकीं घटनेच्या विरुद्ध असलेले लोक हाताच्या बोटांवर मोजण्याइतके सुद्धां नाहींत. चौथी गोष्ट या घटनेंत निसर्गतः कांहीं दोष आहेत असें आजपर्यंत दाखविण्यांत आलें नाहीं. पांचवी गोष्ट या घटनेपेक्षां एखादी सरस घटना या ८ वर्षांच्या कालांत या लोकांनीं सुचविलेली नाहीं. सहावी गोष्ट जहाल पक्षांतील बॅरिस्टर रसूल, नामदार उपासनी, दादासाहेब करंदीकर यांच्यासारख्या लोकमान्य पुढाऱ्यांसही राष्ट्रीय सभेंत सामील होण्यास घटनेची अडचण आजपर्यंत वाटली नाहीं.

नेमस्त पक्षाबद्दल यत्किंचित्‌ही सहानुभूति नसणाऱ्या जहाल पक्षांतील एका पुढाऱ्यानें त्याच पक्षाच्या एका मासिकांत घटनेच्या अवश्यकतेची कबुली दिली आहे. देशहिताबद्दल कळकळ वाटणाऱ्या प्रत्येक राष्ट्रभक्तास राष्ट्रीय सभेंत सामील न होण्यास घटनेची सबब निरर्थक आहे. देशाची गति प्रगमनशील आहे व सुरतेनंतरही आज ८ वर्षें राष्ट्रीय सभा आपला मार्ग आक्रमण करीत आहे. घटनेकरितां अडून वाटेल त्यानें खुशाल घरीं बसावें. देश त्यांचेकरितां वाट पाहण्यास तयार नाहीं. या बाबतींत बाबू अंबिकाचरण मुजुमदार यानीं काढलेले विचार मननीय आहेत:—

"If the separatists at Surat had, instead of attempting to wreck the Congress, started a counter organisation with a definite policy and programme they might well have established their position either as progressives or conservatives in Indian Politics; and if even after the regrettable incident they had openly and earnestly pressed a legitimate scheme before the country instead of sulkily retiring to their tents and dissociating themselves from all practical politics they would not have been charged with committing political suicide and they could have in all probability gained and not lost by their opposition."

## राष्ट्रीय सभेचें ध्येय.

मि. ह्यूम यांस राष्ट्रीय सभेचे जनक असें म्हणण्याचा परिपाठ आहे. राष्ट्रीय सभेचें ध्येय कोणतें, ती कोणत्या उद्देशानें स्थापन केली, तिचा विकास कोणत्या क्रमानें व्हावयाचा आहे व तिचें परिणत स्वरूप कोणतें होईल याची कल्पना मि. ह्यूम यांस स्पष्टपणें होती. १८८८ सालीं केलेल्या एका भाषणांत त्यानीं यासंबंधीं फार बहारीचें वर्णन केलें आहे.

"The Congress was intended to foster a wider altruism and a more genuine public spirit by concentrating the most strenuous efforts on great national problems and diminishing the absorption in local or purely selfish interest-to educate all who took part in it not merely in the arts of public speaking and debate, developing the faculties of thinking out clearly, opinions and expressing them lucidly to others, not merely in habits of accuracy and research but also in the practice of self-control, moderation and willingness to give and take ; to educate them in fact into what has been described as a genuine parliamentary frame of mind, to familiarise the country with the methods and working of representative institutions on a large scale, and thus, as this familiarity grew, to demonstrate to the Government and people of England that India was already ripe for some measure of those institutions to which the entire intelligence of the country so earnestly aspires."

वरील अवतरणांत भविष्य केल्याप्रमाणें राष्ट्रीय सभेनें देशांत एकराष्ट्रीयत्वाची उदात्त भावना उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला, महत्त्वाच्या प्रश्नांबद्दल लोकमत जागृत केलें; जाहीर व्याख्यानें व भारदस्त कोटिक्रम यांची कला लोकांस शिकविली; आपलें ह्मणणें मुद्देसूद रीतीनें, बिनचूक, व्यवस्थित पद्धतीनें व नेमस्तपणानें अधिकाऱ्यांपुढें कसें ठेवावें यांचें शिक्षण येथील लोकांस दिलें; प्रातिनिधिक संस्थांमध्यें कसें वागावें, कोणत्या तऱ्हेनें आपली बाजू समर्थन करावी व आत्मोन्नतीच्या कामीं या संस्थांचा कसा उपयोग करावा हें धोरणही लोकांस घालून दिलें, व याप्रमाणें लोकांची

स्वराज्याचा हक्क मागण्याची पात्रता सिद्ध केली. ह्यूमसाहेबांनीं वर्णन केलेला हा विकास प्रत्यक्ष राष्ट्रीय सभेच्या बैठकींत अध्यक्षांच्या भाषणांवरून व मंजूर झालेल्या ठरावांवरून कसकसा होत गेला व ध्येयाची उन्नति, अनुभवाच्या, पात्रतेच्या व आत्मविश्वाच्या यत्नानें कसकशी होत गेली हा इतिहास फार मनोरंजक आहे. सभेच्या पहिल्या वर्षी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षानीं राष्ट्रीय सभेचे हेतु खालीलप्रमाणें नमूद केले आहेत.

१ देशांतील निरनिराळ्या भागांत राष्ट्रोन्नतीकरितां तळमळीनें काम करणाऱ्या लोकांमध्यें स्नेह व प्रेम वृद्धिंगत करावें.

२ निकट सहवासानें निरनिराळ्या देशभक्तांमधील जात, धर्म, पंथ व स्थानिक गैरसमज दूर करून सर्वांमध्यें ऐक्यभाव उत्पन्न करावा व लार्ड रिपन यांच्या संस्मरणीय कारकीर्दीनें उत्पन्न झालेली एकराष्ट्रीयत्वाची भावना दृढतर करावी.

३ देशांतील सामाजिक प्रश्नांबद्दल वादविवादानें सुशिक्षित लोकांमध्यें निश्चित मतें तयार करावींत व तीं सर्व एकत्र संकलित करावींत.

४ पुढील वर्षांत देशोन्नतीच्या कामीं, राष्ट्रभक्तांनीं कोणतें काम करावें याची दिशा मुक्रर करावी.

मि. उमेशचंद्र बॉनर्जी यानीं 'आपली आकांक्षा एवढीच आहे कीं, राजसत्तेचा पाया विस्तीर्ण होऊन येथील लोकांचाही त्यांत समावेश व्हावा; राज्यकारभाराचा योग्य वांटा त्यांस देण्यांत यावा; हा प्रश्न कालावर व आपल्या पात्रतेवर अवबूंन आहे'–असें सांगितलें. पुढें चार वर्षांनीं राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष कलकत्त्यांतील प्रसिद्ध व्यापारी जार्ज यूल यानीं असें सांगितलें कीं, 'कौन्सिलांत निम्मे लोकनियुक्त सभासद निवडले असतां व प्रश्न विचारण्याचा हक्क दिला असतां प्रस्तुतच्या स्थितींत आपलें समाधान होईल.' याच गोष्टीचा अनुवाद मि. उमेशचंद्र बॉनर्जी यानीं १८९२ सालीं दुसऱ्यांदां अध्यक्ष असतांना केला. आप-

त्यास कोणते हक्क पाहिजे आहेत, आपल्या महत्वाकांक्षेची भरारी कोठपर्यंत आहे ही कल्पना जोरदारपणें प्रथमतः नामदार शंकर नायर यानीं १८९७ सालीं राष्ट्रीय सभेपुढें मांडिली.

'It is the hope that one day we may be admitted as equal sharers in this great inheritance, that we shall have all the civil rights associated with the English Government, that we shall be admitted as freely as Englishmen themselves in this temple of freedom ; it is this hope that keeps India and will keep her always attached to the British. On this race question, no concession is possible. No compromise can be accepted as far as it lies in us. We must insist on perfect equality. Inequality means race inferiority. Acquisition therefore of all Civil Rights conferred on Englishmen, removal of all disabilities on Indians as such–these must be our aim.'

वरील उद्गार किती स्वाभिमानद्योतक आहेत हें सहज दिसून येणार आहे. अपूर्व योगानें नामदार सर शंकर नायर यांस हिंदुस्थान सरकारच्या शिक्षण खात्याचे प्रधान नेमण्यांत आलें आहे. १८९७ सालीं काढलेल्या उद्गारांचें स्मरण ठेवून नामदार नायर हे आपल्या कारकीर्दींत आपल्या ह्मणण्याची प्रचीति लोकांस आणून देतील अशी उमेद आहे.

१८९८ सालीं बाबू आनंदमोन बोस यानीं एतद्देशीय लोकांचा सरकारच्या कार्यकारी कौन्सिलांत प्रवेश होणें अवश्य आहे असें प्रतिपादन केलें.

## स्वराज्य.

सन १८९९ सालीं **स्वराज्य** स्थापनेशिवाय देशाची उन्नति होणार नाहीं असें प्रथमतः स्पष्ट शब्दांनीं बाबू रमेशचंद्र दत्त यानीं अध्यक्ष या नात्यानें प्रतिपादन केलें. रमेशचंद्र दत्त यांस राज्यव्यवस्थेचें हृद्गत संपूर्ण कळलें होतें. त्या वेळीं शक्य असलेली सर्वांत मोठी हुद्याची जागा त्यांस मिळाली होती व लोकांच्या उन्नतीस खरा उपाय कोणता याचा नोकरींतील पुष्कळ वर्षांच्या अनुभवाप्रमाणें, विचार करण्याची त्यांचे ठिकाणीं सर्वस्वीं

पात्रता होती. सरकारचा जुना व विश्वासू नोकर या नात्यानेंही राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून त्यानां सरकारास निग्रहाची विनंति केली आहे.

'It is possible to prevent distress and disasters and deaths from famine, to spread prosperity and contentment and to evoke the zealous and loyal support of a grateful nation only by conceding to the people in so far as is safely possible *the blessings of Self-Government.* It is not possible without this concession' without admitting the people to a real share in the control of their concerns to save India from distress and discontent and deaths from famine.'

१९०३ सालीं लाल मोहन घोस यानीं देशोन्नति होण्याकरितां मोफत प्राथमिक शिक्षणाचा सर्वत्र प्रसार झाला पाहिजे व तो सक्तीनेंही झाला पाहिजे असें सुचविलें. १९०४ सालीं स्वराज्याच्या कल्पनेचा विस्तार सर हेन्री कॉटन यानीं आपल्या भाषणांत केला. या देशांत ग्रेटब्रिटनच्या छत्राखालीं अमेरिकेप्रमाणें स्वतंत्र व संयुक्त राज्यव्यवस्था अस्तित्वांत यावी अशी आर्यमातेच्या पुत्रांची महत्त्वाकांक्षा आहे; हा सुदिन केव्हां येईल तो येवो, परंतु ही महत्वाकांक्षा तृप्त करून घेण्यासाठीं खटपट करणें हें येथील लोक आपलें कर्तव्य समजत आहेत.

'The ideal of an Indian Patriot is the establishment of a federation of free and separate states–the United States of India–placed on a fraternal footing with the self-governing colonies, each with its local autonomy, cemented together under the aegis of Great Britain; that is a forecast of a future, dim and distant though it be, the gradual realisation of which, it is the previlege of Government to regulate and the aim and hope and aspiration of the Indian people to attain.'

मि. नायर, रमेशचंद्र दत्त, सर हेन्री कॉटन यांनीं स्वराज्याबद्दल काढलेलें चित्र भविष्यकालीन होतें. हिंदुस्थानांतील सुशिक्षितांच्या महत्त्वाकांक्षेची अंतिम सीमा म्हणून या कल्पनेचा त्यांनीं निर्देश केला होता; परंतु हिंदुस्थानांतील प्रचलित स्थितींत स्वराज्याची अवश्यकता

आहे व हें ध्येय काल्पनिक नसून राष्ट्रीय सभेच्या इतर मागण्यांप्रमाणें अगदीं व्यवहार्य आहे व देशांत पसरलेल्या भयंकर असंतोषास आळा घालण्याकरितां या कल्पनेस मूर्त स्वरूप दिलें पाहिजे असें प्रथमतः ना. गोखले यानीं विलायतेस १९०५ सालीं न्यु रिफार्म क्लबांत त्यांस दिलेल्या मेजवानीचे वेळीं आपल्या भाषणांत सांगितलें.

'The only solution that is possible, a solution demanded alike by our interest and by your interest, as also by your national honour, is the steady introduction of Self-Government in India, substituting the Indian for the English agency, expanding and reforming the Legislative Councils, till they become in reality true controlling bodies, and letting the people generally to manage their own affairs.'

१९०५ सालीं बनारस येथील राष्ट्रीय सभेंत त्यांनीं हाच उपदेश केला. कल्पनेच्या अज्ञेय जागेंतून व्यावहारिक दृश्य जागेंत त्यानीं हें ध्येय राष्ट्रापुढें ठेविलें व राष्ट्रीय सभेनें या ध्येयाचा अनुवाद करावा अशी त्यानीं देशास विनंति केली. राष्ट्रीय सभेनें मूर्तपणें व स्पष्ट शब्दांनीं स्वराज्याच्या ध्येयाचा या वेळीं अंगिकार केला व या वेळेपासून देशांतील लोकांच्या स्वराज्याच्या कल्पनेस जोरानें प्रोत्साहन मिळालें.

'The goal of Congress is that India should be governed in the interest of the Indians themselves and that in course of time a form of Government should be attained in this country similar to what exists in the self-governing colonies of the British Empire.'

वसाहतीप्रमाणें हिंदुस्थानांत **स्वराज्य** असावें हें ध्येय उघडपणें याप्रमाणें निर्दिष्ट करण्यांत आलें. १९०६ सालीं दादाभाई नवरोजी यानीं कलकत्त्यास याच ध्येयाचा अनुवाद करून **स्वराज्य** या एका शब्दांत त्याचा निर्देश केला.

'We want only justice. Instead of going into any further divisions or details of our rights as British citizens the whole

matter can be summarised in one word "Self-Government" or स्वराज्य like that of the United Kingdom or the colonies.'

**स्वराज्य** या शब्दांत जी जादू आहे तिनें सर्व श्रोते अगदीं भारून गेले. तेव्हांपासून सर्व देशभर हा शब्द दुमदुमून गेला व प्रत्येक विचारी मनुष्यास याचा निदिध्यास लागला आहे. दादाभाईनीं आपल्या कल्पनेंत ग्रेटब्रिटनमधील स्वराज्याप्रमाणें किंवा कॉलनीजप्रमाणें आपल्यास स्वराज्य मिळावें असें मागणें केलें आहे. बाबू भूपेंद्र बसू यानीं कॉलनीजच्या स्वराज्यापेक्षां येथें अमेरिकेप्रमाणें 'संयुक्त स्वराज्य' असावें व तें इंग्लंडच्या साम्राज्यछत्राखालीं असावें व भागीदाराप्रमाणें इंग्लंड व हिंदुस्थान यांचा बरोबरीचा संबंध असावा असें प्रतिपादन केलें आहे.

'The idea that must be pursued and which the Congress has set before itself was that of co-ordination and comradeship of a joint partnership on equal terms.' ग 2/e24

येथपर्यंत काँग्रेसच्या ध्येयाची मजल कसकशी वाढत गेली व स्वराज्याच्या कल्पनेचा विकास कसकसा होत गेला हें दाखविलें आहे. पुष्कळ दिवसपर्यंत हें ध्येय काल्पनिक मानलें जात होतें, पुढें तें व्यवहार्य ठरलें व हल्लीं या कल्पनेच्या निरनिराळ्या स्वरूपांबद्दल देशांत वाटाघाट सुरू आहे. मिसेस बिझांट यानीं होमरूललीगबद्दल जे प्रयत्न चालविले आहेत त्यायोगानें हा प्रश्न सर्व देशापुढें सर्व बाजूंनीं मांडण्यांत येत आहे. स्वराज्याचा कोणता प्रकार येथें आज अमलांत यावा किंवा आजमितीस स्वराज्याच्या हक्काचा विस्तार किती मर्यादेपर्यंत होणें शक्य आहे, याबद्दल पुष्कळ मतभेद आहे, व तोही प्रामाणिकपणाचा आहे. या वादग्रस्त प्रश्नाचा ऊहापोह करण्याचें हें स्थळ नव्हे. खुद्द सरकारास सुद्धां येथें स्वराज्याचा प्रारंभ करणें अवश्य वाटत आहे, व दिल्ली दरबारच्या वेळच्या खलित्यांत प्रांतिक स्वराज्याची कल्पना अमलांत आणणें अगत्याचें आहे असें नमूद केलें आहे.

'Yet the country will have to be satisfied and the question will be how this devolution of power can be conceded without imparing the supreme authority of the Governor-General in Council. The only possible solution of the difficulty would appear to be gradually to give the province a large measure of Self-Government until at last India would consist of a number of administrations, autonomous in all provincial affairs, with the Government of India above them and possessing power to interfere in case of misgovernment but ordinarily restricting the functions to matters of Imperial concerns.

सरकारच्या या खलित्यावरून स्वराज्याची ही कल्पना शक्य कोटींतील आहे व लॉर्ड हार्डिंजसारख्या उदार व दूरदर्शी मुत्सद्यांना ती आदरणीय वाटत आहे एवढें निर्विवाद आहे. कॉलनीजसारखें स्वराज्य किंवा इंग्लंडच्या साम्राज्यछत्राखालीं अमेरिकेप्रमाणें संयुक्त स्वराज्य किंवा सरकारनें म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारच्या सत्तेखालीं असलेलें प्रांतिक स्वराज्य या तिन्ही कल्पनांत फरक असल्यास आजमितीस तरी तो तात्विक स्वरूपाचा आहे. देशांतील निरनिराळे हितसंबध, अडचणी, पक्षभेद, समाजरचना, संस्कार इत्यादि अनेक गोष्टींचा विचार करितां स्वराज्याची कोणतीही कल्पना निर्दोष ठरेल किंवा सर्वसंमत होईल असें म्हणणें धाडसाचें आहे.

शक्याशक्यतेचा विचार करून आजच्या स्थितींत या देशास प्रांतिक स्वराज्याच्या स्वरूपाचें स्वराज्य मिळालें तरी त्यापासून देशांतील अस्वस्थतेस निःसंशय आळा पडेल, विचारी लोकांचें समाधान होईल. व्यावहारिक दृष्टीनें पाहणारा कोणीही मनुष्य एका दिवसांत येथील सर्व स्थिति पालटून स्वराज्य अस्तित्वांत आणावें असें म्हणत नाहीं. ज्या प्रकारचें स्वातंत्र्य हल्लींच्या परिस्थितींत इष्ट आहे व ज्याची पात्रता येथील लोकांनीं स्पष्टपणें स्थापित केली आहे तें कायदेशीर व न्याय्य स्वातंत्र्य अथवा स्वराज्य बिलकूल विलंब न लागतां हिंदुस्थानांतील लोकांस मिळावें व तें अकृत्रिमपणानें देण्यांत यावें हें सर्व समंजस लोकांचें

# राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष.



सर हेनरी काटन —मुंबई १९०४.



गोपाळ कृष्ण गोखले
बनारस—१९०५. जा. जनरल सेक्रेटरी ( माजी )

11 JAN 1996



डा. सर राश बिहारी घोस
सुरत—१९०७, मद्रास—१९०८.



पंडित मदन मोहन मालवीय
लाहोर—१९०९

मागणें आहे. साम्राज्यावर ओढवलेलें हल्लींचें संकट दूर होऊन सर्वत्र शांतता झाल्यानंतर हिंदुस्थानांतील लोकांनीं साम्राज्याच्या इभ्रतीकरितां, लौकिकाकरितां व रक्षणाकरितां जें सहाय्य स्वेच्छेनें, उल्हासानें व स्वयंस्फूर्तीनें केलें आहे त्याचें चीज या सुधारणेनें होईल याबद्दल सर्वांस उमेद आहे.

कलोनियल स्वराज्याच्या कल्पनेंत, किंवा संयुक्त स्वराज्याच्या कल्पनेंत, किंवा फेडरेशनच्या कल्पनेंत किंवा भूपेंद्र बसूनीं सुचविलेल्या बरोबरीच्या भागीदारीच्या स्वराज्याचा कल्पनेंत इंग्लंडचा संबंध मूर्तिमंतपणें गृहित धरलेला आहे. इंग्लंडचा संबंध झुगारून देऊन किंवा इंग्लंडशीं फटकून वागून निर्भेळ स्वराज्य संपादण्याची कल्पना राष्ट्रीय सभेनें आजपर्यंत कधींही पसंत केलेली नाहीं किंवा या कल्पनेस राष्ट्रीय सभेंतील विचारी लोकांनीं कधींही थारा दिलेला नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांस कोणतेही हक्क देऊं नयेत, त्यांना सदैव दास्यत्वांत ठेवावें असें म्हणणारा एक अँग्लो-इंडियन आतताई पक्ष जसा अस्तित्वांत आहे, त्याप्रमाणेंच इंग्लंडशीं यत्किंचितही संबंध न ठेवितां स्वातंत्र्य संपादन करण्याची हांव धरणारा निर्भेळ स्वराज्यवाल्यांचा दुसरा एक आततांई वर्ग आहे, असें जें भूपेंद्र बसू यांनीं या दोन वर्गांचें वर्णन केलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. इंग्लंडचा संबंध चिरंतन रहावा व इंग्लंडच्या आश्रयानें, मदतीनें, प्रोत्साहनानें येथील लोकांस स्वराज्य मिळावें ही कल्पना राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून तिच्या नजरेसमोर आहे. राष्ट्रीय सभेच्या पूर्वी अस्तित्वांत आलेल्या नॅशनल युनियननें आपले हेतु असे जाहीर केले होते कीं, 'ब्रिटिश राज्याबद्दल स्वामिभक्ति हें आपलें ब्रीद आहे व सनदशीर चळवळीच्या मार्गांनीं कित्येक प्रश्नांबद्दल कितीही विरोध केला तथापि इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामधील सलोखा आपल्या उन्नतीस अत्यंत जरूर आहे व तो संबंध अव्याहतपणें सुरक्षित ठेवणें देशाच्या उन्नतीस जरूर आहे.'

'The union appears to be absolutely unanimous in insisting that unswerving loyalty to the British Crown shall be the key-note of the institution. The union is prepared when necessary to oppose by all constitutional methods all authorities, high or low here or in England, whose acts or omissions are opposed to those principles of the Government of India laid down from time to time by the British Parliament and endorsed by the British Sovereign. But it holds the continuous affiliation of India to Great Britan, at any rate for a period far exceeding the range of any practical political forecast to be absolutely essential to the interest of our own national developement.

वरील तत्त्वांचा अंगिकार केलेल्या युनियननेंच पहिली राष्ट्रीय सभा बोलाविली व ती अस्तित्वांत आणिली. राष्ट्रीय सभेनें प्रांजलपणानें या तत्त्वांचा संपूर्ण आश्रय केला आहे, राष्ट्रीयसभेच्या आजपर्यंतच्या इतिहासांत याचा प्रत्यय पदोपदीं आढळून येणार आहे. सरकारनेंही याबद्दल आपली संमति लॉर्ड लॅन्सडाउन यांचे वेळीं प्रदर्शित केली आहे. १९०६ सालचे सुमारास निर्भेळ स्वराज्यवाल्यांचा पक्ष अस्तित्वांत आला व राष्ट्रीय सभेमध्येंही या पक्षाचे कित्येक अनुयायी दिसूं लागले. सुरतेस जो तंटा विकोपास गेला त्याच्या मुळाशीं याच तत्त्वाचा भेद होता. निर्भेळ स्वराज्यवाल्यांचा व राष्ट्रीय सभेंतील पुरस्कर्त्यांचा या बाबतींत समेट होणें अशक्य होतें. या पक्षापासून व्यतिरेकानें आपलें मत स्पष्टपणें निर्दिष्ट करण्याकरितां घटनेचें पहिलें कलम अस्तित्वांत आणावें लागलें. साम्राज्याच्या छत्राखालीं कॉलनीजसारखें स्वराज्य संपादन करणें हें राष्ट्रीय सभेनें आपलें ध्येय निश्चित केलें. अर्थात् निर्भेळ स्वराज्यवादी लोकांस घटनेच्या या पहिल्या कलमास संमति देणें अशक्य आहे व ते राष्ट्रीय सभेंत येणें किंवा त्यांची राष्ट्रीय सभेच्या चालकांशीं एकवाक्यता होणें अगदींच असंभवनीय आहे.

सुरतेनंतर राष्ट्रीय सभेपासून अलग राहिलेला दुसरा एक मोठा वर्ग आहे. या वर्गांतील लोकांस घटनेचें पहिलें कलम मान्य आहे.

हें कलम मान्य झाल्यानंतर या पक्षांतील लोकांस राष्ट्रीय सभेंत सामील होण्यास कोणतीच हरकत नाहीं. राष्ट्रीय सभेंत सामील झालेल्या लोकांस 'मवाळ' असें म्हणण्यांत येतें व वर नमूद केलेल्या पक्षास 'जहाल' पक्ष म्हणतात. दोन्हीं विशेषणें दोषदर्शक आहेत; तथापि पक्षभेदाची मर्यादा बरोबर समजण्यास या विशेषणांची आजामितीस जरूर आहे. जहाल पक्षाची व्याख्या त्यांतील लोकमान्य पुढाऱ्यांनीं आपल्या पत्रांत नुकतीच केली आहे. " हल्लींहून अधिक नेटानें व कळकळीनें राष्ट्रीय सभेचें काम सतत चालू ठेवा असें म्हणणाऱ्या पक्षास जहाल व तदितर पक्षास मवाळ अशीं नांवें पडलीं आहेत " या व्याख्येप्रमाणें जहाल व मवाळ या पक्षांत तत्त्वाचा कोणताच भेद नाहीं. भेद फक्त काम करण्याच्या पद्धतींत आहे. जोंपर्यंत समाजांत स्वभाववैचित्र्य आहे तोंपर्यंत हा भेद कधींही नाहींसा होणार नाहीं किंवा या भेदामुळें कोणासही वाईट वाटणार नाहीं किंवा एकत्र जमून काम करण्यास कोणताही प्रत्यवाय येणार नाहीं. ही व्याख्या जर या पक्षांतील लोकांस मान्य असेल व ती प्रामाणिक बुद्धीनें केली असेल तर जहाल पक्षांतील लोक राष्ट्रीय सभेच्या बाहेर राहण्याचा कां आग्रह धरीत आहेत हें समजणें अशक्य आहे. तत्त्वाचा भेद नाहींसा झाल्यानंतर नुसत्या रुचिवैचित्र्याकरितां किंवा स्वभावभेदाकरितां दुही चालू ठेवणें श्रेयस्कर नाहीं हें कोणासही दिसून येणार आहे. " विक्रीते करिणे किं अंकुशे विवादः " हा अनुभव सर्वमान्य आहे.

## सुराज्य.

प्रारंभीं राष्ट्रीय सभेचे उद्देश काय होते हे पूर्वीं नमूद केले आहेत. राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्यापासून थोड्याच कालांत निरनिराळ्या प्रांतांतील पुढाऱ्यांमध्यें स्नेहभाव व बंधुप्रेम वाढत गेलें. राष्ट्रीय सभेस येणाऱ्या प्रतिनिधींमध्यें जाती, धर्म, पंथ, पूर्वसंस्कार व दुराग्रह यांची तेढ मुळींच नाहीं असें आढळून आलें व इसवी सन १८९९ चे

सुमारास राष्ट्रीय सभेचा हेतु शक्य त्या मार्गांनीं देशांतील लोकांची उन्नति करण्याचा आहे असें निर्दिष्ट करण्यांत आलें. दादाभाई नवरोजी यानीं कलकत्ता येथील आपल्या भाषणांत राष्ट्रीय सभेच्या कामाचें पृथक्करण उत्तम तऱ्हेनें केलें आहे. राजसत्तेचें स्वरूप कोणच्या प्रकारचें असावें व राज्यकारभाराचीं तत्वें कोणतीं असावींत याबद्दल ऊहापोह करून, देशांत उच्च मनोवृत्ति जागृत करणें, लोकांच्या महत्वाकांक्षेस योग्य वळण लावणें व अंतिमध्येयाची कल्पना निश्चित करणें हें राष्ट्रीय सभेचें आद्य कर्तव्य होय. राज्यव्यवस्थेचें निरीक्षण करून निरनिराळ्या खात्यांतून दिसून येणाऱ्या सुधारणा व गरजा सरकारपुढें मांडाव्यात; अन्याय, असमता किंवा प्रजेच्या हक्कांची पायमल्ली झाली असतां ती सरकारच्या नजरेस आणावी; सरकारनीं दिलेल्या आश्वासनांप्रमाणें प्रजेच्या हक्कांचें समर्थन करावें; राज्यव्यवस्थेचें धोरण अपमानाचें, जुलमाचें, त्रासाचें झाल्यास त्याचा निषेध करावा; सहकारितेनें वागून राज्यकारभार लोकहिताचा होईल अशा सूचना वेळोवेळीं कराव्यात; सारांश हिंदुस्थानास सुराज्यप्राप्ति होईल अशा दृष्टीनें प्रजेच्या वतीनें खटपट करावी हें राष्ट्रीय सभेचें दुसरें कर्तव्य आहे. कोणत्याही देशास स्वराज्य पाहिजेच, परंतु त्यास सुराज्यही पाहिजे असतें.

आज तीस वर्षें या दोन्ही हेतूंबद्दल राष्ट्रीय सभेनें एकसारखी चळवळ चालू केली आहे. दरसालचा या सभेच्या कामाचा रिपोर्ट वाचला असतां, राज्यव्यवस्थेच्या सुधारणेबद्दल कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत हें दिसून येणार आहे. पहिल्या वर्षींच्या राष्ट्रीय सभेंतील प्रश्नांचा निर्देश पूर्वीं केलाच आहे. या पुढील काळांत राष्ट्रीय सभेपुढें सुराज्यासंबंधीं आलेल्या प्रश्नांचा संक्षिप्त रीतीनें निर्देश करणार आहें.

## १८८६ तील विशेष ठराव.

या वर्षीं राणी सरकारच्या ५०व्या वर्षानिमित्य होणाऱ्या ज्युबिलीच्या समारंभाबद्दल सभेनें आनंद प्रदर्शित केला. देशांत वाढत असलेल्या

दारिद्र्याचा विचार करून तें निवारण्याकरितां प्रातिनिधिक संस्था या देशांत अस्तित्वांत आणाव्यात असें सुचविण्यांत आलें. वरिष्ठ व प्रांतिक कायदे कौन्सिलांची सुधारणा करणें अत्यंत अवश्य आहे असें प्रतिपादन करून व ही सुधारणा कशी घडवून आणावी या करितां खालीं लिहिलेल्या सूचना करण्यांत आल्याः—

१. वरिष्ठ व प्रांतिक कायदे कौन्सिलांतील सभासदांची संख्या वाढविण्यांत यावी. त्यांपैकीं निम्मे तरी सभासद लोकनियुक्त असावेत. $\frac{1}{8}$ पेक्षां जास्त सरकारी अधिकारी असूं नयेत. $\frac{1}{8}$ पेक्षां अधिक सरकारनें नेमलेले सभासद असूं नयेत.

२. मुंबई, मद्रास व बंगाल येथील प्रांतिक कायदे कौन्सिलांतील लोकनियुक्त सभासद म्युनिसिपालिट्या, लोकल बोर्डें, चेंबर ऑफ कॉमर्स, विश्वविद्यालयें व मतदारांचे विशेष संघ स्थापन करून त्यांनीं निवडलेले असावेत. संयुक्त प्रांत व पंजाब या मागसलेल्या प्रांतांत निवडणुकीचा हक्क सरकारनीं नेमलेल्या व लोकांनीं निवडलेल्या अशा मिश्र मतदार लोकांच्या संघांस देण्यांत याव्या.

३. वरिष्ठ कायदे कौन्सिलांतील लोकनियुक्त सभासद प्रांतिक कौन्सिलांतील निवडलेल्या सभासदांनींच निवडून द्यावेत. सभासदांच्यासंबंधीं जातीचे किंवा धर्माचे कोणतेही निर्बंध असूं नयेत. हिंदुस्थानांत राहणाऱ्या कोणत्याही मनुष्याला सभासद होतां यावें. लोकनियुक्त सभासदास वेतन देऊं नये. त्याच्या प्रवासाचा खर्च मात्र सरकारनें द्यावा.

५. कौन्सिलांतून दरसाल बजेटाची चर्चा व्हावी व तें कौन्सिलनें मंजूर करावें. सभासदांना राज्यकारभाराबद्दल प्रश्न विचारण्याचा अधिकार असावा व एखाद्या प्रश्नाबद्दल कौन्सिलांत वादविवाद करण्याचा हक्क असावा, व अशा वादविवादानंतर कौन्सिलनें आपलें मत ठरावाच्या रूपानें नमूद करावें.

६. कोणताही प्रश्न सरकाराच्या परराष्ट्रीय धोरणासंबंधीं किंवा लष्करी व्यवस्थेसंबंधीं किंवा देशाच्या हितास अपायकारक होणारा असा अस-

ल्यास तो कौन्सिलांत वादविवादाकरितां आणूं नये असा हुकूम करण्याचा सरकारास अधिकार असावा.

७. कौन्सिलांत बहुमतानें एखादा ठराव मंजूर झाला तर तो नापसंत करण्याचा अधिकार सरकारास असावा. परंतु अशा नामंजूर केलेल्या ठरावाबद्दल सरकारानें आपल्या म्हणण्याचें समर्थन वरिष्ठ सरकार किंवा सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचेकडे करावें व कौन्सिलांतील बहुमतांनीं याबद्दल दाद मागितल्यास पार्लमेंटच्या कमिटीपुढें अशा प्रश्नाची चौकशी होऊन निकाल व्हावा. तसेंच सदर वर्षीं प्रातिनिधिक संस्था या देशांत सुरू करण्याची किती अवश्यकता आहे याबद्दल चौकशी करण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत यावें असेंही सुचविण्यांत आलें.

पब्लिक सर्व्हिसच्या प्रश्नांबद्दल एक कमिटी नेमून तिनें याच बैठकींत रिपोर्ट केला व असें मत दिलें कीं, समकालीन परीक्षाच या देशांत सुरू झाली पाहिजे व सिव्हिल सर्व्हिसची मर्यादा २३ वर्षांपर्यंत असली पाहिजे. ज्यूरीची पद्धत विस्तृत प्रमाणावर सुरू करावी असें सुचविण्यांत आलें, व सेशन जज्ज व हायकोर्ट यांस ज्यूरीनें निर्दोषी म्हणून दिलेला ठराव फिरविण्याचा अधिकार असूं नये. तसेंच कोणत्याही आरोपित मनुष्यास मॅजिस्ट्रेटनें आपली चौकशी करण्यापेक्षां आपली चौकशी सेशन कोर्टानें करावी असें म्हणण्याचा अधिकार असावा. न्याय व अंमलबजावणीचीं खातीं निराळीं करावीं व कांहीं थोडासा जादा खर्च आला तरी कांहीं प्रांतांतून या व्यवस्थेचा प्रयोग करून पहावा. युरोपांत चाललेल्या अस्वस्थतेचा विचार करितां ग्रेटब्रिटनवर लढाईचें संकट ओढवल्यास, येथील लोकांस लष्करी शिक्षण दिल्यास त्यांना सरकारास मदत करतां येईल; ह्यासाठीं येथील लोकांस स्वयंसेनिक होण्याची परवानगी द्यावी व यायोगानें संकटाचे वेळीं सरकारास मदत करण्याची पात्रता त्यांचे अंगीं येईल असें करावें.

## १८८७ तील विशेष ठराव.

या वर्षी देशांतील लोकांस लष्करी खात्यांत हुद्याच्या जागा देण्यांत याव्यात व लष्करी शिक्षणाच्या संस्था काढून येथील लोकांस तयार करण्यांत याव्रें असें सुचविण्यांत आलें. इन्कमटॅक्सची किमान मर्यादा निदान एक हजार उत्पन्नावर ठरविण्यांत यावी, असें प्रतिपादण्यांत आलें. देशांतील दारिद्र्यविमोचनाकरितां विस्तीर्ण प्रमाणावर धंदेशिक्षणाच्या सोई देशांत उत्पन्न कराव्यात, सरकारच्या उपयोगी लागणारा देशांत तयार झालेला माल सरकारनें येथेंच खरेदी करावा असें सुचविण्यांत आलें. हत्याराच्या कायद्यांतील निर्बंध कमी करून हत्यारें वापरण्याची मुभा असावी असें मागणें करण्याचा ठराव मंजूर करण्यांत आला.

20 JAN 1994

## १८८८ तील विशेष ठराव.

या वर्षी पोलीसखात्याची व्यवस्था फार असमाधानकारक असल्यामुळें सरकारनें एक कमिशन नेमून चवकशी करावी व या कमिशनमध्यें सरकारी व बिनसरकारी सभासद असावेत असें मागण्यांत आलें. मादक पदार्थांचा देशांत होत असलेला भयंकर खप लक्षांत आणून सरकारनें या बाबतींत लोकांचे व्यसनास आळा घालण्याचा प्रयत्न करावा असें सुचविण्यांत आलें. शिक्षणावरील खर्च कमी करण्यासंबंधीं सरकारी ठरावांतून दिसून आलेलें धोरण गैरवाजवी आहे व शिक्षणसंस्थांवर खर्च वाढविण्याची अवश्यकता आहे व निदान हल्लींच्या स्थितींत तरी हा खर्च कमी करणें अपायकारक आहे असें नमूद करण्यांत आलें. देशांतील सांपत्तिक स्थितीचा विचार करण्याकरितां व उद्योगधंद्यांच्या स्थितीबद्दल चवकशी करण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत यावें. त्याचप्रमाणें राष्ट्रीय सभेच्या मागण्यांचा विचार करण्याकरितां जरूर तर एक पार्लमेंटरी कमिटी नेमून तिनें या बाबतींत विचार करावा अशी विनंति करण्यांत आली. सरकारच्या मदतीनें सैन्यांत सुरू असलेला अनीतीचा प्रकार

बंद करण्याबद्दल इंग्लंडांत चाललेल्या चळवळीस राष्ट्रीय सभेनें संमति दिली. बंगालप्रमाणें मुंबई व मद्रास व इतर प्रांतांतून कायमधाऱ्याची पद्धत सुरू करण्याबद्दल रिपोर्ट करण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली. मिठावरील वाढलेल्या करामुळें गरीब रयतेवर ओझें पडत आहे व शांततेच्या व सरकारच्या सांपत्तिक सुस्थितीच्या कालांत हा कर त्यांचे वर लादणें गैरवाजवी आहे असें प्रतिपादण्यांत आलें.

## १८८९ तील विशेष ठराव.

या सालची राष्ट्रीय सभा फार महत्वाची झाली. सुप्रसिद्ध मुत्सद्दी चार्लस ब्रॅडलॉ हे या सभेस हजर होते व त्यांच्या अलौकिक वक्तृत्वानें सर्व श्रोतृवृंद गुंग होऊन गेला. ब्रॅडलॉसाहेबांचें सर्व आयुष्य स्वातंत्र्याकरितां झगडण्यांत गेलें. ते अनाथांचे वाली होते. विश्वबंधुत्वाची खरी कल्पना त्यांच्यांत पूर्णपणें बाणली होती व हिंदुस्थानांतील कायदे कौन्सिलांची सुधारणा करण्यासाठीं त्यांनीं जे प्रयत्न चालविले होते त्याबद्दल हजारों ठिकाणच्या प्रतिनिधींनीं त्यांस मानपत्रें अर्पण करून आपली कृतज्ञताबुद्धि व्यक्त केली. ब्रॅडलॉसाहेबानीं उत्तरादाखल जें भाषण केलें तें अत्यंत हृदयद्रावक असून त्यांच्या उदात्त मनोवृत्तीचें प्रतिबिंब त्यांत स्पष्टपणें उमटलें आहे. मि० ब्रॅडलॉ यानीं राष्ट्रीय सभेची केलेली व्याख्या फार मार्मिक आहे. This Congress' movement is an educational movement hammering upon the anvil of millions of men's brains until it wields into one common whole-men whose desire for political and social reforms is greater than all distinctions of race and creed.

प्रांतिक व वरिष्ठ कायदे कौन्सिलांच्या सुधारणेबद्दल जें बिल ब्रॅडलॉ-साहेबांनीं तयार केलें होतें त्याबद्दल मोठा महत्वाचा वादविवाद याच बैठकींत झाला. राष्ट्रीय सभेनेंही ब्रॅडलॉसाहेबांस एक मानपत्र समर्पण केलें.

मि. केन व मि. स्मिथ यांनीं अबकारीच्या सुधारणेबद्दल इंग्लंडांत चालविलेल्या प्रयत्नांबद्दल आभार मानण्यांत आले. उतरत्या भावाकडे

लक्ष्य देऊन रुप्यावर बसविलेली जकात माफ करण्यांत यावी असें सुचविण्यांत आलें. हिंदुस्थानचें बजेट पार्लमेंटापुढें मांडण्यांत येतें त्या वेळीं त्याजवर वादविवाद करण्यास योग्य अवसर असावा असें प्रतिपादण्यांत आलें. सिव्हिल सार्व्हिसची वयोमर्यादा १९ ची तेवीस केल्याबद्दल आभार प्रदर्शित करण्यांत आले. पब्लिक सार्व्हिस कमिशनच्या रिपोर्टावरील सरकारच्या ठरावानें फार निराशा झाली आहे व या बाबतींत नवीन जास्त हक्क न मिळतां उलटी पीछेहाटच झाली आहे याबद्दल निषेध प्रदर्शित करण्यांत आला. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा समकालीन झाल्याखेरीज व इतर वरिष्ठ प्रतीच्या जागांचीही भरती इंग्लंड व हिंदुस्थान या देशांत समकालीन परीक्षा घेऊन केल्याखेरीज येथील लोकांस न्याय मिळणार नाहीं असें जाहीर करण्यांत आलें. लॉर्ड रे साहेबांच्या उत्कृष्ट राजकारभाराबद्दल राष्ट्रीय सभेनें आपली गुणग्राहकता व्यक्त केली. सरकारनें बंगालखेरीज इतर प्रांतांत कायमधाऱ्याची पद्धत सुरू करण्याबद्दल विचार करावा अशी विनंति करण्यांत आली.

## १८९० तील विशेष ठराव.

ब्रॅडलॉसाहेबांनीं कायदे कौन्सिलांच्या सुधारणेबद्दल पार्लमेंटांत सादर केलेल्या बिलाबद्दल राष्ट्रीय सभेनें आपली संमति व्यक्त केली. मादक द्रव्यांवर कर वाढवून व दारूचीं दुकानें बंद करून या व्यसनास आळा घालण्याबद्दल सरकारनें केलेल्या प्रयत्नांचें अभिनंदन करण्यांत आलें. तसेंच दारूच्या गुत्त्यांसंबंधीं स्थानिक लोकमताचा विचार करण्यांत यावा असें सुचविण्यांत आलें.

## १८९१ तील विशेष ठराव.

पोलीसखात्याची सुधारणा होण्याबद्दल, त्यांतील हुद्यांच्या जागांचे पगार वाढविण्याबद्दल, सुशिक्षित लोकांचा या खात्यांत भरणा करण्याबद्दल सूचना करण्यांत आली. ब्रॅडलॉसाहेबांच्या आकस्मिक मृत्यूमुळें

झालेल्या हानीबद्दल दुःख प्रदर्शित करण्यांत आलें. जंगलखात्याच्या व्यवस्थेमुळें फार असंतोष उत्पन्न झाला आहे व गरीब रयतेस फार त्रास होत आहे, यासाठीं सरकारनें चवकशी करावी अशी विनंति करण्यांत आली.

## १८९२ तील विशेष ठराव.

कायदे कौन्सिलांच्या सुधारणेचा इंडिया कौन्सिल ॲक्ट मंजूर केल्याबद्दल राष्ट्रीय सभेनें संतोष व्यक्त केला. हिंदुस्थानच्या सरहद्दीबाहेर साम्राज्याच्या हिताकरितां केलेल्या लढायांचा खर्च हिंदुस्थानावर बसविण्यांत येऊं नये असें सुचविण्यांत आलें. सरकारच्या संमतीनें चालू असलेल्या लष्करांतील व्यसनास व दुर्वर्तनास सर्वस्वी आळा घालण्यांत यावा असें नमूद करण्यांत आलें. सेंट्रल फिन्सबरी येथील लोकांनीं नामदार दादाभाई नवरोजी यांस आपल्या वतीनें पार्लमेंटांत निवडून दिल्याबद्दल आभार प्रदर्शित करण्यांत आले.

## १८९३ तील विशेष ठराव.

वैद्यकी खात्यासंबंधीं लष्करी व सिव्हिल अशा वरिष्ठ प्रतीच्या जागा पृथक् करून त्या लायख माणसांस देण्यांत याव्यात. हिंदुस्थानांत उच्च प्रतीच्या शास्त्रीय शिक्षणाची सोय करून व येथील लोकांस वरिष्ठ प्रतीच्या जागा देऊन वैद्यकीय व शास्त्रीय ज्ञानाची वाढ करण्याचा व शोधकबुद्धीचा विकास करण्याचा प्रयत्न करावा असें सुचविण्यांत आलें. हाऊस ऑफ् कॉमन्सनें मंजूर केलेल्या समकालीन परीक्षेच्या ठरावाबद्दल आभार मानण्यांत आले. हिंदुस्थानांतील टांकसाळ बंद करून कृत्रिमपणानें रुपयाचा भाव वाढविल्यामुळें देशी उद्योगधंद्यांचें व विशेषेंकरून गिरणीवाल्यांचें नुकसान होत असल्याबद्दल जाहिर करण्यांत आलें. युरोपियन नोकर लोकांस हुंडवणावळीबद्दल नुकसानरूपानें सुमारें दीड कोट रुपयांचा जो विशेष भत्ता देण्यांत येतो त्याबद्दल राष्ट्रीय सभेनें निषेध प्रदर्शित केला.

## १८९४ तील विशेष ठराव.

लँकेशायर येथील व्यापारास उत्तेजन देण्याच्या हेतूनें हिंदुस्थानांतील कापडावर बसविलेली जकात अन्यायमूलक आहे असें जाहिर

करण्यांत आलें. हिंदुस्थानच्या खर्चाबद्दल चौकशी करण्याचें सरकारनें कबूल केल्याबद्दल सरकारचे आभार मानण्यांत आले. डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज यांच्या जागा वकिलीच्या धंद्यांतील लोक नेमून भरण्यांत याव्यात व त्यांचें प्रमाण हल्लींपेक्षां वाढविण्यांत यावें असें मागण्यांत आलें.

जंगलखात्यासंबंधीं हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केलेल्या उदार धोरणाबद्दल आभार प्रदर्शित करण्यांत आले. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी वसाहतवाल्यांच्या संबंधीं तेथील सरकारनें केलेल्या कायद्याबद्दल सरकारनें आपली नापसंती दाखवावी असें सुचविण्यांत आलें.

## १८९५ तील विशेष ठराव.

स्थानिक व वरिष्ठ कायदे कौन्सिलांत विचारण्यांत येणाऱ्या प्रश्नांसंबंधीं खुलासा करण्याचा अधिकार सभासदांना असावा असें मागण्यांत आलें. लीगल प्रॅक्टिशनर्स ॲक्टाबद्दल राष्ट्रीय सभेनें आपली नापसंती व्यक्त केली. जकातीची वीस नंबरापेक्षां कमी प्रतीच्या सुतावर असलेली माफी सरकारनें कायम ठेवावी असें सुचविण्यांत आलें.

## १८९६ तील विशेष ठराव.

राणी सरकारच्या ज्युबिलीसंबंधीं राष्ट्रीय सभेनें आपला संतोष व्यक्त केला. प्रांतिक कराराच्या बाबतींत सुधारणा करण्यासंबंधीं सूचना करण्यांत आल्या. दुष्काळनिवारणार्थ उभारलेल्या फंडाचा हिशोब स्वतंत्र ठेवावा, त्याची वाढ करावी व दयार्द्रबुद्धीनें दुष्काळग्रस्तांस मदत करावी अशी विनंति करण्यांत आली. कलकत्ता, मद्रास, मुंबई या विश्वविद्यालयांनीं प्रत्यक्ष विद्यादानाची सोय करणें हें आपल्या कर्तव्यांपैकीं आहे असें समजून तजवीज करावी असें सुचाविण्यांत आलें.

आसामांतील मुदतबंदीच्या करारासंबंधीं केलेले कायदे रद्द करण्यांत यावेत असें प्रतिपादन केलें. मुंबई व मद्रास येथील प्रांतिक कार्यकारी कौन्सिलरांची संख्या दोहोंची तीन करण्यांत यावी. मुंबई व मद्रास

येथील मुख्य लष्करी अंमलदारास या कौन्सिलचे सभासद नेमण्यांत यावें असें सुचविण्यांत आलें.

## १८९७ तील विशेष ठराव.

हद्दपारीच्या कायद्यासंबंधीं निषेध प्रदर्शित करण्यांत आला; तसेंच १२४ अ यांतील सुचविलेल्या दुरुस्तीसंबंधींही नापसंती व्यक्त केली. वरिष्ठ कायदे कौन्सिलाच्या बिन सरकारी सभासदांना खर्चाच्या बाबतींत कौन्सिलचें मत निश्चित करण्याचा अधिकार असावा. सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्या कौन्सिलांत एतद्देशीय लोक नेमावेत व दरसाल हिंदुस्थानच्या खर्चाबद्दल चवकशीकरितां एक पार्लमेंटची कमिटी नेमावी अशी सूचना करण्यांत आली. फॅमिन कमिशनला दुष्काळाच्या कारणांची व त्यांचा प्रतिकार करण्याच्या मार्गांची चवकशी करण्याचा अधिकार देण्यांत यावा असें मागण्यांत आलें.

## १८९८ तील विशेष ठराव.

फौजदारी कायद्यासंबंधीं केलेल्या दुरुस्त्या प्रजेच्या हक्कांस बाध आणणाऱ्या आहेत असें नमूद करण्यांत आलें. वर्तमानपत्रांची तपासणी करण्याकरितां कित्येक प्रांतांतून नेमलेल्या गुप्त कमिट्या ब्रिटिश राज्यव्यवस्थेच्या धोरणास सुटून आहेत व त्यांपासून विचारस्वातंत्र्यास धक्का बसणार आहे, असें प्रतिपादन करण्यांत आलें. कार्यकारी कौन्सिलांत निदान एकतरी एतद्देशीय सभासद असावा, असें मागण्यांत आलें. प्लेगची आपत्ति सर्व राष्ट्रावर आली असून त्यासंबंधींचा खर्च स्थानिक संस्थांवर न घालतां तो सरकारनें सोसावा असें सुचविण्यांत आलें.

## १८९९ तील विशेष ठराव.

पंजाब लँड एलिनिएशन बिलाबद्दल निषेध व्यक्त करण्यांत आला. सरकारची ग्रँट घेणाऱ्या खासगी शिक्षणसंस्थांतील शिक्षकांनीं व व्यवस्थापकांनीं जाहिर सभांतून कोणताही भाग घेऊं नये म्हणून केलेल्या

नियमाबद्दल नापसंती व्यक्त करण्यांत आली. देशांत औद्योगिक शिक्षणाच्या संस्था फार थोड्या व अगदीं हलक्या प्रतीच्या असल्यामुळें उच्च प्रतीचें धंदेशिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण करण्यांत याव्यात असें सुचविण्यांत आलें, व कै. टाटा यानीं दिलेल्या उदार देणगीबद्दल अभिनंदन करण्यांत आलें.

## १९०० तील विशेष ठराव.

लष्करांतील शिपायांनीं दाखविलेल्या मर्दुमकीकडे लक्ष देऊन त्यांना वरिष्ठ प्रतीच्या हुद्देदारीच्या जागा देण्यांत याव्यात; लष्करी कॉलेजें स्थापून त्यांतून लष्करी शिक्षण देण्याची सोय करण्यांत यावी; हिंदुस्थानांतील युनिव्हर्सिटयांस सेनेटचे फेलो निवडण्याचा हक्क असावा असें मागण्यांत आलें. कर्झनसाहेबांच्या दुष्काळासंबंधींच्या उदार धोरणाबद्दल व रंगून आणि ओग्यारा या खटल्यांसंबंधीं त्यांनीं दाखविलेल्या न्यायबुद्धीबद्दल त्यांचा गौरव करण्यांत आला. हिंदुस्थान व इंग्लंड यांचेमध्यें होणाऱ्या खर्चाच्या वांटणीचे बाबतींत सुमारें ४० लक्ष रुपये इंग्लंडकडून हिंदुस्थानास देण्याबद्दल वेल्बी कमिशनच्या सूचनेप्रमाणें सरकारनें देण्याचें ठरविल्याबद्दल सरकारचे आभार मानण्यांत आले. कूपर्स हिल कॉलेजांतील प्रवेश मर्यादित करण्यासंबंधीं केलेले निर्बंध काढून टाकावेत व रुरकी कॉलेजांतील जातिविशिष्ट नियम रद्द करावेत असें मागण्यांत आलें. तसेंच पोलीस, पब्लिक वर्क्स, स्टेट रेलवेज, अबकारी व कस्टम खात्यांतील वरिष्ठ जागा एतद्देशीयांना कांहीं योग्य प्रमाणानें देण्यांत याव्यात असें मागण्यांत आलें.

## १९०१ तील विशेष ठराव.

सरदार घराण्यांतील कांहीं लोकांना लष्करी खात्यांतील कमिशनें देण्याबद्दल लॉर्ड कर्झन साहेबांनीं अस्तित्वांत आणलेल्या इंडियन कॅडेट कोरबद्दल पसंती व्यक्त करण्यांत आली. शेतकी खात्याची सुधारणा करण्यांत यावी, शेतकीच्या पेढ्या काढण्यांत याव्यात, असें सुचविण्यांत

आलें. खाणींसंबंधीं शिक्षण देण्याकरिता एक कॉलेज काढण्यांत यावें असें मागण्यांत आलें. प्रिव्ही कौन्सिलच्या जुडीशियल कमिटींत नामांकित हिंदी कायदेपंडितास नेमण्याबद्दल विनंति करण्यांत आली.

## १९०२ तील विशेष ठराव.

सातवे एडवर्ड बादशहा यांचे राज्याभिषेकासंबंधानें आनंद प्रदर्शित करण्यांत आला. युरोपियन लष्करी शिपायांचा पगार वाढवून लष्करी खर्च वाढविल्याबद्दल निषेध प्रदर्शित करण्यांत आला. युनिव्हर्सिटी कमिशनच्या रिपोर्टांतील प्रतिगामी धोरणाबद्दल खेद व्यक्त करण्यांत आला. टाटांच्या शास्त्रीय शिक्षणाच्या संस्थेस सरकारनें उत्तेजन द्यावें व अशा दुसऱ्या संस्थाही स्थापन करण्यांत याव्यात असें मागणें करण्यांत आलें. रेल्वेंतील हुद्याच्या जागा युरोपियन लोकांसच देण्यांत येतात, हें गैराशिस्त असून या जागा लायख हिंदी गृहस्थांस द्याव्यात, असें प्रतिपादण्यांत आलें.

## १९०३ तील विशेष ठराव.

ऑफिशियल सीक्रेट बिलाचा जोरानें निषेध करण्यांत आला; लष्करी खर्चाच्या वाढीबद्दल टीका करण्यांत आली; मिठावरील कर कमी केल्याबद्दल व प्राप्तीच्या कराची किमान मर्यादा वाढविल्याबद्दल सरकारचें अभिनंदन करण्यांत आलें; स्थानिक स्वराज्य व युनिव्हर्सिट्यांचें बाबतींत स्पष्ट दिसणाऱ्या सरकारच्या पीछेहाटीच्या धोरणाबद्दल निषेध प्रदर्शित करण्यांत आला.

## १९०४ तील विशेष ठराव.

प्राथमिक शिक्षणावरील वाढविलेला खर्च व धंदेशिक्षणाबद्दल स्थापन केलेल्या १० शिष्यवृत्ति यांबद्दल सरकारचे आभार मानण्यांत आले. प्रत्येक प्रांतांतून एक तरी धंदेशिक्षणाकरितां टेक्निकल इन्स्टिटयूट स्थापन करण्यांत यावें; शेतकरी वर्गाच्या विपन्न स्थितीचा विचार करून त्यांच्या स्थितीची चौकशी करण्याकरितां कांहीं ठराविक खेड्यांतून

माहिती मिळविण्यांत यावी; सरकारच्या तिजोरींत वाढत असलेल्या शिलकेचा विनियोग मिठावरील कर कमी करण्याकडे, शेतकऱ्यांवरील ओझें कमी करण्याकडे, देशी कापडावरील जकात उठविण्याकडे, म्युनिसिपालिटच्या व लोकलबोर्डें यांस मदत करण्याकडे, वैद्यकीय व आरोग्याच्या साधनांच्या वृद्धीकडे करण्यांत यावा असें सुचविण्यांत आलें. प्रत्येक प्रांतास निदान दोन तरी प्रतिनिधी पार्लमेंटास निवडून पाठविण्याचा अधिकार असावा; वरिष्ठ व प्रांतिक कायदेकौन्सिलांत बिनसरकारी सभासदांची संख्या वाढविण्यांत यावी; पैशाच्या बाबतींत कौन्सिलचें मताधिक्य निश्चित करण्याचा अधिकार सभासदास असावा; सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचे कौन्सिलांत व वरिष्ठ, मुंबई आणि मद्रास येथील कार्यकारी कौन्सिलांत लोकनियुक्त सभासदांनीं प्रतिनिधी निवडून द्यावेत असें मागणें करण्यांत आलें; तिबेटच्या मोहिमेबद्दल निषेध प्रदर्शित करण्यांत आला; बंगालच्या फाळणीसंबंधीं हिंदुस्थानसरकारच्या योजनेविरुद्ध राष्ट्रीय सभेनें आपलें मत जोरानें प्रतिपादन केलें.

## १९०५ तील विशेष ठराव.

प्रिन्स ऑफ वेल्स यांचें हिंदुस्थानांतील आगमनाबद्दल स्वागत करण्यांत आलें, सेक्रेटरी आफ स्टेट यांचे कौन्सिलांत निदान तीन, वरिष्ठ कौन्सिलांत दोन, मुंबई व मद्रास येथील कार्यकारी कौन्सिलांत प्रत्येकीं एक याप्रमाणें हिंदी गृहस्थ नेमण्यांत यावे असें मागण्यांत आलें. पोलीस खात्याच्या सुधारणेबद्दल सूचना करण्यांत आल्या; मक्केस जाणाऱ्या मुसलमान यात्रेकरूंवरील क्वारन्टाईन उठविण्यांत यावें, बंगालची फाळणी रद्द करण्यांत येऊन सर्व बंगाली लोकांना एकाच राज्यव्यवस्थेखालीं ठेवण्यांत यावें; फाळणीमुळें उत्पन्न जाहलेला असंतोष दडपून टाकण्याकरितां जें उग्र स्वरूप सरकारानें धारण केलें आहे तें अन्यायाचें आहे, असें नमूद करण्यांत आलें. प्राथमिक शिक्षण मोफत करण्याचा प्रारंभ करण्यांत यावा असेंही सुचविलें.

## १९०६ तील विशेष ठराव.

वाक्फच्यासंबंधीं प्रिव्ही कौन्सिलच्या ठरावाकडे लक्ष्य देऊन हिंदुस्थानसरकारनें कायदा करावा; बंगाल्यांतील लोकांनीं सनदशीर चळवळीबद्दल निराश होऊन सरकारचें लक्ष्य आपल्या दुःखाकडे वेधण्याकरितां काढलेला बहिष्काराचा उपाय योग्य व कायदेशीर आहे असें राष्ट्रीय सभेनें ठरविलें; थोडीशी झीज सोसूनही देशांतील उद्योगधंद्यांस उत्तेजन देण्याकरितां देशी माल वापरण्यांत यावा; ब्रिटिश साम्राज्यांत स्वयंसत्ताक कॉलनीजप्रमाणें या देशांत स्वराज्य स्थापन करण्यांत यावें; व त्याची पूर्वतयारी म्हणून समकालीन परीक्षांची पद्धत ताबडतोब अमलांत आणण्यांत यावी, कार्यकारी कौन्सिलांतून एतद्देशीय सभासद नेमण्यांत यावे, कायदे कौन्सिलांतील लोकनियुक्त सभासदांची संख्या वाढविण्यांत यावी, जमाखर्चावर त्यांचा ताबा असावा व राज्यकारभारावर त्यांची हुकमत चालावी; स्थानिकस्वराज्याच्या संस्था सर्वांशीं बिनसरकारी कराव्यात. लोकांनीं राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न हातीं घेऊन लोकांच्या हुकमतीखालीं व लोकांच्या हिताकडे लक्ष्य देऊन या शिक्षणाचा सर्वत्र प्रसार करावा.

## १९०७ तील विशेष ठराव.

सन १९०७ सालीं सुरतेस बखेडा होऊन राष्ट्रीय सभा मोडली व कन्व्हेनशनची बैठक होऊन राष्ट्रीय सभेचें काम चालू ठेवण्याकरितां, घटना ठरविण्याकरितां कमिटी नेमण्यांत येऊन त्या कमिटीच्या ठरावाप्रमाणें राष्ट्रीय सभेची बैठक करण्याचें ठरलें.

## १९०८ तील विशेष ठराव.

लॉर्ड मोर्ले यांच्या सुधारणांबद्दल आनंद प्रदर्शित करण्यांत आला; अत्याचाराबद्दल राष्ट्रीय सभेनें आपला तिरस्कार व्यक्त केला; देशांत वाढलेल्या धारणीसंबंधीं चौकशी करण्याकरितां एक कमिशन नेमणेंत यावें असें सुचविणेंत आलें.

# राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष.



पंडित बिशन नारायण दार,
कलकत्ता—१९११.



रा· ब· रं· न मुधोळकर, बांकीपूर—१९१२.



नवाब सय्यद महमद,
कराची—१९१३. जा· जनरल सेक्रेटरी.



भूपेंद्र बसु, मद्रास—१९१४.

## १९०९ तील विशेष ठराव.

१९०९ च्या इंडियन कौन्सिल ॲक्टास अनुसरून केलेले कानू अत्यंत असमाधानकारक आहेत असें सुचविणेंत आलें; संयुक्तप्रांत, पंजाब, पूर्व बंगाल, आसाम व ब्रह्मदेश येथें कार्यकारी कौन्सिलें स्थापणेंत यावीं असें मागणेंत आलें; वऱ्हाड व मध्यप्रांतांत कायदेकौन्सिल स्थापणेंत यावें असें सुचविणेंत आलें. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांनीं चालविलेल्या निःशस्त्र-प्रतिकाराच्या चळवळीबद्दल अभिनंदन प्रदर्शित करणेंत आलें व तेथील लोकांस मदत करण्याकरितां देशांतील लोकांस विनंति करण्यांत आली.

## १९१० तील विशेष ठराव.

पंचम जॉर्ज बादशहा यांचें राज्यारोहणाबद्दल अभिनंदन करणेंत आलें; संयुक्तप्रांत व पंजाब या ठिकाणीं कार्यकारी कौन्सिलें स्थापणेंत यावींत; प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करणेंत यावें; जातिविशिष्ट मतदारांचे संघ उत्पन्न करण्यांत येऊं नयेत व हेंच तत्व म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डें यांस लागू करणेंत यावें, असें सुचविणेंत आलें; धार्मिक बाबतींत स्वस्थतेचा भंग होण्याच्या प्रसंगीं समेट करण्याकरितां पंचायती स्थापन करणेंत याव्यात; राजकीय बाबतींतील गुन्हेगारांस माफी करणेंत यावी.

## १९११ तील विशेष ठराव.

बादशहा व महाराणी यांचें हिंदुस्थानांतील राज्यारोहणाबद्दल अभिनंदन करण्यांत आलें; बंगालची फाळणी रद्द केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यांत आली; बहारचा नवीन प्रान्त केल्याबद्दल आनंद प्रदर्शित करण्यांत आला; संयुक्त प्रांतांत कार्यकारी कौन्सिल मुंबई, मद्रास, बंगाल इलाख्यां-प्रमाणेंच स्थापणेंत यावें व त्याचप्रमाणें इतर प्रांतांतही तें स्थापन करण्यांत यावें असें मागण्यांत आलें.

## १९१२ तील विशेष ठराव.

व्हाइसरॉय यांचेवर फेंकण्यांत आलेल्या बॉंबच्या अत्याचाराचा राष्ट्रीय सभेनें फार जोरानें निषेध केला; दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी

वसाहतवाल्यांची स्थिति लक्ष्यांत घेतां मुदतबंदीच्या करारानें परदेशांत मजूर नेण्याची पद्धत सर्वस्वीं बंद करण्यांत यावी अशी मागणी करण्यांत आली; हिंदुस्थान सरकारनें सुचविलेलें प्रांतिकस्वराज्य या देशांत स्थापण्यांत यावें अशी विनंति करण्यांत आली; मध्यप्रांतांत इतर प्रान्तांप्रमाणें लेफ्टेनन्ट गव्हर्नर नेमण्यांत यावा असें सुचविण्यांत आलें; प्राथमिक शिक्षणाचा फैलाव करण्याबद्दल व शिक्षणाचें काम करणारीं विश्वविद्यालयें अस्तित्वांत आणण्याबद्दल मागणी करण्यांत आली; कलकत्ता हायकोर्टाप्रमाणें हिंदुस्थानांतील सर्व हायकोर्टांस वरिष्ठ सरकारशीं प्रत्यक्ष संबंध ठेवण्याची परवानगी असावी असें नमूद करण्यांत आलें.

## १९१३ तील विशेष ठराव.

दक्षिण आफ्रिकेंतील लढ्याबद्दल समाधानकारक निकाल लावण्यांत यावा अशी विनंति करण्यांत आली. लॉर्ड हार्डिंज यांच्या या बाबतींतील उदार धोरणाबद्दल आनंद प्रदर्शित करण्यांत आला. मास्लेम लीगचें ध्येय व राष्ट्रीय सभेचें ध्येय एकच असल्यामुळें या दोन्ही संस्थांनीं एकवाक्यतेनें देशोन्नतीचे कामीं प्रयत्न करण्यांत यावे असें सुचाविण्यांत आलें; सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्या कौन्सिलची सुधारणा करून त्यांत ९ सभासद असावेत व त्यांपैकीं ३ हिंदुस्थानांतील कौन्सिलांतील लोकनियुक्त सभासदांनीं निवडलेले असावेत, ३ ब्रिटिश राज्यकारणांत वाकबगार व अनुभवी असे असलेले नेमण्यांत यावे व बाकीचे तीन सिव्हिल सर्व्हिसपैकीं असून त्यांस हिंदुस्थान सोडून दोन वर्षांहून जास्ती दिवस जाहलेले नसावेत असें सुचविण्यांत आलें; कानडामधील हिंदी वसाहतवाल्यांच्या बाबतींत प्रवासासंबंधीं असलेले निर्बंध नाहींसे करण्यांत यावेत; हिंदुस्थानांत किंवा दुसरे कोठेंही मुदतबंदीची पद्धत सर्वस्वीं बंद करण्याबद्दल सुचविण्यांत आलें; देशभक्त गांधी यांस त्यांनीं चालविलेल्या स्तुत्य प्रयत्नांत सर्व देशाचें पाठबळ आहे असा संदेश पाठविण्यांत आला.

## १९१४ तील विशेष ठराव.

चालू युद्धांत इंग्रज सरकार व दोस्त राष्ट्रांस यशःप्राप्ति व्हावी; हिंदुस्थानांतील लोक अत्यंत राजनिष्ठपणानें शक्य ती मदत करण्यास तयार आहेत असें जाहीर करण्यांत आलें; लॉर्ड हार्डिंज यानीं दक्षिण आफ्रिकेंतील लढा समाधानधारक रीतीनें मिटाविण्याचें बाबतींत दाखविलेल्या थोर मुत्सद्दीगिरीबद्दल आभार प्रदर्शित करण्यांत आले; प्रस्तुत युद्धांत हिंदी शिपायांनीं दाखविलेल्या कर्तबगारीचा विचार करितां लष्करी खात्यांत वरिष्ठ प्रतीच्या जागा त्यांस देण्यांत याव्यात; लष्करी शिक्षणाच्या सोई करण्यांत याव्यात; स्वयंसैनिक होण्याची परवानगी देण्यांत यावी; व हत्याराच्या कायद्याची माफी करण्यांत यावी असें मागण्यांत आलें. वर्तमानपत्रांसंबंधीं असलेला कायदा फार त्रासाचा व जुलमांचा असल्यामुळें तो रद्द करण्यांत यावा अशीही विनंति करण्यांत आली; युद्धाचा शेवट होईपर्यंत लॉर्ड हार्डिंज यांची मुदत वाढावी अशी एक विनंति करण्यांत आली.

याप्रमाणें या तीस वर्षांच्या कालांतील ठळक मागण्यांचा आम्हीं नुसता निर्देश केला आहे. व त्यावरून सुराज्याच्या व्याप्तीची कल्पना येईल. त्याच्या उपयुक्ततेबद्दल विस्तार करणें अशक्य आहे. स्थलमर्यादेमुळें आम्हांस तसें करितां येत नाहीं याबद्दल दिलगिरी वाटते. दुधाची तहान ताकावर भागत नाहीं हें लक्षांत ठेवून, व सर हेन्री कँबेल बॅनरमन यानीं म्हटल्याप्रमाणें सुराज्यानें स्वराज्याची जागा भरून येत नाहीं या तत्वाचा अनुवाद करून राष्ट्रीय सभेनें कसकसे प्रयत्न केले आहेत याबद्दल वर उल्लेख आलाच आहे.

राष्ट्रीय सभेच्या सर्वच बैठकींबद्दल सारखाच उत्साह दिसून येत होता, हें म्हणणें चुकीचें होईल. संसारामध्यें प्रत्येक दिवस हौसेचा, सणाचा किंवा विशेष महत्त्वाचा असतो असा मुळींच अनुभव नाहीं. सन्माननीय पाहुणे आले, साधु, संत घरीं आले, तर तो दिवस सणासारखा आपण

साजरा करतों. घरांत मंगलकार्य असलें, मोठा लाभ झाला, यशःप्राप्ति झाली, तर त्या प्रसंगीं मोठा उत्साह दिसून येतो. कुटुंबावर संकट ओढवलें, तर अस्वस्थता दिसून येते; कुटुंबांत भांडणें सुरू झालीं, वांटणीची वाटाघाट चालू झाली, म्हणजे अंतःकलह व मनःसंताप उत्पन्न होतो. एरवींच्या सर्व प्रसंगीं प्रपंचाचा गाडा धोपट मार्गानें चाललेला असतो, व त्यांत कांहीं कुतूहलही असत नाहीं. राष्ट्रीय सभेसारख्या विश्वप्रपंचाची हीच तऱ्हा आहे. पहिलीं चार वर्षें संसाराची स्थापना करून त्याची जुळवाजुळव व स्थिरस्थावर करण्यांत व जम बसविण्यांत गेलीं. १८८९ सालीं ब्रॅडलॉसाहेबांच्या आगमनानें अपूर्व उत्साह दिसून आला. १८९० सालीं सरकारी नोकरांनीं राष्ट्रीय सभेस जाण्यासंबंधीं चाललेल्या वांटाघांटीमुळें सभेच्या बैठकीस कलकत्त्यास मेथासाहेब अध्यक्ष असतांना फार महत्व आलें होतें. १८९३ सालीं लाहोरास दादाभाई नौरोजी अध्यक्ष होते. पार्लमेंटांतील निवडणुकींत त्यांस यशःप्राप्ति झाली होती व त्यामुळें त्यांचें अभिनंदन करण्याकरितां पुष्कळ लोक जमले होते ही सभा फार थाटाची झाली. १८९५ सालीं सामाजिक परिषदेस मंडप देण्याच्या संबंधानें पुणेंकरांनीं उत्पन्न केलेल्या बखेड्यानें राष्ट्रीय सभेबद्दल देशांत चर्चा झाली होती. बैठकीबद्दल सर्वत्र काळजी उत्पन्न झाली होती. परंतु न्यायमूर्ति रानड्यांच्या मुत्सद्देगिरीमुळें शेवट गोड झाला; या सभेचें अधिवेशन सर्वांगसुंदर झालें. १९०५ सालीं बंगालच्या फाळणीमुळें देशांत अस्वस्थता उत्पन्न झाली होती. फुल्लरशाहींतील जुलमाचा प्रतिकार करण्याकरितां ना. गोखले, राष्ट्रीय सभेच्या वतीनें विलायतेस गेले होते. त्यांची कामगिरी फार यशस्वी झाली होती व त्यांचें अभिनंदन करण्याकरितां व गुणग्राहकता व्यक्त करण्याकरितां पुष्कळ लोक मोठ्या उल्हासानें या सभेस आले होते. भागीरथीच्या पवित्र तीरावर काशीक्षेत्रांत गोपाळरावांसारख्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं भरलेल्या सभेची शोभा फार अपूर्व होती. १९०६ सालीं कलकत्त्यास भरलेल्या राष्ट्रीय सभेची बैठक त्या सालीं

उत्पन्न झालेल्या पक्षभेदामुळें फार चळवळीची होती. यापूर्वींच देशांतील अंतःकलहास प्रारंभ झाला असल्यामुळें, चिंता, काळजी, उताविळपणा या योगानें ही बैठकही संस्मरणीय झाली.

## यशःप्राप्ति.

कोणतीही संस्था अस्तित्वांत आली म्हणजे तिची संभावना उपहास, निंदा, विरोध या प्रकारांनीं केली जाते. या नूतन संस्थेस स्थैर्य आलें म्हणजे बराच काळपर्यंत तिजबद्दल उदासीनता आढळून येते. अशा संस्थेंत कर्तृत्वशक्ति जसजशी वाढत जाते तसतशी सहानुभूति उत्पन्न होत जाऊन प्रतिष्ठा व मान्यता प्राप्त होण्यास सुरुवात होते. राष्ट्रीय सभेसही याच स्थित्यंतरांतून जावें लागलें आहे. प्रथमतः ही सभा क्षणभंगुर आहे असा उपहास करण्यांत आला. ही अराजनिष्ठ आहे असे भलतेच आरोप करण्यांत आले. सर ऑकलंड कॉलव्हीनसारख्या अंमलदाराच्या दुराग्रहामुळें राष्ट्रीय सभेच्या मंडपास जागा मिळण्याची सुद्धां एक वेळ अलाहाबादेस पंचाईत पडली होती व दरभंग्याच्या देशाभिमानी महाराजानीं यासाठीं मुद्दाम इमारत खरेदी करून ही अडचण दूर केली. राष्ट्रीय सभेस उत्क्रांतीच्या पहिल्या स्थितींतून पार पडण्यास पांच वर्षें लागलीं. लॉर्ड लॅन्सडौन यानीं राष्ट्रीय सभा ही कायदेशीर संस्था आहे असें जाहिर केल्यापासून सुमारें १५ वर्षांचा काल औदासीन्यांत गेला. १९०५ नंतरचा काल कर्तबगारीचा व उत्साहाचा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. १९०६ सालीं लिबरल प्रधानमंडळ अधिकारारूढ झाल्यापासून हिंदुस्थानच्या पुष्कळ आकांक्षा सफल होतील अशी आशा दिसूं लागली आहे. मनुष्याच्या नैसर्गिक वाढीमध्यें ज्याप्रमाणें रोग, आपत्ति, सांथी यांच्या अडचणी सोसाव्या लागतात तसेंच राष्ट्राच्या वाढींत अत्याचारासारख्या अरिष्टापासूनही दुःख भोगावें लागत आहे. सुखदुःखांचें हें संमिश्रण सृष्टिनियमाला अनुसरूनच आहे. परंतु १९०५ नंतर स्वराज्यासंबंधीं चालू झालेल्या चळवळीपासून देशाची झालेली प्रगति पाहतां कोणासही भविष्य कालाबद्दल आशा व उमेद वाटल्यावांचून

राहणार नाहीं. राष्ट्रीय सभेस या ३० वर्षांच्या कालांत किती यशःप्राप्ति संपादन करितां आली व तिनें कोणतें कार्य घडवून आणलें हें मनन करण्यासारखें आहे. बंगालचे चीफ जास्टिस सर रिचर्ड गार्थ यांच्यासारख्या त्रयस्थ व कॉंझरव्हेटिव पक्षाच्या गृहस्थानीं दिलेला अभिप्राय खरोखर आदरणीय आहे.

'I will tell you what they (Congress) have done. They have dared to think for themselves; and not only for themselves but for millions of poor ignorant people, who compose our Indian Empire. They have been content to sacrifice their own interest and to brave the displeasure of Government in order to lend a helping hand to those poor people. They have had the courage and the patriotism to denounce abuses, which have disgraced our Indian rule for years past, which have been condemned in India and in England and to which the Indian Government appears to cling with a tenacity, which seems utterly inexplicable. They have dared to propose reforms, which, despite the resistance of the Government, have been approved by Parliament and to endeavour to stay that fearful amount of extravagance, which has been going on in India for years past and has been the means, as some of our wisest councillors consider, of bringing our Eastern Empire to the verge of bankruptcy.'

'राष्ट्रीय सभेच्या योगानें सुशिक्षित लोकांस आत्मज्ञान झालें; आपल्या लक्षावधि देशबांधवांकरितां विचार करण्याची पात्रता त्यांचे अंगीं आली; सरकारच्या अवकृपेस न भितां, स्वतःचें नुकसान सोसून, गरीबांस ते मदत करूं लागले; राज्यकारभारांतील अन्यायाचा ते धैर्यानें व देशभक्तीनें निषेध करूं लागले; सरकारच्या इच्छेविरुद्धही राज्यव्यवस्थेंतील सुधारणेचें त्यांनीं जोरानें प्रतिपादन केलें आहे; हिंदुस्थानसरकारास भिकेस लावणाऱ्या अवाढव्य खर्चास आळा घालण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे.' वरील विचार किती समर्पक आहेत हें सांगण्याची अवश्यकता नाहीं. सुराज्याबद्दल व स्वराज्याबद्दल राष्ट्रीयसभेनें शेंकडो मागण्या आजपर्यंत केल्या व त्यांच्यापैकीं कित्येक महत्त्वाच्या मागण्या

सरकारानीं मान्य केल्या आहेत; या मागणीला आलेल्या यशावरून भविष्यकाळ निराशेचा नाहीं असा भरंवसा वाटत आहे. सफल झालेल्या मागण्यांपैकीं कांहीं प्रमुख मागण्यांचा निर्देश करणें अवश्य आहे.

( १ ) राष्ट्रीय सभेच्या मागणीप्रमाणें संयुक्त प्रांत, पंजाब, आसाम व मध्यप्रांत या ठिकाणीं कायदेकौन्सिलें अस्तित्वांत आणिलीं आहेत.

( २ ) वरिष्ठ कायदेकौन्सिलांत बिन सरकारी व लोकनियुक्त सभासदांची संख्या वाढविण्यांत आली आहे.

( ३ ) बंगालच्या कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासदांचें संख्याधिक्य स्थापन केलें आहे.

( ४ ) इतर प्रांतांतून बिन सरकारी सभासदांची संख्या सरकारी सभासदांपेक्षां अधिक करण्यांत आली आहे.

( ५ ) पूरक प्रश्न विचारण्याची सवलत (Supplimentary questions) ठेवण्यांत आली आहे.

( ६ ) लोकहिताच्या प्रश्नांची चर्चा ठराव कौन्सिलांत आणून करण्याची मुभा मिळाली आहे.

( ७ ) बजेटाच्या बाबतींत मतभेद निश्चित करण्याचा ( dividing on financial matters ) कौन्सिलांतील सभासदांस हक्क प्राप्त झाला आहे.

( ८ ) हिंदुस्थानसरकारच्या व मुंबई, मद्रास, बंगाल व बहार येथील कार्यकारी कौन्सिलांत एतद्देशीय सभासद नेमण्याचा आरंभ झाला आहे.

( ९ ) सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचे कौन्सिलांत दोन हिंदी गृहस्थांस नेमण्यांत आलें आहे.

( १० ) हे सभासद निवडणुकीच्या तत्त्वानें पसंत करण्यांत यावेत हें मागणें लॉर्ड क्र्यू यांच्या बिलानें मान्य केलें आहे.

( ११ ) संयुक्त प्रांतास कार्यकारी कौन्सिल देण्याची सूचना वरिष्ठ सरकार व सेक्रेटरी ऑफ स्टेट यांस पसंत आहे.

( १२ ) प्रीव्ही कौन्सिलांत हिंदी गृहस्थाची नेमणूक झाली आहे.

( १३ ) वज्रलेप झालेली बंगालची फाळणी रद्द करून सर्व बंगाली लोकांचा एकाच अमलाखालीं समावेश करण्यांत आला आहे.

( १४ ) वसहातींसंबंधीं व विशेषतः दक्षिण अफ्रिकेंतील मुदतबंदीच्या मजुरांच्यासंबंधीं व वसाहतींत स्थाईक झालेल्या हिंदी लोकांच्यासंबंधीं वसाहतींतील सरकारनें केलेल्या कायद्यांची निर्घृणता सौम्य झाली आहे व देशत्याग करून पोटाच्या विवंचनेसाठीं परदेशीं गेलेल्या हिंदी लोकांना स्वाभिमानानें रचितार्थ चालवितां येईल अशी परिस्थिति घडवून आणणाऱ्या स्वावलंबनाच्या प्रयत्नास सरकारनें संपूर्णपणें सहाय्य केलें आहे.

( १५ ) मुदतबंदीची पद्धत अत्यंत निंद्य व गुलामगिरीच्या स्वरूपाची असल्यामुळें ती सर्वस्वी बंद करण्यांत यावी ही राष्ट्रीय सभेची मागणी हिंदुस्थानसरकारानें मान्य केली आहे.

( १६ ) शिक्षणाच्या बाबतींत सरकारचें धोरण उदार बुद्धीचें दिसून आलें आहे.

( १७ ) प्राथमिक शिक्षण मोफत करण्याचा क्रम सुरू झाला आहे.

( १८ ) दिल्ली दरबारच्या वेळच्या दरसालच्या ५० लक्षांच्या देणगीनें वरिष्ठ शिक्षणास उत्तेजन मिळालें आहे.

( १९ ) विश्वविद्यालयांनीं नुसत्या परीक्षेचेंच काम न करितां शिकविण्यास ऊर्फ विद्यादान करण्यास ( teaching ); प्रारंभ केला आहे, डाका व नागपूर येथें शिकविणारीं विश्वविद्यालयें स्थापण्याचा सरकारचा निश्चय झाला आहे.

( २० ) धंदेशिक्षणाकरितां १० शिष्यवृत्ति निर्माण करण्यांत आल्या आहेत.

( २१ ) अधिकारविभागणीचें कमिशन नेमून, लोकलबोर्ड व म्युनिसिपालिट्या यांचे अधिकार वाढविण्याचे प्रयत्नास आरंभ झाला आहे.

म्युनिसिपालिट्यांतून लोकनियुक्त अध्यक्ष नेमण्यांत येत आहेत. डिस्ट्रिक्ट-बोर्डांचे अध्यक्ष लोकनियुक्त नेमण्याचा उपक्रम सुरू झाला आहे.

( २२ ) जिल्हाधिकाऱ्यांना सल्ला देणारी मंडळी अस्तित्वांत आणण्याचें तत्त्व मान्य होऊन मुंबई इलाख्यांत जिल्हादरबारची संस्था स्थापन झाली आहे.

( २३ ) आरोग्य व इतर बाबतींसंबंधीं सरकारकडून स्थानिक संस्थांना मोठ्या प्रमाणावर मदत मिळूं लागली आहे.

( २४ ) अबकारीच्यासंबंधीं मादक पदार्थांवर कर वाढवून दारूच्या व्यसनास आळा घालण्याचा व दारूचे गुत्ते बंद करण्याचा व स्थानिक मतास ( Local option ) मान देऊन या गुत्त्यांचें नियंत्रण करण्याचा प्रारंभ झाला आहे.

( २५ ) जंगलसंबंधीं लोकांच्या पुष्कळ तक्रारी विचारांत घेऊन सवलती देण्यांत आल्या आहेत.

( २६ ) मिठावरील कर कमी केला आहे.

( २७ ) प्राप्तीवरील कराची किमान मर्यादा एक हजार रुपये ठरविण्यांत आली आहे.

( २८ ) तारांचें हांशील कमी झालें आहे.

( २९ ) रुप्याच्या आयातीवरील जकात उठविण्यांत आली आहे.

( ३० ) सरकारच्या संमतीनें लष्करांत चालू असलेल्या अनीतीच्या संस्था बंद करण्यांत आल्या आहेत.

( ३१ ) इंग्लंड व हिंदुस्थान यांमधील खर्चाच्या गैरशिस्त विभागणीसंबंधीं वेल्बी कामिशन नेमण्यांत येऊन कांहीं बाबतींत हिंदुस्थानावरील खर्चाचें ओझें कमी करण्यांत आलें आहे.

( ३२ ) पोलीसखात्यांतील दुय्यम प्रतीच्या जागांसंबंधीं राष्ट्रीय सभेच्या मागणीप्रमाणें सुधारणा करण्यांत आली आहे.

( ३३ ) लष्करी खात्यांतील कमिशनें एतद्देशीय लोकांस देण्यास प्रारंभ झाला आहे.

( ३४ ) लढाईमध्यें बहादुरी करण्याबद्दल व्हिक्टोरिया क्रॉसचीं बहुमानाचीं पदकें एतद्देशीय शिपायांस देण्यांत येत आहेत.

( ३५ ) वाकफचा कायदा अमलांत आला आहे.

( ३६ ) महर्घतेच्या कारणांचा विचार करण्याकरितां कमिटी नेमण्यांत आली आहे.

( ३७ ) दुष्काळाच्या वेळीं सरकारचें धोरण औदार्याचें दिसून आलें आहे.

( ३८ ) दुष्काळनिवारणार्थ स्थापिलेल्या फंडाची ट्रस्टी नेमून योग्य व्यवस्था झाली आहे.

( ३९ ) शेतकीखात्याची सुधारणा, पतपेढ्यांची स्थापना, शेतकीच्या बँका व सहकारी चळवळ यांस जोराचें प्रोत्साहन सरकारनें दिलें आहे.

( ४० ) वरिष्ठ प्रतीच्या नोकऱ्यांसंबंधीं एतद्देशीय लोकांचा अशा नोकऱ्यांत आधिक प्रवेश व्हावा या हेतूनें पब्लिक सर्व्हिस कमिशन नेमण्यांत आलें आहे.

( ४१ ) सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेची वयोमर्यादा १९ ची तेवीस केली आहे.

कार्यकारी कौन्सिलांत निदान एक तरी एतद्देशीय सभासद असावा असें १८९८ सालीं मागण्यांत आलें. हा ठराव मद्रासचे व्ही. कृष्णस्वामी अय्यर यांनीं सभेपुढें मांडला. ना. व्ही. कृष्णस्वामी यांसच मद्रासचे कार्यकारी कौन्सिलर नेमण्यांत आलें. हा योगायोग लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

वरील सर्व मागण्या राष्ट्रीय सभेनें वेळोवेळीं केल्या होत्या व त्याच सरकारनें योग्य समजून दिल्या आहेत; त्याचप्रमाणें कित्येक प्रश्नांबद्दल सरकारचें धारण राष्ट्रीय सभेच्या मागणीस अनुसरूनच अंगिकारलें जात आहे. न्याय व अंमलबजावणी हीं खातीं निरनिराळीं करण्याचें तत्व निर्विवादपणें कबूल होऊन खर्चाच्या सबबीवर फक्त मागें पडलें आहे.

प्राथमिक शिक्षणाचें तत्त्वही सरकारनें अंगिकारलें आहे. लष्करी खर्चाच्या बाबतींतील राष्ट्रीय सभेनें सुचविलेलें धोरणही मान्य झालें आहे व वैद्यकी खात्यासंबंधीं राष्ट्रीय सभेचे मागणीप्रमाणें लॉर्ड मोर्ले यानीं आपल्या खालेत्यांत सुधारणा सुचविली आहे. लॉर्ड हार्डिंज यानीं आपल्या थोर व उदार स्वभावास अनुसरून प्रांतिक स्वराज्याचें ध्येय व्यवहार्य आहे असें प्रतिपादन केलें आहे. ब्युरॉक्रसींतील लोकांनीं हिंदी प्रजा आपली नोकर नसून आपण त्या प्रजेचे नोकर आहों ही नामाभिधानाप्रमाणें ( (public service) अन्वर्थक भावना सदैव लक्षांत ठेवावी असा इषारा व्हाइसरायानीं दिला आहे.

राष्ट्रीय सभेचें सर्वच मागणें आजमितीस मान्य झालें अथवा होणार आहे असें कोणीच म्हणणार नाहीं. राष्ट्रीय सभेसंबंधीं लोकांनीं केलेल्या प्रयत्नाच्या, स्वार्थत्यागाच्या, चळवळीच्या व्यापकतेच्या, उत्साहाच्या व खऱ्या तळमळीच्या मानानें यशःप्राप्ति झाली आहे कीं नाहीं, एवढेंच निर्विकारमनानें कोणींही पाहिल्यास सनदशीर चळवळीबद्दल निराश होण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. येथील लोकसंख्येच्या, नफानुकसानीच्या, विरोधाच्या व प्रतिपक्षाच्या सामर्थ्याच्या मानानें तीस वर्षांचा काळ देशोन्नतीच्या कामीं म्हणण्यासारखा आहे किंवा या काळांत झालेल्या इष्टापत्तीनें भविष्यकाळाबद्दल विषण्णमनस्क होण्याचें कारण आहे असें कोणत्याही समंजस मनुष्यास म्हणतां येणार नाहीं. दरसाल तीन दिवस याप्रमाणें तीस वर्षांच्या राष्ट्रीय सभेच्या बैठकींचा आजपर्यंतचा हिशेब केल्यास अवघें तीन महिन्यांचें सुद्धां काम होत नाहीं. या कामाच्या मानानें देशांतील झालेली राजकीय प्रगति निःसंशय उत्साहजनक आहे व सनदशीर चळवळीस नांवें ठेवण्यास यत्किंचित्‌ही आधार नाहीं. जोंपर्यंत लोकांना राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेचें काम जत्रेंतील बाजाराप्रमाणें तीन दिवस करून समाधान वाटतें, जोंपर्यंत प्रांतिक सभेची बैठकसुद्धां दरसाल भरविण्याची जबाबदारी वाटत नाहीं, जोंपर्यंत राष्ट्रीय सभेचें कार्यालय किंवा तिच्या कामाची

परंपरा वर्षभर चालू ठेवण्याची अवश्यकता भासत नाहीं, जोंपर्यंत स्वार्थ-त्याग करून रात्रंदिवस राजकीय चळवळीचा प्रसार करण्याकरितां देशांतील तरुण उल्हासानें पुढें येत नाहींत, जोंपर्यंत देशांतील बुद्धिमान् लोक आयुष्याचा उत्कृष्ट भाग द्रव्यार्जनाकरितां खर्च करून फुरसतीचे वेळीं राजकारणांत मन घालीत आहेत, तोंपर्यंत राजकीय चळवळीस दोष देणें किंवा तिला 'भिक्षांदेही' म्हणून तिचा उपहास करणें कितपत शहाणपणाचें आहे?

## कंठाळी ठराव

राष्ट्रीय सभेच्या अस्तित्वापासून कांहीं मागण्या इतक्या निश्चित स्वरूपाच्या व इतक्या जरूरीच्या होत्या कीं, साल दरसालच्या बैठकींत त्यांचा ऊहापोह होत असे, व दरवर्षी कंठाळी ठरावाच्या स्वरूपानें त्या राष्ट्रीय सभेपुढें मांडल्या जात. या ३० वर्षांच्या कालांत या सदराखालीं येणाऱ्या ३ प्रकारच्या मागण्यांबद्दल राष्ट्रीय सभेची आजपर्यंतची चळवळ अरण्यरुदनाप्रमाणें निष्फळ झाली आहे. (१) सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा समकालीन या देशांत सुरू व्हावी, सिव्हिलसर्व्हिसखेरीज इतर खात्यांतील सुद्धां वरिष्ठ प्रतीच्या जागा या देशांत परीक्षा घेऊन भरण्यांत याव्या; सारांश अधिकाराचा जो मक्ता अँग्लो-इंडियन लोकांचे हातीं आहे, तो नाहींसा होऊन कोणताही निर्बंध न ठेवितां लायकीच्या तत्त्वावर या जागा भरण्यांत याव्या. या प्रश्नास तादृश यश आजपर्यंत आलेलें नाहीं, याचें कारण ब्यूरॉक्रसीचा विरोध हें होय. अँग्लो-इंडियन लोकांच्या पोटापाण्याचा हा प्रश्न आहे, व शक्य तितका अडथळा ते या मागणीस करीत आहेत. दुसरा प्रश्न औद्योगिक उन्नतीसंबंधीं आहे. देशांतील लक्षावधि लोकांची उपासमार होत असतांना, व कोट्यावधि रुपयांचा कच्चा माल येथून परदेशांत जात असतांना, उद्योगधंद्याची वाण या देशांतील लोकांस पडावी हें लांच्छनास्पद आहे. उद्योगधंद्याचें व कलाकौशल्याचें ज्ञान येथील लोकांस देऊन हिंदुस्थानची सांपत्तिक

स्थिति सुधारणें सरकारास मुळींच अशक्य नाहीं. यांत इंग्लंडच्याही नफानुकसानीची बाबत नाहीं. चालू महायुद्धामुळें हिंदुस्थानचें औद्योगिक पारतंत्र्य किती आहे, व इंग्लंडखेरीज युरोपांतील इतर राष्ट्रांवर आयात व निर्गत मालासाठीं या देशास पराधीनपणामुळें किती अवलंबून रहावें लागत आहे याचा स्पष्ट अनुभव आतां आला आहे. या अनुभवाचा फायदा घेऊन शांतता स्थापन झाल्यानंतर या बाबतींत सुधारणा होईल, व साम्राज्यसरकार मनोभावानें उद्योगधंद्यांची वाढ या देशांत करण्याचा प्रयत्न करील अशी उमेद आहे. तिसरा प्रश्न हत्याराच्या परवानगीचा, लष्करीशिक्षणाचा,लष्करांतील हुद्यांच्या जागांचा, व स्वयंसैनिक होण्याच्या-बाबतीचा आहे. हिंदुस्थानांतील लोकांस लष्करी शिक्षण दिलें, त्यांना स्वयंसैनिक होण्याची परवानगी दिली, हत्यारें वापरण्याची मुभा ठेविली, तर परचक्रासारख्या संकटाचे वेळीं अथवा चालू युद्धासारख्या युद्धांच्या वेळीं साम्राज्यास हिंदुस्थानापासून फार मदत होईल अशी विनंति तीस वर्षांपूर्वीं राष्ट्रीय सभेनें आकंठरवानें केली होती. विश्वासाचें धोरण ठेऊन मुत्सद्देगिरीनें, शहाणपणानें व दूरदर्शिपणानें या बाबतींत सरकारानें वर्तन आजवर ठेविलें असतें तर हल्लींच्या प्रचंड युद्धांत एकाच जर्मनीस काय परंतु असल्या दहा बलाढ्य राष्ट्रांसही ब्रिटिश सरकारास हिंमतीनें तोंड देतां आलें असतें, व कोणत्याही प्रकारची काळजी बाळगण्याचें प्रयोजन उरलें नसतें. हिंदी शिपायांचें शौर्य, कर्तबगारी व साहस यांची साक्ष चालू युद्धांत सरकारास पटली आहे. प्रस्तुतच्या महायुद्धापासून सरकारनें योग्य बोध घेतल्यास कंठाळी ठरावांतून वरील दोन ठराव वगळण्याचा सुदिन राष्ट्रीय सभेस तावडतोब येईलच येईल यांत बिलकुल शंका नाहीं.

## राष्ट्रीय सभेपासून फायदे.

राष्ट्रीय सभेपासून कोणकोणते फायदे झाले हें सविस्तर नमूद करणें अवश्य आहे. देशांत राजकीय चैतन्य कसें उत्पन्न झालें व एकराष्ट्रीय-

त्वाची भावना कशी प्रादुर्भूत झाली हें आम्हीं विस्तारानें राष्ट्रीय सभेच्या उत्पत्तीची मीमांसा करतांना दाखविलें आहे. राष्ट्रीय सभा अस्तित्वांत आल्यानें कोणते फायदे झाले याची बरोबर कल्पना अभावानें, किंवा राष्ट्रीय सभा अस्तित्वांत नसती तर कोणची स्थिति आज दिसून आली असती त्याच्या कल्पनेनें स्पष्टपणें दिसून येणार आहे. राजकारणांत पड-णारा एक पुढारी वर्ग अस्तित्वांत आला आहे. निरनिराळ्या प्रांतांतून सार्वजनिक आयुष्यक्रमांत काम करणाऱ्या लोकांबद्दल, पुढारी या नात्यानें सर्व देशास आदर, प्रेम व अभिमान वाटत आहे. निरनिराळ्या राजकीय प्रश्नांबद्दल साधकबाधक प्रमाणांची सर्व माहिती फार व्यापक स्वरूपानें गोळा झाली आहे. ब्रिटिश राज्याच्या येथील राज्यव्यवस्थेच्या धोरणा-बद्दल अधिकृत माणसांचीं आश्वासनें व अभिवचनें सप्रमाण रीतीनें एकत्र केलीं आहेत. वादविवाद, वक्तृत्व, स्वमतस्थापन यांमध्यें पुष्कळांस प्रावीण्य संपादन करतां आलें आहे. डेप्युटेशनें, मुलाखती वगैरेंच्या प्रसंगानें, अध्यक्ष किंवा राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधि या नात्यानें उत्पन्न होणाऱ्या जबाबदारीमुळें हिंदी मुत्सद्देगिरीचा विस्तार व विकास होण्यास पुष्कळ अवसर मिळालेला आहे. पुष्कळ पुढारी त्यांच्या योग्यतेनें सरकारच्या आदरास प्राप्त झाले आहेत. परिस्थितीचें ज्ञान व हक्काची जाणीव यांमुळें स्वाभिमानाची वाढ झाली आहे. उदात्त ध्येयामुळें देशाभिमानाची वाढ होऊन त्यास उज्ज्वल स्वरूप प्राप्त झालें आहे. पुष्कळ मानधन पुढारी निर्माण होऊन करारानें, धैर्यानें व निस्पृहपणानें अन्यायाचा निषेध व आपल्या हक्कांचें समर्थन राजमान्यपणानें करीत आहेत. राष्ट्रीय सभेमुळें ही जी देशांतील स्वोन्नतीच्या मार्गांची ज्ञानवृद्धि झाली आहे व पुढा-ऱ्यांच्या स्वार्थत्यागामुळें जनसमूहाची दानत वाढली आहे त्यांचा देशांतील उन्नतीच्या कामीं अपूर्वच लाभ समजला पाहिजे. एखाद्या जुलमी संस्थानांत प्रजेच्या ठिकाणीं किती दुबळेपणा, अन्यायाच्या प्रतिकाराबद्दल हताशपणा, मानसिक दौर्बल्य, नैतिक अवनति, दिसून येते, याचा विचार केला असतां, व याच्या उलट साम्राज्य सरकारच्या

प्रतिनिधीसमोरसुद्धां—मग तो कितीही अरेराव किंवा बलाढ्य असला तरी-अन्यायाचा निषेध करण्याचे कामीं, उघड दरबारांत, ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोक कसे कचरत नाहींत ही गोष्ट पाहिली असतां या गुणांची थोरवी लक्षांत येईल. अन्यायाबद्दल जुलमी संस्थानांत प्रजेस ब्र काढण्याचीसुद्धां प्राज्ञा नसते, मग हक्कांचा उल्लेख करणें तर लांबच राहिलें. राष्ट्रीय सभा नसती तर अनियंत्रित सत्तेपासून उत्पन्न होणाऱ्या अधोगतीमुळें ब्रिटिश इंडियांतही हीच स्थिति आढळून आली असती. परंतु संवयीच्या, समवायाच्या, शिक्षणाच्या योगानें, राष्ट्रीय सभेच्या परंपरेपासून वृद्धिंगत होणाऱ्या सामर्थ्यामुळें व पुढारी लोकांच्या स्वार्थत्यागामुळें देशांतील लोकांत धैर्य, करारीपणा व तेजस्वीपणा उत्पन्न झाला आहे. राष्ट्रोन्नतीच्या कामीं हे गुण किती बिनमोल आहेत हें सांगण्याची अवश्यकता नाहीं. ही स्वार्थत्यागाची तयारी व स्वावलंबनाची स्फूर्ति राजकीय चळवळीपासूनच उत्पन्न झाली आहेत. मि. ह्यूम यानीं एके ठिकाणीं खालीलप्रमाणें उद्गार काढिले आहेत.

'You have heard it said that
They would be free
Themselves must strike the blow
But I say to you
They would be free
Must first deserve to be so.'

वरील अवतरणांत सूचित केलेलें तत्त्व या बाबतींत निरंतर ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. शिक्षणाच्यायोगानें व्यक्तिविषयक गुणांच्या उन्नतीची सीमा आपल्या देशांत इतर कोणत्याही राष्ट्रांतील सीमेबरोबर पोहोंचली आहे. शिक्षणाच्या संस्कारामुळें व उपलब्ध असलेल्या सवलतींच्यायोगानें प्रामाणिकपणा, कर्तबगारी, श्रमसाहिष्णुता, स्वाभिमान, सचोटी या वैयक्तिक गुणांचा आपल्या देशांत पुष्कळ विकास झाला आहे. परंतु सार्वजनिक आयुष्यक्रमांत ( public life ) आपला काळ फार थोडा गेला असल्यामुळें सार्वजनिक कर्तव्याच्या जबाबदारीची जाणीव जितकी व्हावी तितकी झालेली नाहीं. अद्यापि आपल्यामध्यें

सहनशीलता, दीर्घ प्रयत्नांची इच्छा, चिकाटी, चिवटपणा, प्रसंगानुसार लवचिकपणा, अडचणी व संकटांमुळें हताश न होण्याची संवय, दुसऱ्याच्या हेतू व अडचणींबद्दल योग्य आकलन, परमतसहिष्णुता, हे गुण यावयाचे आहेत. हेवा व असूया या दोषांमुळें सार्वजनिक चारित्र्याची शुद्धि झालेली नाहीं. या बाबतींत एका गृहस्थानें काढलेले उद्गार नित्यप्रत्ययाचे आहेत.

'In a Western country when a man shows signs of any extraordinary talent in any distinction, the whole community rushes in to push him up. But in India the general tendency is to pull him down.'

सार्वजनिक आयुष्यक्रमाची जसजशी वाढ होईल, जबाबदारीची व कर्तव्याची भावना जसजशी तीव्र होईल, त्याप्रमाणें सार्वजनिक आयुष्यक्रमही अभिमानास्पद होईल अशी आम्हांस उमेद आहे.

## सामाजिक सुधारणा.

राष्ट्रीय सभेच्या निमित्तानें जमणाऱ्या सुशिक्षित पुढाऱ्यांनीं हळू हळू सामाजिक विषयाबद्दलही वाटाघाट करण्यास सुरुवात करावी हें साहजिक आहे व त्यामुळेंच सामाजिक सुधारणेच्या प्रश्नाबद्दल विचार करण्याकरितां राष्ट्रीय सभेबरोबरच सामाजिक परिषेदचीं अधिवशनें होऊं लागलीं. सामाजिक व नैतिक सुधारणेस यामुळें फार प्रोत्साहन मिळालें. देशांतील ऐक्यभाव वाढण्यास व निरनिराळ्या पुढाऱ्यांमध्यें बंधुप्रेम उत्पन्न होण्यास या संस्थेचा उपयोग झाला. राष्ट्रीय सभेच्या या भावंडामुळें सरकारी व बिनसरकारी हिंदुस्थानांतील देशहितचिंतकांस एकत्र जमण्याची संधि मिळाली. राज्यकारभाराचा आपला अनुभव आपल्या इतर देशबांधवांस या प्रसंगानें निवेदन करण्यास सहाय्य झालें. या कामीं प० न्यायमूर्ति माधवरावजी रानडे यांचे देशावर महत् उपकार झाले आहेत. राष्ट्रीय सभेच्या बैठकीमुळेंच, औद्योगिक उन्नतीबद्दलचा विचार एकत्र जमून करण्याची संधि देशांतील पुढाऱ्यांस अनायासें मिळाली. उद्योगधंद्यांची वाढ, त्यांतील अडचणी, सांपत्तिक स्थिति, चलनपद्धति, धंदेशिक्षण, त्याच्या प्रस्तुत अस्तित्वांत असलेल्या सोयी व त्या वाढविण्याची

अवश्यकता इत्यादि देशाच्या उत्कर्षास अवश्य असणाऱ्या प्रश्नांचा खल औद्योगिक परिषदेंत होऊं लागला. नामदार मुधोळकर यांच्या परिश्रमानें हें राष्ट्रीय सभेचें तिसरें भावंड सुदृढ व चिरायु होत आहे. त्याचप्रमाणें धार्मिक प्रश्नांचीही चर्चा राष्ट्रीय सभेच्या बैठकीचा फायदा घेऊन समवायानें करण्याचा प्रघात सुरू झाला आहे. देशांतील पुढाऱ्यांमध्यें सामाजिक, औद्योगिक, धार्मिक व आध्यात्मिक बाबतींत व्यक्तिविषयक जसजशी स्फूर्ति असेल, तसतशी एकवाक्यता होत आहे व एकराष्ट्रीयत्वाच्या व बंधुप्रेमाच्या कल्पना या व अन्य अनेक संमेलनांनीं व त्यांच्या अधिवेशनांनीं वृद्धिंगत होत आहेत. राष्ट्रीय सभेचेच हे सर्व आनुषंगिक फायदे आहेत. राजकीय चळवळीच्या मुशींतूनच स्वदेशीची कल्पना तावून निघाली आहे. राजकीय चळवळीच्या अनुभवानेंच **स्वावलंबना**ची स्फूर्ति उत्पन्न झाली आहे व तिचाच विकास **राष्ट्रीय शिक्षण व सहकारी चळवळ** या कल्पनांत दिसून येत आहे. याप्रमाणें राष्ट्रीय सभेमुळें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असे पुष्कळ फायदे नमूद करण्यासारखे झाले आहेत; परंतु स्थलसंकोचास्तव त्यांचा विस्तार करितां येत नाहीं. राष्ट्रीय सभा उत्पन्न झाल्यापासून तिच्या बैठकीच्या वेळीं तरुण व उत्साही लोक स्वयंसैनिकाचें (volunteers) काम आजपर्यंत करीत आले आहेत व राष्ट्रीय सभेची बैठक व्यवस्थेनें पार पाडण्याचें व प्रतिनिधींचें योग्य प्रकारें आदरातिथ्य करण्याचें पुष्कळ श्रेय त्यांचेकडेसच आहे. देशाकरितां थोडीशी झीज सोसण्याचें किंवा शरीर कष्टवून सेवा करण्याचें हें व्रत—पुष्कळ तरुणांनीं—दरसाल तीन दिवस कां होईना—करण्याचा उपक्रम चालू ठेविला आहे. ह्यूमसाहेबांनीं राष्ट्रीय सभेच्या उत्पत्तीपूर्वीच देशांतील सर्व तरुणांस देशकार्याकरितां अहर्निश वाहून घेण्याबद्दल फार कळकळीची विनंति केली होती. परंतु या विनंतीस देशांतील तरुण व होतकरू लोकांनीं इतक्या काळांतही द्यावा तसा मान दिलेला नाहीं ही अत्यंत दुर्दैवाची व खेदाची गोष्ट आहे. ह्यूमसाहेबांच्या बोधामृताप्रमाणें देशकार्यास सर्वस्वी वाहून घेण्याचा निश्चय सर्व हिंदुस्थानांत, कायावाचामनें-

करून, एकट्या गोपाळरावजी गोखल्यानींच केला व या उद्देशाच्या सिद्धीकरितांच ‘भारतसेवकसमाज’ (Servants of India society) अस्तित्वांत आणिला. या संस्थेस सुद्धां ह्यूम साहेबानीं ४० वर्षांपूर्वी सुचविल्याप्रमाणें आजसुद्धां अद्यापि ५० गृहस्थही मिळालेले नाहींत. देशोन्नतीची कळकळ, आस्था व स्वार्थत्यागाची तत्परता या राष्ट्रीय गुणांचा अजमाव या एका गोष्टीवरूनच होणार आहे. ३० कोटी लोकांच्या उन्नतीकरितां नुसत्या ५० सच काय परंतु ५० लक्ष लोकांची जरूरी आहे. या कामीं स्वार्थत्याग करणारीं व देशकार्याकरितां आपल्यास सर्वस्वी वाहून घेणारीं माणसें जसजशीं निर्माण होतील त्या त्या मानानें देशाचा हा प्रपंच स्वास्थ्याचा, आनंदाचा व अभ्युदयाचा होणार आहे हें कोणासही सांगावयास नको.

## राष्ट्रीय सभेची अवश्यकता.

सुधारलेलीं कौन्सिलें अस्तित्वांत आल्यापासून लोकहिताच्या प्रश्नांची चर्चा कौन्सिलांत करितां येते, सबब राष्ट्रीय सभेच्या अस्तित्वाची आतां जरूर नाहीं अशी एक सूचना सर व्हॅलेंटाईन चिरोल यानीं धूर्तपणानें केली आहे. सुशिक्षित वर्गाबद्दल चिरोल साहेब यांची कितपत सहानुभूति आहे हें सर्वविश्रुत आहे. त्याचप्रमाणें ही त्यांची सूचनाही खोडसाळपणाची आहे. सुधारलेल्या कौन्सिलांतून सुद्धां कित्येक प्रश्न वादविवादाकरितां आणतां येत नाहींत. परराष्ट्राशीं असलेलें राजकारण, लष्करी हालचाली, किंवा सार्वजनिक हितास अपाय होईल या सबबींवर दुसरे कित्येक प्रश्न चर्चेकरितां कौन्सिलांत आणण्याची मनाई आहे. परंतु राष्ट्रीय सभेस या प्रश्नांचा विचार करण्यास कोणतीही आडकाठी नाहीं. परराष्ट्रांच्या खलबतानें हिंदुस्थानचें नुकसान होण्यासारखें असल्यास राष्ट्रीय सभेस आपलें मत जोरानें प्रतिपादण्याचा अधिकार आहे. हिंदुस्थानचा पैसा मुलुखगिरीमध्यें निष्कारण खर्च होत असेल तर तो होऊं नये असें म्हणण्याचा, किंवा युद्धाचा प्रसंग सरकारनें आणूं नये असें सांगण्याचा

राष्ट्रीय सभेस हक्क आहे. ज्या बाबतींच्या चर्चेनें सार्वजनिक हितास धक्का बसेल असें सरकारास वाटेल त्याच बाबतींसंबंधानें उघडपणें वाटाघाट केली असतां सार्वजनिक हित होईल असाही मतभेद सरकार व प्रजा यांच्या दरम्यान होण्याचा संभव आहे. अशा प्रसंगीं लोकपक्षाची बाजू राष्ट्रीय सभेशिवाय सरकारपुढें ठेवण्यास दुसरा मार्ग नाहीं. कौन्सिलानें हें काम भागण्यासारखें नाहीं. कौन्सिलांतही ज्या ज्या प्रश्नांबद्दल लोकमताचा पराजय होईल किंवा न्याय मिळणार नाहीं अशा सर्व प्रश्नांबद्दल दाद मागण्यास राष्ट्रीय सभा हेंच मुख्य साधन आहे. पुष्कळ आणीबाणीच्या प्रसंगीं व बिकट परिस्थितींत राष्ट्रीय सभेसच महत्वाच्या राजकीय प्रश्नांबद्दल निश्चित मत देतां येईल व त्याचाच उपयोग कौन्सिलांत करितां येईल. सार्वजनिक प्रश्नांबद्दल साधक बाधकरीतीनें लोकमत तयार करण्यास राष्ट्रीय सभेशिवाय दुसरी जागा नाहीं. कोणत्याही प्रश्नांबद्दल राष्ट्रीय सभेमध्यें चर्चा होऊन लोकमत निश्चित झालें म्हणजे कौन्सिलांतील सभासदांसही आपल्या बाजूचें समर्थन करण्यास लोकमताच्या पाठिंब्यानें प्रोत्साहन मिळेल, तसेंच सर्व राजकीय प्रश्नांबद्दल व्यापकपणानें चर्चा करण्यास व तीही सर्व प्रांतांतील लोकांस मिळून करण्यास राष्ट्रीय सभेखेरीज दुसरें ठिकाण नाहीं. याच कारणांकरितां सुधारलेल्या कौन्सिलांतील लोकांच्या प्रतिनिधींचें काम यशस्वी होण्यास राष्ट्रीय सभेची अवश्यकता आहे. एतद्देशीय संस्थानांसंबंधीं कांहीं प्रश्नांची चर्चा राष्ट्रीय सभेनें केली आहे. संस्थानांतील मुद्रणस्वातंत्र्य मर्यादित करणाऱ्या हिंदुस्थान सरकाराच्या ठरावाबद्दल, राष्ट्रीयसभेनें निषेध प्रदर्शित केला आहे व कोणत्याही संस्थानिकास जुलमी राज्यकारभाराबद्दल गादीवरून काढावयाचें झाल्यास त्याबद्दल सरकार व संस्थानिक या उभयतांच्या आदरास पात्र झालेल्या अशा न्यायाच्या कोर्टांत चवकशी होऊन, अपराध स्थापन झाल्यानंतर त्या राजास गादीवरून काढण्यांत यावें असें राष्ट्रीयसभेनें सुचविलें आहे. अशा तऱ्हेची सूचना कौन्सिलांतून करितां येणें

अगदीं अशक्य आहे व तीं करण्यास राष्ट्रीय सभेशिवाय दुसरें गत्यंतर नाहीं. वरील सर्व कारणांचा विचार करितां राष्ट्रीय सभेच्या अस्तित्वाची देशास अत्यंत जरूरी आहे असें स्पष्ट दिसेल व त्यामुळें चिरोलसाहेबांचा मानभावी उपदेश देशांतील पुढाऱ्यांस मुळींच पटण्याचा संभव नाहीं.

## विलायतेंतील काम

राष्ट्रीय सभेच्या कामाची दिशा दोन प्रकारची आहे. एक इंग्लंडांत लोकमत जागृत करणें व दुसरी हिंदुस्थानांत राजकीय चळवळीचा फैलाव करणें ही होय. इंग्लंडांतील चळवळ तेथील कित्येक निरपेक्ष व वसुधैवकुटुंबक वृत्तीच्या लोकांनीं अकारण प्रेमामुळें आजवर चालविलेली आहे. या कार्यास प्रसिद्ध इंग्लिश मुत्सद्दी एडमंड बर्क यांचेपासून आरंभ झाला व त्यांच्यानंतर जॉन ब्राइट यांनीं १८४७ पासून १८८० पर्यंत पुष्कळ स्वरूप आणिलें. सर चार्लस वुड यांच्या इंडिया बिलास त्यांनीं जोरानें विरोध केला. हिंदुस्थानांतील बेजबाबदार राज्यव्यवस्थेबद्दल ते नेहमीं टीका करीत असत. येथील लोकांचें दारिद्र्य निवारण्याबद्दल, त्यांचेवरील कराचें ओझें कमी करण्याबद्दल, त्यांस हुद्याच्या जागीं नेमण्याबद्दल ब्राइटसाहेबांनीं पार्लमेंटचें लक्ष वेधलें होतें. जास्ती मुलूख संपादन करण्याची हांव न धरितां असलेल्या राज्याची उत्तम प्रकारानें, न्यायानें व्यवस्था करून प्रजेस संतुष्ट ठेवणें, हेंच इंग्लंडचें आद्य कर्तव्य आहे असें ते म्हणत. व राणीसरकारनीं प्रसिद्ध केलेला जाहिरनामा त्यांच्या सूचनेवरूनच लॉर्ड डर्बी यांनीं तयार केला असें आतां प्रसिद्ध झालें आहे. हिंदुस्थानच्या लोकांबद्दल कोणीही नालस्ती केल्यास ती आपणास यत्किंचितही खपणार नाहीं असें त्यांनीं बजावून सांगितलें होतें. हिंदुस्थानांतील असंख्यात व अशरण अशा विपन्न लोकांची आध्यात्मिक व नैतिक उन्नति करण्याबद्दल व त्यांस न्यायदृष्टीनें वागविण्याबद्दल त्यांनीं आपल्या देशबांधवांस वेळीं अवेळीं अनेकदां उपदेश केला आहे. ब्राइटसाहेबांनंतर प्रो. फॉसेट हेच हिंदुस्थानचे वाली होते व हिंदुस्थानचे प्रतिनिधी (mumber for India) असें त्यांस म्हणत असत. हिंदुस्थानांत समकालीन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा होण्याबद्दल त्यांनीं १८६८

मध्यें हाऊस ऑफ कॉमन्स पुढें ठराव आणला होता. १८७० मध्यें हिंदुस्थानच्या बजेटाची चर्चा अगदीं शेवटीं रिकाम्या बेंचापुढें कॉमन्ससभेमध्यें करण्याच्या फासाचा त्यानीं निषेध केला. त्यांच्या चळवळीमुळेंच १८७१ सालीं हिंदुस्थानच्या जमाखर्चाची तपासणी करण्याकरितां एक पार्लमेंटची कमिटी नेमण्यांत आली होती. १८७४ सालीं पार्लमेंटच्या निवडणूकींत फॉसेटसाहेबांचा पराजय झाला. या निवडणुकीच्या कामीं त्यांना मदत व्हावी म्हणून सुमारें ८००० रुपये या देशांतून पाठविण्यांत आले होते. १८७५ सालीं हिंदुस्थानच्या खर्चानें टर्कीच्या सुलतानला लॉर्ड सॅलिसबरी यांनीं दिलेल्या मजलसीबद्दल त्यानीं जोराचा विरोध केला. तसेंच ड्यूक ऑफ एडिंबरो यानीं हिंदी राजेरजवाडे यांस दिलेल्या देणग्यांचा खर्च हिंदुस्थानावर लादण्याचे बाबतींत त्यानीं हरकत घेतली. त्यांच्या वजनामुळेंच ॲबिसीनियन लढाईचा खर्च व प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या सफरीचा बोजा हिंदुस्थानावर कमी पडला; हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेची चवकशी करण्याबद्दल पार्लमेंटची कमिटी नेमण्याची सूचना फिरून १८७९ सालीं त्यांनीं केली होती.

हिंदुस्थानच्या प्रश्नांकडे कॉमन्स सभेच्या सभासदांचें लक्ष वेधण्याकारितां संस्था स्थापून तिच्या विद्यमानेंही हे प्रयत्न वेळोंवेळीं करण्यांत आले आहेत. १८५३ सालीं जॉन डिकिन्सन यांनीं 'इंडियन रिफार्म सोसायटी' या नांवची संस्था स्थापन केली होती. या संस्थेमार्फतच पुष्कळ माहिती गोळा करून ती पार्लमेंटच्या सभासदांस वांटण्यांत येत होती. याच सुमारास ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेची मुदत भरली असून तिला नवीन सनद देण्याचा प्रसंग आला होता. नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें कंपनीच्या राज्यकारभारासंबंधीं पार्लमेंटची कमिटी नेमून चवकशी व्हावी अशी या संस्थेची खटपट होती. परंतु तो योग आला नाहीं. कंपनीचा कारभार संपून राणीसरकारकडे १८५८ सालीं हिंदुस्थानची राज्यव्यवस्था आली. १८८३ सालीं जॉन ब्राइट यांनींही पार्लमेंटच्या सभासदांस हिंदुस्थानासंबंधीं माहिती पुरविण्यासाठीं एक कमिटी अस्तित्वांत आणिली

होती व तिचे ते अध्यक्ष होते. या कमिटीच्या प्रोत्साहनानें मि. जॉन स्लॅग यानीं हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची पार्लमेंटकडून चवकशी व्हावी म्हणून १८८५ सालीं कॉमन्स सभेंत एक सूचना आणिली व लॉर्ड रॅन्डॉल्फ चर्चिल यांनीं तिला अनुमोदन दिलें होतें. इतक्यांत लिबरलपक्ष अधिकारभ्रष्ट झाला व या सूचनेचा कांहीं उपयोग झाला नाहीं. १८८७ सालीं दादाभाई नवरोजी विलायतेस राहतच होते. उमेशचंद्र बानर्जी व मि. नॉर्टन यांच्या सहाय्यानें त्यानीं ब्रॅडलॉसाहेबांची सहानुभूति संपादन केली. ब्रॅडलॉसाहेब यांचें पार्लमेंटांत फार वजन होतें. हिंदुस्थानचा पक्ष अशा त्रयस्थ परंतु उदार मतवादी लोकनायकांकडून समर्थन झाल्यास देशाचें फार कल्याण होईल, अशी दादाभाईंची खात्री होती. ब्रॅडलॉ यांनां त्यांच्या कामांत मदत करण्यास उपयोगी पडावी म्हणून **इंडियन एजन्सी** म्हणून एक संस्था स्थापण्यांत आली. मि. डिग्बी हे या संस्थेचे सेक्रेटरी होते. तिसऱ्या राष्ट्रीय सभेच्या रिपोर्टांच्या दहा हजार प्रति इंग्लंडांत वांटण्यांत आल्या; बानर्जी, नॉर्टन आणि ब्रॅडलॉ यांनीं शेंकडों व्याख्यानें दिलीं. वर्तमानपत्रांतून हिंदुस्थानविषयक लेख प्रसिद्ध होऊं लागले. पार्लमेंटच्या सभासदांच्या मुलाखती यांनीं घेतल्या. ग्लॅडस्टन साहेबांची डिग्बी यांनीं भेट घेतली ब्रॅडलॉसाहेबांनीं कायदे कौन्सिलची सुधारणा करण्याबद्दलच्या एका बिलाचा मसुदा पार्लमेंट सभेंत सादर केला व यामुळें सरकारास या प्रश्नाकडे लक्ष देणें भाग पडलें व त्याचेंच फळ १८९२चा कौन्सिलच्या दुरुस्तीचा कायदा होय. इंडियन एजन्सी या संस्थेसच पुढें **ब्रिटिश कमिटी** ऑफ दि इंडियन नॅशनल कॉंग्रेस हें नांव देण्यांत आलें. या कमिटीचे सर वुईलीयम वेडर्नबर्न हे अध्यक्ष होते व आहेत. मि. केन, दादाभाई नवरोजी, मॅक्लेरन्, मि. एलीस, यूल श्वान, हरबर्ट रॉबर्ट्स, डॉ. क्लार्क व मार्टिन वुड हे सभासद होते. या कमिटीचे उद्देश राष्ट्रीय सभेच्या हेतूंचा प्रसार सर्व देशभर करावा, पार्लमेंटच्या सभासदांस हिंदुस्थानच्या संबंधीं माहिती पुरवावी, प्रधानमंडळास प्रश्न विचारावे, शक्य त्या मार्गांनीं कॉमन्स सभेचें लक्ष हिंदुस्थानच्या स्थितीकडे वेधावें हे होते.

17 JAN 1994

परंतु पार्लमेंटच्या बाहेर राहून हे हेतु सिद्धीस आणणें फार कठीण वाटूं लागलें. खुद्द पार्लमेंटच्या सभासदांमध्यें या बाबतींत जागृति उत्पन्न केल्याखेरीज व त्यांनींच या कामीं पुढाकार घेतल्याखेरीज कार्यभाग होणार नाहीं असें ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीच्या चालकांस आढळून आलें. १८९३ सालीं वेडर्नबर्न व केन यांनीं पुढाकार घेऊन **एक इंडियन पार्लमेंटरी** कमिटी स्थापन केली. पार्लमेंटचे १५४ सभासद या कमिटींत सामिल झाले. खुद्द पार्लमेंटांत इतके सभासद हिंदुस्थानच्या हिताकडे लक्ष देणारे मिळाल्यामुळें हिंदुस्थानसंबंधीं चालविलेली चळवळ यशस्वी होईल असें वाटूं लागलें. या देशाबद्दल सहानुभूति असलेले कॉमन्स सभेंत पुष्कळ सभासद होते; त्यांच्या मदतीनेंच २ जून १८९३ रोजीं समकालीन परीक्षेबद्दलचा ठराव कॉमन्स सभेंत मंजूर झाला. या पार्लमेंटरी कमिटीच्या वजनामुळेंच सर हेन्री फौलर ह्यानीं वेलबी कमिशन नेमण्याचें १८९४ सालीं कबूल केलें. या कमिटीस मदत करण्याच्या हेतूनेंच इंडिया वर्तमानपत्र इंग्लंडांत सुरू करण्यांत आलें व त्याच्या द्वारें हिंदुस्थानची बाजू ब्रिटिश जनतेपुढें मांडण्याचा प्रयत्न सुरू झाला. प्रथमतः हें मासिक होतें. १८९८ पासून हें दर आठवड्यास निघत आहे. पार्लमेंटच्या सभासदांस, इंग्लंडांतील प्रमुख राजकीय संस्थांस या पत्राच्या प्रति मोफत देण्यांत येतात. येथील सर्व प्रश्नांची हिंदी बाजू शक्य त्या मार्गानें ब्रिटिश जनतेपुढें मांडण्याचा प्रयत्न चालू आहे. ब्रिटिश जनतेमध्यें येथील परिस्थितीबद्दल ज्ञान पसरण्याकरितां वेळोवेळीं येथून व्याख्यानें देण्याकरितां प्रतिनिधी पाठविण्यांत आले आहेत. राजा राममोहनराय यांचेनंतर १८८५ मध्यें मनमोहन घोस, चंदावरकर व रामस्वामी मुदलीयार हे गेले होते. १८८९ सालीं याच उद्देशानें राष्ट्रीय सभेनें मि. मेथा, मनमोहन घोस, शरफुद्दीन, सुरेंद्रनाथ बानर्जी, उमेशचंद्र बानर्जी यांस प्रतिनिधि म्हणून पाठवून दिले. त्यानंतर १८९०सालीं फिरून मेथा, बानर्जी, घोस, ह्यूम, कालीचरण बानर्जी व नौरोजी यांस विलायतेंतील चळवळीकरितां निवडलें

होतें. १८९६ सालीं मि. वाच्छा, गोखले व सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं राष्ट्रीय सभेच्या वतीनें वेल्बी कमिशनपुढें साक्षी दिल्या. १९०४ सालीं फाळणीमुळें उत्पन्न झालेली अस्वस्थता व फुलरशाहीचा जुलूम यांचें यथार्थ ज्ञान इंग्लंडांतील लोकांस करून देऊन कांहींतरी प्रतिकार व्हावा या हेतूनें गोखले व लाला लजपतराय विलायतेस गेले होते. या शिष्टाईमुळें फुलरसाहेबांस स्वदेशीं परत बोलावण्यांत आलें, पूर्वबंगाल्यांतील अरेरावीस आळा पडला, १९०६ सालींही गोपाळराव गोखले राष्ट्रीय सभेच्या वतीनें विलायतेस गेले होते. हिंदुस्थानांतील अस्वस्थता कमी करण्यास प्रजेस हक्क देऊन संतुष्ट केलें पाहिजे असें त्यानीं तेथें प्रतिपादन केलें; कॉमन्स सभेच्या पुष्कळ सभासदांच्या त्यांनीं मुलाखती घेतल्या, जबाबदार प्रधानमंडळांच्या भेटी घेतल्या, हिंदुस्थानच्या परिस्थितीचें चित्र त्यांजपुढें स्पष्ट रीतीनें मांडण्यांत आलें व याचाच परिणाम १९०९ सालच्या कौन्सिलच्या सुधारणेंत दिसून आला. १९१३ सालींही मि. बसू, जिना, समर्थ, सिंह, शरमा व मझरुल हक यांचें एक डेप्युटशन सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांच्या कौन्सिलच्या सुधारणेसंबंधीं इंग्लंडांतील लोकमत सुशिक्षित करण्यासाठीं पाठविण्यांत आलें होतें. परंतु आयर्लंडांतील होमरूल बिलाच्या अवस्थतेमुळें या प्रयत्नास फारसें यश आलें नाहीं. लालमोहन घोस, सुरेंद्रनाथ बानर्जी, यांच्या अमोघ वक्तृत्वानें, कैलासवासी गोखले यांच्या मुद्देसूद कोटिक्रमानें व कर्णमधूर वाक्प्रवाहानें, ब्रिटिश श्रोतृवृंद तल्लीन झाल्याचा पुष्कळ वेळां अनुभव आलेला आहे. अशा व्याख्यानांपासून इष्ट फलप्राप्ती झाली आहे. इंग्लंडांतील राजकारणी पुरुषांस अधिकारी वर्गाकडून व वर्तमानपत्रांतून देशाच्या स्थितीची एकदेशीय बाजू माहीत असते. दुसरी बाजू—लोकपक्षाचें म्हणणें—त्यांचे समोर जात नाहीं. याच कारणामुळें ब्रिटिश मुत्सद्यांची, राजकारणी पुरुषांची, प्रधानमंडळाची, मुलाखत घेऊन येथील वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान त्यांस करून दिलें असतां, वादविवादानें, कोटिक्रमानें, यथार्थ माहितीनें, त्यांच्याशीं ऊहापोह केला असतां, पुष्कळ वेळां त्यांची सहानु-

भूति मिळवितां येते व त्यांच्या अनुकूलतेचा, प्रोत्साहनाचा व वजनाचा पुष्कळ उपयोग होतो. इंग्लंडांतील पार्लमेंटांत दादाभाईसारखा एखादा प्रतिनिधि असला तरी त्याला महत्तम कार्य घडवून आणतां येतें. कोणत्याही प्रश्नाबद्दल अधिकारानें आपली बाजू पुढें मांडून ती समर्थन करितां येते.

दादाभाई हे जरी एकटे पार्लमेंटांत होते तथापि स्वदेशाबद्दलची त्यांची कळकळ निस्सीम असल्यामुळें त्यांना पुष्कळ काम करितां आलें. स्वकीयांबद्दलची तळमळ व त्यामुळें पडणारा आंतड्यांचा पीळ यांचा जोर कांहीं निराळा आहे. १८९२पासून १९०६पर्यंत दादाभाईंनीं इंग्लंडांत वास्तव्य केलें होतें. हिंदुस्थानच्या हिताकडे त्यांचें रात्रंदिवस लक्ष होतें. त्यांच्या उद्योगाचा परिणाम इतरांवरही होऊन इंग्लंडांत हिंदुस्थानचे पुष्कळ हितचिंतक उत्पन्न झाले. दादाभाई स्वदेशीं परत आल्यानंतर हें काम मि. ह्यूम, सर हेन्री कॉटन व सर वुईल्यम वेडनर्बर्न या तीन परदेशी गृहस्थांवर पडलें. या तिन्ही थोर पुरुषांनीं निरपेक्षपणानें, आपल्या जातिबांधवांची निंदा सोसूनही हें कार्य चालविलें आहे. काळाच्या तडाख्यांतून वांचून आजमित्तीस फक्त वेडनर्बर्न हेच हयात आहेत. त्यांचा स्वार्थत्याग, इतक्या उतार वयांतही ते करीत असलेले परिश्रम व तरुणाहूनही जास्त उत्साही व उल्हासजनक अशी त्यांची वृत्ति हें सर्व पाहून प्रत्येक मनुष्यास त्यांच्याबद्दल कृतज्ञताबुद्धीनें गौरव वाटत आहे. तथापि काल हा सर्वांचे पाठीमागें आहेच. यासाठीं इंग्लंडांतील चळवळीचा प्रश्न अत्यंत काळजीचा वाटत आहे. एकतर या चळवळीस मोठें द्रव्यसहाय लागतें, काम करणारीं माणसें लागतात; हिंदुस्थानच्या परिस्थितीचा अनुभव असलेलीं आज तीस वर्षांच्या कालांत वर नमूद केलेलीं तीनच माणसें हिंदुस्थानास लाभलीं व तींही प्रारंभींच मिळालीं. परंतु या तीस वर्षांत त्यांच्या इतका स्वार्थत्याग करण्यासही सिव्हिल सर्व्हिसमधील पेन्शनरांपैकीं एकही मनुष्य पुढें आलेला नाहीं. यापासून घेण्यासारखा बोध एवढाच आहे कीं, आपल्या देशांतील लोकांनींच आतां या कामीं पुढाकार घेतला पाहिजे.

इंग्लंडांत जाऊन कायमचें वास्तव्य केलें पाहिजे; हिंदुस्थानांतील लोकांनीं उदार बुद्धीनें या कार्यास पैशाचें सहाय केलें पाहिजे; लाल मोहन घोस, सुरेंद्रनाथ बानर्जी, आनंद मोहनबोस यांसारखे वाग्देवीच्या गळ्यांतील ताईत इंग्लंडांत जाऊन त्यांनीं आपल्या अलौकिक वक्तृत्वानें, विशाल विद्वत्तेनें व जीवंत तळमळीनें इंग्लंडांतील लोकांचीं अंतकरणें हालवून सोडलीं पाहिजेत. दादाभाईसारख्या निरलस व निरपेक्ष साधुवृत्तीच्या हिंदी मनुष्यास इंग्लंडच्या लोकांच्या विश्वासास पात्र करून घेण्यास हल्लींतरी कोणती अडचण आहे ? इंग्रजी भाषेमध्यें नैपुण्य संपादन केलेल्या व इंग्रजी भाषेंत वाखाणण्यासारखीं वर्तमानपत्रें किफायतीनें या देशांत चालविणाऱ्या आर्यमातेच्या पुत्रांस इंग्लंडांत जाऊन हा धंदा यशस्वीपणानें करितां येणार नाहीं काय ? राष्ट्रीय सभेनें चालविलेल्या 'इंडिया' पत्रांत सचेनता, भारदस्तपणा, मनोरंजकपणा उत्पन्नकरितां येणार नाहीं काय ? उपयुक्त आणि विविध माहितीचा समावेश करितां येणार नाहीं काय ? येथील कायदेकौन्सिलांत नांवलौकिकास आलेल्या कांहीं थोड्या गृहस्थांनीं स्वार्थत्याग केल्यास 'ब्रिटिश काँग्रेस कमिटी' किंवा 'इंडियन पार्लमेंटरी कमिटी' यांमधील सभासदांच्या संख्येची वाढ करून त्या संस्थांस वजनदार करितां येणार नाहींत काय ? गोपाळराव गोखल्यांप्रमाणें हिंदुस्थानांतील हयात असलेल्या जबाबदार पुढाऱ्यांपैकीं कांहीं सद्गृहस्थांना पैशाची हांव सोडून विलायतेस जाऊन प्रधानमंडळाची, अधिकारी वर्गाची, राजकारणी पुरुषांची, थोर मुत्सद्यांची, मनवळवणी करितां येणार नाहीं काय ? या देशांत राजकारणांत चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांनीं निरपेक्षपणानें तेच प्रयत्न विलायतेंत केल्यास यशःप्राप्ति होणार नाहीं काय ? या सर्व प्रश्नांचीं उत्तरें अस्तिपक्षीं देतां येतील परंतु त्या सर्वांस मुख्य जरूर एकाच गोष्टीची आहे व ती तळमळीच्या व स्वार्थत्याग करणाऱ्या माणसांची होय.

हिंदुस्थान व इंग्लंड यांचा संबंध, व्यवहाराच्या दृष्टीनें विचार करणारास कल्पनेची मजल जाईपर्यंत अस्तित्वांत राहणार आहे असें

स्पष्ट दिसत आहे. ही गोष्ट लक्षांत ठेऊन विचार केला असतां दाद मिळविण्याची मुख्य जागा विलायतेस आहे हें स्पष्ट दिसणार आहे. येथील सत्ताधारी वर्गावरून तेथील लोकस्थितीचें अनुमान करणें चुकीचें आहे. ब्रिटिश जनतेच्या सामान्य कल्पना ब्युरॉक्रसीइतक्या अनुदार नाहींत. तेथील अधिकारी वर्गांत पुष्कळ उदार मतवादी, सात्विक बुद्धीचे गृहस्थ आहेत. येथील अन्यायाच्या आविष्करणानें अशा गृहस्थांस चीड येते; या देशांतील अज्ञान व विपन्न अवस्था ऐकून पुष्कळांस शरम वाटते; शंभर वर्षांच्या सुधारलेल्या राज्यव्यवस्थेखालींही येथील लोकांस प्रातिनिधिक संस्थांचे अद्याप खरे हक्क दिले नाहींत हें पाहून पुष्कळ लोक खालीं मान घालतात. विश्वबंधुत्वाच्या भावनेनें प्रेरित झालेले पुष्कळ सद्गृहस्थ हिंदुस्थानच्या वतीनें झगडण्यास तयार होतात; सारांश, सत्ताधारी वर्गाचें किंवा एकतंत्री अधिकाराचें बंड नाहींसें करण्याचे बाबतींत इंग्लंडांतील सात्विक बुद्धीच्या लोकांची मदत झाली आहे व होत आहे व म्हणूनच शक्य त्या मार्गानें या लोकांची सहानुभूति संपादन करणें येथील चळवळीच्या पुरस्कर्त्यांस अवश्य वाटत आहे. यासाठीं दीर्घोद्योगानें ही सहानुभूति, हें सहाय्य—मिळविलें पाहिजे, मिळेल तें रक्षण केलें पाहिजे, व तें आपल्याच लोकांनीं केल्याशिवाय दुसरा तरणोपाय नाहीं. हें वर निर्दिष्ट केलें आहे. वेडर्बर्नसाहेबांनीं हीच विनंति केली आहे.

'What the Indian people have to realise is that action in favour of Indian aspirations does not spring sponteneously from the ordinary operation of British institutions but has ever been the result of persistent and laborious personal effort on the part of outside reformers working both in India and England.'

## येथील काम.

राष्ट्रीय सभेच्या येथील कामाबद्दलही पुष्कळ सूचना करण्यांत आल्या आहेत. हल्लींच्या तरुण पिढीस आजपर्यंत चाललेलें काम नापसंत असून ते उतावीळ झालेले दिसतात. परंतु राष्ट्रीय सभा अस्तित्वांत आणून तिनें आजपर्यंत आक्रमण केलेला मार्ग गांठण्याकरितां ज्या अडचणी पडल्या, जीं संकटें सोसावीं लागलीं, ज्या दुस्तर परिस्थितींतून

जावें लागलें, त्यांची या मंडळीस बरोबर कल्पना नाहीं. उपहास, निंदा, विरोध व औदासीन्य यांचा जो अनुभव तत्कालिन पिढीस सोसावा लागला त्याची अटकळ हल्लींच्या पिढीस असणें अशक्य आहे. प्रवासाचीं साधनें हल्लींसारखीं उपलब्ध नसतांना, कुटुंबांतील माणसांस घेऊन रात्रीं बे रात्रीं, उन्हातान्हातून, उन्हाळ्यापावसाळ्यांतील हालअपेष्टा सोसून प्रवास करणाऱ्या वडीलधाऱ्या माणसांस जे श्रम पडले, प्रवासांत हिंस्र श्वापदांची व लुटारूंची जी भीति असे, त्यांची ज्यांनीं पर्वा केली नाहीं. मुक्कामाच्या ठिकाणाची आतुरतेनें वाट पहात त्यांना जी जागरूकता ठेवावी लागली, त्यांची कल्पना सुखसाधनांतून प्रवास करणाऱ्या, सृष्टिसौंदर्याचें कुतूहलानें निरीक्षण करणाऱ्या व पाथेयाचा स्वेछेनें उपभोग घेणाऱ्या बाल-गोपालांस काय येणार आहे! ही स्थिति कांहीं अंशीं हल्लींच्या तरुण पिढीची आहे. राष्ट्रीय सभेच्या येथील कामाबद्दल कोणी म्हणतात कीं, तिचें क्षेत्र वाढवून, घटनेस मूर्त स्वरूप देऊन, खेड्यापाड्यांतून तिच्या शाखा स्थापन कराव्या; राष्ट्रीय सभेचें कार्यालय स्थापावें; राष्ट्रीय सभेची शाखा म्हणून बिन सरकारी एक सेक्रेटेरीएट बनवावें; कित्येक म्हणतात कीं, कांहीं विविक्षित प्रश्न हातीं घेऊन त्याबद्दलच सर्व देशभर प्रचंड चळवळ चालू करावी; कित्येकांच्या मतें अर्ज, डेप्युटेशनें, हस्तपत्रकें, जाहिर सभा, व्याख्यानें, यांनीं सर्व देश दणाणून सोडावा; कित्येकांच्या मतें स्वराज्याच्या एकाच कल्पनेनें सर्व राष्ट्रांत चळवळ करावी. याप्रमाणें अनेकांकडून अनेक सूचना करण्यांत येत आहेत. ह्या सर्व प्रामाणिक बुद्धीनें केल्या जात आहेत, या सर्वांचा निष्कर्ष एका शब्दांतच सांगतां येईल व तो शब्द म्हणजे **काम-काम-काम.** परंतु हें झालें तरी माणसांनींच करावयाचें आहे. एखाद्या यंत्राचा शोध लागून त्याच्या सहायानें हें घडवितां येईल असें नाहीं. म्हणजे अर्थात् निरपेक्ष-पणानें व स्वार्थत्यागानें काम करणाऱ्या माणसांवरच देशाची सर्व भिस्त असणार आहे. राष्ट्रीय सभेच्या उत्पत्तीपूर्वी ह्यूमसाहेबांनीं हेंच सांगितलें होतें. या तत्त्वाची खरी उमज देशांतील एका पुरुषासच झाली. स्वानुभवानें व स्वतःच्या उदाहरणानें गोपाळराव गोखले यानीं यासंबंधीं जो उपदेश केला आहे तो निरंतर संस्मरणीय आहेः "How soon or how late the ideal (colonial Self-Govern-

ment ) is realised depends really upon ourselves. Our numbers are so great that no power on Earth can bear our weight for any length of time if only we are true to ourselves. But much work has to be done and enormous sacrifices will have to be made before any real advance in this direction is secured. What we need to-day above every thing else, is a band of workers who will give up theirs all, for their country and spread the gospel of unity and patriotism far and wide hroughout the land. Th e curse of a tendency towards disintigration which still rests upon us must be lifted. Our love of the motherland must grow so fervent and passionate that it will turn all sacrifice for India into a pure joy and the workers must maintain resolute discipline in their ranks. What the situation requires is not new ideas but sacrifice, not talk but work-work early and work late, work when it is dawn and work when it is dark. We are entitled to do such work for our country and it is entirely in accord with the declared object of British Rule in India. We are anxious to do this work without disturbing the harmonious relations that have hitherto existed between Indians and Englishmen and if those who wield power at present in our country choose to turn their backs on solemn promises, given in the name of England and thereby make a continuance of harmonious relations impossible; the responsibility for disturbing these relations will lie on them and not on us. No one knows what the future has in store for us or how much fulfilment our own eyes may witness before they close. But one thing is quite clear. There is nothing in this world of ours, which may not be achieved by men whose lives are inspired by patriotism, sustained by faith and ennobled by sacrifice. India expects that such men shall now come forward in sufficient numbers in her service. If this expectation is realised all else will be well.

गोपाळरावजींचा हा उपदेश मनावर एकदां ठसला, व तो हल्लींच्या तरुण पिढींत कृतींत उतरला तर या उदयोन्मुख राष्ट्राचा भविष्यकाळ निःसंशय आनंददायक होईल, याबद्दल यत्किंचित्‌ही संशय नाहीं.

येथपर्यंत राष्ट्रीय उत्क्रांतीचा इतिहास शक्य तितका संक्षेपानें दिला आहे. राष्ट्रीय चैतन्य कसें प्रदीप्त झालें, आत्मप्रत्याची त्यास कशी जोड मिळाली, एकराष्ट्रीयत्वाची भावना कशी उत्पन्न झाली, तिचा कसा विकास होत गेला, राष्ट्रीय सभेच्या द्वारें तिला कसें मूर्तस्वरूप प्राप्त झालें, सभेवर कोणतीं संकटें ओढवलीं, तिच्यावर कोणते आघात करण्यांत आले, आत्मसंरक्षण करून तिची वाढ कशी होत गेली, या सभेच्या ध्येयाचा कसा विस्तार झाला, तिनें कोणती कामागिरी बजावली, किती यशःप्राप्ती संपादन केली तिजपासून कोणते फायदे झाले, तिच्या अभिवृद्धीकरितां कोणते व कोठें प्रयत्न केले पाहिजेत व तिची खरी भिस्त कोणावर आहे, याचें तात्विक दृष्टीनें विवेचन केलें आहे. राष्ट्रोन्नतीचें खरें हृद्गत गोपाळरावजींच्या शब्दांत वर निर्दिष्ट केलें आहे. प्रत्येक देशभक्तानें त्याचें मनन केल्यास, निजध्यास केल्यास व तदनुसार वर्तन केल्यास देशाचा उत्कर्ष स्पृहणीय होईल. लोककल्याणाच्या प्रयत्नांस दुर्गति कधींही प्राप्त होत नाहीं

सामर्थ्य आहे चळवळीचें ।
जो जो करील त्याचें ॥

हा समर्थांचा उपदेश लक्षांत ठेवल्यास फलप्राप्तीबद्दल निराश होण्याचें मुळींच कारण नाहीं.

ग 2
८२५

# परिशिष्ट अ.

# हिंदी राष्ट्रीय सभेची घटना.

( १९०८ च्या राष्ट्रीय सभेंत मंजूर झालेली व १९११ व १९१२ च्या राष्ट्रीय सभेंत दुरुस्त झालेली. )

## हेतु.

**कलम १.** स्वराज्याचा उपभोग घेणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यान्तर्गत देशांत ज्या स्वरूपाची शासनपद्धति प्रचलित आहे, तसल्या स्वरूपाची शासनपद्धति हिंदी लोकांस प्राप्त व्हावी व त्यांनीं त्या देशांच्या बरोबरीनें साम्राज्याचे हक्क उपभोगावे व जबाबदारीचा वांटा उचलावा हे राष्ट्रीय सभेचे हेतु आहेत. प्रचलित शासनपद्धतींत क्रमाक्रमानें सुधारणा घडवून आणणें, राष्ट्रीय ऐक्याचें संवर्धन करणें, सार्वजनिक हिताचीं कामें स्वतः करण्याविषयींची प्रवृत्ति वाढविणें आणि देशांतील बुद्धिविषयक, नैतिक, सांपत्तिक व औद्योगिक साधनसमुच्चयाला संघटित स्वरूप देऊन पूर्णावस्थेस आणणें या उपायांचा आश्रय करून कॉन्स्टिटयूशनल मार्गानीं या इष्ट हेतूंची सिद्धि करून घ्यावयाची आहे.

**कलम २.** राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक प्रतिनिधीनें घटनेच्या पहिल्या कलमांतें नमूद केलेले राष्ट्रीय सभेचे उद्देश आपणास मान्य आहेत व घटनेप्रमाणें आणि घटनेस जोडलेल्या नियमानुसार वागण्यास आपण राजी आहों, असें लिहून दिलें पाहिजे.

## राष्ट्रीय सभेच्या बैठकी.

**कलम ३.**

( अ ) साधारणपणें हिंदी राष्ट्रीय सभेची बैठक वर्षांतून एक वेळ नाताळच्या सुटींत, पूर्वीच्या बैठकींत ठरविलेल्या ठिकाणीं, होत जाईल.

( ब ) ठिकाण ठरलें नसल्यास त्याबद्दलचा निर्णय ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी करील.

( क ) स्वतःच्या प्रेरणेनें, किंवा प्रांतिक कॉंग्रेस कमिटयांनीं बहुमतानें राष्ट्रीय सभेची विशेष बैठक भरवावी अशी लेखी विनंति केल्यास,

ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें योग्य वाटेल त्या स्थळीं व काळीं अशा प्रकारची विशेष बैठक भरवावी.

( ड ) कांहीं विकट स्वरूपाच्या किंवा अनपेक्षित अडचणी उत्पन्न झाल्यास किंवा तशाच स्वरूपाचें दुसरें कांहीं कारण घडल्यास राष्ट्रीय सभेच्या बैठकीचें एकवार ठरलेलें ठिकाण बदलून दुसऱ्या ठिकाणची योजना करण्याचा अखत्यार ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या हातीं राहील.

## राष्ट्रीय सभा संस्थानाचे घटक.

**कलम ४.** हिंदी राष्ट्रीय सभा संस्थानामध्यें पुढील संस्थांचा समावेश होईल:—

( १ ) हिंदी राष्ट्रीय सभा.

( २ ) प्रांतिक काँग्रेस कमिटया.

( ३ ) जिल्हा काँग्रेस कमिटया, किंवा प्रांतिक काँग्रेस कमिटयांशीं संलग्न असलेलीं मंडळें.

( ४ ) जिल्हा काँग्रेस कमिटयांशीं किंवा मंडळांशीं संलग्न असलेल्या सब-डिव्हिजनल किंवा तालुका काँग्रेस कमिटया.

( ५ ) प्रांतिक काँग्रेस कमिटयांस मंजूर झालेलीं राजकीय मंडळें किंवा सार्वजनिक संस्था.

( ६ ) ऑल इंडिया काँग्रेस कमिटी.

( ७ ) काँग्रेसची ब्रिटिश कमिटी.

( ८ ) प्रांतिक काँग्रेस कमिटीनें निर्माण केलेल्या नियतकालिक संस्था, म्हणजे उदाहरणार्थ—प्रांतिक किंवा जिल्हा-परिषदा किंवा राष्ट्रीय सभेची अथवा प्रांतिक परिषदेची त्या सालची स्वागत कमिटी.

**कलम ५.** ज्याचें वय २१ वर्षांहून कमी असेल व जो घटनेंतील कलम १ यांत नमूद केलेले हेतु मान्य करून घटनेप्रमाणें व घटनेस जोडलेल्या नियमांस अनुसरून चालण्याविषयीं लेखी मान्यता देणार नाहीं, अशा कोणाही व्यक्तीस कोणत्याही प्रांतिक, जिल्हा अगर इतर काँग्रेस कमिटयांचे सभासद होतां येणार नाहीं.

## प्रांतिक काँग्रेस कमिटया.

**कलम ६.** राष्ट्रीय सभाविषयक बाबीसंबंधानें आपापल्या प्रांतापुरती व्यवस्था करण्यासाठीं व योग्य वाटेल त्या रीतीनें प्रांतिक व जिल्हा परिषदांची घटना करण्यासाठीं पुढें दिलेल्या ९ प्रांतांच्या मुख्य शहरीं प्रत्येकीं एक एक प्रांतिक काँग्रेस कमिटी असली पाहिजे:—

[stamp] म. मं. ...

( १ ) मद्रास, (२) मुंबई, (३) संयुक्त बंगाल, (४) संयुक्तप्रांत, ( ५ ) पंजाब ( सरहद्दीवरील वायव्य प्रांत धरून ), ( ६ ) मध्यप्रांत, ( ७ ) बहार व ओरिसा, ( ८ ) वऱ्हाड आणि ( ९ ) ब्रह्मदेश.

**कलम ७.** अशा रीतीनें निर्मिलेल्या प्रत्येक कॉंग्रेस कमिटीनें पुढें दिल्याप्रमाणें अधिक सभासद आपल्या कमिटींत घ्यावे.

( अ ) अमुक वेळां कॉंग्रेसला मुखत्यार म्हणून गेले असतील, अशांना प्रांतिक कॉंग्रेस कमिटींत घेण्यांत यावें, अशा तऱ्हेचा जो निर्बंध प्रत्येक-प्रांतांतील कॉंग्रेस कमिटीनें घालून दिला असेल, त्या नियमानुसार तितके वेळां कॉंग्रेसला मुखत्यार म्हणून गेलेले त्या प्रांतांतील गृहस्थ.

( ब ) आपणांशीं सामील करून घेतलेल्या प्रत्येक जिल्हा कॉंग्रेस कमिटीनें ठरलेल्या नियमांस अनुसरून निवडलेले प्रतिनिधि.

( क ) कलम ४ पोट कलम ( ५ ) मध्यें नमूद केलेल्या राजकीय मंडळांचे अगर सार्वजनिक संस्थांचे प्रत्येक प्रांतिक कॉंग्रेस–कमिटी ठरवील तितके प्रतिनिधि.

( ड ) कलम ६ पोट-कलम ( २ ) प्रमाणें किंवा या कलमांतील वरील पोट-कलमास अनुसरून ज्यांचें नांव कॉंग्रेस-कमिटीचे सभासद या नात्यानें नोंदलें गेलें नसेल असे प्रांतिक कॉंग्रेस-कमिटीच्या हद्दींतच सामान्यतः राहणारे कॉंग्रेसचे सर्व माजी अध्यक्ष किंवा कॉंग्रेसच्या स्वागत कमिटीचे माजी चेअरमन यांस प्रांतिक कॉंग्रेस-कमिटीचे सभासद नेमावें.

( इ ) प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या हद्दींत बहुधा नेहमीं राहणारे कॉंग्रेसचे एक किंवा अनेक जनरल सेक्रेटरी यांचाही त्या प्रांताच्या कॉंग्रेसचे कमिटींत समावेश व्हावा. हे जनरल सेक्रेटरी सदर कमिटीचे एक्स–ऑफिशिओ सभासद समजले जावे.

**कलम ८.** प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या प्रत्येक सभासदानें निदान पांच रुपये वार्षिक वर्गणी दिली पाहिजे.

## जिल्हा कॉंग्रेस कमिट्या व इतर मंडळें.

**कलम ९.** प्रत्येक प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें शक्य असेल तेथें दर जिल्ह्यास, किंवा आपणास योग्य वाटेल तितक्या क्षेत्रापुरती, एक जिल्हा कॉंग्रेस कमिटी किंवा दुसरी एखादी संस्था आपणास अवश्य किंवा इष्ट वाटतील त्या शर्तींवर आपल्याशीं सामील करून घ्यावी. जिल्हा कॉंग्रेस कमिटीनें व दुसऱ्या संस्थांनीं

आपल्याशीं संलग्न असलेल्या तालुका काँग्रेस कमिट्यांशीं मिळून जिल्ह्यांतील राष्ट्रीय सभेचें काम करावें. हें काम हरएक बाबतींत प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या देखरेखी-खालीं व पसंतीनें चाललें पाहिजे.

**कलम १०.** डिस्ट्रिक्ट काँग्रेस कमिटीचा किंवा असोसिएशनचा प्रत्येक सभासद त्या जिल्ह्यांतील एक तर रहिवाशी असला पाहिजे, किंवा त्या जिल्ह्यांत त्याचा विशेष हितसंबंध असला पाहिजे व त्यानें कमींत कमी एक रुपया वार्षिक वर्गणी दिली पाहिजे.

**कलम ११.** कलम ४ पोट-कलम ( ३ ) व ( ५ ) यांत नमूद केलेल्या कोण-त्याही संस्थेला प्रांतिक काँग्रेस कमिटीनें ठरविलेली वार्षिक वर्गणीची रक्कम दिल्याशिवाय काँग्रेस कमिटींत प्रतिनिधी निवडून देण्याचा किंवा राष्ट्रीय सभेंत अथवा प्रांतिक परिषदेंत आपल्या वतीचे मुखत्यार पाठविण्याचा हक्क प्राप्त होणार नाहीं.

**कलम १२.** प्रत्येक काँग्रेस कमिटीनें काँग्रेसच्या घटनेशीं व नियमांशीं विसंगत न होतील अशा तऱ्हेचे आपआल्या कामाचे नियम करावे. कलम ९ मध्यें नमूद केलेल्या कोणत्याही जिल्हा काँग्रेस कमिटीस किंवा इतर संस्थेस आपल्या प्रांतांतील प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या नियमांशीं विसंगत असे कोणतेही नियम करतां येणार नाहींत.

## ऑल इंडिया काँग्रेस कमिटी.

**कलम १३.** ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची घटना शक्य तितकी पुढें दिल्या-प्रमाणें असावी.

| प्रांत. | प्रतिनिधींची संख्या. | प्रांत. | प्रतिनिधींची संख्या. |
|---|---|---|---|
| मद्रास ... ... ... ... | १५ | मध्यप्रांत ... ... ... | ७ |
| मुंबई ... ... ... ... | १५ | बहार व ओरिसा ... ... | १५ |
| संयुक्त बंगाल ... ... ... | २० | वऱ्हाड ... ... ... | ५ |
| संयुक्त प्रांत ... ... ... | १५ | ब्रह्मदेश ... ... ... | २ |
| पंजाब, वायव्य सरहद्दीवरील प्रांतासह | १३ | | |

प्रतिनिधींच्या एकंदर संख्येपैकीं होतां होईल तों $\frac{१}{५}$ संख्या मुसलमान प्रतिनि-धींची असावी. याशिवाय हिंदुस्थानांत राहात असलेले किंवा हजर असलेले काँग्रे-सचे सर्व माजी अध्यक्ष व काँग्रेसचे जनरल सेक्रेटरीज हेही ऑल इंडिया काँग्रेसचे कमिटीचे एक्स–ऑफिशिओ सभासद असावे. काँग्रेसचे जनरल सेक्रेटरीज हे ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचेही एक्स–ऑफिशिओ जनरल सेक्रेटरीज असावे.

**कलम १४.** प्रत्येक प्रांतातर्फे ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत निवडून द्याव-याच्या सभासदांची निवड प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें होतां होईल तों दरवर्षी ता. ३० नोव्हेंबरपूर्वी करावी. एखाद्या प्रांतिक कॉंग्रेस कमिटीकडून ही निवड न झाल्यास पुढील राष्ट्रीय सभेंत त्या प्रांतातर्फे हजर राहणाऱ्या मुखत्यारांनीं त्या निवडणुकीचें काम करावें. प्रत्येक प्रांता निहाय हे प्रतिनिधि प्रांतिक कॉंग्रेस कमिटयांच्या सभासदांमधूनच निवडून दिले पाहिजेत व ही निवड करितांना १३ व्या कलमांतील मुसलमान प्रतिनिधींसंबंधाच्या शर्तीकडे शक्य तितकें लक्ष दिलें पाहिजे.

**कलम १५.** निरनिराळ्या प्रांतांनीं अशा रीतीनें निवडलेल्या प्रतिनिधींचीं नांवें जनरल सेक्रेटरीस कळवावीं. हीं नांवें एक्स–ऑफिशियो सभासदांच्या नांवासुद्धां राष्ट्रीय सभेंत जाहीर करण्यांत यावीं.

**कलम १६.** राष्ट्रीय सभेच्या ज्या बैठकींत ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी अस्तित्वांत येईल, त्या सभेचे अध्यक्ष सामान्यतः हिंदुस्थानांत राहात असल्यास ते ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे एक्स–ऑफिशिओ अध्यक्ष होतील. त्यांच्या गैरहजिरींत ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभासदांनीं स्वतःच अध्यक्षांची निवड करावी.

**कलम १७.**

( अ ) अशा रीतीनें अस्तित्वांत आलेली ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी राष्ट्रीय सभेच्या बैठकींत तिची नेमणूक झाल्या वेळेपासून पुढें नवी कमिटी नेमीपर्यंत अधिकारांत राहील.

( ब ) मृत्यु, राजीनामा किंवा इतर कांहीं कारणांनीं ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींतील सभासदांची एखादी जागा रिकामी झाल्यास ज्या प्रांताच्यासंबंधानें ही जागा रिकामी पडेल, त्या प्रांताच्या बाकीच्या सभासदांना ही जागा अवशिष्ट मुदतीपर्यंत भरण्याचा अखत्यार असावा.

**कलम १८.**

( अ ) राष्ट्रीय सभेचें काम चालू ठेवून तिच्या मताचा प्रसार करण्यासाठीं ज्या ज्या गोष्टी अवश्य व व्यवहार्य असतील, त्या त्या करण्याची तजवीज करणें हें काम ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचें आहे.

या घटनेंत ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या अधिकारांत किंवा कर्तव्यांत ज्या गोष्टी नमूद केल्या आहेत, त्यांशिवाय राष्ट्रीय सभेच्या नांवानें व तिच्या हेतूच्या सिद्धीसाठीं ज्या कांहीं अति महत्वाच्या व तांतडीच्या गोष्टी करणें जरूर असेल, त्या करण्याचा अधिकार ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीस असावा.

( ब ) वर निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रसंगीं ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें दिलेला निर्णय अखेरचा समजला पाहिजे व त्या निर्णयानें राष्ट्रीय सभा, स्वागत कमिटी किंवा प्रांतिक कमिटी-जिच्याशीं या निर्णयाचा संबंध येईल ती-बांधली जाईल.

**कलम १९.** ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या कमींत कमी २० सभासदांनीं लेखी मागणी केल्यास जनरल सेक्रेटरींनीं ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा शक्य तितक्या तांतडीनें बोलवावी.

## मतदार मंडळें व मुखत्यार.

**कलम २०.** पुढें दिलेल्या संस्थांना हिंदी राष्ट्रीय सभेस मुखत्यार निवडून देण्याचा हक्क आहे:—

( १ ) कॉंग्रेसची ब्रिटिश कमिटी.

( २ ) उपरिनिर्दिष्ट नियमांस अनुसरून स्थापन झालेल्या प्रांतिक कमिट्या, जिल्हा कमिट्या व इतर संस्था.

( ३ ) प्रांतांतील प्रांतिक कॉंग्रेस कमिटीस मंजूर झालेल्या दोन वर्षांहून अधिक काळ अस्तित्वांत असलेल्या राजकीय मंडळें किंवा सार्वजनिक संस्था.

( ४ ) ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीस मंजूर झालेलीं ब्रिटिश हिंदुस्थानच्या हद्दीबाहेर राहणाऱ्या ब्रिटिश हिंदी गृहस्थांचीं राजकीय मंडळें, व

( ५ ) प्रांतिक किंवा जिल्हा कॉंग्रेस कमिट्यांनीं किंवा मंजूर झालेल्या इतर संस्थांनीं बोलाविलेल्या जाहीरसभा.

**कलम २१.** हिंदी राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक प्रतिनिधीनें १० रुपये फी दिली पाहिजे व त्याचें वय निवडणुकीच्या वेळीं २१ वर्षांहून कमी असतां कामा नये.

## कॉंग्रेसची स्वागत कमिटी.

**कलम २२.**

( अ ) ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरावयाची असेल तेथील प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें स्वागत कमिटी नेमण्याची तजवीज करावी. त्या प्रांताचा जो रहिवासी असेल, घटनेच्या ५ व्या कलमांतील शर्ती ज्याकडून पुऱ्या केल्या जातील व जो प्रांतिक कॉंग्रेस कमिटी ठरवील तेवढी पैशाची मदत देईल त्याला स्वागत कमिटीचा सभासद होण्याची पात्रता प्राप्त होईल.

( ब ) जो फक्त स्वागत कमिटीचा सभासद असेल, पण मुखत्यार निवडून आला नसेल, त्याला कॉंग्रेसमध्यें मत देतां येणार नाहीं किंवा कॉंग्रेसमध्यें होणाऱ्या चर्चेंत सामील होतां येणार नाहीं.

( क ) स्वागत कमिटीनें राष्ट्रीय सभेच्या सर्व खर्चाचा व राष्ट्रीय सभेचा रिपोर्ट तयार करण्यास, छापण्यास, प्रसिद्ध करण्यास व वांटण्यास लागणाऱ्या जरूर तितक्या खर्चाच्या पैशाचा पुरवठा केला पाहिजे.

## अध्यक्षाची निवडणूक.

**कलम २३.**

( अ ) निरनिराळ्या प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांनीं जूनअखेरपर्यंत राष्ट्रीय सभेचे त्या वर्षी अध्यक्ष होण्यास जे गृहस्थ योग्य आहेत असें त्यांना वाटेल त्यांचीं नांवें स्वागत कमिटीस सुचवावीं; अशा रीतीनें सुचविलेलीं नांवें त्यांतून निवड करून शेवटची शिफारस करण्याकरितां स्वागत कमिटीनें सर्व प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांकडे जुलईच्या पहिल्या आठवड्यांत पाठवावीं; ( मात्र ही शेवटची शिफारस प्रत्येक प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें या सुचविलेल्या नांवांतून एकाच नांवाची करावी, अधिक नांवांची करूं नये ) आणि प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांनीं केलेल्या या शेवटच्या शिफारशींचा विचार करण्याकरितां स्वागत कमिटीनें ऑगस्ट महिन्यांत आपली सभा भरवावी. प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांनीं बहुमतानें सुचविलेलें अध्यक्षांचें नांव, अध्यक्षाच्या निवडणुकीचा विचार करण्यासाठीं भरविलेल्या स्वागत कमिटीच्या विशेष सभेतील सभासदांस बहुमतानें मान्य झाल्यास, ते गृहस्थ पुढील राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होतील; परंतु प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांनीं सुचविलेलें नांव स्वागत कमिटीस मान्य न होईल, अगर वर वर्णिलेल्या रीतीनें निवडलेल्या अध्यक्षांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिल्यामुळें किंवा ते वारल्यामुळें किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें नवा अध्यक्ष निवडावा लागल्यास ती गोष्ट तावडतोब ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीस कळविण्यांत यावी. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें होतां होईल तों या प्रश्नाचा निर्णय सप्टेंबर महिना संपण्यापूर्वी करावा. वरील दोहोंपैकीं कोणत्याही मार्गानें निवड झाली तरी ती निवड कायमची समजावी. ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरावयाची असेल, त्या प्रांतांतील गृहस्थांस कधींही राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष निवडूं नये.

( ब ) कॉंग्रेसकडून किंवा कॉंग्रेसमध्यें अध्यक्षाची औपचारिक निवडणूक करण्यांत येणार नाहीं. फक्त ( घटनेस जोडलेल्या नियमांतील कलम ३ पोट कलम ( २ ) यास अनुसरून ) वर वर्णिलेल्या रीतीनें आ-

धींच निवडलेल्या अध्यक्षास आसनारूढ होण्याबद्दल विनंति करण्याचा एक औपचारिक ठराव करण्यांत याव.

## विषयनियामक कमिटी.

**कलम २४.** कॉंग्रेसच्या प्रत्येक बैठकींत कार्यक्रम ठरविण्यासाठी नेमावयाच्या विषयनियामक कमिटीची रचना शक्य तितकी पुढीलप्रमाणें असावी:—

| प्रांत. | प्रतिनिधींची जास्तींत जास्त संख्या. | प्रांत | प्रतिनिधींची जास्तींत जास्त संख्या. |
|---|---|---|---|
| मद्रास ... ... ... | १५ | मध्यप्रांत ... ... ... | ७ |
| मुंबई ... ... ... ... | १५ | बहार व ओरिसा ... ... | १५ |
| संयुक्त बंगाल... ... ... | २० | वऱ्हाड ... ... ... | ५ |
| संयुक्त प्रांत ... ... ... | १५ | ब्रह्मदेश ... ... ... | २ |
| पंजाव ( वायव्य सरहद्दीवरील प्रांत धरून ) ... ... | १३ | कॉंग्रेसची ब्रिटिश कमिटी ... | ५ |

ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरेल त्या प्रांतातर्फे जादा प्रतिनिधी ... .... १०

विषयनियामक कमिटींतील हे सर्व प्रतिनिधि निरनिराळ्या प्रांतांतून राष्ट्रीय सभेचे निवडून आलेल्या प्रतिनिधींनीं घटनेस जोडलेल्या ९ व्या नियमास अनुसरून निवडून दिले पाहिजेत.

त्या वर्षीचे कॉंग्रेसचे अध्यक्ष, त्या वर्षीचे स्वागत कमिटीचे अध्यक्ष, कॉंग्रेसचे सर्व माजी अध्यक्ष, पूर्वीच्या स्वागत कमिट्यांचे माजी अध्यक्ष, कॉंग्रेसचे जनरल सेक्रेटरी, त्या वर्षीच्या कॉंग्रेसचे स्थानिक सेक्रेटरी ( ही संख्या सहांहून अधिक नसावी ), त्या वर्षीच्या ऑल इंडिया कमिटीचे सर्व सभासद सर्व विषयनियामक कमिटीचे एक्स-ऑफिशिओ सभासद मानले जावे.

**कलम २५.** त्या वर्षाच्या कॉंग्रेसच्या अध्यक्षांनीं विषयनियामक कमिटीचे एक्सऑफिशिओ चेअरमन व्हावें, आणि अल्पसंख्याक लोकांच्या वतीनें किंवा विषयनियामक कमिटींतील दुसरी कांहीं उणीव दूर करणें अवश्य दिसल्यास त्या कमिटींत पांच प्रतिनिधी नेमण्याचा अधिकार त्यांना असावा.

## वादग्रस्त विषय व अल्पसंख्याक लोकांचे हितसंबंध.

**कलम २६.**

( अ ) जो विषय चर्चेसाठीं घेऊं नये असें हिंदु किंवा मुसलमान प्रतिनिधींच्या तीनचतुर्थांश संख्येस वाटेल, तो विषय विषयनियामक कमि-

# राष्ट्रीय सभेचे जनरल सेक्रेटरी.



ए. ओ. ह्यूम
जनरल सेक्रेटरी (माजी)



पंडित अयोध्यानाथ
जा. जनरल सेक्रेटरी (माजी)



दाजी आबाजी खरे
जा. जनरल सेक्रेटरी (माजी)



सुब्बराव पंतुलू
जा. जनरल सेक्रेटरी

टीनें चर्चेसाठीं मंजूर करूं नये किंवा कॉंग्रेसच्या अध्यक्षांनीं कॉंग्रेसमध्यें त्या विषयावर चर्चा होऊं देऊं नये. चर्चेसाठीं मंजूर झालेल्या एखाद्या विषयावर वाद झाल्यानंतर हिंदु किंवा मुसलमान प्रतिनिधीं-पैकीं ¾ प्रतिनिधी त्या विषयावर करावयाच्या ठरावास विरुद्ध असले तर तो ठराव गाळण्यांत यावा. मात्र हे तीनचतुर्थांश प्रतिनिधी दोन्ही प्रसंगीं राष्ट्रीय सभेंत जमलेल्या एकंदर प्रतिनिधींच्या एकचतुर्थांशापेक्षां कमी असूं नयेत.

( ब ) कॉंग्रेस ज्या कांहीं गोष्टी सरकारच्या नजरेस आणील किंवा राज्यकारभारांत लोकांचा अधिक शिरकाव व्हावा, म्हणून ज्या कांहीं मागण्या करील, त्यांमध्यें अल्पसंख्याक लोकांच्या हिताच्या रक्षणाविषयीं खबरदारी घेतली जावी.

## मतें घेण्याची रीति.

**कलम २७.** साधारणपणें सर्व प्रश्नांचा निकाल घटनेस जोडलेल्या २१ व्या नियमान्वयें बहुमतानें केला जाईल. परंतु घटनेचें कलम ३० यांत नमूद केलेल्या प्रसंगीं किंवा २२ व्या नियमास अनुसरून मतें घ्यावीं, म्हणून योग्य रीतीनें मागणी करण्यांत येईल, तेव्हां प्रांतवारीनेंच फक्त मतें घेतलीं जातील. कलम ३० पोट कलम ( १ ) मध्यें नमूद केलेल्या प्रसंगीं प्रत्येक प्रांतांला फक्त एकच मत देतां येईल व त्या प्रांतातर्फे कॉंग्रेसमध्यें जे प्रतिनिधि हजर असतील, त्यांच्या बहुमतास अनुसरून हें मत दिलें जावें. प्रांतवारीनें मतें घेण्याच्या इतर सर्व प्रसंगीं वर वर्णिलेल्या पद्धतीनें दिलेलें प्रांताचें मत ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची घटना करण्यांत त्या प्रांताच्या वांटणीस जितके प्रतिनिधि येतील त्या संख्येबरोबर समजलें जाईल.

## कॉंग्रेसची ब्रिटिश कमिटी.

**कलम २८.** ज्या प्रांतांत कॉंग्रेस भरेल, त्या प्रांतांतील स्वागत कमिटीनें प्रतिनिधींकडून आलेल्या फीच्या रकमेपैकीं निम्मी रक्कम कमींत कमी तीन हजार रुपये कॉंग्रेसच्या ब्रिटिश कमिटीकडे पाठवावी.

## जनरल सेक्रेटरीज.

**कलम २९.**

( अ ) राष्ट्रीय सभेला दोन जनरल सेक्रेटरीज असावेत व त्यांची निवडणूक दरवर्षी राष्ट्रीय सभेनें करावी. कॉंग्रेसचे रिपोर्ट तयार करणें, प्रसिद्ध

करणें व वांटणें यावद्दलची जबाबदारी त्याचेवर असावी; त्यांजकडे जमा होणाऱ्या रकमांचा पुरा हिशेब व त्या वर्षाच्या कामाचा अहवाल त्यांनीं त्या वर्षी राष्ट्रीय सभा भरेल त्या ठिकाणीं व राष्ट्रीय सभेच्या बैठकीच्या सुमारास ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीस सादर करावा; आणि त्या हिशोबाच्या आणि अहवालाच्या प्रती सर्व प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांना आगाऊ पाठवाव्या.

( **ब** ) स्वागत कमिटीच्या ताब्यांत असलेल्या शिलकेंतून किंवा योग्य वाटेल त्या प्रमाणांत प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांकडून मागविलेल्या पैशांतून ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें जनरल सेक्रेटरीस कराव्या लागणाऱ्या कामास पैशाचा योग्य पुरवठा करावा.

## घटना व नियम यांत फेरबदल.

**कलम ३०.** ( १ ) सर्व प्रांतांचें एकमत झाल्याशिवाय घटनेच्या पहिल्या कलमांत कांहीं अधिक घालूं नये, फेरफार करूं नये, किंवा त्यांत दुरुस्ती करूं नये.

( २ ) घटनेंतील इतर कलमांत किंवा घटनेस जोडलेल्या नियमांत, सर्व प्रांतांचें $\frac{2}{3}$ बहुमत झाल्यावांचून, फेरफार किंवा दुरुस्ती करण्यांत येऊं नये.

त्या वर्षाच्या कॉंग्रेसच्या विषयनियामक कमिटीच्या आगाऊ मंजुरीशिवाय वर सांगितलेल्या दोन रीतींपैकीं कोणत्याही रीतीनें असे फेरफार किंवा दुरुस्त्या कॉंग्रेसपुढें कधींही आणतां येणार नाहींत.

# हिंदी राष्ट्रीय सभेच्या कामासंबंधाचे नियम.

( १९०८, १९११ व १९१२ च्या राष्ट्रीय सभेंत मंजूर झालेले. )

**नियम १.** नाताळाच्या सुटींत स्वागत कमिटी निश्चित करील त्या दिवशीं व घटनेच्या तिसऱ्या कलमान्वयें ठरविलेल्या ठिकाणीं साधारणपणें राष्ट्रीय सभेची वार्षिक बैठक होत जाईल. ऑल इंडिया काँग्रेस कमिटी ठरवील त्या स्थळीं व काळीं राष्ट्रीय सभेची विशेष बैठक होईल.

**नियम २.** स्वागत कमिटी जाहीर करील त्या स्थळीं व वेळीं प्रतिनिधींची सभा भरून प्रत्येक काँग्रेसच्या बैठकीस सुरुवात होईल. त्या बैठकींतील पुढील अधिवेशनें कोठें व्हावयाचीं हें अध्यक्ष ठरवितील व त्याप्रमाणें जाहीर करतील.

**नियम ३.** सुरुवातीच्या दिवशीं व प्रत्येक राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनांत होतां होईल तों पुढें दिल्याप्रमाण कामें होतील:—

( अ ) स्वागत कमिटीच्या अध्यक्षांचें प्रतिनिधींस उद्देशून प्रास्ताविक स्वागतपर भाषण.

( ब ) स्वागत कमिटीनें किंवा ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें ( जशी स्थिति असेल त्याप्रमाणें ) निवडलेल्या अध्यक्षांनीं स्थानापन्न व्हावें अशी विनंति करण्याचा एक औपचारिक ठराव पास करण्यांत यावा. स्वागत कमिटीचे अध्यक्ष ज्या प्रतिनिधींस विनंति करतील किंवा परवानगी देतील, त्यांनीं हा ठराव पुढें आणणें, त्याला अनुमोदन देणें व दुजोरा देणें हीं कामें करावीं. दुरुस्तीची, सभा तहकूब ठेवण्याची किंवा दुसरी एखादी सूचना पुढें आणून हा ठराव पास करण्याचें काम दिरंगाईवर टाकण्याची किंवा त्याच्या अंमलबजावणीस अडथळा करण्याची कोणालाही परवानगी नसावी.

( क ) अध्यक्ष स्थानापन्न होऊन त्यांचें प्रास्ताविक भाषण होईल.

( ड ) ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें रिपोर्ट तयार केला असल्यास तो वाचावा किंवा वांटावा व जनरल सेक्रेटरींनीं कांहीं विशेष कळविणें असल्यास कळवावें.

( ई ) अध्यक्षांनीं आभारप्रदर्शन, अभिनंदन किंवा खेदप्रदर्शन यासंबंधाचे कांहीं औपचारिक ठराव जरूर वाटल्यास स्वतःच सभेपुढें मांडणें.

( फ ) विषयनियामक कमिटी नेमण्याकरितां व विषयनियामक कमिटींतील प्रतिनिधि निवडण्यासाठीं निरनिराळ्या प्रांतांच्या प्रतिनिधींनीं कोठें व

केव्हां सभा भरवाव्या व विषयनियामक कमिटीची बैठक केव्हा व कोठें व्हावयाची हें अध्यक्षांकडून जाहीर होण्यासाठीं सभेचें काम तहकूब ठेवण्यांत यावें.

**नियम ४.** कॉंग्रेसच्या बैठकीच्या पहिल्या अधिवेशनांत वरील कामाशिवाय दुसरें कोणतेंही काम करण्यांत येऊं नये, किंवा करण्याची कोणत्याही स्वरूपाची सूचना आणण्याची परवानगी देण्यांत येऊं नये.

**नियम ५.** कॉंग्रेसचे अध्यक्ष स्थानापन्न होईपर्यंत स्वागत कमिटीच्या अध्यक्षांनीं बैठकीच्या पहिल्या अधिवेशनाच्या वेळीं अध्यक्षांचे अधिकार चालवावेत. कॉंग्रेसचे अध्यक्ष असतील तेच त्या बैठकींतील सर्व अधिवेशनांचे व विषयनियामक कमिटीच्या सर्व सभांचे अध्यक्ष असावेत. त्यांच्या गैरहजिरात सभेंत हजर असलेल्या व ते नेमतील त्या कॉंग्रेसच्या माजी अध्यक्षांनीं, किंवा असे अध्यक्ष मिळण्यासारखे नसतील तेव्हां स्वागत कमिटीच्या अध्यक्षांनीं, कॉंग्रेच्या बैठकींत अध्यक्षांचे काम करावें.

( अपवाद ) अशा प्रसंगीं विषयनियामक कमिटीनें वाटल्यास आपला अध्यक्ष निवडावा.

**नियम ६.** मतें देण्याच्या सर्व प्रसंगीं कॉंग्रेसच्या किंवा स्वागत कमिटीच्या अध्यक्षाला एखाद्या प्रश्नावर भिन्न पक्षाचीं सारखीं मतें पडल्यास, स्वतःच्या मताशिवाय एक निर्याणक मत देण्याचा अधिकार असावा.

**नियम ७.** वहिवाटीच्या किंवा काम करण्याच्या पद्धतीसंबंधाच्या सर्व प्रश्नांचा निकाल कॉंग्रेसच्या किंवा स्वागत कमिटीच्या अध्यक्षांनीं तावडतोब द्यावा व तो निकाल अखेरचा समजून सर्वांनीं मान्य केला पाहिजे.

**नियम ८.** विशेष तीव्र स्वरूपाची अस्वस्थता झाल्यास किंवा दुसऱ्या कोणत्याही योग्य कारणासाठीं विशिष्ट मुदतीपर्यंत किंवा पुढील दिवस न नेमतां कॉंग्रेस तहकूब करण्याचा अधिकार कॉंग्रेसचे किंवा स्वागत कमिटीचे अध्यक्ष यांस असावा.

**नियम ९.** विषयनियामक कमिटीच्या सभासदांची निवड निरनिराळ्या प्रांतांच्या मुखत्यारांनीं अध्यक्ष जाहिर करतील त्या स्थळीं व वेळीं जमून करावी. स्पर्धा असल्यास अशा प्रत्येक सभेला एक अध्यक्ष असावा, या अध्यक्षांनीं प्रथम निदान दोन प्रतिनिधि ज्यांचीं नांवें सुचवितील तीं नांवें नोंदावीं. अशा रीतीनें नोंदलेलीं सर्व नांवें जाहिर करून नंतर अध्यक्षांनीं प्रत्येक सभासदाकडे त्याला ज्या गृहस्थांना निवडून द्यावयाचें असेल त्यांच्या नांवांची यादी मागावी, किंवा नोंदण्यांत आलेल्या नांवांसंबंधानें वाटेल त्या क्रमानें अध्यक्षांनीं मतें घ्यावींत, अथवा जेव्हां प्रतिनिधींच्या दोनच प्रतिस्पर्धी यादी असतील, तेव्हां अध्यक्षांनीं त्या यादीवर मतें घ्यावींत व निवडणुकीचा निकाल तावडतोब कॉंग्रेसच्या जनरल सेक्रेटरीस कळवावा.

**नियम १०.** विषयनियामक कमिटीनें कॉंग्रेसच्या बैठकीपुढें यावयाच्या प्रश्नांची चर्चा करून त्या बैठकींतील कार्यक्रमपत्रिका तयार करावी. जनरल सेक्रेटरीनीं होतां होईल तों प्रत्येक बैठकीला सुरुवात होण्यापूर्वी त्या बैठकींत होणाऱ्या कामकाजाची छापील पत्रिका प्रतिनिधींस वांटावी.

**नियम ११.** कॉंग्रेसच्या प्रत्येक बैठकींत कामाचा अनुक्रम पुढें दिल्याप्रमाणें असावा:—

( अ ) विषयनियामक कमिटीनें पास करण्यांत यावे म्हणून शिफारस केलेले ठराव.

( ब ) प्रस्तुत नियमांतील ( अ ) पोटकलमांत समाविष्ट न झालेली व घटनेंतील कलम ३० खालीं न येणारी कोणतीही स्वतंत्र सूचना कॉंग्रेसपुढें मांडण्यास परवानगी देण्याविषयीं २५ प्रतिनिधींनीं त्या दिवसाच्या बैठकींत सुरुवात होण्यापूर्वी अध्यक्षांस लेखी विनंति केल्यास ती घेणें.

( अपवाद ) विषयनियामक कमिटीच्या सभेंत अशा प्रकारच्या सूचनेवर वादविवाद होऊन तिला त्या वेळीं विषयनियामक कमिटींत हजर असलेल्या $\frac{1}{3}$ सभासदांचा पाठिंबा मिळाल्यावांचून अशी सूचना कॉंग्रेसपुढें मांडतां येणार नाहीं.

**नियम १२.** वरील नियमानें त्या नियमाच्या ( अ ) पोट कलमांत उल्लेख केलेल्या ठरावांचा अनुक्रम बदलण्यास किंवा स्वतःच आभार, अभिनंदन, खेदप्रदर्शन वगैरेसारखे औपचारिक ठराव पुढें मांडण्यास अध्यक्षांस कोणत्याही प्रकारें प्रतिबंध होणार नाहीं.

**नियम १३.** विषयनियामक कमिटीनें मंजूर केलेले ठराव कॉंग्रेसपुढें मांडणें, त्यांस अनुमोदन देणें व त्यांचें समर्थन करणें हीं कामें करणारे कॉंग्रेसचे प्रतिनिधिच असले पाहिजेत व त्यांची निवड विषयनियामक कमिटीकडून झाली असली पाहिजे. अध्यक्षांनीं मर्जीस वाटल्यास इतर प्रतिनिधींस ठरावावर बोलूं द्यावें व एखाद्या सन्माननीय प्रेक्षकास कॉंग्रेसपुढें बोलण्यास परवानगी द्यावी. स्वतःच कांहीं ठराव सभेपुढें मांडण्याचा अधिकार अध्यक्षांना विषयनियामक कमिटीनें दिला असेल तर त्यांना तसें करण्यास या नियमानें प्रतिबंध होणार नाहीं.

**नियम १४.** कोणत्याही ठरावावर उपसूचना आणतां येईल; मात्र ती उपसूचना वादविषयक मुद्यास लागू असावी. तिनें आधींच निर्णीत झालेला किंवा त्या दिवसाच्या कार्यक्रमपत्रिकेंतील ठरावांत अंतर्भूत झालेला पण पुढें येणारा एखादा विषय उपस्थित करूं नये. उपसूचनेची भाषा नीटनेटकी असावी व ती कॉंग्रेसच्या मूलभूत तत्त्वांस विरोधी अशी नसावी. प्रत्येक उपसूचना पूर्ण ठरावाच्या स्वरूपाची असावी.

**नियम १५.** जेव्हां एखाद्या ठरावावर उपसूचना येतील, तेव्हां त्या उपसूचना ज्या क्रमानें आल्या असतील, त्यांच्या उलट क्रमानें त्यांच्यावर मतें घेण्यांत येतील.

**नियम १६.** एखाद्या ठरावावरील वादविवाद किंवा सभा तहकूब ठेवावी अशी उपसूचना वाटेल त्या वेळीं आणतां येईल. दुसऱ्या प्रकारची उपसूचना पुढें आणणारानें ती सूचना पुढें आणण्यास काँग्रेसच्या किंवा स्वागत कमिटीच्या अध्यक्षांची संमति मिळविली पाहिजे. तहकुबीची सूचना त्रासदायक अथवा कामास अडथळा करणारी आहे किंवा कामासंबंधाच्या नियमांचें अतिक्रमण करणारी आहे असें काँग्रेसच्या किंवा स्वागत कमिटीच्या अध्यक्षांस वाटल्यास त्या सूचनेवर मतें घेण्याचें नाकारण्याचा त्यांस अधिकार असावा.

**नियम १७.** सर्व सूचनांना–मग त्या स्वतंत्र असोत किंवा उपसूचना, तहकुबी, वगैरे संबंधानें असोत–अनुमोदन मिळणें जरूर आहे. अनुमोदन न मिळाल्यास त्या रद्द समजाव्या. कोणतीही सूचना–मग ती नियम ११ पोटकलम ( व ) खालीं येणारी असो किंवा दुरुस्ती, तहकुबी किंवा वादविवादाची बंदी यांविषयीं असो–अध्यक्षांना आगाऊ सूचना दिल्यावांचून ती सूचना पुढें आणतां येणार नाहीं. अशा प्रकारची सूचना स्पष्टपणें लिहून ती पुढें आणणारांच्या व अनुमोदन देणारांच्या सह्यांनिशीं व सूचना करणारे आणि अनुमोदन देणारे ज्या प्रांतांतील असतील त्या प्रांतांच्या नांवानिशीं अध्यक्षांकडे देण्यांत आली पाहिजे.

**नियम १८.** ज्या कोणीं काँग्रेसपुढें आलेल्या एखाद्या ठरावावर वादविवाद केला असेल त्या गृहस्थास त्या ठरावावरील वादविवाद चालू असतां तहकुबीची किंवा दुरुस्तीची सूचना पुढें आणतां येणार नाहीं, किंवा दुसऱ्यानें आणलेल्या सूचनेस अनुमोदन देतां येणार नाहीं. एखाद्या ठरावावरील वादविवाद तहकूब करण्याविषयींची सूचना पास झाल्यास त्या ठरावावरील वादविवाद त्या वेळीं बंद होईल व त्या दिवसासाठीं कार्यक्रमांत नमूद केलेलीं कामें संपल्यावर पाहिजे तर तो वादविवाद पुनः सुरू होईल. सभा तहकूब ठेवण्याविषयींच्या सूचनेंत सभेच्या कामास पुनः केव्हां सुरुवात व्हावी याबद्दलचा स्पष्ट उल्लेख असावा.

**नियम १९.** सूचना पुढें आल्यापासून अर्धा तास लोटल्यावर वाटेल त्या सूचनेवरील वादविवाद बंद करण्याची सूचना आणतां येईल. अशा तऱ्हेची वादविवाद बंद करण्याची सूचना पास झाल्यास मूळ सूचनेवरील व त्या सूचनेवर आलेल्या उपसूचनेवरील सर्व वादविवाद एकदम बंद होईल व अध्यक्ष त्या वादविषयक प्रश्नावर मतें घेतील.

**नियम २०.** एखादा प्रतिनिधि योग्य रीतीनें सभेमध्यें बोलत असता वादविवाद बंद करण्याची सूचना पुढें आणतां येणार नाहीं.

**नियम २१.** घटनेचें कलम २७ व ३० यांस विरोध न येईल अशा रीतीनें सर्व प्रश्नांचा निकाल बहुमतानें केला जाईल. हात वर करून, किंवा आपआपल्या

ठिकाणीं अनुकूल किंवा प्रतिकूल मत देणें असेल त्याप्रमाणें आळीपाळीनें उभें राहून, प्रतिनिधींनीं आपलीं मतें द्यावींत म्हणजे त्या संख्येची मोजदाद करतां येईल.

**नियम २२.** घटनेच्या ३० व्या कलमांत अंतर्भूत न होणाऱ्या प्रसंगीं अध्यक्षांनीं मतांचा निकाल जाहिर केल्यापासून पांच मिनिटांच्या आंत कॉंग्रेसमधील कोणीही २० सभासदांनीं अनूकल प्रतिकूल मतें मोजण्याची मागणी केल्यास ती मान्य करावी, नंतर अध्यक्ष सांगतील त्या स्थळीं व वेळीं प्रत्येक प्रांताच्या प्रतिनिधींनीं जमावें व त्या प्रतिनिधींच्या प्रत्येक सभेच्या अध्यक्षांनीं नेमून दिलेल्या वेळांत आपआपल्या प्रांताचें अनुकूल प्रतिकूल मत कळवावें.

**नियम २३.** कॉंग्रेसमधील किंवा विषयनियामक कमिटीमधील प्रत्येक सभासदानें पुढील नियम अवश्य पाळले पाहिजेत.

( अ ) नियम ३० खालीं ज्यांस विशेष हक्क प्राप्त झाले असतील; त्यांशिवाय इतरांनीं आपआपल्या प्रांतांस आंखून दिलेल्या जागेंतच बसलें पाहिजे.

( ब ) अध्यक्ष भाषण करण्यास उठतील किंवा दुसरा एक सभासद सभेस उद्देशून बोलत असेल तेव्हां गप्प बसलें पाहिजे.

( क ) हुश, हुश करूं नये, कोणत्याही प्रकारचा अडथळा करूं नये, गैरवाजवी किंवा सभास्थानास अयोग्य अशी भाषा वापरूं नये.

( ड ) अध्यक्षाचे हुकूम मानावे.

( ई ) स्वतःच्या वर्तनासंबंधानें चर्चा होऊन आपल्यावर ठेवण्यांत आलेल्या आरोपाला उत्तर दिल्यावर सभेंतून निघून जावें.

( फ ) साधारणपणें प्रत्येकानें शिष्टाचार व सभ्यता यांस अनुसरून वागलें पाहिजे.

**नियम २४.** कॉंग्रेसमधील कोणत्याही सभासदास कोणत्याही ठरावावर व्यक्तिविषयक खुलासा करण्याची किंवा वहिवाटीचा प्रश्न उपस्थित करण्याची गरज असल्यावांचून एकाहून अधिक वेळ बोलतां येणार नाहीं. परंतु स्वतंत्र सूचना पुढें मांडणारांस ( दुरुस्तीची किंवा तहकुबीची नव्हे ) उत्तर देण्याचा हक्क आहे. ज्यानें एखाद्या विषयावर वादविवाद केला असेल, त्याला स्वतःच्या भाषणानंतर पुढें आलेल्या दुरुस्तीच्या किंवा तहकुबीच्या सूचनेवर बोलतां येईल. सर्व वक्त्यांनां वेळाची मर्यादा घालून देण्याचा, त्याप्रमाणेंच एखादा वक्ता तेंच तें पुनः बोलूं लागेल, अयोग्य भाषा वापरील, किंवा अप्रस्तुत गोष्टींचा उल्लेख करील व अध्यक्षाचा इषारा मिळाला असतांही हटवादीपणानें आपलाच क्रम चालू ठेवील, तर अशा वक्त्याला कालमर्यादा संपण्यापूर्वींच व्यवस्थित रीतीनें बोलण्याविषयीं किंवा भाषण बंद करण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार कॉंग्रेसच्या किंवा स्वागत कमिटीच्या अध्यक्षास असावा.

**नियम २५.** जर एखादी व्यक्ति काँग्रेसच्या किंवा स्वागत कमिटीच्या अध्यक्षाचे हुकूम मानणार नाहीं किंवा गैरशिस्त वर्तन करील, तर एकवार इषारा देऊन, व तिरस्कारानें ती व्यक्ति अध्यक्षाच्या अधिकाराचा उपमर्द करील तर इषारा न देतां देखील, त्या व्यक्तीस सभागृह सोडून जाण्याचा हुकूम करण्याचा अधिकार अध्यक्षास असावा. अध्यक्षांनीं वरील प्रकारचा हुकूम केल्यावर त्या व्यक्तीनें सभागृह सोडून जावें व त्या दिवसाच्या बैठकीपुरते त्या सभासदाचे प्रतिनिधींचे हक्क काढून घेण्यांत यावेत.

**नियम २६.** वरील नियमास अनुसरून जी शिक्षा देण्याचा अधिकार स्वतःस आहे ती शिक्षा अपुरी आहे असें अध्यक्षास वाटल्यास त्यांनीं त्या सभासदास सभेस योग्य वाटेल तें अधिक शासन करण्याची सभेस विनंति करावी. अशां प्रसंगीं त्या सभासदास काँग्रेसच्या सर्वंध बैठकींतून घालवून देण्याचा अधिकार काँग्रेसला असावा.

**नियम २७.** काँग्रेसच्या किंवा स्वागत कमिटीच्या बैठकींत किंवा मतें घेण्याच्या वेळीं व्यवस्था राखण्यासाठीं स्वागत कमिटीस योग्य वाटतील त्या व्यक्तींची त्यांनीं एक मंडळी नेमावी. या मंडळीवर एक कॅप्टन नेमावा व या कॅप्टननें काँग्रेसच्या किंवा स्वागत कमिटीच्या अध्यक्षाचे हुकूम अंमलांत आणावे.

**नियम २८.** स्वागत कमिटी ठरवील त्या शर्तींवर काँग्रेसमध्यें हजर राहण्याची प्रेक्षकांस परवानगी द्यावी. वाटेल त्या वेळीं प्रेक्षकास सभागृह सोडून बाहेर जाण्यास सांगण्याचा अधिकार अध्यक्षांस असावा. प्रतिनिधींसाठीं राखून ठेविलेल्या जागेंत कोणी प्रेक्षक प्रवेश करील, किंवा अध्यक्षाचे हुकूम अमान्य करील, अथवा गडबड किंवा अडथळा करील, किंवा कोणत्याही रीतीनें गैरशिस्त वर्तन करील, तर त्यास ताबडतोब सभागृहांतून हांकून लावण्यांत येईल.

**नियम २९.** विषयनियायक कमिटींत फक्त त्या कमिटींतील सभासदांसच व मतें घेण्याचे वेळीं भरविण्यांत येणाऱ्या प्रांताच्या प्रतिनिधींच्या सभेंत फक्त त्या प्रांतांतील प्रतिनिधींसच हजर राहतां येईल.

( अपवाद ) वरील दोनही प्रसंगीं २७ व्या नियमांत नमूद केलेल्या व्यक्तींना हजर रहातां येईल.

**नियम ३०.** स्वागत कमिटीचे व काँग्रेसचे अध्यक्ष यांनीं व सेक्रेटरींनीं इष्ट वाटेल त्याप्रमाणें अध्यक्षाच्या उच्चासनावर ( १ ) काँग्रेसचे प्रमुख सभासद, ( २ ) सन्मान्य प्रेक्षक, ( ३ ) स्वागत कमिटीचे सभासद, ( ४ ) स्त्रिया–मग त्या प्रतिनिधि असोत वा प्रेक्षक असोत, व ( ५ ) ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे सभासद इतक्यांस बसण्याची सोय करावी.

**नियम ३१.** घटनेच्या ६ व्या कलमान्वयें प्रांतिक काँग्रेस कमिट्यांकडून भरविण्यांत आलेल्या प्रांतिक व जिल्हा परिषदेस वरील नियम अवश्य ते फेरफार करून लागू करण्यांत यावेत.

# परिशिष्ट ब.

# RULES

OF THE

## Bombay Provincial Congress Committee.

(Framed under Article XII of the "Constitution of the Indian National Congress Organisation" at present in force).

1. The Bombay Provincial Congress Committee shall have the following Officers:—A President, 3 Secretaries and a Council of management of not less than 15 and not more than 25 members, exclusive of the President and the Secretaries, who shall be ex-officio members of the Council.

2. All the aforesaid Officers shall be elected every year at the Annul General Meeting of the Bombay Provincial Congress Committee to be held in the month of November. Till the Annual General Meeting in November 1915, the Officers shall be appointed by such Resolution as may be passed in that behalf by the meeting of the Bombay Provincial Congress Committee at which these Rules are adopted.

3. The Council may fill up any vacancy in the list of Officers till the date of the next election.

4. Any member of the Bombay Provincial Sub-Committee of the Convention, on his satisfying the requirements of Article V of the Constitution before the 15th of December 1908, will be enrolled as a member of the Bombay Provincial Congress Committee.

5. Under Article VII (*a*) of the Constitution any person in the Province of Bombay who has attended as a

Delegate not less than two Sessions of the Congress, one of which at least was held outside the province of Bombay, will be eligible for membership of the Bombay Provincial Congress Committee provided he fulfils the conditions laid down in Article V of the Constitution. On his sending to any of the Secretaries of the Bombay Provincial Congress Committee Form B duly filled in and signed by him and on the Secretaries or any of them certifying thereon that the Form has been correctly filled in and signed and is otherwise free from doubt or objection, he may be enrolled as a member of the Bombay Provincial Congress Committee. In case of any doubt or objection, the Secretaries shall refer the matter to the Council for decision.

6. The Bombay Provincial Congress Committee shall have affiliated to itself a District Congress Committee or Association for each District, wherever possible, or for such areas in the Town and Island of Bombay or elsewhere in the Province as the Council may determine, subject to the following conditions or terms of affiliation besides those which the Council may in each case from time to time deem expedient or necessary:—

(*a*) Every member of a District Congress Committee or Association must satisfy the requirements of Articles V and X of the Constitution as per Form C.

(*b*) Every District Congress Committee or Association must contribute an annual subscription of Rs. 20 to the Bombay Provincial Congress Committee under Article XI of the Constitution.

(*c*) Every such District Congress Committee or Association may under Article VII (*b*) and (*c*) of the Constitution, elect its representatives as members of the Bombay Provincial Congress Committee as under:—

One representative for the first ten members on its roll and one additional representative for every additional thirty members, subject to a maximum of four representatives and a minimum of one representative in any case whatever the number of members on its roll.

(*d*) Every District Congress Committee or Association shall apply for affiliation to the Bombay Provincial Congress Committee as per Form D.

7. A Political Association or Public Body of more than two years' standing in any part of the Province of Bombay may be recognised by the Council as an Electorate entitled to return representatives to the Bombay Provincial Congress Committee or Delegates to the Indian National Congress or to the Provincial Conference organised by the Bombay Provincial Congress Committee, provided and so long as

(*a*) it expresses by a Resolution at a General Meeting of its members, its acceptance of the principles embodied in Article I of the Constitution and makes the acceptance of the same a condition precedent to new membership and,

(*b*) it contributes to the Bombay Provincial Congress Committee, under Article XI of the constitution, an annual subscription of Rupees fifty, if the Political Association or Public Body is situate in any part of the Town and Island of Bombay, and Rupees twenty-five, if it is situate elsewhere.

8. A Political Association or Public Body, recognised as an Electorate in the manner hereinabove laid down, may, under Article VII (*c*) of the Constitution, elect its representatives as members of the Bombay Provincial Congress Committee as under :—

(a) In the case of a Political Association of Public Body situate in any part of the Town and Island of Bombay, one representative for every thirty members on its roll, subject to a maximum of ten representatives and a minimum of one representative in any case whatever the number of members on its roll.

(b) In the case of a Political Association or Public Body situate elsewhere in the Province of Bombay, one representative for every twenty-five members on its roll, subject to a maximum of five representatives and minimum of one representative in any case whatever the number of members on its roll.

9. The annual subscription payable by every member of the Bombay Provincial Congress Committee shall be Rs. 5.

10. The Annual General Meeting of the Bombay Provincial Congress Committee shall be held in the month of November for the following purposes :—

(a) To receive and adopt the annual report and the Statements of Accounts as submitted by the Secretaries after being approved by the Council.

(b) To elect Officers for the ensuing year.

(c) To transact any other business mentioned in the notice of meeting.

(d) To transact such other business as the President or Chairman of the Meeting may direct or permit to be brought forward.

11. The Secretaries may, in consultation with the President, call Meetings of the Bombay Provincial Congress Committee or of the Council whenever they may deem necessary. On receipt of a written requisition, clearly specifying the object for which the meeting is to be called,

signed by not less than 15 members, the Secretaries shall call a meeting of the Bombay Provincial Congress Committee.

12. As a general rule, a notice of every General or Special Meeting, unless it is an adjourned Meeting, shall be issued at least seven days before the date of the meeting by the Secretaries to the registered address of Members, specifying the day, hour, place and business of the Meeting.

13. Receipts for subscriptions and donations, if any, shall be signed by any one of the Secretaries, and all moneys belonging to the Bombay Provincial Congress Committee shall be invested in such manner as the Council may from time to time order.

14. By sanction of the Council, the Secretaries may appoint, from among the members of the Bombay Provincial Congress Committee, Assistant Secretaries to assist them in any of the following areas or such other areas as the Council may from time to time determine :—(1) Sind ; (2) Kathiawad ; (3) Northern Division ; (4) Southern Division ; (5) Central Division ; and (6) the Town and Island of Bombay.

15. The rules of procedure contained in the "Rules for the Conduct and Regulation of the Indian National Congress Meetings" will be followed, as far as they can be made applicable, in all meetings of the Bombay Provincial Congress Committee.

*Bombay Provincial Congress Committee.*

## Form B.

(For membership of the Bombay Provincial Congress Committee under Article VII (*a*) of the Constitution.)

---

1. I have read the " Constitution of the Indian National Congress Organisation " and " Rules for the Conduct and Regulation of the Indian National Congress Meetings " at present in force.

2. I hereby express in writing my acceptance of the objects of the Congress as laid down in Article I of the said Constitution and my willingness to abide by the said Constitution and the said Rules.

3. I fulfil the condition as to age limit laid down in Article V of the said Constitution.

4. I am a resident of the Province of Bombay and have attended as a Delegate not less than two Sessions of the Indian National Congress, one of which at least was held outside the Province of Bombay, namely, ( here mention the places and years of the aforesaid Sessions of the Congress.)..............................................................................................

..............................................................................................

Name in full..............................................................................................

Occupation or designation in full..............................................................................................

..............................................................................................

Religion, Caste &c..............................................................................................

Address..............................................................................................

Date and Place..............................................................................................

Signature..............................................................................................

Certified that this form has been correctly filled in and signed by the person aforesaid and is otherwise free from doubt or objection.

Dated ........................................ ........................................

Hon. Secretary,

Bombay Provincial Congress Committee.

# Form C.

(For membership of a District Congress Committee).

1. I have read the "Constitution of the Indian National Congress Orgainsation" and "Rules for the Conduct and Regulation of the Indian National Congress Meetings" at present in force.

2. I hereby express in writing my acceptance of the Objects of the Congress as laid down in Article I of the said Constitution and my willingness to abide by the said Constitution and the said Rules.

3. I fulfil the condition as to age limit laid down in Article V of the said constitution.

4. I am a resident of this District. (To be scored out, if the intending member does not fulfil this condition but fulfils the next following). I have a substantial interest in this District, namely, (here mention the nature of the substantial interest)..........................................

..............................................................................................

..............................................................................................

Name in full..............................................................................

Occupation or designation in full..........................................

..............................................................................................

Religion, Caste &c...................................................................

Address......................................................................................

Date and Place..........................................................................

Signature...................................................................................

## Form D.

(For affiliation of a District Congress Committee or Association to the Bombay Provincial Congress Committee)

*To*

**The Hon. *Secretaries*, Bombay Provincial Congress Committee.**

DEAR SIRS,

1. We have formed a District Congress Committee or Association for the District of............................................................................ and desire to have it affiliated to the Bombay Provincial Congress Committee in accordance with Rule 6 of yonr Committee.

2. Every member of our Committee or Association has satisfied—and no person shall be admitted to membership of our Committee or Association unless he satisfies—the requirements of Articles V and X of the Constitution as per Form C.

3. Our Committee or Association agrees to contribute an annual subscription of Rs. 20 to the Bombay Provincial Congress Committee.

4. We have (here enter the number)..................members on our roll at present and the annual subscription for every member of our Committee or Association is Rs..........................

5. Our Committee or Association agrees to supply such information from time to time as your Committee may require in regard to our Committee or Association or our District and to assist your Committee in all Congress matters including the organising of Provincial or District Conferences and generally to co-operate with your Committee and carry out its directions or give effect to its decisions.

Date..............................

Place..............................

(Signature of the President or Chairman of the District Congress Committee.) ..............................
..............................

(Signature or signatures of the Hon. Secretary or Secretaries of the District Congress Committee.) ..............................
..............................
..............................

परिशिष्ट क.

# Government Servants and the Congress.

## An Incident of 25 Years Ago.

### THE GOVERNMENT OF INDIA RULE.

The following orders, referred to in the correspondence given below, were issued by the Government of India to all the Local Governments and Administrations.

From, C. J. Lyall Esq. C. I. E.

OFFG. SECY. TO THE GOVT. OF INDIA.

To

All Local Governments and Administrations.

*Calcutta, March 18th 1890.*

SIR,

I am directed to say that the Governor-General in Council has had under consideration the attitude which should be maintained by officers in the service of Government towards political or quasi-political movements with which they may be brought in contact. Servants of Government have not the same liberty of action as private individuals and are bound to hold themselves aloof from many movements which are perfectly legitimate in themselves and which private persons are free to promote. Their participation in such movements is open to objection, because their connection with them is likely to create, and even to be appealed to for the purpose of creating, a false impression in the minds of ignorant persons that such movements have the countinance of Government, and because their influence with the community at large is liable to be impaired by identifying themselves with the class by which the movement is promoted.

2. For these reasons His Excellency in Council desires that the following rules may be observed by all Government servants :—

(a) As a general rule no officer of Government should attend at a political meeting where the fact of his presence is likely to be misconstrued or to impair his usefulness as an official.

(b) No officer of Government may take part in the proceedings of a political meeting or in organizing or promoting a political meeting or agitation.

(c) If in any case an officer is in doubt whether any action which he proposes to take would contravene the terms of this order, the matter should be referred to the Head of the Department or District and if necessary to the Local Government or Administration.

I have the honour to be
Sir,
Your most obedient servant,
C. J. LYALL,
Offg. Secretary to the Government of India.

The Congress passed the following resolution on the 29th December 1890:—

GOVERNMENT OFFICIALS AND THE CONGRESS.

" That this Congress, having observed with surprise a notice, apparently official, in various Calcutta news papers which runs as follows:—

THE CONGRESS.

The Bengal Government having learnt that tickets of admission to the visitors' enclosure in the Congress pavilion have been sent to various Government officers residing in Calcutta, has issued a circular to all secretaries, and heads of departments subordinate to it, pointing out that under the orders of the Government of India the presence of Government officials, even as visitors at such meetings, is not advisable and that their taking part in the proceedings of any such meetings is absolutely prohibited.

And having also considered a letter addressed by the Private Secretary of His Honour the Lieutenant-Governor of Bengal to the Secretary of the Reception Committee, of which the following is an exact copy:—

" Belvedere, 26th December, 1890.

DEAR SIR,—In returning herewith the seven cards of admission to the visitors' enclosure of the Congress pavilion, which were kindly sent by you to my address yesterday afternoon, I am desired to say that the Lieutenant-Governor and the members of his household could not possibly avail themselves of these tickets, since the orders of the Government of India definitely prohibit the presence of Government officials at such meetings.—

Yours faithfully,
P. C. Lyon, Private Secretary,

To J. Ghosal Esq. Secretary, Congress Reception Committee.

Authorises and instructs its president to draw the attention of His Excellency the Viceroy, to the declaration embodied in these papers that

Government servants are prohibited from attending any meetings of this Congress even as spectators, and to enquire most respectfully whether His Honour the Lieutenant-Governor of Bengal has or has not correctly interpreted the orders of the Government of India."

Government House, Calcutta.

*January 19th 1891.*

DEAR SIR,

With reference to the comm unications which have recently taken place, first between Mr. Mehta and the Viceroy, and after Mr. Mehta's departure from Calcutta between yourself and His Excellency, upon the subject of the letter received by the Secretary of the Lieutenant-Governor of Bengal, in reference to the attendance of Government servants at meetings of the Congress, I am authorised by His Excellency to say that Mr. Lyon's letter of December 26th, in which it was stated that "the orders of the Government of India definitely prohibit the presence of Government officials at such meetings" and the Circular in which that letter was communicated to she heads of departments under the Bengal Government, were issued under a misapprehension as to the purport of the orders of the Government of India. It was at once recognised by the Government of Bengal, of its own motion, aud by the Government of India, that the letter in question went beyond those orders, and an amended circular in which it was pointed out that the expression "absolute prohibition" had reference only to the participation of Government officials in the proceedings of a political meeting, was subsequently issued by the Bengal Govenment to the heads of departments. I enclose here with a copy of the orders of the Government of India. Those orders, wnich arose, out of a totally different matter, had no special reference to the Congress movement, and were certainly not framed in a spirit of hostility to it. The publications of some of the supporters of the Congress have, in the opinion of the Government of India, been open to serious question ; but apart from this, the movement is regarded as one of those which, in the words of the Circular, are "perfectly legitimate in themselves and which private persons are free to promote," but from participation in which Government officials are, for the reasons specified in the orders, necessarily debarred.

The Government of India recognise that the Congress movement is regarded as representing in India what in Europe would be called the more advanced Liberal party, as distinguished from the great body of conservative opinion which exists side by side with it. They desire themselves to maintain an attitude of neutrality in their relations with both parties, so long as these act strictly within constitutional limits.

They intend that all Government Servants shall preserve a similar attitude of neutrality, and shall abstain from active participation in political or quasi-political movements of all kinds ; and also from putting pressure upon others in order to induce them to take part or not to take part, in any movement which is legitimate in itself. It was with the above objects that the orders of March 1890 were issued.

In reference to a specific question which you addressed to His Excellency, I am to say that the orders apply only to those who are actually, at the time being, Government Servants but not to pensioners and others who have quitted the service of the Government for good.

Yours truly,

J. C. ARDAGH,

Private Secretary to the Viceroy.

To

A. O. HUME, ESQ., C. B.

## परिशिष्ट ड.

| अधिवेशन. | वर्ष. | स्थळ. | अध्यक्ष. | स्वागत कमिटीचे अध्यक्ष. | प्रतिनिधींची संख्या. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८८५ | मुंबई | डब्ल्यु. सी. बानर्जी. | | ७२ |
| २ | १८८६ | कलकत्ता | दादाभाई नौरोजी. | डॉ. राजेंद्रलाल मित्र. | ४३६ |
| ३ | १८८७ | मद्रास | बद्रुद्दिन तय्यबजी. | सर. टी. माधवराव. | ६०७ |
| ४ | १८८८ | अलाहाबाद | जॉर्ज यूल. | पंडित अयोध्यानाथ. | १२४८ |
| ५ | १८८९ | मुंबई | सर वुइलियम् वेडरबर्न. | फेरोजशहा मेथा. | १८८९ |
| ६ | १८९० | कलकत्ता | फेरोजशहा मेथा. | मनमोहन घोस. | ६७७ |
| ७ | १८९१ | नागपूर | आनंदाचार्लू. | नारायणस्वामी नायडू. | ८१२ |
| ८ | १८९२ | अलाहाबाद | डब्ल्यु. सी. बानर्जी. | पंडित विश्वंभरनाथ. | ६२५ |
| ९ | १८९३ | लाहोर | दादाभाई नौरोजी. | सरदार दयाळसिंग. | ८६७ |
| १० | १८९४ | मद्रास | ऑल्फ्रेड वेब. | रंगय्या नायडू. | ११६३ |
| ११ | १८९५ | पुणें | सुरेंद्रनाथ बानर्जी | विष्णु मोरेश्वर भिडे. | १५८४ |
| १२ | १८९६ | कलकत्ता | रहिमतुल्ला सयानी. | रमेशचंद्र मित्र. | ७८४ |
| १३ | १८९७ | उमरावती | शंकर नायर. | दादासाहिब खापर्डे. | ६९२ |
| १४ | १८९८ | मद्रास | आनंद मोहन बोस. | सुब्राव पंतुलु. | ६१४ |
| १५ | १८९९ | लखनौ | आर. सी. दत्त. | बाबु बनसीलाल सिंग. | ७३९ |

## परिशिष्ट ड ( पुढें चालू )

| अधिवेशन. | वर्ष. | स्थळ. | अध्यक्ष. | स्वागत कमिटीचे अध्यक्ष. | प्रतिनिधींची संख्या. |
|---|---|---|---|---|---|
| १६ | १९०० | लाहोर | नारायण गणेश चंदावरकर. | काली प्रसन्न राय. | ५६७ |
| १७ | १९०१ | कलकत्ता | डी. ई. वाच्छा. | नाटोरचे महाराज जोगेंद्रनाथ राय | ८९६ |
| १८ | १९०२ | अहमदाबाद | सुरेंद्रनाथ बानर्जी. | अंबालाल साखरलाल. | ४७१ |
| १९ | १९०३ | मद्रास | लाल मोहन घोस. | नबाब सय्यद महमद. | ५३८ |
| २० | १९०४ | मुंबई | सर हेनरी कॉटन. | सर फेरोजशहा मेथा. | १०१० |
| २१ | १९०५ | बनारस | ना. गोपाळ कृष्ण गोखले. | मुनशी माधवलाल. | ७५६ |
| २२ | १९०६ | कलकत्ता | दादाभाई नौरोजी. | डॉ. राशबिहारी घोस. | १६६३ |
| २३ | १९०७ | सुरत | डॉ. राशबिहारी घोस. | त्रिभुवनदास मालवी. | १२०० |
| २४ | १९०८ | मद्रास | डॉ. राशबिहारी घोस. | के. कृष्णस्वामी राव. | ६१७ |
| २५ | १९०९ | लाहोर | पंडित मदनमोहन मालवीय. | लाला हरकिसन लाल. | २४३ |
| २६ | १९१० | अलाहाबाद | सर. वुइलियम वेडरबर्न. | पंडित सुंदरलाल. | ६३६ |
| २७ | १९११ | कलकत्ता | पंडित बिशन नारायण धार. | बाबु भूपेंद्र बसू. | ४४६ |
| २८ | १९१२ | बंकीपुर | आर. एन्. मुधोळकर. | मझरूल हक्क | २०० |
| २९ | १९१३ | कराची | नबाब सय्यद महंमद. | हरिश्चंद्रराय विशनदास. | ३४९ |
| ३० | १९१४ | मद्रास | बाबू भूपेंद्रनाथ बसू. | सर. सुब्रम्हण्य अय्यर. | ८६६ |

## परिशीष्ट इ.

राष्ट्रीय सभेचीं अधिवेशनें प्रांतवारीनें खालीं दिल्याप्रमाणें झालीं त:—

| | |
|---|---|
| मुंबई इलाखा | ७ |
| मद्रास | ६ |
| बंगाल | ६ |
| पंजाब | ३ |
| संयुक्तप्रांत | ५ |
| मध्यप्रांत | २ |
| बहार | १ |

इलाख्याच्या राजधानीच्या गांवांतून व इतर गांवांतून खालीं लिहिल्याप्रमाणें अधिवेशनें झालीं आहेत:—

| | |
|---|---|
| मुंबईशहर | ३ |
| मद्रास | ६ |
| कलकत्ता | ६ |
| लाहोर | ३ |
| अलाहाबाद | ३ |
| नागपूर | १ |
| बंकिपूर | १ |
| | २३ |

पुणें, अहमदाबाद, सुरत, कराची या मुंबई इलाख्यांतील प्रांतिक शहरांतून, लखनौ व बनारस या संयुक्त प्रांतांतील प्रांतिक शहरांतून व मध्यप्रांतांतील उमरावती या ठिकाणीं राष्ट्रीय सभा भरल्या आहेत. बंगाल, मद्रास, पंजाब व बहार या प्रांतांतील राजधानीखेरीज इतर

भागांत राष्ट्रीयसभेचा अद्याप मुळींच प्रवेश झाला नाहीं.

राष्ट्रीय सभेच्या २४ अध्यक्षांची जातवारी खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:

३ पार्शी, ३ मुसलमान, ४ युरोपियन १४ हिंदु.

धंद्याच्या दृष्टीनें हें वर्गीकरण खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

३ पेन्शन घेतलेले सरकारी नोकर, २ व्यापारी, १४ वकिलीचा धंदा करणारे, व ४ जनसेवक ( public men ) आहेत.

प्रांतवारीनें अध्यक्षांचा मान मुंबई इलाख्यापैकीं ७, बंगाल्यांतील मद्रासेंतील ३, संयुक्तप्रांतांतील २, व मध्यप्रांतांतील १, गृहस्थांस मिळाला आहे. पंजाब व बहार या प्रांतांतील लोकांस हा मान अद्यापपर्यंत मिळालेला नाहीं.

## राष्ट्रीय सभेचे जनरल सेक्रेटरी.

| नांव | वर्ष |
|---|---|
| ए. ओ. ह्यूम | १८८५ ते १९०६ |

## जॉइंट जनरल सेक्रेटरी.

| | |
|---|---|
| पंडित अयोध्यानाथ | १८९१।१८९२ |
| आनंदा चार्लू | १८९३ |
| डी. ई. वाच्छा | १८९६ ते १९१३ |
| ना. गोपाळ कृष्ण गोखले | १९०४ ते १९०७ |
| दाजी आबाजी खरे | १९०८ ते १९१३ |
| नबाब सय्यद महमद<br>सुबराव पंतुलु | १९१४ |